# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा इतिवृत्त

## दिनांक १६-१०-१९९७ ते ३०-३-१९९८

## रजिष्टर क्र. ७

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १६-१०-१९९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. दि. १६-१०-९७ रोजी मा. सभापती श्री. प्रभाकर सिताराम विधाते यांच्या अध्यक्षते खाली दुपारी ४.०० वाजता स्थायी समितीची सभा संपन्न झाली. प्रस्तुत सभेस अधिकारी वर्ग व खालीलप्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. गिरजाराम हाळनोर
२) श्री. सुभाष टाकळकर
३) श्री. त्रिंबक तुपे
४) श्री. कचरु नवपुते
५) श्री. अभिमन्यु भालेराव
६) श्री. विकास जैन
७) श्री. भगवान घडामोडे
८) श्री. म.अ. रऊफ स.अ. माबुद
९) श्री. संजय जोशी
१०) श्री. गौतम लिंबाजी लांडगे
११) सौ. यशोदा धनंजय वाडेकर

**संवाद :**

**श्री. कचरु नवपुते :** लोकपत्र व नवा मराठा या दै. वृत्तपत्रात अशी बातमी छापुन आली की हर्सुल शाळेतील अपंग विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मंजुर होऊन समाजकल्याण विभागाने शाळेत पत्राने कळविले व संबंधीत मुख्यध्यापिकेने सदरची शिष्यवृती तेथील पाण्यांना न सांगता वर्गातील विद्यार्थ्यांच्या शाळेतच मुलांच्या स्वाक्षऱ्या घेऊन शिष्यवृत्ती दिल्याने खोटे कागदावर लिहुन घेतले. ज्या वेळी त्या पालकांनी मुख्याध्यापिकेस विचारणा केली असता ती शिष्यवृत्ती वाटप केली असे सांगितले एंकदरीत १९६०/- रुपयांची अफरातफर या अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती संबंधीत मुध्याध्यापिकेने केली आहे ते खरे आहे. काय? या बाबतची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त-२** : संबंधीत बाबतीत हर्सुलच्या मुख्याध्यापिका यांना " कारणे दाखवा नोटीस" बजावण्यात आली असुन शिक्षण अधिकाऱ्यांना चौकशी करण्याचे सांगितले आहे. चौकशी करुन पुढील बैठकीत माहिती देण्यांत येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : शिष्यवृत्ती मंजुर झाली नाही असे पत्र सदरील मुख्याध्यापकाने दिनांक १९-९-९७ रोजी पालकांना दिलेले आहे. शिष्यवृत्तीची रक्कम ज्या ज्या विद्यार्थ्यांना दयावयाची होती त्याची यादी दिनांक ३-८-९६ ला सदरील मुख्याध्यापकाकडे आलेली आहे व कोणत्या विद्यार्थ्यांना किती किती रक्कम दयावयाची याची माहिती असतांना संबंधीत मुख्याध्यापिकेने कार्यालयाकडे काहीही न सांगता परस्पर त्यांनी पत्र दिलेले आहे. व अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कमेत अफरातफर केली ही बाब गंभीर असुन संबंधीत मुख्याध्यापिकेवर कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा केल्याप्रमाणे पुढच्या बैठकीला या बाबत सविस्तर माहिती देण्यात येईल.

**उप आयुक्त-२ :** पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** मागील वर्षात मध्यवर्ती जकात नाका व इतर नाक्यावर वायरलेस सेट घ्यावयाचे ठरले होते, त्याचे काय झाले याची माहिती दयावी.

**उप आयुक्त-१ :** जकात नाक्यावर व झोन कार्यालय येथे वायरलेस सेट घेण्याबाबतचा प्रस्ताव तयार केला असता रु. १०.०० लाखाचे अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षित होता याबाबत टेंडर काढुन आवश्यक ती कार्यवाही करणे ठिक राहील त्यामुळेच विलंब लागलेला आहे.

**अग्नीशामन अधिकारी :** फिक्वेन्सी व्हॉलिड नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** फ्रिक्वेन्सी व्हॉलिड नसल्यास याबाबत टेंडर मागवुन वायरलेस सेट घेण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री. संजय जोशी :** कोटला पाण्याची टाकी येथे वायरलेस आहे. परंतु तो नादुरुस्त आहे ते खरे आहे काय?

**मा. सभापती :** ठिक आहे संबंधीत अधिकारी यांनी या बाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** महानगरपालिकेमध्ये विदयुतलाईन गेल्यानंतर शासकीय कामात अडथळा निर्माण होतो. त्याकरिता आपण महानगरपालिकातर्फे एक जनरेटर घ्यावयाचे ठरवले होते. त्याबाबत काय झाले त्याची माहिती दयावी.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** जनरेटर महानगरपालिकेकडे आलेले असुन जनरेटर ठेवण्यासाठीचे खोली बांधकाम चालु आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** संत एकनाथ रंगमंदिर येथे कुलिंगची व्यवस्था फेल ठरलेली आहे. याची माहिती दयावी.

**अति. शहर अभियंता :** त्या ठिकाणी कुलिंग व्यवस्था आजही नाही या ठिकाणी पाण्याची व्यवस्था भरपुर प्रमाणात होते किंवा नाही याची पाहणी करावी लागेल त्यामुळेच कुलिंग व्यवस्था फेल होत असेल.

**मा. सभापती :** कुलिंग व्यवस्थेसाठी नविन प्रस्ताव ठेवावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** एनर्जी-७ घेणे बाबतचा प्रस्ताव मनपाकडे होता. त्याप्रमाणे एमएसईबी कडे काय कार्यवाही करण्यात आली. याची माहिती दयावी. ज्यामुळे एमएसईबीचे बिल कमी होते व मनपाचा पैसाही वाचेल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**अति. शहर अभियंता :** एनर्जी-४ ही व्यवस्था आपण केलेली नाही. कारण बाब असल्याने परंतु महानगरपालिकाकडे ही व्यवस्था बऱ्याच ठिकाणी करणे आवश्यक असुन यासाठी खर्च जास्त प्रमाणात येणार आहे.

**श्री. संजय जोशी :** बांधकाम विभागाचे श्री. एस.डी. पानझडे उपअभियंता व श्री. सी.एस. सोनी, अति,शहर अभियंता यांनी विशेष परिश्रम घेऊन टेलिफोन विभागाकडुन गेल्यावर्षी सुमारे सव्वा कोटी रु.ची वसुली केली व महानगरपालिकेच्या निधीत मोलाची भर टाकली त्याबद्दल या दोन्हीही अधिकाऱ्यांचे अभिनंदन करावे.

**मा. सभापती** : ठिक आहे. स्थायी समिती सभेमध्ये त्याचे अभिनंदन करण्यात येते व याबाबत प्रशासनाने एक वार्षिक वेतनवाढ देण्यास शिफारस करण्यात येते.

**श्री. संजय जोशी** : आंबेडकर नगर येथील ड्रेनेज पाईप लाईन संबंधीत अधिकारी या बैठकीला खुलासा करणार होते त्याबाबत माहिती दयावी.

**श्री. भगवान घडामोडे :** सिडको हडको भागातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असुन नागरिक त्रस्त झाले आहेत. लोक प्रतिनिधींना नागरिक सारखे घेराव घालुन हळहळ करतात. आम्ही मते दिली तुम्ही पाणी प्रश्न सोडवा.

**श्री. सुभाष टाकळकर :** स्वत: नगरसेवकच या बाबत प्रयत्न करीत नाही अशा तक्रारी करतात. काही नगरसेवकांनी याबाबत पत्रकार परिषद घेऊन मागणी केली त्यांची बाजु ऐकुण घेतल्या जाते मात्र आम्ही स्थायी समिती सदस्य असुन आमची बाजु जर रितसर ऐकुन घेतली नाही. तर आमचा या ठिकाणी बोलण्याचा हळु डावल्या जातो असे समजवे लागेल.

**मा. सभापती** : सदरील खुलासा पुढच्या बैठकीत देण्यात येईल, कारण संबंधीत अधिकारी पाणी प्रश्नासंदर्भात विचारणा करुनच बाहेर गेलेले आहेत.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** नागरिकांना पाणी पुरवठा होणे ही काळाजी गरज असुन ही बाब नागरिकाच्या समस्यापैकी अत्यंत आवश्यकतेची बाबत आहे.

**श्री. संजय जोशी, श्री. गौतम लांडगे, श्री. टाकळकर सुभाष** : त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली आहे. आम्ही आपणांस बोलु इच्छितो की, जायकवाडी धरणाला पाणी नाही काय? जर जायकवाडी धरणाला पाणी असुन आम्हाला आठ दिवसापासुन सतत पाणी मिळत नाही. तेव्हा पाणी कमी का येते याची माहिती प्रशासनाने दयावी.

**मा. सभापती :** या प्रश्नाबाबत संबंधीत अधिकारी हजर नसल्यामुळे पुढच्या बैठकीला याची माहिती देण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** डॉ. आंबेडकर नगर सिडको येथील ड्रेनेज प्रश्नाविषयीची माहिती कधी देण्यात येईल.

**उपआयुक्त-**१ : आंबेडकरनगर सिडको येथील ड्रेनेज विषयीची माहिती संबंधीत अधिकारी नसल्याने पुढील पुढील देण्यात येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सिडकोला पाणी नेहमी नसते. सिडकोला ७००,१४०० मी.मी. लाईन बंद होते. त्यामुळे पाणी येणे बंद होऊ शकते. या ठिकाणी मा. आयुक्त यांनी समक्ष भेट दिली आहे व व्होलटेजच्या प्राब्लेम येत . तेव्हा ते मिळविण्याच्या प्रशासन प्रयत्न करीत आहे काय याची माहिती दयावी. जर एम.आय.डी.सी. ला पाणीपुरवठा स्वतंत्रपणे होत असतो व नियमित होत असतो तर सिडकोसाठी स्वतंत्र डी.पी. घ्यावी.

**श्री. संजय जोशी :** सिडको भागात पाणी पुरवठा होत नाही परंतु तेथील औद्योगिक वसाहतीतील ज्या कंपन्या आहेत त्यांना पाणी मिळते.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. भगवान घडमोडे :** महानगरपालिकेने वाटर सप्लॉयर साठी स्वतंत्र डि.पी. बसवावी नागरिकांना पाणी पुरवठा होत नाही. आणि कंपनीला पाणी पुरवठा होतो. या बाबत प्रशासन योग्य त्या जबाबदारीने काम पाहत नाहीत असे दिसुन येते. प्रशासन सिडकोतील नागरिकांकडे जाणीपुर्वक दुर्लक्ष करते आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रशासनावर माझे माझे स्पष्ट आरोप आहेत प्रशासन पाणी पुरवठा, स्वच्छता मोहिम, अनाधिकृत कामे, विद्युत इ. बाबीवर प्रशासनाचा व्यवस्थीत पणा देखरेखपणा दिसुन येत नाही त्यामुळे प्रशासन ठप्प झालेले आहे.

प्रशासनावर नियंत्रण असणे आवश्यक असुन प्रशासकीय यंत्रणा कोलमडलेली आहे.

**श्री. त्र्यंबक तुपे :** आज सुध्दा अर्ध्या शहरात पाणी पुरवठा नाही.

**श्री. भगवान घडामोडे :** पाणी पुरवठया संदर्भात प्रशासन निष्क्रीय झालेले आहे असे वाटते.

**श्री. कचरु नवपुते :** मागील आठवडयात आपल्या महानगरपालिकांचे शिष्टमंडळ मा. मुख्यमंत्री यांच्याशी जायकवाडी ते औरंगाबाद पाणी पुरवठा हस्तांतरणाबाबत विचाराविनिमय करण्यासाठी मुंबईला गेले होते. त्यात या प्रश्नाबाबत काय निर्णय झाला याचा थोडक्यात माहिती दयावी.

**श्री. संजय जोशी :** स्थायी समिती सभेमध्ये आम्ही पाणी पुरवठयावर चर्चा करुनही प्रशासन योग्य कार्यवाही करीत नसल्यास या ठिकाणी मुद्दे उपस्थित करणे आम्हास काहीच अर्थ नाही कारण या सभागृहात पक्षपातीपणा दिसुन येतो.

**उप आयुक्त-१ :** सदरील शिष्टमंडळ हे प्रशासनामार्फत नव्हते हे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली मा. मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करण्यासाठी मुंबईला गेले होते.

**मा. सभापती** : या बाबत संबंधीत आधिकारी आज हजर नसल्यामुळे पुढच्या बैठकीत याचा खुलासा देता येईल. विषेष बाब "कार्यवाही करण्याचे मा. मुख्यमंत्री महोदय यांनी आश्वासन पाणी पुरवठा संबंधीत केलेले आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** महानगरपालिका मार्फत पुशधन पर्यवेक्षक या पदांसाठी प्रशासनाने कॉल लेटर देऊन मुलाखती घेतल्या या मुलाखती कधी घेण्यात आल्या याची तारीख प्रशासनाने सांगावी.

**उप आयुक्त-१ :** प्रशानामार्फत ज्या मुलाखती झाल्या त्याची तारीख मला निश्चित सांगता येणार नाही. परंतु सदरील मुलाखती १ महिन्यापुर्वी झालेल्या आहेत. आणि मुलाखती घेऊन त्यांचे यादी निश्चित करुन कामावर घेण्याचे आदेशही काढलेले आहेत. कदाचित ते रुजुही झालेले असतील.

**विषय क्र. २८१/१ :**

दि. ३-१०-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पृष्ठ क्र. १७ वर विषय क्र. २५७/१२ मध्ये काही दुरुस्त्या करुन पुढील माहिती ठेवावी असे म्हटलेले होते. तर संबंधीत अधिकारी यांनी माहिती दयावी. त्या ठिकाणी बॅडमिंटन हॉल बांधण्यासाठी वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. २.८७ लाख त्या कामाची उंची व वुडन फ्लोरिंग करण्यासाठी असे एकंदरीत वाढीव कामाची रु. ५.३१ ला मंजुरी दयावी कारण त्या ठिकाणी खेळाची प्रॅक्टीस होणार असुन मागे पुढे स्पर्धाही घेता येतील.

**शहर अभियंता :** मो. ज्योतीनगर येथील बॅडमींटन व्यायाम शाळेच्या कामाचे प्लोरिंग करण्याकरिता अंदाजे रु. ५.०० लाखाचे अंदाजपत्रक होईल. म्हणजे २.८० लाख खर्च जादा येईल. त्या ठिकाणी बॅडमिंटन प्रॅक्टीस होणार आहे. स्पर्धा होणार नाहीत.

**श्री. संजय जोशी :** संबंधीत ठिकाणी वुडन प्लोरिंगचे अंदाजपत्रक तयार केले असते ते चांगले झाले असते. आपले अभियंता यांनी विचार पुर्वक कामे करावीत. कारण वाढीव रक्कमेसाठी समितीमध्ये वेळोवेळी चर्चा होतात. व बॅटमिंटन

हॉलच्या ठिकाणी हळुहळु प्रॅक्टीस करित स्पर्धाही होऊ शकतील परंतु प्रशासनातील अधिकारी यांनी समजुन नये यांचे आम्हाला दु:ख वाटते.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**श्री. कचरु नवपुते** : पृष्ठ क्र. ११ वर २२४/२३ चा ठराव आहे. त्यामध्ये मुळ प्रस्तावात जी रक्कम रु. ९.०० लाख दाखविलेली आहे व प्रस्ताव आहे त्याच आधारे दुरुस्ती ठराव करुन मंजुरी दयावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सदरील ठराव हा चुकीचा होता. प्रस्तावाप्रमाणे त्यास दुरुस्ती करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. मुळ प्रस्तावाच्या उलट चुकीने लिहिलेला ठराव व रक्कमेत दुरुस्ती करुन मुळ प्रस्तावाप्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

१) पृष्ठ क्र. १७ विषय क्र. २५७/१२ दि. ३-११-९७ चे इतिवृत्तातील हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला होता. त्यास वाढीव रक्कमेसह मंजुरी देण्यात येते.

२) पृष्ठ क्र. ११ विषय क्र. २२४/२३ दि. १७-९-९७ चे इतिवृत्ता मुळे प्रस्तावातील ठरावात पुर्णत बदल करुन रक्कमेतही वाढ केलेली होती. त्यात दुरुस्ती करुन मुळ प्रस्तावाप्रमाणेच ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या वर इतर दुरुस्त्यासह दि. ३-१०-९७ चे इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २८२/२ :**

अतिरिक्त अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जयसिंगपुरा, कुतुबपुरा भागात खांडकी बसविण्याच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन ९६-९७ च्या दर सुचीनुसार रक्कम रु. १,०१,८७३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन सदरचा खर्च "भांडवली रस्ते खांडकी रस्ते" या शिर्षाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीतुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयसिंगपुरा, कुतुबपुरा भागात खांडकी व फरशी बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,०१,८७३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भांडवली रस्ते खांडकी रस्ते" या शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८३/३ :**

अतिरिक्त अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठणगेट आणि दलालवाडी भागातील रोडचे पुर्नडांबरीकरणी करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ७,५१,४००/- चे तयार करण्यात आलेले असुन सदरचा खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीतुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणगेट आणि दलालवाडी भागातील रोडचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ७,५१,४००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च पुर्नडांबरीकरण या शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८४/४ :**

अतिरिक्त अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र. ४३ बुढ्ढीलेन येथील गल्ल्यांमध्ये शहाबाद फरशी बसविण्याच्या कामासाठी सा.बां. खात्याचे दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ३,६९,८३३/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च भांडवली खांडकी रस्ते या लेखा शिर्षाखाली सन ९७-९८ या तरतुदीतुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. ४३ बुढ्ढीलेन येथील गल्ल्यांमध्ये शहाबाद फरशी बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,६९,८३३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली खांडकी रस्ते या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८५/५ :**

अतिरिक्त अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कैलासनगर येथील गल्लीत फरशी बसविण्याचे कामासाठी सा.बां. खात्याचे सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. २,१३,५००/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च नविन खांडकी रस्ते या लेखाशिर्षाखाली सन १९९७-९८ च्या तरतुदीतुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलासनगर येथील गल्लीत फरशी बसविण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,१३,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च नविन खांडकी रस्ते या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८६/६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रगती कॉलनी (घाटी) येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे असुन सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,२८,०००/- सा.बां. खात्याचे दरसुची सन ९६-९७ च्या नुसार तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च शासकीय अनुदान सन १९९७-९८ (४ कोटी) अंतर्गत करण्यात येणार आहे. करिता रक्कम रु. ४,२८,०००/- चा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रगती कॉलनी (घाटी) येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,२८,०००/- चा अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "शासकीय अुनदान सन ९७-९८ (चार कोटी)" मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८७/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठणरोड ते राहुलनगर या मुख्य रस्त्यावर भुमिगत केबलव्दारे पथदिव्याची व्यवस्था कामासाठी सा.बां. खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु. ३,९६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९७-९८ च्या शहरात नविन सोडीयम व्हेपर दिवे लावणे या लेखा शिर्षामधुन करण्यात येईल. तरी रक्कम रु. ३,९६,०००/- च अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणरोड ते राहुलनगर या मुख्य रस्त्यावर भुमिगत केबलव्दारे पथदिव्याची व्यवस्था करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,९६,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "शहरात नविन सोडीयम व्हेपर दिवे लावणे" या लेखा शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८८/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विविध वार्डात १५० वॅट सोडियम व्हेपर फिटींग सामान खरेदी करण्याचे कामासाठी सा.बां. खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु. ४,६८,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९७-९८ च्या सोडीयम व्हेपर खरेदी या लेखा शिर्षकामधुन करण्यांत येईल.

तरी रक्कम रु. ४,६८,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध वार्डात १५० वॅट सोडियम व्हेपर फिटींगचे खरेदी करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,६८,२००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "सोडीयम व्हेपर खरेदी" या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८९/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विविध ठिकाणी ३ सेट सोडीयम फिटींग कामासाठी एकंदरीत अंदाजपत्रक सा.बां. विद्युत दरसुची सन ९६-९७ नुसार र.रु. ४,९२,२६०/- चे तयार करण्यात आलेले असुन वेळोवेळी मा. नगरसेवक यांच्या मागणी नुसार एकुण ३ सेट २० फिटींगचे कामासाठी सदर अंदाजपत्रक स. नगरसेवकांच्या

स्वेच्छानिधी या शिर्षकामधुन करण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. सदरचा खर्च सन १९९७-९८ वर्षात करण्यात येईल. तरी विविध ठिकाणी स. सदस्यांच्या मागणीनुसार त्यांच्या वॉर्डात सोडीयम ३ सेट फिटींगचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,९२,२६०/- चे मंजुरी देण्याची विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध ठिकाणी ३ सेट सोडीयम फिटींग बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९२,२६०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च नगरसेवक स्वेच्छा निधीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९०/१० :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा कब्रस्थान येथे रेस्टींग शेड,वॉचमन निवासस्थान, पाण्याचा हौद बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सा.बां. विभागाच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार आयुक्तांची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामाचा खर्च स्मशानभुमी विकास या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. करिता रक्कम रु. १,६९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा कब्रस्थान येथे रेस्टींग शेड, वॉचमन निवासस्थान, पाण्याचा हौद बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,६९,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "स्मशानभुमी विकास" या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९१/११ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कबाडीपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता पुर्वी रक्कम रु. १०,००,०००/- (दहा लाखचे) अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. परंतु पुर्वीचे ठेकेदार श्री. मौला अली यार खान यांचे काम समाधानकारक नसल्यामुळे ठेका रद्द करुन त्यांच्या काळया यादीत समाविष्ट करुन उर्वरित कामाकरिता सुधारित अंदाजपत्रक परिसर अभियात्रिकीच्या दरसुची ९६-९७ नुसार रक्कम रु. १०,००,०००/- पैकी रक्कम रु. ६,०५,५६६/- ६,०५,५६६=३,९४,४३४) असुन नविन दरानुसार रक्कम रु. १०,००,०००/- ६,९८,५६६/- ची वाढ होत आहे. सदरील रक्कम १०,००,०००/- च्या आत आहे.

सदरील काम लेखा शिर्षक "नाला ट्रेनिंग" यातुन प्रस्तावित केले आहे. मा. आयुक्तांनी दि. २५-९-९७ रोजी सदरील कामास मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. संजय जोशी :** सदरील प्रस्तावात कंत्राटदाराने बेजबाबदार पणे वाढवलेली आहे. या ठिकाणी ३ लाख रुपयांचे ६ लाख रुपये रक्कम झाली आहे. त्यामुळे सर्व बांधकाम खात्याचे दरान्वये वाढीव रक्कम असल्याने मनपाला भुर्दड झालेला

आहे. त्यासाठी या कंत्राटदाराचे लायसेंस ब्लॉबलिस्ट मध्ये नोंदवुन मा. आयुक्त यांनी सर्व बांधकाम खात्यास त्यांचे लायसेंस रद्द करण्यांचे पत्राने कळवावे.

**मा. सभापती :** लेखाधिकारी यांनी माहिती द्यावी.

**लेखाधिकारी :** सन १९९२-९३ चे दराने अंदाजपत्रक होते. आता सन १९९६-९७ अंदाजपत्रकान्वये बदल झालेला असल्याने रक्कम रु. ६.०५ लाखाचे काम झालेले आहे.

**श्री. संजय जोशी, श्री. गिरजाराम हाळनोर** : संबंधीत कंत्राटदाराने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केलेले असल्याने त्यांना ब्लॉकलिस्ट मध्ये टाकुन सर्व बांधकाम खात्यास लायसेंस रद्द करण्यांचे मा. आयुक्त यांनी पत्राने कळवावे.

**मा. सभापती :** संबंधीत कंत्राटदराचे सर्टिफिकेटस् मा. आयुक्त यांना बी. ॲन्ड सी. ला पत्र देवुन रद्द करण्यांचे सुचवावे.

**लेखाधिकारी-१ :** प्रस्तावातील उर्वरित कामाचे हे अंदाजपत्रक असुन आता त्यात बद्दल झालेला आहे. त्यामुळे १८५ मी. चे पुर्ण काम बाकी आहे. व रु. ३.९४ लाखचे जुने काम बाकी आहे. आता नविन दरान्वये वाढीव रक्कम झालेली आहे.

**मा. सभापती :** सदरील ठेकेदाराने प्रमाणपत्र बी ॲन्ड. सा ला पत्र देवुन रद्द करण्यांत यावे. याबाबत संबंधीत अधिकारी यांना याबाबत कार्यवाही करावी. आणि प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. कबाडीपुरा येथील नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता पुर्वी रक्कम रु. १०,००,०००/- (दहा लाखचे) अंदाजपत्रक तयार करण्यात आले. परंतु ठेकेदाराचे काम समाधान कारक नसल्याने या कामाकरिता सुधारित अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकीच्या दरसुची सन ९६-९७ नुसार रु. १०,९३,३००/- चे तयार करण्यांत आले पैकी पुर्वीचे रक्कमेतुन रुपये ६,०५,५६६/- काम झाले असुन (१०,००,०००/- ६,०५,५६६=३,९४,४३४) असुन नविन दरानुसार रक्कम रु. ६,९८,५६६/- वाढ होणार आहे. या वाढीत रक्कमेस "नाला ट्रेनिंग" या शिर्षातुन खर्च करण्यांस व या कामातील ठेकेदार श्री. मौला अली यार खान यांचे काम समाधानकारक नसल्याने त्यांचे नांव ब्लॉक लिस्ट मध्ये टाकुन सार्वजनिक बांधकाम खात्यास त्याचा परवाना रद्द करण्यांस मा. आयुक्त यांनी कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९२/१२ :**

वार्ड क्रमांक (५५) मधील गरमपाणी झोपडपट्टीत दोन वर्षापुर्वी दुरुस्ती करण्यांत आलेल्या खांडकी रस्त्यामध्ये ड्रेनेज दुरुस्तीचे काम केल्यामुळे खांडकी खराब झाली सदरील कामाची पहाणी केली असता सदरील वार्डाचे स.नगरसेवक तथा महापौर हयांनी ७३ मीटर लांबीच्या खांडकी रस्त्याचा ४०-५० एम.एम. जाडीची फरशी (बिना तळाचे कॉक्रीटने) बसविणे तसेच ५० मीटर लांबीच्या खांडकी रस्त्यावर सिमेंट कॉक्रीटचा रस्ता बनविणे बाबत सुचना दिल्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु. १,११,५००=०० तयार करण्यात आले व मा. आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविली असता त्यांनी "स्थाई समिती समोर सादर करा" असा शेरा दिल्यावरुन सदरील कामाचे अंदाज पत्रक रक्कम रुपये १,११,५००=००

च्या कामास मंजुरीस्तव व खांडकी रस्त्यावर फरशी करणे व सिमेंट रोड तयार करणे बाबत पॉलीसी मॅटर ठरविणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक (५५) मधील गरमपाणी हया घोषीत झोपडपट्टीत खांडकी रस्त्यावर फरशी बसविणे व सिमेंट रोड तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,११,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९३/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कल्पतरु हौ.सो. (गारखेडा) मार्ग तिरुपती नगर स्वप्ननगरी गजानन कॉलनी ५० फुट रुंद रस्त्यालगत ६०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रकास रक्कम रुपये ९,६५,८००/- यास सर्वसाधारण मध्ये विषय क्र. २०१/१८ दि. १०-३-९७ रोजी मान्यता मिळाल्यावर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकुण एकोणावीस (१९) निविदा विक्री झाल्या होत्या त्यापैकी एकुण सहा (६) निविदा प्राप्त झाल्या असुन खालील प्रमाणे दर दिलेले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राणा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | ३२.९९% कमी |
| २. | श्री. सोहल सिध्दीकी | --//-- | ३०.००% --//-- |
| ३. | श्री. खर्डीकर कन्स्ट्रक्शन | --//-- | २५.२५% --//-- |
| ४. | श्री. आर.बी. चव्हाण | --//-- | २३.००% --//-- |
| ५. | श्री. के.बी. पार्थीकर | --//-- | १५.७०% --//-- |
| ६. | कंम्फर्ट कन्स्ट्रक्शन | --//-- | १३.००% --//-- |

वरील दर पाहता तुलनात्मक दृष्टया कमी अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३२.९९% कमी दराची मे. राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करिता निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कल्पतरु हौसिंग सोसायटी (गारखेडा) मार्गे तिरुपतीनगर, स्वप्ननगरी, गजानन कॉलनी ५० फुट रुंद रस्त्यालगत ६०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३२.९९% कमी दराची मे. राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९४/१४ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सादिया टॉकिज मागील बाजुच्या रिकामे दुकाना व भाडेतत्वावर देणेसाठी सदरील

दुकानाची अनामत रक्कम व भाडे निश्चित करणेसाठी भाडे समिती समोर प्रकरण ठेवण्यात आले होते. सदरील दुकानाचे भाडे व अनामत रक्कम खालील प्रमाणे आहे.

**अ) <u>अनामत रक्कम</u> :**

दिनांक १६-३-९६ चे सर्वसाधारण सभेने मंजुर केल्याप्रमाणे रुपये ४०००/- प्रति चौरस मीटर अनामत रक्कम घेण्यात यावी.

**ब) <u>भाडे</u>** :

या भागातील दुकानाचे भाडे मुख्य रस्त्याकडील बाजुचे फ्रंट साईटचे दुकानाकरिता किमान भाडे ६०/- रु.प्रति चौरस मीटर प्रतिमहा राहील.

मागील बाजुचे दुकाना व इतर दुकानाचे किमान भाडे ५०/- रु. प्रति चौरस मीटर प्रतिमहा प्रमाणे निश्चित करण्यांत आले आहे.

शासन पत्र, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. बीएससी-२३८०/५११०/नवि-३, दिनांक २१ ऑक्टोबर १९८१ अन्वये अनुसुचित जाती/जमाती तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी नगरपालिका मार्केटमधील ५% टक्के व्यापारी गाळे/स्टॉल्स/दुकाना राखुन ठेवण्यात यावे व त्यांच्या मधुनच कमीत कमी किंमती भाडयाव्दारे निकाली काढण्यात यावे या बाबत सुचना दिलेल्या आहे.

वरील सुचना अधीन राहुन सदरील व्यापारी संकुल मध्ये ५० दुकानापैकी अनुसुचित जमातीसाठी २ व विमुक्त जाती व भटक्या जामातीसाठी १ राखीव ठेवावे लागेल. सदरील आरक्षण धारकांना अनामत रक्कम किंवा भाडे कसे घ्यावे या बाबत निर्णय घ्यावा लागेल.

तरी वरीलप्रमाणे निश्चित केलेले भाडयाचे आधारे अनामत रक्कमेवर रुपये ४०००/- प्रति चौरस मीटर पेक्षा जो अधिक देईल त्याला दुकान बोली लिलावाने देणे बाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

पॉलीसी मॅटर असल्याने सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्याची शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९५/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरु पॅलेस येथे खडी रस्ता तयार करुन कल्व्हर्ट बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,०३,०७७/-च्या अंदाजपत्रकास व काम तातडीचे असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री. अनिल कुलकर्णी यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यासाठी दिनांक ३०-८-९६ विषय क्र. २११/१ अन्वये स्थायी समितीच्या सभेमध्ये मान्यता मिळालेली आहे.

तसेच सदरील भागाचे स. नगरसेवक श्री. सुभाष कच्छवाह यांनी दि. २९-७-९७ रोजी पत्र देवुन विनंती केल्यानुसार सुमारे ६५ मीटर लांबीची गटार बांधावी लागणार आहे. व या ६५ मीटर लांबीच्या गटारीसाठी रु. १,१५,८२६/- एवढा अतिरिक्त खर्च येत आहे. तसेच सदरच्या कामाचे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु. २,०३,०७७/- इतके असुन अतिरिक्त खर्च रु. १,१५,८२६/- व मुळ अंदाजपत्रक रक्कम रु. २,०३,०७७/- असे एकुण सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,१८,९०३/- चे तयार करण्यात आले असुन त्यास दिनांक १०-१०-९७ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी मुळ अंदाजपत्रक रु. २,०३,०७७/- व अतिरिक्त रक्कम रु. १,१५,८२६/- असे एकुण रु. ३,१८,९०३/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सदरील काम हे निविदेतील ठेकेदार

श्री. अनिल कुलकर्णी यांचे कडुन त्यांनी दिलेल्या दराने म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% कमी दराने करुन घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नेहरु पॅलेस येथे खडी रस्ता तयार करुन कलव्हर्ट बांधणेच्या कामामध्ये वाढ झाल्यामुळे मुळ र.रु. २,०३,०७७ अधिक अतिरिक्त र.रु. १,१५,८२६/- अशा एकंदर र.रु. ३,१८,९०३/- च्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच सदरील काम निविदेतील ठेकेदार श्री. अनिल कुलकर्णी यांचेकडुन अं.प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९६/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा राम मंदिर येथील रोडची उंची वाढविणे व दगडी गटारीचे बांधकाम करणेच्या कामासाठीच्या अंदाजपत्रक रक्कम रु. ११,४७,६००/- ला दिनांक २-९-९७ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. ८६/२ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि ५७/९७ दिनांक ८-९-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (२६) निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण सहा (६) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या प्राप्त निविदा पत्रके दिनांक २४-९-९७ रोजी उघडण्यात आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सैय्यद रफियोद्दीन | २.८६% | कमी दराने |
| २. | श्री. एस.एस. मंडोरे | ०.१०% | --//-- |
| ३. | श्री. एस.ए. नवाज | ३.००५ | जास्त दराने |
| ४. | श्री. शेख शरीफ | ४.००% | --//-- |
| ५. | श्री. मे.न्यु. स्टार कन्स्ट्रक्शन | ६.००% | --//-- |
| ६. | श्री. मो. सोहेल सिद्दीकी | ११.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २.८६% कमी दराने श्री. सैय्यद रफियोद्दीन यांची निविदा असुन मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा राम मंदिर येथील रोडची उंची वाढविणे व दगडी गटारीचे बांधकाम करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २.८६% कमी दराची श्री. सैय्यद रफियोद्दीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९७/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव, सादर केला आहे की, मो. मुकंदवाडी भागात काही ठिकाणी नविन शहाबादी फरशी बसविणे काही ठिकाणी अस्तीत्वात असलेली खांडकी काढुन

दुरुस्त करणे व पुन्हा बसविणे काही भागात खांडकीला पाईटींग करणे व काही भागात नवीन खांडकी बसविणे इ. काम करिता र.रु. ५,७०,८५७/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दर सुची १९९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दिनांक २४-९-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रधान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास योजने अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

करिता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुकंदवाडी भागात काही ठिकाणी नविन शहाबादी फरशी बसविणे व काही ठिकाणी अस्तीत्वात असलेली खांडकी काढुन दुरुस्त करणे व पुन्हा बसविणे काही भागात खांडकीला पाईटींग करणे व काही भागात नवीन खांडकी बसविणे इ. कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ५,७०,८५७/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम १८ खेडी विकास योजने अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९८/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विविध वार्डात ३ सेट फिटींग लावण्यासाठी स. सदस्याकडुन त्यांच्या स्वेच्छा निधीतुन मागणी प्राप्त झाली आहे. त्यानुसार शहरात विविध ठिकाणी ३ सेट व ४ सेट सोडियम व्हेपर फिटींग लावण्याकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) दरसुचीनुसार रक्कम रु. १,९२,८६६=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील संपुर्ण खर्च स. सदरच्या स्वेच्छा निधीतुन खालील प्रमाणे करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | स. सदस्याचे नांव | ३ सेट फटींग | ४ सेट फिटींग | येणारा एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. कचरु नवपुते | १ | - | २२८६८=०० |
| २. | स.स.श्री. सलीम कुरेशी | १ | २ | १०१३९४=०० |
| ३. | स.स.श्री. अभिमन्यु भालेराव | १ | - | ४५७३६=०० |
| ४. | स.स.श्री. गौतम लांडगे | १ | - | २२८६८=०० |
| | | ६ | २ | १९२८६६=०० |

तरी वरील दर्शविल्याप्रमाणे काम करणेसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १९२८६८=०० चे अंदाजपत्रकीय मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स. सदस्यांकडुन मागणी प्राप्त झाल्यानुसार थ्रीसेट फिटींग सहा नग व फोर सेट फिटींग दोन नग लावणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,९२,८६६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च नगरसेवक स्वेच्छानिधीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९९/१९ :**

संजय गांधी युथ वेल्फेअर कल्चरल व स्पोर्टस् असो. औरंगाबाद या संस्थेन मोहल्ला नागसेन कॉलनीच्या मंजुर रेखाकंनातील खुली जागा नगर भुमापन क्रमांक ९२६९ संस्थेच्या जिम्नॅशियम हॉल करिता मिळावी म्हणुन मागणी केलेली आहे.

मंजुर विकास नियंत्रण नियमावली नुसार मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत खुल्या जागेच्या क्षेत्राच्या १०% इतके बांधकाम जिम्नॅशियम हॉल करिता करता येते. सदरील खुली जागा मंजुर रेखांकनातील असुन महापालिकेच्या ताब्यात आहे. सदरील संस्था नोंदणीकृत धर्मादाय संस्था असुन त्यांना सदर जागा हया संस्थेस देण्याबाबत दिनांक २०-२-९३ चे सर्वसाधारण सभेत ठराव क्र. १३०/१६ ने मंजुरी दिलेली आहे. सदरील संस्था पंजीकृत असुन नोंदणी क्र. एफ-१६२१/८८ दि. २८-७-९७ आहे.

सदरील जागेकरिता दिनांक २०-११-९६ चे सर्वसाधारण सभेतील मंजुर ठराव क्र. १६०/१ नुसार रु. १००/- प्रतिवर्ष याप्रमाणे भाडे आकारुन नेहमी अटी व शर्तीस पात्र राहुन सदर जागा संजयगांधी युथवेल्फेअर कल्चरल व स्पोर्टस् असो. औरंगाबाद यांना दिर्घ मुदतीकरिता भाडे पट्टयावर देण्याचे प्रस्तावात करण्यात येते.

करिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर, मान्यतेनंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही /पुर्तता करुन संस्थेस जागा देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागसेन कॉलनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा नगरभुमापन क्र. ९२६९ संजय गांधी युथ वेल्फेअर कलचरल व स्पोर्टस् असो. औरंगाबाद या संस्थेस जिम्नॉशियम हॉल बांधणेकरिता प्रतिवर्षी रु. १००/- भाडे आकारुन नेहमीच्या अटी व शर्तीस पात्र राहुन दीर्घ मुदतीकरिता भाडेपट्टयावर देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३००/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील विविध चौकातील वाहतुक संकेतांकाची देखभाल व दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक आहे. मागील वर्षापासुन वाहतुक संकेतांकाची देखभाल व दुरुस्ती मे. न्युकली ॲनिक्स पुणे हे प्रति युनिट (प्रत्येक वाहतुक संकेतांकासाठी) वार्षीक र.रु. १२,०००/- या दराने करीत आहेत. त्याची मुदत म्हणजे दि. ३० जुन १९९७ पासुन पुन्हा एक वर्षासाठी वाहतुक संकेतांकाची दुरुस्ती मागील वर्षीच्याच दराने म्हणजे प्रति युनिट र.रु. १२,०००/- याच दराने करण्याची तयारी दर्शविली आहे व त्यास मा. आयुक्त यांची प्रशासकीय मान्यताही प्राप्त झालेली आहे. शहरातील एकुण वाहतुक संकेतांकापैकी एकुण बावीस वाहतुक संकेतांकाची देखभाल व दुरुस्तीचा करार करणे आवश्यक आहे. यासाठी एकुण २२x१२०००=००=२,६४,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. मे. न्युकली ॲनिक्स् पुणे यांनी मागील वर्षात वाहतुक संकेतांकाची देखभाल व दुरुस्ती अत्यंत चांगल्याप्रकारे केलेली आहे.

तरी पुढील वर्षीही (दिनांक ३० जुन १९९७ पासुन) शहरातील वाहतुक संकेतांकाची देखभाल व दुरुस्ती मे. न्युकली ॲनिक्स् पुणे यांच्याकडुन मागील वर्षीच्याच दराने म्हणजे प्रति युनिट रक्कम रु. १२०००/- या दराने करुन घेण्याचे मान्यतेस्तव तसेच यासाठी येणाऱ्या र.रु. २,६४,०००/- च्या खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध चौकातील वाहतुक संकेतांकाची देखभाल व दुरुस्तीचे काम (दि. ३० जुन ९७ पासुन) या वर्षीही मे. न्युक्ली ऑनिक्स, पुणे यांच्याकडुन मागील वर्षीच्याच दराने म्हणजे प्रतियुनिट र.रु. १२,०००/- या दराने करुन घेण्यास तसेच यासाठी येणाऱ्या र.रु. २,६४,०००/- च्या खर्चास मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

**श्री. गिरजाराम हाळनोर** : मागच्या बैठकीत शहरातील गाजर गवताबाबत चर्चा झाली होती. परंतु पुढच्या मिटींगला त्याचा खुलासा करणार होते तर संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकिय अधिकारी** : सदर कामाबाबत प्रत्येक झोनला ५ मजुर दिलेले आहेत गाजर गवत काढण्यासाठी मंजुर येत नाही. त्यामुळे गवत काढणारास त्रास होतो. त्यामुळे मजुर हे गवत काढण्यात येत नाही. सदरील काम पुर्ण होण्याची कार्यवाही चालु आहेत यासाठी १५ दिवस तरी कालावधी लागेल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहरातील डास निर्मुलन मोहिम बाबत खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आमच्याकडे जे पाहिले कर्मचारी आहेत त्यांच्याकडुन हे काम करवुन घेत आहेत काही भागात जेथे जेथे डास आहेत. तेथील नागरीक स्वच्छता ठेवत नाहीत त्यामुळेही मोहिम राबवण्यास जास्त वेळ लागेल. तरी प्रशासनाच्या वतीने मोहिमेव्दारे कार्यवाही चालु करता येईल. सेप्टी टॅक ज्या ठिकाणी आहेत. त्या ठिकाणी मागे जाळया बसविल्या होत्या त्याप्रमाणे नागरिकांनी सहकार्य करावे.

**श्री. विकास जैन** : मागील बैठकीत मी सुचना केलेली होती की, बाबा पेट्रोल पंप येथील महावीर स्तंभ येथील ग्रिल लावुन सौदर्यीकरण करणे बाबत चर्चा केलेली होती. त्याप्रमाणे त्या ठिकाणी सौदर्यीकरण सुशोभित होणेसाठी चांगलया प्रतीचे ग्रील लावुन प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. संबंधीत अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | मा. सभापती स्थायी समिती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २८-१०-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मंगळवार दि. २८-१०-९७ रोजी मा. सभापती श्री. प्रभाकर सिताराम विधाते यांच्या अध्यक्षते खाली दुपारी ४.०० वाजता स्थायी समितीची सभा संपन्न झाली. सभेची सुरुवात वंदे मारतम् या गिताने झाली. यावेळी सभेस अधिकारी वर्ग व खालीलप्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. प्रभाकर सिताराम विधाते
२) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
३) श्री. सुभाष टाकळकर
४) श्री. त्रिंबक तुपे
५) श्री. अभिमन्यु भालेराव
६) श्री. विकास जैन
७) श्री. भगवान घडामोडे
८) श्री. अब्दुल रशिदखॉन (मामु)
९) श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद
१०) श्री. स.अली मिरा सलामी
११) श्री. संजय जोशी
१२) श्री. गौतम लांडगे
१३) सौ. यशोदा धनंजय वाडेकर
१४) श्री. बन्सी गागवे

**संवाद**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दिवाळी सणा निमित्त आम्ही आमच्या वतीने मनपा अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग यांना दिवाळी निमित्त शुभेच्छा शहरात दरवर्षी ज्या ज्या सणा निमित्त नवरात्र उत्सव, गणेशत्सव, या काळात मनपा विद्युत विभागातील अधिकारी यांना लाईट बाबत जी खबरदारी घेतात त्या प्रमाणे येत्या दिवाळीवर सुध्दा संबंधीत अधिकारी यांनी लाईट पुरवठा सुरळीत चालु राहील याची खबरदारी घ्यावी जेणे करुन नागरिकांना तक्रारी येणार नाही तसेच शहरातील जे बंद दिवे आहेत ते चालु करुन घ्यावे या बाबत आपण संबंधीत अधिकारी यांना सुचना कराव्या अशी सुचना संबंधीत अधिकारी यांनी घ्यावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. स. नगरसेवक यांनी ज्या सुभेच्छा दिल्या ते दिवाळीच्या काळात शहरातील एका ही नागरिकांची लाईन बाबत तक्रार येणार नाही व शहरात नवरात्र गणपती उत्सव निमित्त आपल्या मनपातील विद्युत विभागातील अधिकारी जशी जातीने लक्ष घालुन काम करतात तसेच या येत्या दिवाळीत सुध्दा संबंधीत अधिकारी यांनी लक्ष घालुन कोठेही विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची खबरदारी दयावी व बंद असलेले दिवे त्वरीत चालु करुन घ्यावे अशी सुचना देण्यात येते.

**श्री.संजय जोशी :** मागच्या बैठकीमध्ये अधिकारी यांच्या बाबत चर्चा होऊन वेतनवाढ करावी असे ठरले होते. परंतु यापैकी फक्त १६ अधिकांऱ्याना आतापर्यंत आदेश

दिलेले आहेत. परंतु यात आणखी ५ अधिकाऱ्यांचे नावे सुटलेले होते. परंतु त्यांना आतापर्यत प्रशानामार्फत प्रस्ताव मांडलेला नाही. ज्या सोळा (१६) अधिकाऱ्यांना वेतनवाढ दिलेली आहे. त्यांच्याकडुन प्रशासनाने चांगल्याप्रकारे व योग्य त्या जबाबदारीने काम करुन घ्यावे. त्याचप्रमाणे ५ अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रशासनाने प्रस्ताव ठेवावा.

**मा. आयुक्त :** ज्या ५ अधिकाऱ्याचे नावे यादीनुसार उल्लेख केलेले होते. त्यानुसार त्याचे नाव सुटलेले आहेत. त्याची सभागृहात नावाचा उल्लेख करावा.

**श्री. गौतम लांडगे, श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. अभिमन्यु भालेराव :** यात अग्निशामन अधिकारी श्री. झनझन, श्री. पी.के. खोब्रागडे व श्री. एच.आर. बाहेती, उच्चलघुलेखक, कामगार अधिकारी श्री. लोखंडे तसेच सांस्कृतिक अधिकारी श्रीमती ज्ञानदा कुलकर्णी ही ५ (पाच) पदे आहेत. अग्नीशामन अधिकारी यांचे टेकनीकल केडर असे त्यांचे पद आहेत. त्यानुसार त्यांना २२०० ते ४००० पर्यंत त्यांना वेतनश्रेणी देण्यात यावी. व इतर चार अधिकारी आहेत त्यांना रु. २२०० ते ३७०० ही वेतनश्रेणी लागु करावी. कारण या पदांना भविष्यात कोणत्याही प्रकारची प्रमोशनल चॅनेल नसल्याने त्यांनाही प्रशासनाने श्रेणी वाढीचा प्रस्ताव ठेवुन कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिद खॉन (मामु) :** मनपा सचिव श्री. जी.व्ही. मगरे यांचा सर्वसाधारण सभा दि. २७-१२-९५ ठराव क्र. १३०/८ अन्वये २२०० ते ४००० या वेतन श्रेणीस ठराव मंजुर झालेला आहे. त्यांची सेवा निवृत्त होण्याची वेळ आली आहे. त्यांना वरील प्रमाणे वेतनश्रेणी मंजुर करावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** श्री. अ. रशिद खॉन (मामु) यांच्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**उप आयुक्त-१ :** सचिवांचा ठराव शासनाकडे पाठविलेला आहे. त्यानुसार कार्यवाही होईल.

**अभिमन्यु भालेराव :** इतर अधिकाऱ्यांची इथेच मंजुरी घेतलेली आहे. व त्यांची अंमलबजावणी ही केली आहे. त्याप्रमाणे सचिवांना का वेतनश्रेणी लागु केली नाही/

**उप आयुक्त-१** : सचिवांनी स्वतः माझ्या निदर्शनास आणुन दिले नाही.

**मा. आयुक्त :** सचिवांचे अधिकारच कायद्याने अ. वर्ग दर्जाचे आहेत, त्यांना वेतनश्रेणी २२०० ते ४००० लागु करण्यास काही हरकत नाही. इतर अधिकाऱ्यांचा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यांत यावा.

**मा. सभापती :** विद्यामान सचिवांना ही २२०० ते ४००० वेतनश्रेणी लागु करण्याची मा. सर्वसाधारण सभेने ठराव मंजुर केल्यांच्या तारखेपासुन मंजुरी देण्यात येते. व इतर अधिकाऱ्यांचा प्रस्ताव प्रशासनमार्फत पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावित सभेत चर्चा संपन्न झाल्यानंतर मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३०/८ दि. २७-१२-९५ पासुन वेतनश्रेणी २२०० ते ४००० लागु करण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**श्री. अ. मीरा सलामी :** छावणी व मनपा जकात वादाच्या बाबतीत.

**मा. सभापती :** या विषयावर आपण चर्चा करु नये हा पॉलीसी विषय असुन याबाबत आपण सर्वसाधारण सभेत चर्चा करावी.

**श्री. स.अली मीरा सलामी :** या विषया संदर्भात मी बोलु इच्छितो की, ४०० कोटी रुपये ऑक्टोबर पर्यंत मिळाले होती आता ७५ हजार कमी आले याचे कारण काय या वेळेस ३७५ लाख रु. चे जकात वसुली का झाली याबाबत प्रशासनाची कार्यवाही दिवसेदिवस कमी पडत आहे काय?

**उप आयुक्त-१ :** जी वसुली या वर्षीची केली गेली आहेत ती ४.०० कोटीची होती ही रक्कम एखादया ठरविक वर्षीच जास्तीची रक्कम यावयास पाहिजे असे नाही वेळी आतापर्यंत १४.०० कधी १२-१३ लाखा जकात वसुल याप्रमाणे होते तर या वर्षात ४० कोटी रुपयांचे अर्थसंकल्प मध्ये तरतुद उत्पन्न आपण धरलेले आहेत त्याप्रमाणे गेल्या वर्षी पेक्षा या वर्षी जास्त रक्कम जकातीची वसुल झालेला आहेत.

**श्री. स. अली मिरा सलामी** : या वर्षीच्या दिवाळीच्या फटाक्याचा जो माल शहरात आलेला आहेत. त्याचा ॲक्ट्राय वसुल झाला आहे. आतापर्यंत मागील महिन्याचा किती ॲक्ट्राय वसुल झाला आहे. या बाबत माहिती घ्यावी या दिवाळीच्या फटाके शहरात आलेले आहे त्याची जकात संबंधीत अधिकारी यांनी बरोबर वसुल केलेली नाही. असा माझा आरोप आहे.

**जकात अधिक्षक :** मागील महिन्याच्या ॲक्ट्राय ९८ लाख ४० हजार ९०० शे. वसुल झालेला आहेत. व फटाक्याची जकात रु. ३.९६ लाख वसुली झालेली आहे. सदरील वसुली मागील वर्षीपेक्षा जास्तीची आहे. व जसजसा माल आयात होतो त्याप्रमाणे जकात वसुली होत असते.

**श्री. संजय जोशी :** मनपातील या बाबत संबंधीत अधिकारी यांनी जकात वसुली चांगली केली त्याबद्दल अभिनंदन परंतु मनपातील कोणते कामे वार्डातील करावयाचे असल्यास त्या कामास दिरंगाई लागते आणि प्रति उत्तरे मिळतात की तिजोरीत पैसा नाही फाईल वर लिहिले जाते का बजेट नाही तर हा येणारा पैसा कोठे जातो याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** या बाबत मा. आयुक्त खुलासा करतील.

**मा. आयुक्त :** मनपाच्या तिजोरीत खडखडाट आहे हे म्हणणे योगय नाही. ते खोटे आहे. महानगरपालिकेने या वर्षीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ६१ लाख रुपये खर्च केलेले आहेत. ९८ हजार रुपये दिवाळीचा बोनस म्हणुन वाटप केलेले आहे. ज्यामध्ये हंगामी कर्मचाऱ्यांनाही बोनस दिला आहे. बालवाडी शिक्षिकांना बोसन रु. ५००/- भाऊबीज निमित्त देण्यात आलेले आहे. यावर्षी आपण महानगरपालिकेतील ३५ दिवसाचा बोनस वाटप केलेला आहेत.शहरातील अनेक कामे केली आहेत. मोठमोठे प्रकल्प सुरु आहेत. शहरात पाणी टंचाई ही ठिक ठिकाणी जाणुन येते. त्याकरिता नागरिकांना व्यवस्थीत पाणी पुरवठा व्हावा. यासाठी योग्य त्या सुविधा करण्याच्यामार्गावर आपण आहोत. काही ठिकाणी आपण सुविधा उपलब्ध करुनही दिलेल्या आहेत. शहरात लाईटची कामे मोठया प्रमाणात चालु आहेत. शहरातील जी जी म्हत्वाची मोठमोठी जी कामे आहेत ती आपण करीत आहोत शासनाचे यावर्षीचे ४ कोटी रुपये आपल्याला मिळालेले बजेट आहे त्याचा उपयोग आपण अंदाजपत्रकाप्रमाणे चांगला कामासाठी करीत आहोत.

**श्री. संजय जोशी** : तिजोरीत पैसा आहेत परंतु अधिकारी यांनी स्विल ओव्हरची कामे कशासाठी मंजुर करुन ठेवलेले होते.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : महानगरपालिकेने ३५ दिवसांचा बोनस या वर्षी वाटप केलेला असेल, आपण ३५ दिवसाचा बोनस गेल्या वर्षी सुध्दा वाटप केलेला होता महानगरपालिकेच्या तिजोरीत पैसा उपलब्ध असतांना महानगरपालिकाचे जे ठेकेदार आहेत. त्याची बिले का रोखुन ठेवण्यात आलेली आहे. वार्डातील कामाचे प्रस्ताव केले तर अधिकारी म्हणतात बजेट नाही. महानगरपालिकेच्या तिजोरीत पैसा असेल तर ठेकेदाराची रक्कम लवकरात लवकर अदा करण्यात यावी.

**श्री. गौतम लांडगे** : शहरातील वार्डामध्ये जी कामे झालेली आहेत त्या ठेकेदाराची बिले आतापर्यंत दिलेली नाही असे समजते.

**श्री. संजय जोशी, श्री. गिरजाराम हाळनोर :** शहरातील जे नागरिक १०० टक्के टॅक्स भरतात, आपण त्यांना पाणी देत नाही. आपण त्यांना योग्य सुविधा देऊ शकत नाही. आपण टॅक्स का वसुल करतो. यात दोषी प्रशासन आहे. मागील वर्षी जे काम आलेले होते. त्यावर प्रशासनाने योग्य त्या प्रकारे कार्यवाही केलेली नाही. मा. आयुक्तांनी जे १५-२० कोटी रुपयाचे बजेट तयार केलेले आहेत ते चुकीचे आहेत.

**श्री. स.अली मिरा सलामी :** मा. आयुक्त पहिल्यांदा सांगता कर्मचाऱ्यांना बोनस दिले आहे. स्वातंत्र्य महोत्सत्वास पैसा खर्च झालेला आहे. महानगरपालिकेच्या तिजोरीत बजेट आहे. मा. सभापती सांगतात. फाईल परत आलेल्या आहेत. याचाच अर्थ या ठिकाणी स. नगरसेवकांची संबंधीत अधिकारी दिशाभुल करित आहेत. कर्मचाऱ्यांना पगार दिवाळीपुर्वी दिलेला आहे काय? अर्थसंकल्पात तरतुद केल्यानुसार प्रशासन खर्च करित आहे काय? मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्रावर प्रशासनाने आतापर्यंत किती पैसा खर्च केला. मागील आयुक्त यांनी चुकीचे अंदाजपत्रक तयार करुन खर्च दाखविलेला आहे ते योग्य नाही.

**मा. सभापती :** आजपर्यंत मागील वर्षीचे तरतुदीप्रमाणे कशासाठी खर्च करण्यात आले या बाबत संबंधीत अधिकारी यांनी माहिती द्यावी.
उदा. दयावयाचे झाल्यास माझ्या वार्डातील रु. ३७/- हजाराचे कामासाठी आपल्याकडे पैसा नसल्याने संचिकेत नमुद केल्या जाते.

**श्री. स.अली मिरा सलामी** : महानगरपालिकेच्या बजेटच्या बाबत प्रशासनाने मिटींग घ्यावी.

**मा. सभापती** : या बाबत आपण पुढच्या मिटींगला चर्चा करु.

**श्री. भगवान घडामोडे :** कालच्या दै. वर्तमानपत्रात एका महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण अशी बातमी छापुन आली ती खरी आहे काय?

**श्री. गौतम लांडगे :** वृत्तपत्रात ज्या जमीनी बाबत वृत्त छापुन आलेले आहेत ही जागा महानगरपालिकेची आहे या ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत. या बाबत मा. महापौर यांनी कार्यवाही केली परंतु प्रशासनाने काय कार्यवाही केली तसेच धोबी घाटाचे पण झालेले आहेत. याच प्रमाणे हेगडेवार रुग्णालयाजवळ ज्या टपऱ्या आहे त्या अनाधिकृत जागेवर टपऱ्या असतांना महानगरपालिकेने त्या उठवलेल्या नाही अनेक वेळा या बाबत मी सभागृहात चर्चा केली परंतु त्यावर कार्यवाही करण्यात येईल. असे सांगितले जाते. परंतु कार्यवाही केली जात नाही. महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर एका इसमाने अतिक्रमण केले त्यास जबाबदार कोण राहणार/ याची माहिती दयावी वेळीच प्रशासन कार्यवाही का करीत नाही.

**श्री. त्र्यंबक तुपे :** बंजारा कॉलनी येथील बऱ्याच दिवसापासुन अतिक्रमणे झालेली आहेत. स्थायी समिती सभेमध्ये मी या विषयावर चर्चा केली परंतु कार्यवाही करण्यात आली नाही का करण्यात आली नाही. याचा खुलासा करावा.

**प्रशासकीय अधिकारी :** सदरील कॉलनी मधील बांधकामाबाबत पाहणी केलेली आहे. काम चालु असतांना व तार फेन्सींगचे काम असतांना सामान जप्त करण्यात आलेले आहे.

**श्री. अब्दुल रशीद खॉन (मामु) :** ज्या महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केलेली होती. त्या जागेबाबत संबंधीत अधिकारी यांनी त्या व्यक्तीवर पोलिस कार्यवाही का नाही केली.

**श्री. स.अली मिरा सलामी :** जाधव वाडीमधे असे अनेक अनाधिकृत कामे झालेली आहेत. तेथील बऱ्याच ठिकाणचे कामे अनाधिकृत असुन तेथील महानगरपालिकेने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने स. नगरसेवकांनी दबाव आणल्यामुळे तेथील कार्यवाही करण्यात आलेली नाही. तर कोणत्याही वार्डातील अनाधिकृत काम चालु असेल किंवा झालेले असेल तर महानगरपालिकेने प्रशासनातर्फे कार्यवाही करण्यावर कोणत्याही स. सदस्यांनी अडथळा आणु नये त्यामुळे प्रशासकीय अडथळा निर्माण होतो. यामुळे यात अधिकारी व नगरसेवक हे दोघे ही तितकेच जबाबदार आहेत.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** संबंधीत अधिकारी म्हणतात जागा महानगरपालिकेची नाही.

**श्री. संजय जोशी, री. अब्दुल रऊफ, श्री. भगवान घडामोडे :** अतिक्रमण हटावा पथक बंद करावे व जे स.स. अडथळे आणतात. त्यांची नांवे सभागृहात सांगावे.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी यांनी जेथे जेथे अनाधिकृत बांधकामे होत असतील ते त्वरीत थांबवावीत व या पुढे कोणत्याही ठिकाणचे अनाधिकृत बांधकाम चालु असतांना कोणत्याही स. नगरसेवक यांच्या दबावाखाली येऊ नये प्रशासनाच्या नियमाप्रमाणेच कामे करावीत व अशा काही व्यक्तींविरुध्द पोलिस केस करावी.

**श्री. गौतम लांडगे :** सुरेवाडी, मिसारवाडी, जाधववाडी व इतर काही शहरातील अनाधिकृत बिफ मटन दुकाने आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास होतो. तर ती सर्व दुकाने एका ठिकाणी असावी. बऱ्याच ठिकाणी असे आढळुन येत की, दुकानदार आपल्या दुकानामध्ये व्यवस्थीत पणा ठेवत नाही. त्यामुळे जनतेच्या आरोग्याला धोका होऊ शकतो. या बाबत आपण काय कार्यवाही केली आहे. मटन/मांस विक्री करीत असंताना नियमाप्रमाणे जे परवाने दयावी लागतात तेंव्हा ज्या काही अटी व शर्ती महानगरपालिकेच्या असतात. त्यानुसार कार्यवाही होत नाही. याकडे प्रशासनाने लक्ष दयावे.

**श्री. संजय जोशी :** ज्या ज्या बिफ/मटन शॉपच्या दुकाने आहेत त्यांनी परवाने काढलेले आहेत का? याची पडताळणी करण्यात यावी ज्या ज्या जवळ परवाने नसतील त्यांची दुकाने त्वरीत बंद करावी व ज्या जवळ परवाने काढलेले आहेत. त्या दुकानदारानी बिफ मटन विकतांना व्यवस्थितपणा ठेवला तर त्याचे परवाने राहु दयावे नसता अशा काही दुकानदाराविरुध्द कार्यवाही करावी. तसेच त्यांनी मांस विक्री करतांना काच,जाळी, आणखी काही आरोग्याच्या दृष्टीकोनातुन प्रश्न उद्‌भवणार नाही. याची काळजी घ्यावी व अशाच नागरिकांना यापुढे देण्यात यावी.

**श्री. स.अली मिर सलामी :** स. नगरसेवक यांनी जी माहिती दिली त्यास माझी संमती आहे. त्या लोकांची दुकाने स्वच्छतेच्या दृष्टीने चांगल्या ठेवल्या आहेत. व काही दुकाने जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक असेल तर अशा दुकानदारांना नोटीस देऊन परवाने रद्द करावे.

**मा. सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** बऱ्याच दुकानदाराना या बाबत नोटीसा दिलेल्या आहेत की, ज्यांनी बिफ/मटन, मांस, मांसे, वगैरे विक्री करतांना त्यांनी जाळी, काच व्यवस्थीत पणे लावुन विक्री करावी जेणे करुन आरोग्याच्या दृष्टीने हिताचे राहील व ज्यांनी व्यवस्थीतपणे स्वच्छता व नियमाप्रमाणे विक्री केली नाही असे निदर्शनास आल्यास त्याचा परवाना रद्द करण्यांत येईल.

**श्री. संजय जोशी** : नवीन दुकानदाराला परवानगी देतांना लोकांची मनाई असतांना आपण त्या दुकानदाराला परवाना देऊ नये बरेच विना परवाना मांस/मटन उघडयावर विक्री करतात ज्यामुळे माशां व धुळ बसलेली असते व तेच नागरिकही घेतात.

**श्री. स.अली मिरा सलामी :** नविन दुकानदाराला परवानगी साठी ४ वर्षापासुन अर्ज आलेले आहेत. त्याचे (लायसन्स) परवाना आपण का अद्यापही देण्यात आला नाही.

**अभिमन्यु भालेराव :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी नोटीस दिल्या म्हणतात. तपासणी केलेले आहे. जेथे दुकाना आहे. तेथे पाहणी करुन अधिकारी यांनी व्यवस्थीपणे विक्री होत नाही अशा किती दुकानादारावर केसेस आपल्या महानगरपालिकाव्दारे केलेल्या आहेत.

**वैद्यकीय अधिकारी :** जवळपास ६५ अनाधिकृत मांस/मटन दुकानांवर धाडी टाकण्यात आली आहे. ३३५ बिफची दुकाने आहेत. बरेच लोकांनी लायसेंस नुतनीकरण केलेले नाहीत. ज्याची लायसंस आहेत. त्यांना दुकाने व्यवस्थित रित्या चालविणे बाबत सुचना दिल्या जातात व वेळोवेळी पाहणी केल्या जाते. आता पुढे माहे डिसेंबर नंतर नविन लायसंस देण्याची प्रक्रिया सुरु करण्यांत येईल.

**मा. सभापती :** शहरातील नविन मटन/मांस विक्री करणाऱ्यांसाठी परवाने देत असतांना मंदिर/मस्जीद/चर्च यांच्या आजुबाजुला परवाना देवु नये याची प्रशासनाने खबरदारी घ्यावी.

**श्री. संजय जोशी :** जेटिंग मशीन एक महिन्यापासुन बंध आहे हे खरे आहे काय?

**कार्यकारी अभियंता** : पाईप बदलण्याचे काम चालु आहे. मशीनचा एक पार्टस् मद्रासवरुन आणलेला आहे.

**उप अभियंतायांत्रिकी :** मशीनरी पार्ट खराब झाला आहे ती मशनरीचे पार्ट मागणी करण्यास वेळ लागत नाही. परंतु ती इतरपर्यंत येण्यास १५ दिवस लागतात. त्यामुळे पंधरा दिवसापासुन जेटिंग मशीन बंद आहे.

**मा. सभापती :** या मशीन पार्ट बाबत आपण ऑर्डर दिली आहे काय? पार्ट येण्यास किती वेळ लागेल.

**उप अभियंता यांत्रिकी :** मागणी करण्यास वेळ लागत नाही. परंतु इथपर्यंत येण्यास त्यास १५ दिवस लागतात.

**श्री. भगवान घडामोडे** : ज्याज्या विभागाची ज्या अधिकाऱ्यांना पुरेपुर माहिती नसते. तर अशा अधिकाऱ्या ऐवजी दुसऱ्या अधिकाऱ्यांवर काही कामाचा कार्यभार सोपावावा.

**श्री. म.अ.रऊफ स.अ. माबुद :** संबंधीत अधिकारी यांच्यावर करावी.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी याबाबत दखल घ्यावी की, १०-१५ दिवस मशीन बंद पडणार नाही. याबाबत उप आयुक्त-१ हे चौकशी करतील व पुढील बैठकीत माहिती दयावी.

**श्री. सुभाष टाकळकर :** श्री.पी.एम. देशमुख यांना २४-१०-९७ रोजी महानगरपालिकेतर्फे ऑर्डर देण्यात आलेली आहे. तो लाईन गार्ड असुन अंपग सुध्दा आहेत मा. प्रशासक श्री. भोगे साहेबांनी त्याला नोकरीवरुन काढले होते. सदरील व्यक्तीने कोर्टात केस पण टाकलेली आहे व अंपग सुध्दा आहे. त्याची कोर्टात केस चालु असतांना त्याला ऑर्डर कशा पध्दतीने देण्यात आली त्यांना आता सुध्दा पोहता येत नाही. तरीही त्याला कामावर घेण्याचा आदेश का देण्यात येतो. याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अ. शहर अभियंता :** सदरील व्यक्तीला पोहता येते तो अंपग नसुन एका हाताने फॅक्चर आहे. शिवाय माजी सैनिक आहे.

**मा. सभापती :** मा. उपआयुक्त-१ व अ.शहर अभियंता यांनी चौकशी करुन पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

**श्री. सुभाष टाकळकर :** सिडको भागात पाण्याचा प्रश्न आहे. तेथील ४७० प्रकरणे मनपाकडे आहेत. येथील बऱ्याच व्यक्तीला एकाच नावावर दोन दोन बिले येतात. त्यामुळे नागरिक बिले भरण्याचे टाळतात. या अशा प्रकाराबध्दल नागरीक नाराजी व्यक्त करतात. त्यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीत रक्कमेची भर पडत नाही. काही नळ बंद असुनही महानगरपालिकेची बिले येतात. मनपाचे मार्च पर्यंतचा वार्षिक अहवाल तयार करावा लागतो. त्यामुळे सदरील प्रकरणे निकाली काढावी व नागरिकांना वेळीच सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी माहिती दयावी.

**कार्यकारी अभियंता :** मागील १९८५ च्या दरम्यान जी बीले आहेत. ती माफ करावी अशा तक्रारी आहेत. याबाबत आपण झोन ऑफिसला कळवलेले आहे. आपणाला झोन ऑफिसर कडुन रिपोर्ट घेऊन नंतर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** आपण या बाबत झोन ऑफिसरला कळवुन रिपोर्ट मागवुन योग्य ती कार्यवाही लवकरात लवकर करावी.

**विषय क्र. ३०२/१ :**

दिनांक १६-१०-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पृष्ठ क्र. २ वर फिकवेगन्सी व्हॅलिड झालेले नसल्यास जी आलेली आहे. त्यामधुन सेट घेण्यात यावे असे मी सभागृहात बोललो होतो. ती दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पृष्ठ क्र. ३ एनर्जी- सेवेन ऐवजी एनर्जी सेव्हर अशी दुरूस्ती करावी. पृष्ठ क्र. १ कबाडीपुरा नाल्याच्या बाबतीतला प्रस्ताव मंजुर कसा झाला यांची माहिती दयावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : पृष्ठ क्र. ९ वर विषय क्र. २९१/११ चे इतिवृत्तात मा. आयुक्तांनी स्वतंत्र काम दयावे व ते काम बरोबर केलेले नसल्यास संबंधीत ठेकेदाराला हिशोब फायनल करुन डी. एस.आर प्रमाणे रेट लावावे. याबाबतची सविस्तर माहिती दयावी.

**कार्यकारी अभियंता :** संबंधीत गुत्तेदाराने काम व्यवस्थित रित्या केलेले नाही. दुसऱ्या इंजिनिअरला पाठवुन स्पेसिफिकेशन प्रमाणे कामाची पाहणी करावी. लागली ती केलेली नाही आणि त्याचे काम समाधानकारक नाही तेथील दगडी कामही योग्य रित्या केलेले नाही. त्यामध्ये बऱ्याचशा त्रुटया आढळुन आल्या त्या काढण्यासाठी संबंधीतांना पत्रही दिले. परंतु त्यांनी ऐकले नाही. स्वतःचे मनमानी करु लागला.

वेळोवेळी सुचना देऊनही ऐकले नसल्याने त्याचे जेवढे काम झाले त्या कामाचे पैसे नियमाप्रमाणे देऊन त्याचे नाव ब्लॅक लिप्ट मध्ये टाकण्याची कार्यवाही केलेली आहे.

**मा. सभापती** : १० लाखाचे ते काम होते. त्यामध्ये त्यांनी ६,०५,५६६/- रु. चे काम केले आहे. त्याचे आणखी काही रक्कम बाकी असेल तरी सदरील गुत्तेदाराला देण्यात यावी व त्याच्या कडुन काम करुन घेण्यात यावे.

**श्री. स.अली मिरा सलामी :** संबंधीताचे काम ७५% झालेले असल्याने आता त्याच्यावर कार्यवाही करणार ते अन्यायकारक आहे.

**कार्यकारी अभि. :** जो गुत्तेदार होता त्यांनी काम केले आहे. त्याचे पेमेंट देऊन त्यांना ब्लॅक लिस्टमधुन काढुन टाकु शकतो.

त्या प्रमाणे त्याला कॅम्लेशन प्रमाणपत्र दिलेले आहे.

मा. सभापती : विषय क्र. १ मंजुर व सदरील प्रस्तावामध्ये खालील प्रमाणे निर्णय देण्यात येतो.

१) ठेकेदार यांनी केलेल्या कामाचे महाराष्ट्र शासनाच्या अभियांत्रिकी महाविदयालया कडुन काम उत्तम दर्जाचे झाल्या बाबत चाचणी पत्र सादर केले आहे तसेच कामाचे उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांनीच काम निविदा पत्र प्रमाणे व वापरलेले साहित्य आय.ए.आय.दर्जाचे असल्याचे प्रमाणीत केलेले होते. करिता ठेकेदार याचे काळया यादीतील नाव कमी करण्यात येते. व दि. १६-१०-९७ रोजी ब्लॅक लिस्ट बाबत दिलेले निर्णय रद्द करण्यात येतो.

२) ठेकेदार यांनी केलेल्या संपुर्ण कामाचे व कामासाठी जमा केलेल्या साहित्याचे पुनः मोजमाप संपुर्णपणे घेण्यात यावे व त्याचे थकीत पेमेंट/बील त्वरीत देण्यात यावे.

३) निविदेतील बाब क्र. ६(डि. वाटरसिंग चे केलेले रिडयुस पेमेंट निविदा दराप्रमाणे बील देण्यात यावे.

**ठराव :**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २ मध्ये फ्रिक्वेन्सी व्हॅलीड झालेले नसल्यास जी आलेली असेल त्यामधुनच वापरलेत सेट घेण्यात यावे. अशी दुरुस्ती करण्यात येते.

२) पृष्ठ क्र. ३ मध्ये एनर्जी सेवन असा शब्दप्रयोग चुकीने झाला त्याऐवजी एनर्जी सेव्हर अशी दुरस्ती करावी

३) पृष्ठ क्र. ९ मधील विषय क्र. २९८/११ मध्ये

अ) ठेकेदार यांनी केलेल्या कामाचे महाराष्ट्र शासनाच्या अभियांत्रिकी महाविदयालयाकडुन काम उत्तम दर्जाचे झाल्या बाबत चाचणी पत्र सादर केले आहे. तसेच कामाचे उप-अभियंता व कार्यकारी अभियंता यांनीच काम निविदा पत्र प्रमाणे व वापरलेले साहित्य आय.एस.आय. दर्जाचे प्रतरुपाचे प्रमाणित केलेले होते. करिता ठेकेदार याचे काळया यादीतील नाव कमी करण्यात येते व दि. १६-१०-९७ रोजी ब्लॅक लिष्ट बाबत दिलेले निर्णय रद्द करण्यात येतो.
ब) ठेकेदार यांनी केलेल्या संपुर्ण कामाचे व कामासाठी जमा केलेल्या साहित्याचे पुनः मोजमाप संपुर्ण पणे घेण्यात यावे व त्याचे थकीत पेमेंट बील त्वरीत देण्यात यावे.
क) निविदेतील बाब क्र. ६ (डि.वाटरींग चे केलेले रिडयुम पेमेंट निविदा दराप्रमाणे बील देण्यात यावे.

या व इतर दुरुस्तीसह दिनांक १६-१०-९७ चे इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०३/२ :**

पैठणगेट ते क्रांतीचौक हया १०० फुट रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत मिळकत न.भु.क्र. १७६३६ ही १००% बाधीत होते हा रस्ता प्राधान्य रस्त्यापैकी आहे. सदर मिळकत धारकाने जागेच्या मोबदल्याची मागणी केली आहे.

सिद्धशिघ्र गणकानुसार या भागातील जमीनीचे दर घेऊन या प्रकरणी मुल्यांकन करता रस्त्याखालील ५०.०० चौ.मी. क्षेत्राचा मोबदला रु. २,५००००/- निश्चित केला आहे. खाजगी वाटाघाटी मध्ये मिळकत धारकाने वरील मुल्यांकनास मान्यता दिली आहे. तसेच खरेदी खर्च मनपाने ५०% व मिळकत धारकाने ५०% करायची ही मान्यता मिळकत धारकाने दिली आहे.

तरी खरेदी खतासाठी लागणारी ५०% रक्कम रु. १२,५००/- वळती करुन उर्वरित र.रु. २,३७,५००/- रु. दोन लाख सदतीस हजार पाचशे फक्त मिळकतधारक श्री. शेख अब्बास शेख छोटे यांची जागा संपादन करुन याचा देणेचे मान्यतेस्तव तसेच खरेदी खताच्या खर्चाची र.रु.२५०००/- श्री. डी.डी. काळेले शा. अ. यांना अग्रीम म्हणुन देण्यांत यावी.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

पैठणगेट ते क्रांतीचौक हया १०० फुट रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत मिळकत न.भु.क्र. १७६३३ संपादीत करण्याकरिता खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार मिळकतधारक श्री. शेख अब्बास शेख ठोटे यांना मोबदल्याची रक्कम रु. २,५०,०००/- पैकी खेरदी खताचा अर्धा खर्च रु. १२,५००/- वळती करुन उर्वरित रु. २,३७,५००/- अदा करण्यास तसेच खरेदी खताच्या खर्चाकरिता रु. २५,०००/- श्री. डी.डी. काळेले, शा.अ. यांना अग्रीम म्हणुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०४/३ :**

मौजे गारखेडा येथील सं.न. ६०/भाग आदित्यानगर, या मंजुर रेखांकनामधील खुली जागा क्षेत्र ५१७०/चौ.मी.(५५६२९) चौ.फुट आहे. ती निसर्ग मित्रमंडळ या नोंदणीकृत संस्थेने भाडेपट्टयाने मागणी केलेली आहे.

१) सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १६०/१ दि. २०-११-९६ नुसार मान्य असलेले भाडे रु. १००/- प्रति वर्ष राहील.
२) विकास नियंत्रण नियमावली नुसार अनुज्ञेय वापरासाठी व खुल्या जागेच्या क्षेत्राचे १००% अथवा २०० चौ.मी. दोहोपैकी जे कमी असेल त्यासाठी रितसर बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजुर करुन घ्यावा.
३) भाडेपट्टयाचा मुदत ३० वर्ष राहील परंतु प्रत्येक ५ वर्षानंतर करावयाचे धोरणानुसार इतर सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन घेऊन जागा ताब्यात देण्याची कार्यवाही मालमत्ता विभागाने करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे गारखेडा येथील सं.न. ६०/भाग आदित्यानगर, या मंजुर रेखांकनामधील खुली जागा क्षेत्र ५१७०/चौ.मी.(५५६२९ चौ.फुट) ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने प्रतिवर्ष रु. १००/- भाडयाने तसेच प्रत्येक पाच पर्षानंतर भाडेपट्टयाचे नुतनीकरण करुन घेण्याचे तसेच जागा प्रदान करावयाचे धोरणानुसार सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन घेऊन संस्थेस देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत असुन सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०५/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला मुर्गीनाला येथील तोटीच्या मस्जिद मागील गल्लीत शहाबाद फरशी बसविणे बाबतच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १,०४,१४४/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च भांडवली खाडकी रस्ते या शिर्षाखाली सन ९७-९८ या तरतुदीमधुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुर्गीनाला येथील तोटीच्या मस्जिद मागील गल्लीत शहाबाद फरशी बसविणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,०४,१४४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०६/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गणेश कॉलनी येथे शहाबाद फरशी बसविण्याच्या कामासाठी सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. १,०७,७००/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "नविन खांडकी रस्ते" या शिर्षकातुन सन ९७-९८ या वर्षाच्या तरतुदीमधुन करण्यांत येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गणेश कॉलनी येथे शहाबाद फरशी बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १,०७,७००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "नविन खांडकी रस्ते" या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०७/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. सादतनगर, राहुलनगर स्लम भागात क्रॉसींग ठिकाणी बॉक्स कलव्हर्ट बांधणे कामाकरिता रक्कम रु. ६,०८,४४०/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दि. १४-९-९७ रोजी मान्यता प्रधान केली आहे. सदर काम गलिच्छ वस्ती सुधारण ९७-९८ शिर्षाखाली खांडकी रस्ते कल्व्हर्ट या शिर्षा अंतर्गत करण्यांचे प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सादतनगर, राहुलनगर स्लम भागात क्रॉसींग ठिकाणी बॉक्स कलव्हर्ट बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ६,०८,४४०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "गलिच्छ वस्ती सुधारणा ९७-९८ शिर्षखाली रस्ते व कल्व्हर्ट या शिर्षअंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०८/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि. १३-२-९७ च्या ऐनवेळीच्या विषय क्र. ६६२/१० अन्वये सुलभ शौचालय बांधणे व देखभाल करणे करिता सुलभ इंटरनॅशनल महाराष्ट्र यांचे तर्फे खालील प्रमाणे अंदाजपत्रक सादर करण्यात आले होते.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | सेलटॅक्स ऑफिस स्टेशन समोर | ७,४०,०००/- |
| २. | सरस्वती भुवन नाला औरंगपुरा | ७,५०,०००/- |
| ३. | आंबेडकरनगर गरवारे कंपनीजवळ | १०,३०,०००/- |

व सदर विषयांकित ठरावात दर्शविलेल्या नियम अटीनुसार सुलभ इंटरनॅशनल यांना खालील कामाकरिता ५०% अग्रिम मधुन देण्यांत आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सेलटॅक्स ऑफिस स्टेशन समोर | ३,४०,०००/- |
| २. | सरस्वती भुवन नाला औरंगपुरा | ३,७५,०००/- |

दि. ६-५-९७ रोजी मा. आयुक्त यांचे बरोबर सेल टॅक्स ऑफिस स्टेशन समोर "सुलभ शौचालय बांधणेबद्दल चर्चा करण्यात आली की, ३ वेळा सदर भागात जागा बदल्यानंतर ही जागा उपलब्ध होऊ शकली नाही करिता मा. आयुक्त यांचे बरोबर स्थळ पाहणी केली फोडर मार्केट पुला जवळ सुलभ शौचालय बांधणे करिता पहाणी करण्यात आली असता मा. आयुक्तांनी दि. १३-७-९७ रोजी सदर ठिकाणी सुलभ शौचालय बांधणेच्या मान्यता प्रधान केली आहे.

करिता सेलटॅक्स ऑफिस स्टेशन समोर शौचालय बांधणे ऐवजी फोडर मार्केट (जाफर गेट) या ठिकाणी बांधण्याची मान्यता होणे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुलभ इंटरनॅशनल महाराष्ट्र यांचेतर्फे बांधण्यात येणाऱ्या सुलभ शौचालयापैकी सेलसटॅक्स ऑफिस स्टेशन समोर जागा नसल्यामुळे याऐवजी फोडर मार्केट (जाफगेट) या ठिकाणी सुलभ शौचालय बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०९/८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मराठवाडा सांस्कृतिक मंडळापासुन अंजली सिनेमागृह जवळील नाल्यापर्यंत ६०० मी.मी. व्यासाची पावसाचे पाणी वाहुन जाण्यासाठी आर.सी.सी. ड्रेनेजलाईन टाकण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास विषय क्र. १८०/३९ दि. १६-८-९७ रोजी स्थायी समितीने रु. ३,७१,३००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द देवुन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण एकोणीस (१९) कोऱ्या निविदा विक्री झाल्या सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखपर्यंत एकुण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन | ०५% | कमी दराने |
| २. | मे. विपुल कंन्स्ट्रक्शन | १०% | जास्त दराने |

वरीलप्रमाणे तुलनात्मक दृष्टया कमी दर हा मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांना आहे. म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०५% कमी दराची मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांची निविदा असुन दि. ६-१०-९७ रोजी त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

सबब सादर कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०५% कमी दराची मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मराठवाडा सांस्कृतिक मंडळापासुन अंजली सिनेमागृह जवळील नाल्यापर्यंत ६०० मी.मी. व्यासाची पावसाचे पाणी वाहुन जाण्यासाठी आर.सी.सी. ड्रेनेजलाईन टाकणेच्या कामाकरिता तयार प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराची मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांची ०५% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१०/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. म्हाडा को. (गृहनिर्माण भवन जवळ) येथे नविन आर,सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या ९५-९६ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रकीय र.रु. ३,१८,०००/- चे तयार करण्यांत आले असुन या कामास मा. आयुक्त यांची दि. ६-१०-९७ रोजी मान्यता मिळाली आहे. तरी सदरील खर्च दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षकातुन करण्यांत येईल.

तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, म्हाडा कॉलनी (गृहनिर्माण भवन जवळ) नविन आर,सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,१८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च दुरुस्ती व देखभाल या लेखा शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३११/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा येथे श्री. शेख भिखन यांच्या घरापासुन ते श्री. इंगळे यांच्या घरापर्यंत १५० मी.मी. व्यासासाठी ए.सी. जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुची नुसार र.रु. १,५२,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधुन करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा येथे श्री. शेख भिखन यांच्या घरापासुन ते श्री. इंगळे यांच्या घरापर्यंत १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,५२,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामाच्या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१२/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जवाहर कॉलनी येथील भाजी मंडईमध्ये विविध प्रकारची बांधकामे करावयाची आहेत. यासाठी सा.बांधकाम विभागाचे सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. २,३९,९०५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. ६-१०-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर कामाचा खर्च आठवडी बाजार विकसित करणे व आवश्यक सुविधा पुरविणे या लेखा शिर्षकामधुन करण्यांत येणार आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जवाहर कॉलनी येथील भाजी मंडईमध्ये विविध प्रकारची बांधकामे करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. २,३९,९०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१३/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अभिनय टॉकीज ते किराणा चावडीपर्यंत रोडवर पोलसह सोडियम व्हेपर दिवे बसविण्याच्या कामाबाबत रु. ९,७८,११३/- चे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुची अन्वये तयार करण्यांत आले आहे. सदरील काम शासनाकडुन प्राप्त झालेल्या रु. ४.०० कोटी शासकीय अनुदानातुन

प्रस्तावित आहे. सदर कामास मा. आयुक्तांची प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. तरी अभिनय सिनेमा टॉकीज ते किराणा चावडी पर्यंत रोडवर पोलसह सोडियम व्हेपर दिवे लावण्यासाठी रु. ९,७८,११३/- अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अभिनय टॉकीज ते किराणा चावडीपर्यंत रोडवर पोलसह सोडियम व्हेपर दिवे बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ९,७८,११३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च शासनाकडुन प्राप्त झालेल्या रु. ४.०० कोटीच्या अनुदानातुन करण्यांस मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१४/१३ :**

वॉर्ड क्र. ५८ मधील समतानगर या भागात महापालिकेच्या प्राथमिक शाळेकरिता नगर भुमापन क्र. १७९७२/पै चा भाग असलेला श्रीमती मालती विरेंद्रकुमार रस्तोगी यांचे मालकीचा भुखंड (क्षेत्र १७९.० चौ.मी.) संपादित करण्याचे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

समतानगर ही अनाधिकृत झालेली वसाहत असुन तेथे प्राथमिक शाळेसारखी सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता महापालिकेची जागा उपलब्ध नसल्याने जनतेचीह मागणी विचारात घेऊन खाजगी वाटाघाटीने संबंधीत स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे व नमुद खाजगी मिळकत/भुखंड संपादित करण्याचे करण्याचे कार्यवाही अंतर्गत प्रशासकीय मान्यतेनंतर जागेचे मुल्यांकन करण्यांत आले. हया जागेवरील अस्तित्वात असलेले १३२.० चौ.मी. क्षेत्राचे बांधकाम, बांधकामाची सद्यस्थिती व उपयुक्तता इत्यादी चा एकत्रित विचार करुन हया भुखंडाकरिता रक्कम रु. ४,०४,०००/- एवढा मोबदला निश्चित करण्यांत आला आहे. तसेच जागा हस्तांतराकरिता येणाऱ्या रीतसर नोंदणीकृत दस्तऐज/खरेदीखताकरिता येणाऱ्या निम्मा खर्च संबंधीत जमीन मालक करणार आहेत.

करिता खाजगी वाटाघाटीने भुसंपादन करावयाचा सदरील प्रस्ताव व संपादीत करावयाचे जमीनीकरिता द्यावयाच्या मोबदल्याची रक्कम रु. ४,०४,०००/- मान्यते साठी सादर.

मान्यतेनंतर संबंधीत जमीन मालकास नोंदणीकृत दस्तऐवजाकरिता येणाऱ्या खर्चाची निम्मी रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम देण्यांत येईल. हया जमीनीचे नोंदणीकृत दस्तऐवज/खरेदीखता करिता लागणारा खर्च रक्कम रु. ३६,५००/- श्री. खन्ना एस.पी. शाखा अभियंता यांना अग्रिम म्हणुन देण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समतानगर भागात मनपा प्राथमिक शाळेकरिता न. भ.क्र. १७९७२/पै चा भाग असलेला श्रीमती मालती विरेंद्रकुमार रस्तोगी यांचे मालकीचा भुखंड (क्षेत्र १७९. चौ.मी.) संपादित करण्याकरिता खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार मोबदल्याची रक्कम रु. ४,०४,०००/- मधुन नोंदणीकृत दस्तऐवज/खरेदी खताकरिताचा निम्मा खर्च वळती करुन उर्वरित रक्कम जमीन मालकास देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. जमीनीचे नोंदणी कृत/दस्तऐवज/खरेदी खताकरिता लागणारा खर्च रु. ३६,५००/- श्री. एस.पी. खन्ना शाखा अभियंता यांना अग्रीम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचा विषय*

**विषय क्र. ३१५/१४ :**

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी केलेल्या लेखा परिक्षण अहवाल माहे नोव्हें ९६ ते सप्टे. ९७ पर्यंतच्या अहवालावर विचार विनिमय करणे. (अहवाल वाटप यापुर्वीच करण्यात आलेले आहे)

**संवाद**

**मा. सभापती :** सदरील विषयाची सविस्तर माहिती पुढच्या मिटींगला ठेवण्यात येऊन चर्चा करण्यांत येईल.

**ठराव :**

सदरील विषयावर पुढील बैठकीत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३१६/१५ :**

ठराव क्र. २२८/७ दि.९-१०-९६ प्रमाणे सी.आय.डी. एफ.स्लुस वॉलव (आय. व्ही.सी. किंवा किर्लोसकर) खरेदी करण्यासाठी निविदा मागवुन त्यामध्ये सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने मे.अर्थ मोव्हर्स यांची होती. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन करारनामा करुन घेऊन सदर साहित्याचा पुरवठा करण्याबाबत आदेश देण्यात आले. परंतु मे. अथ्र मोव्हर्स यांनी दि. ८-८-९७ ला पत्र देऊन स्लुस वॉलव्हचा पुरवठा करण्यासंबंधी असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाच्या गुत्तेदारास मे. सुरज इंटरप्रायजेस ज्यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.४०% जास्त दर होते. त्यांना पत्र देवुन स्लुस वॉलवचा पुरवठा करण्यासंबंधी विचाराणा केली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने स्लुस वॉलवचा पुरवठा करण्यांस तयार असल्याबाबत त्यांनी पत्र देवुन लेखी कळविले आहे. त्या अनुषंगाने मे. अर्थ मोव्हर्स यांनी सदर साहित्याचा पुरवठा न केल्यामुळे त्यांचा करारनामा रद्द करुन कार्यालयात जमा करण्यात आलेले २% अनामत रक्कम जप्त करुन मे. सुरज इंटरप्रायजेस यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दर स्विकारुन त्यांच्याकडुन करारनामा करुन घेऊन कामाचा आदेश देणेस्तव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे अर्थ मोव्हर्स यांनी साहित्याचा पुरवठा न केल्यामुळे त्याचा करारनामा रद्द करुन त्यांची २% अनामत रक्कम जप्त करुन सदर काम मे. सुरज इटरप्रायजेस यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दर असलेली निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१७/१६ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शासनाचा अनुदानित कार्यक्रम माताबाल संगोपन या अंतर्गत शहरातील माता व बालकांना पौष्टीक औषधे वितरण करणे जरुरी असल्याने त्यासाठी नेटल केअर पावडर जी मे. दालमिया इंडस्ट्रिज लिमिटेड,

न्यु दिल्ली यांचे उत्पादन असुन त्यांचेकडुन उत्पादक कंपनी दर रु. ३३३/- प्रति किलो प्रमाणे एक हजार पाचशे किलो संपुर्ण वर्षासाठी खरेदी करुन वितरण करावयाचे आहे. या खरेदीस व येणाऱ्या खर्चास मान्यता देवुन मंजुरी देणे योग्य मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाचा अनुदानित कार्यक्रम माताबाल संगोपन या अंतर्गत शहरातील माता व बालकांना पौष्टीक औषधे वितरण करणे करिता नेटल केअर पावडर मे. दालमिया इंडस्ट्रिज लिमीटेड, न्यु दिल्ली यांचे कडुन कंपनी दर रुपये ३३३/- प्रति किलो प्रमाणे एक हजार पाचशे किलो संपुर्ण वर्षासाठी खरेदी करुन वितरण करणेच्या येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१८/१७ :**

ऐनवेळी चर्चेव्दारे आलेला प्रस्ताव.

**संवाद**

**मा. सभापती :** श्री. काझी, पवार यांच्या वर पाईप वॉल इ. वस्तु चोरीस गेल्याच्या करणावरुन त्यांना निलंबीत केले होते. परंतु ते निर्दोष आहेत तर त्यांना रेगुलर करण्यात यावे असा कोर्टाचा आदेश आहेत.

**श्री. संजय जोशी :** ते गुन्हेयात निर्दोष आतील तर त्यांना रेगुलर करुन फूसीलीटी देण्यांत याव्यात.

**मा. सभापती :** मनपा कर्मचारी श्री. पवार व श्री. काझी हे पाईप व वॉल या वस्तु गेल्याच्या आरोपावरुन त्यांना निलंबीत केले होते. परंतु ते निर्दोष आहे असे दिसुन आले. त्यामुळे त्यांना योग्य त्या फॅसीलिटी देऊन रेगुलर करण्यात यावे.

**ठराव :**

श्री. पवार व श्री. काझी यांना निलंबीत केले होते. त्यामध्ये एक वर्षाच्या स्थगित वेतन वाढ नियमीत करावे व रजेत रुपांतर केलेला निलंबीत काळ सेवाकाळ समजण्यात यावा. याबाबत प्रशासनाने योग्य ती तपासणी करुन कार्यवाही करावी.

या बरोबर "जन गण मन" राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २४-११-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सोमवार दि. २४-११-९७ रोजी मा. सभापती श्री. प्रभाकर सिताराम विधाते यांच्या अध्यक्षते खाली दुपारी ४.०० वाजता "मलीक अंबर- सभागृहात संपन्न झाली तिचे इतिवृत्त सभेची सुरुवात वंदेमातरम् या गिताने झाली. सभेस अधिकारी वर्ग व खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. गिरजाराम हाळनोर | स.सदस्य |
| २) | स.स. श्री. त्रिंबक तुपे | --//-- |
| ३) | स.स. श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ४) | स.स. श्री. कचरु चंद्रभान नवपुते | --//-- |
| ५) | स.स. श्री. अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ६) | स.स. श्री. विकास जैन | --//-- |
| ७) | स.स. श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ८) | स.स. श्री. अब्दुल रशिदखॉन (मामु) | --//-- |
| ९) | स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद | --//-- |
| १०) | स.स. श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ११) | स.स. श्री. संजय जोशी | --//-- |
| १२) | स.स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| १३) | स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १४) | स.स. श्री. बन्सी गागवे | --//-- |
| १५) | स.स. श्री. जयवंत (बंडु) ओक | --//-- |

**संवाद**

**श्री. अ.अली मिरा सलामी** : शहरातील जी अतिक्रमणे झालेली आहेत ती अतिक्रमणे महानगरपालिकेने हटविण्याची मोहिम हाती घेतलेली आहे हा चांगली बाब असुन सदरील मोहिमेत असलेले अधिकारी व कर्मचारी यांनी अतिक्रमण हटवितांना जे बेघर नागरिक छोटया व्यवसायातुन आपली उपजिविका भागवतात अशा लोकांच्या टपऱ्या हटवण्यात आलेल्या आहेत. ज्याच्या टपऱ्या रोडवर कायमच्या आहेत त्यांच्या काढण्यात आलेल्या नाहीत व ज्यांच्या टपऱ्या रोडवर नुसत्या उभ्या असलेल्या टपऱ्या मुद्दामहुन हटविण्यात आलेल्या आहेत या बाबत प्रशासन योग्य त्या प्रकारचे नियमाचा वापर करीत नाही. याची दखल प्रशासनाने घ्यावयास पाहिजे. तसेच सभागृहात संबंधीत अधिकारी सांगतात नविन टपऱ्या बाबत कधीही फॉर्म वाटप केले नाही. परंतु नविन फार्म वाटप मोहिम चालु असुन माझ्याकडे त्याबाबतचा एक पुरावा म्हणुन आदेशाची प्रत आहे तेव्हा आपण एका बाजुने फॉम्र वाटप करता व एका बाजुने अतिक्रमण हटविण्याची मोहिम हाती घेता हे कोणत्या नियमा आधारे कामे करतात. महानगरपालिकेने ज्या अनाधिकृत टपऱ्या असतील त्यांना फॉर्म देऊन नियमाप्रमाणे परवानगी दयावी व नविन लोकांना टपरी बाबत आदेश कसा दिला याचा माहिती दयावी.

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिकेने अतिक्रमण हटविण्याची मोहिम सुरु केली व बऱ्याच ठिकाणची अतिक्रमणे हटविलेली आहेत. त्याबद्दल मी प्रशासनाचे प्रथमतः अभिनंदन करतो जी मोहिम हाती घेतली व जी अतिक्रमणे हटवलेली आहेत ती कुणाच्या दबावाला बळी न पडता उठवलेली आहेत. अतिक्रमण हटवुन जी निरला बाजार येथील जागा खाली केली ती जागा महानगरपालिकेने ताब्यात घ्यावी त्या ठिकाणी अतिक्रमण होऊन पुन्हा दुकाने होणार नाही याची दखल घ्यावी. तसेच मध्यर्ती बसस्टॅन्ड व मेडीकल कॉलेज जवळील जी अतिक्रमणे हटविली त्या सर्व माकळया जागांवर लोखंडी ग्रील बसविण्यात यावे म्हणजे त्या जागेवर अतिक्रमण होणार नाहीत. बऱ्याच वेळा मी सभेमध्ये सांगितले की, हेडगेवार रुग्णालयाजवळ ज्या अतिक्रमणाच्या टपऱ्या आहेत. त्या हटविण्यात याव्यात परंतु प्रशासनाने त्याची दखल घेतलेली आहे.

सदरील ठिकाणचे अतिक्रमण लवकरात लवकर हटविण्यात यावे अशी माझी प्रशासनास विनंती कारण तयार ठिकाणी हेडगेवार हॉस्पीटल मध्ये येणाऱ्या रुग्णांना सारखा त्रास शिवाय त्या ठिकाणी हॉटेल ही आहे. त्याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री. जयवंत ओक** : शहरातील अतिक्रमण हटविणे ही चांगली बाबत असुन प्रशासनाने हेतुपुरस्सर अतिक्रमण हटविणे हे चांगले नाही. निराला बाजार येथील अतिक्रमण हटविले परंतु शहरातील अशाच प्रकारचे असलेले अतिक्रमण हटवावे. शहरातील गरिब व होतकरु असलेल्या नागरिकांच्या टपऱ्या हटविण्यात आल्या आहेत. याबाबत प्रशासन पक्षपातीपणा दाखवत आहे. कारण शहरात गेल्या १०/१० वर्षापासुन अनाधिकृत जागेवर दुकाने व टपऱ्या आहेत त्यांच्या टपऱ्या हटविण्यापुर्वी संबंधीत अर्धा तासाच्या वेळ देण्यात यावा. प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता नियमानुसार शहरातील अतिक्रमण हटवावे व शहरातील रोड रुंद करतांना ६० फुटा रुंद रस्ता करण्या ऐवजी ४० फुट रुंद रस्ता काहीच्या सुचनेवरुन करतात. त्यामुळे अतिक्रमणे शहरात वाढतात याची प्रशासन दखल घेत नाही. यासाठीच पक्षपातीपणा प्रशासनाने करु नये अशी मी विनंती करतो.

१) टपऱ्या टवितांना अर्धातास पुर्वी सुचना कराव्यात. २) शहागंज चमनभोवती संपुर्ण अतिक्रमने टपऱ्या आहेत. त्या काढल्या काय? ३) शहरातील रस्ते मोठे करावे यात भेदभाव करु नये व त्यामुळे प्रशासनाचे धोरण पळकुटे वाटते.

**मालमत्ता अधिकारी** : या विभागामार्फत फॉर्म वाटप झालेल्या नाहीत लासेंस नुतनीकरण केलेले आहेत.

**मा. सभापती :** महानगरपालिकेने सध्या अतिक्रमण हटाव मोहिम हाती आहे. संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांनी पक्षपाती न करता व कुणाच्याही दबावाला न येता अतिक्रमण हटविण्याची मोहिम सुरुच ठेवावी. व स. सदस्य यांनी मुद्दा उपस्थित केला की, टपऱ्या बाबत संबंधीत विभाग फॉर्म वाटप करु लागले परंतु फॉर्म वाटप झालेले नाही. याबाबतचा निर्णय टपरी समितीचा आहे. त्यानुसारच कार्यवाही होईल.

**श्री. अ.रशिद खॉन (मामु) :** अतिक्रमण हटवितांना महानगरपालिकेतील अधिकारी यांनी नियमाचा कोणताही भंग करु नये. जे अतिक्रमण आहेत. ती काढण्यात

यावीत यामध्ये कोणत्याही प्रकारची पक्षपाती पणाची प्रशासनाने घेऊ नये व कोणाही व्यक्तीच्या दबावाखाली येऊ नये.

**श्री. स. अली मिरा सलामी :** टपरी वाटप बाबत फॉर्म संबंधीत विभागाने वाटप केलेले आहे. त्याचा नमुना म्हणुन एक आदेशाची प्रत माझ्याकडे आहेत. (स.सदस्य तो फॉर्म सभागृहात दाखवतात) या शिवाय झुणका भाकर केंद्रास परवानगी देतांना झुणका भाकरी शिवाय इतर खादय पेये ठेवावे काय? अशी परवानगी नसतांनाही बऱ्याचशा झुणकाभाकर केंद्रावर बरेचसे खाद्य पदार्थ विक्रीसाठी ठेवुन दुकाने व जागा वाढवितात. त्याबाबत प्रशासन योग्य ती कार्यवाही करीत नाही.

**मालमत्ता अधिकारी :** (याचवेळी मालमत्ता अधिकारी हे तो फॉर्म घेतात व शहानिशा करतात त्यावेळी तो फॉर्म नुतनीकरणाचा आहे. असे निदर्शनास आणु देतात) ज्यांना ज्यांना लायसेंस मिळालेलेग आहे त्यांनी नुतनीकरण साठीचा हा आदेश आहे. स.सदस्याचा या बाबत गैरसमज झाला असुन आपल्या विभागातुन कोणत्याही व्यक्तींला फॉर्म वाटप केलेले नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी :** संबंधीत अधिकारी दिशाभुल करीत आहेत. आदेशांची प्रत असुन मालमत्ता विभागामार्फत टपरीसाठी एक एक फॉर्म गुप्तपणे वाटण्यात येत आहेत.

**मा. सभापती :** संबंधीत नगरसेवक यांना टपरीवाटप फॉर्म वाटप आहेत गैर समज झालेला आहे तो फॉर्म नुतनीकरणाचा आहे. नवीन फॉर्म वाटप झालेले नाहीत. या व्यतिरिक्त प्रशासनाने कोणतेही अतिक्रमण हटवितांना पक्षपातीपणाची भुमिका येऊ नये व कुणाच्या ही दबावाला बळी पडु नये. अशी मी सुचना करतो.

**श्री. जयवंत ओक :** शहरातील अतिक्रमण मोहिम चालु असतांना शनिवार, रविवार व सोमवार या तीन दिवसांपासुन अतिक्रमण मोहिम हटविणे बंद का केले होते. याची माहिती दयावी. ज्यामुळे बऱ्याच मोठमोठया व्यक्तींना कोर्टात जाण्याची संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी अतिक्रमण हटाव मोहिम ही पुर्ण होईपर्यंत चालुच ठेवावी यामध्ये खंड पडु देवु नये.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहरातील अतिक्रमणे हटविणे ही मोहिम अत्यंत चांगल्याप्रकारची असुन अभिमानास्पद बाब आहे. प्रशासनाने छोटी व मोठी असलेली अतिक्रमणे हटविलेली आहेत. परंतु असे ही निदर्शनास आलेले आहे की, स.स. श्री. ओक यांनी सुचना केल्याप्रमाणे टपऱ्या हटवितांना अगोदर १/२ तास सुचना दयाव्यात त्यानंतरही जर काढले नाही तर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

**उप आयुक्त-१ :** महानगरपालिकेने दि. १७-११-९७ पासुन शहरातील अतिक्रमणे व अनाधिकृत बांधकाम हटविण्याची मोहिम हाती घेतलेली आहे. शासनाच्या धोरणानुसार १-१-९६ नंतरचे शहरातील जी अतिक्रमणे व अनाधिकृत बांधकामे आहेत. ज्यामध्ये टपऱ्या रोड, फुटपाथवरील अतिक्रमणे, पार्किंग इ. बाबत पोलिस संरक्षण घेऊन मा. आयुक्तांच्या परवानगीने शहरातील जी अतिक्रमणे आहेत. ती काढण्यात आलेली आहेत. सुमारे अंदाजे ४५०-५०० अतिक्रमणे हटविले आहेत. मा महापौर यांच्या वार्डा पासुन अतिक्रमण हटविले आहेत. यात कुणाचाही दबाब नाही. शनिवारला ही मोहिम चालु होती रविवार सुट्टीचा दिवस असल्यामुळे ही मोहिम बंद होती आज ही

अतिक्रमण हटविणे मोहिम बंद नाही. कोणच्याही दबावाखाली प्रशासन येणार नाही, मी स्वतः या मोहिमेत जातीने हजर होतो. उपआयुक्त-२ या पदासाठीची मुलाखत दबावाखाली प्रशासन अधिकारी कार्यालयात होते. तरीही अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींना जवळ जवळ १/२ तासांचा अवधी देण्यात आलेला होता त्या काळात बाजुला हटविलेले नसेल तर त्यांने अतिक्रमण काढण्यात आलेले आहेत.

२) शहरातील जे झुनकाभाकर केंद्र आहेत तेथील ही अतिक्रमणे बऱ्याच ठिकाणी काढण्यात आली आहेत. ३) आजही बस स्टॅन्ड समोरील काढण्यात आलेल्या टपऱ्या पुन्हा बसल्यामुळे हटविण्यात आलेल्या आहेत.

**श्री. जयवंत ओक** : शहरातील जी अतिक्रमणे २-३ वर्षापासुन आहेत ती काढण्यात आली नाही. गरिब नागरिकांच्या टपऱ्या काढण्यात येतात मोठमोठया नागरीकांना नोटीसा बजावतात. त्यानुसार ते कोर्टात जातात व कोर्टातुन स्टे आणतात. त्यामुळे काहीही कार्यवाही करता येत नाही.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** संबंधीत कार्यालयातील अतिक्रमण असलेल्या नावाची यादी नुसार अतिक्रमणे काढण्यात आलेली नाहीत मी गेल्या कित्येक दिवसांपासुन पत्राव्दारे व स्थायी समिती सभेतही विचारणा करतो की, झोन-५ मधील जी अतिक्रमणे झालेली आहेत. उदा. पॉवर लुम कारखान्याजवळील, मसनतपुर वगैरे ठिकाणची अतिक्रमणे त्वरीत हटवावी यासाठी पोलिस मदत न मिळाल्यास मी स्वतः उभा राहतो तेथील रहदारी वाढलेली असुन कारखाने मनपाला व्यवस्थित टॅक्स भरतात तेव्हा झोन-५ कडेही प्रशासनाने लक्ष दयावे.

**श्री. स.अली मिरा सलामी :** झुनका भाकर केंद्रासमोरील जागा आहे त्या बाबत प्रशासनाने अतिक्रमण हटविलेले आहे काय?

**उप आयुक्त-१ :** अतिक्रमण हटविण्याचा मोहिम सध्याही चालुच आहे. काही वेळा पोलिस संरक्षण मिळत नाही. त्यासाठी पोलिस संरक्षणासाठी पाठपुरावा करावा लागतो.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** संबंधीत विभागातील यादीनुसार अतिक्रमणे हटविण्यात आलेले नाहीत या बाबत मी मा. आयुक्त व मा. महापौर यांना ही भेटलो व तसे पत्र दिलेले आहेत. या बाबत आपण कार्यवाही करावी.

**श्री. भगवान घडमोडे** : अतिक्रमण मोहिम हटवितांना प्रशासनाचे जे अधिकारी असतील त्यांच्या नजर चुकीने एखादया ठिकाणचे अतिक्रमण राहिले असेल तर स.सदस्यांनी प्रशासनाच्या लक्षात आणुन दयावे व स. सदस्यांनी यात सहभागी व्हावे असे माझी विनंती आहे. पैठणगेट व गुलमंडी येथील अतिक्रमण हटवित असतांना एकाचे हटविले व त्यांच्या बाजु ताल्याचे हटविले नाही यांचे नेमके गुढ काय आहे? हे प्रशानालाच मोहित.

**श्री. संजय जोशी :** शहरातील जेथे जेथे ओपन स्पेस आहेत तेथे अतिक्रमण झालेले असल्यास ती हटवुन त्या ठिकाणी वायर फेन्सींग करुन घ्यावे व प्रशासनाने त्या जागेवर पुन्हा अतिक्रमण होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**मा. सभापती- :** १) अतिक्रमण मोहिमे बाबत खुप चर्चा झालेली आहे. संबंधीत अधिकारी यांनी ही मोहिम राबवितांना संबंधीत नागरीकांच्या टपरी,वगैरे हटवितांना १/२ तासाचा कालावधी देण्यात यावा. त्यानंतर अतिक्रमण हटवावे. १) दुसरी बाब अशी की, संबंधीत अधिकारी यांनी नियमानुसार अतिक्रमणे

हटवावी. कोणत्याही दबावाला बळी न पडता अतिक्रमण थांबवु नये. महानगरपालिकेच्या खुल्या जागेवरील अतिक्रमणे हटविल्यास वाय फेन्सींग करुन महानगरपालिकेचा त्या ठिकाणी बोर्ड लावावा.

**श्री. कचरु नवपुते :** शहरातील हद्दीमध्ये जे रोडवर धाबे आहेत तेथील पाण्यात लहान-मोठे जीवाणु (किडे) असतात. या बाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी आतापर्यंत किती पाण्याचे नमुने आणलेले आहेत. याची माहिती दयावी.

**आरोग्य वैद्यकीय आधिकारी :** जे पाण्याचे नमुने घेतलेले आहेत ते झोन वाईज घेतलेले आहेत. पाण्याचे नमुने घेण्यासाठी महानगरपालिकेकडे एकच निरीक्षकाचे पद असल्यामुळे तपासणीकामी उशिर होतो. संपुर्ण करण्यास वेळ लागणार आहे.

**मा. सभापती :** शहरातील जे धाबे आहेत तेथील पाण्याचे नमुने त्याचप्रमाणे शहरातील हॉटेल्स् आहेत तेथीलही नमुने घेऊन तपासणी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी करावी व याबाबतचा अहवाल सादर करावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहरातील रोड रुंदीकरणाचे काम केले जाते. परंतु त्या अगोदर रोड दुभाजक वळण टाकले जाते ते रोड रुंदीकरण केल्यानंतर टाकण्यात यावे कारण त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. याचे उदा. दयावयाचे झाल्यास पवन गॅस समोरील रस्ता रुंदीकरण करण्यापुर्वीच डिव्हायडर केल्याने रस्ता रुंद होण्याऐवजी अरुंद झाला.

**श्री. जयवंत ओक :** शहराचा व्यवस्थीत विकास होणेच्या दृष्टीने मनपाने ५० ते ६० फुटाचा रोड रुंदीकरण प्रस्तावाच्या उलट ४० फुटाचा रस्ता करु नये.

**अति. शहर अभियंता** : रोड रुंदीकरण करतांना अगोदर दुभाजक वळण टाकले जाते. कारण रोड रुंदीकरण करुन त्याची लेव्हलींग डब्ल्यु बी एम केली जाते. खडी दबल्यानंतर रस्ता तयार केला जातो व सुव्यवस्थित होतो.

**श्री. संजय जोशी :** शहरातील रोड रुंदीकरण करतांना अगोदर रस्ता तयार करुन त्यानंतर दुभाजक वळण टाकण्यात आले पाहिले कारण स.स.नी सुचना केल्याप्रमाणे सदरील रोडवर एक डी.पी. मध्ये येत असल्याने अपद्यात होण्याची चिन्हे दिसतात.

**मा. सभापती :** ठिक आहे. संबंधीत अधिकारी यांनी या बाबत या पुढे होणाऱ्या रोड रुंदीकरण रस्ते व दुभाजक टाकण्याबाबत दखल घ्यावी व पुढील कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिद खॉन (मामु) :** माजी महापौर यांनी फोनवर कळविले की त्यांच्या वार्डातील काही ठिकाणी विद्युत लाईट बंद होते. संबंधीत अधिकारी यांना सांगुनही याकडे लक्ष का देत नाही. याचा खुलासा करावा.

**श्री. गौतम लांडगे :** महानगरपालिकेत बऱ्याच विभागात कर्मचाऱ्याची आवश्यकता असुन मागे सर्वसाधारण सभेत "आकृतीबंध" बाबतचा प्रस्ताव ठेवलेला होता. परंतु तो मंजुर झालेला नाही त्यामुळे संबंधीत विभागात कर्मचारी अपुरे असुन त्यामुळे शहरातील विद्युत उपाययोजना ची व्यवस्था करण्यात दिरंगाई होते. महानगरपालिकेचे कर्मचारी आकृतीबंध प्रस्ताव मंजुर करुन नविन कर्मचारी भरण्यात यावे त्यामुळे प्रत्येक वार्डात कोणत्याही समस्या सोडविण्यास महानगरपालिकेतील प्रशासनाला सोपे जाईल याची सभागृहाने नोंद घ्यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** विद्युत विभागास कर्मचारी अपुरे आहेत असे म्हणणे चुकीचे असुन या विभागाकडे हैड्रोलिक गाडी आहे याद्वारे कार्यवाही होत असते.

**श्री. जयवंत ओक :** महानगरपालिकेतर्फे मागे १५०० विद्युत लाईन पोल लावण्यात आले. महानगरपालिकेने त्या पोलवर दोन तारा ओढल्या त्यानंतर तिसरी तार एमएसईबी ने ओढलेली नाही किंवा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने ही कार्यवाही केलेली नाही. आजपर्यंत किती पोलवर टयुब्स, पिक्चर्स लावलेले आहेत. व लावण्यात आलेल्या पोलची क्वॉलीटी चांगल्या प्रकारची आहे काय? याची माहिती दयावी.

**श्री. स.अली मिरा सलामी :** संबंधीत विभागात किती साहित्य येते. कोणकोणते साहित्य येते. व ते किती प्रमाणात व कोठे-कोठे वापरले जाते. याची माहिती दयावी व प्रस्ताव मंजुरीप्रमाणे खरोखरच साहित्य खरेदी केले जाते काय? याची माहिती दयावी.

**मा. सभापती** : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (विद्युत विभाग) :** महानगरपालिकेने १५०० पोल पैकी १४५९ पोल असुन ३८ शिल्लक आहेत. यामध्ये ९७६ फिक्चर लावलेले आहेत. आणि फिक्चर बाबतची प्रस्ताव याच स्थायी समितीमध्ये आहे स. सदस्यांनी विचारलेल्या प्रमाणे पोलवर दोन तारा ओढलेल्या आहेत हे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या उद्दीष्टाप्रमाणे असुन त्याचे तपासणी निरीक्षक यांनी तपासणी करुन चार्जिंग करुन परवानगी देत असते. आणि नंतरच मनपाला कार्यवाही करावी. लागते.

**श्री. अ. रशिद खॉन (मामु) :** १५०० पोल मधील किती पोल वापरण्यात येत आहेत तसेच निपट निरंजन जवळ विद्युत लाईट का बंद होता. नागरिकांना वेळेवर आपण सुविधा उपलब्ध करुन देत नाही. हर्सुल भागात जे पोल बंद आहेत ते आपण ८ दिवसांपुर्वी थोडया फार प्रमाणात तेथील काम केलेले आहेत. बाकी तसेच आहेत. याचे कारण काय? या बाबत संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी. या शिवाय हॉटेल वेदांत समोरील लाईट बंद असल्याचे संबंधीत अधिकाऱ्यांना कळवुनही अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

**श्री. विकास जैन :** उपअभियंता यांच्या मारोती गाडी बाबतचा ठराव पास झालेला आहे त्यांना नागरीकांच्या योग्य त्या वेळेत सोडवण्यासाठी त्यांना गाडी देण्यात यावी.

**श्री. संजय जोशी :** दोन-तीन दिवसापुर्वी मा. मंत्री महोदय यांच्या औरंगाबाद भेटीच्या कालाधीत उपअभियंता यांनी स्वत:च्या स्कुटरवर फिरुन लाईट चालु आहेत किंवा नाही या बाबत कार्यवाही केलेली आहे.

**श्री. अ. अली मिरा सलामी :** इंजिनिअरींग कॉलेज जवळील रोडवर एकदा अपघात झालेला होता त्यानंतर सदरील रोडवर ६ महिने लाईट बसविण्यात आलेला नाही. यावर संबंधीत अधिकारी यांना सांगुनही कार्यवाही झालेली नाही. तेंव्हा संबंधीत बाबतीत कार्यवाही व्हावी.

**श्री. रशिद खॉन (मामु) :** सर्व स. सदस्यांच्या तक्रारी येऊन सुध्दा संबंधीत अधिकारी लक्ष देत नाही. कोणत्याही स. सदस्यांच्या वार्डातील तक्रारी व नागरीकांच्या वाढत्या तक्रारी बाबत संबंधीत अधिकारी यांनी त्या कामा बाबत कार्यवाही लवकारात लवकर करावी.

**श्री. जयवंत ओक :** आतापर्यंत किती प्रमाणात पोलवर टयुब्स,लाईट, मर्क्युराचे साहित्य खरेदी केले यांची माहिती दयावी.

**श्री. भगवान घडामोडे :** स. नगरसेवक हे उपअभियंता विद्युत यांच्यावर दबाव आणतात. प्रशासनावर कोणत्याही व्यक्तीने दबाव आणल्यास प्रशासनाला व्यवस्थीतपणे

व वेळी आययोजना करण्यास दिरंगाई लागते याचे कारण म्हणजे या विभागातील विद्युत लाईनमन हे जर व्यवस्थिपणे काम करीत नसल्यास त्यांचे बाबतीत संबंधीत अधिकारी यांनी कार्यवाही करावी. नसता लाईनमन वर अकुंष नाही असे दिसुन येते.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (विद्यत) :** महानगरपालिकेकडे २-३ महिन्यापासुन बल्ब मागविण्यात आलेले नाहीत व आपल्याकडे सध्या उपलब्ध नाहीत या टयुब लावण्याचे सोडीयम व्हेपरचे दिवेही नाहीत. स्ट्रिट लाईटचे फिक्चर लावणे बाकी आहे. जवळपास ५००-७०० पोलवर फिक्चर टयुब लावण्याचे बाकी आहेत. ज्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने पोल लावलेले आहेत त्या ठिकाणी महापालिकेने फिक्चर लावलेले आहेत.

**श्री. अ. रशिद खॉन (मामु) :** बाबा पेट्रोल पंपा जवळील लाईट बंद का आहेत. बजेट अभावी ते काम राहिले असेल तर त्याबाबत कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** विद्युत साहित्याबाबत चौकशी करुन पुढील बैठकीत माहिती दयावी व बाबा पेट्रोलपंप ते रेल्वे स्टेशन येथील पोलवरील लाईट बाबत तातडीने कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी :** उप अभियंता (विद्युत विभाग) यांची मारोती गाडी का आली नाही याची माहिती दयावी.

**श्री. विकास जैन :** दोन गाडयांसाठीचे प्रपोजल होते पैकी एक गाडी आलेली आहे व एका गाडीला विलंब का होत आहे याची माहिती दयावी.

**मा. सभापती :** लेखाधिकारी-१ यांनी खुलासा करावा.

**लेखाधिकारी-१ :** उपअभियंता यांच्या वाहनाबाबतची प्रक्रिया चालु आहे.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** प्रभाग क्र. १४ मधील रु. २२.५० लाखाचे अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली त्यानुसार सदरील ठिकाणी विद्युत बल्प किती लावण्यात आले किती लावावयाचे राहिलेले आहे. या कामा करिता किती खर्च लागलेला आहेत. याचीं सविस्तर माहिती दयावी. कारण एमआयडीसी हा भाग बऱ्याचशा प्रमाणात अंधारात असुन प्रशासनाने याकडे बारकाईने लक्ष द्यावे.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (विद्युत विभाग) :** प्रस्तुतच्या प्रस्तावाबाबत संबंधीत भागात ५०० सोडियम व्हेपर दिवे मागविलेले पैकी आतापर्यंत ३५० लावण्यात आले आहेत. व ते सर्व चालु आहेत. या भागातील रस्ते अरुंद असल्याने बाकी १५० सोडियम दिवे शिल्लक आहेत.

**श्री. आभिमन्यु भालेराव :** संबंधीत वार्डात ३५० सोडियम व्हेपर दिवे चालु नाहीत तर त्या वार्डात २५० सोडियम व्हेपर दिवे अंदाजे चालु असेल, बाकीचे सोडीयम व्हेपर दिवे काय केले? मंजुरी ५०० दिव्याची लावण्यात आले फक्त १५० दिवे प्रशासनाने काय केले. कुठे इतर ठिकाणी लावले काय? किंवा विकले काय याची माहिती दयावी. त्याचप्रमाणे गरवारे स्टेडियम येथीलही बरेच काम अपुर्ण आहे ते सुध्दा कधी होणार याची माहिती दयावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** महानगरपालिकेने ५०० सोडीयम व्हेपरचे दिवे मागविलेले आहेत त्यापैकी ३५० लावण्यात आले. बाकीचे १५० सोडीयम व्हेपरचे दिवे का लावण्यात आले नाही. सदर वार्डात जेवढया सोडीयम व्हेपरची आवश्यकता होती. तेवढयासाठी संबंधीत अधिकारी यांनी अंदाजपत्रक तयार करावयास

पाहिजे होते. संबंधीत अधिकारी यांनी त्यामुळे बेजबाबदारपणे काम करतात. त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**मा. सभापती :** वार्ड क्र. १४ मधील ५०० सोडीयम व्हेपर पैकी १५० सोडीयम व्हेपर दिवे लावावयाचे राहिलेले आहेत तर संबंधीत अधिकारी यांनी ते लवकारात लवकर लावुन कार्यवाही करावी. तसेच गरवारे जवळील लाईटचे काम पुर्ण करुन घ्यावे व विद्युत विभागातील इतर साहित्याचा पुरवठा व खरेदी केलेल्या साहित्याबाबत पुढील बैठकीत माहिती दयावी.

**श्री. म. अ. रऊफ म.अ. माबुद :** वार्डातील रोडचे जे काम आहेत ते पुर्ण केलेले नाही. याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना विचाराणा करावी.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी याबाबत कार्यवाही करावी.

**अ. शहर अभियंता :** १) गरवारे स्टेडियम मधील कामे जवळपास २-३ महिन्यात होईल.
२) त्याचप्रमाणे स. सदस्य श्री. रऊफ यांच्या वार्डातील टेलिफोनच्या कामामुळे थांबलेले आहे.

**विषय क्र. ३१९/१ :**

दिनांक २८-१०-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. स.अली मिरा सलामी, श्री. गिरजाराम हाळनोर :** पृष्ठ क्र. २ वर ज्या १६ अधिकाऱ्यांची वेतन वाढ केलेली आहे. यामध्ये ४ अधिकारी सुटलेले होते परंतु यात सांस्कृतिक अधिकारी यांचे जास्तीचे नावाचा उल्लेख केलेला आहे. याच बरोबर क्रिडा अधिकारी जनसंपर्क अधिकारी यांचाही समावेश करण्यांत यावा. व त्या सर्वाची एकत्रीत प्रस्ताव पुढील बैठकीत प्रशासनाने ठेवावा.

**श्री. गौतम लांडगे :** चार अधिकाऱ्यांच्या वेतन वाढीबाबतचा प्रस्ताव या बैठकीत ठेवण्यात येणार होता परंतु प्रस्ताव सादर केलेला नाही. याचे कारण काय? सोबत समुदाय संघटक यांचाही वेतनवाढीचा प्रस्ताव ठेवावा.

**मा. सभापती :** पुढील बैठकीत पृष्ठ क्र. २ वर उल्लेखीलेल्या प्रमाणे चार अधिकारी सोबतच सांस्कृतिक अधिकारी संपर्क अधिकारी, क्रिडा अधिकारी इ. एकत्रित वेगवेगळया श्रेणीप्रमाणे वेतनवाढीचा प्रस्ताव पुढील बैठकीत प्रशासनाने ठेवावा. त्याचप्रमाणे सौ. मोरे, श्री. यादव, श्री. चव्हाण या तीन समुदाय संघटकांचाही प्रस्ताव वेतनश्रेणीचा प्रशासनाने पुढील बैठकीत ठेवावा.

**मा. आयुक्त :** ठिक आहे. पुढील बैठकीत प्रस्ताव प्रशासनामार्फत ठेवण्यांत येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पृष्ठ क्र. ३ वर स.सदस्य संजय जोशी संवादात अभिनंदन ऐवजी अभिनंद अशी चुकीची टायपिंग मिस्टेक झालेली आहेत. तसेच दिरंगाई ऐवजी दिरंगाई असा शब्द टंकलिखीत झालेला आहेत. यापुढे असे झाल्यास संबंधीतावर कार्यवाही करावी.

**ठराव :**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतनश्रेणी बाबत अग्नीशामन अधिकारी, कामगार अधिकारी, उच्च श्रेणी लघुलेखक, दोनपदे असे चार अधिकारी व सोबतच सांस्कृतिक अधिकार, क्रिडा अधिकारी व जनसंपर्क अधिकारी

तीन सुमदाय संघटक सौ. मोरे श्री. यादव व श्री. चव्हाण याचाही वेतनश्रेणीचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवावा.

२) त्याप्रमाणे पृष्ठ क्र. ३ मध्ये स.स. श्री. संजय जोशी यांच्या वाक्यात अभिनंदन ऐवजी अभिनंद व दिरंगाई ऐवजी दिरंगाई असे चुकीने टंकलिखीत झालेली आहे यात दुरुस्ती अभिनंदन व दिरंगाई अशी करण्यात येते. या व इतर दुरुस्तीसह दि. २४-११-९७ च्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२०/२ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध असलेली दुकाने भाडेपट्टयाने देण्यांत आलेली आहेत.

परंतु सदरील दुकानाची पाहणी केली असता ज्या मुळदुकानधारकांना दुकाने भाडयाने दिली गेली त्यांनी कार्यालास न कळविता उपरोक्त रित्या पोटभाडेकरु ठेवुन त्यांच्याकडुन भाडे वसुल करतात तसेच अनामत रक्कम स्वत: हा घेऊन परस्पर दुकान हस्तांतरीत करतात.

महानगरपालिका करारनामा करुन घेतांना अटी-शर्तीनुसार पोटभाडेकरु ठेवु नये अशी अट प्रामुख्याने घातलेली असतेच परंतु त्या अटी-शर्तीचे त्यांनी उल्लघंन केलेले आहे. व त्यांनी पोटभाडेकरु ठेवलेले आहेत. असे निर्देशनास आल्यामुळे दुकानाच्या मुळभाडयामध्ये प्रति महा ५०% इतकी वाढ करुन मुळ दुकान धारकांचा भाडेपट्टा रद्द करण्यांत येऊन पोटभाडेकरुच्या नांवे भाडेपट्टा करावा किंवा कसे? याबाबत मार्गदर्शनासाठी मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** मनपातील शॉपिंग सेंटर बाबत पोटभाडे कडुन ५०% ऐवजी १००% चा घेऊ नये याची माहिति द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** मनपाच्या अंतर्गत ८४ व्यक्तींनी याबाबत नोटीसा जारी केल्या असुन त्यांचेकडील उत्तर समाधानकारक मिळालेले नाही. त्यामुळे भाडेकरु व पोटभाडेकरु वगैरे आहेत किंवा नाहीत. याची कल्पना नाही.

**श्री. संजय जोशी :** शॉपिंग सेंटर जेथे रिकामे असेल ती आपण खाली करुन नंतर भाडयाने देऊ शकतो. याबाबत कार्यवाही करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** महानगरपालिकेने प्रत्येक दुकानाचे भाडे ५०% घेण्या ऐवजी १००% करावी.

**मा. सभापती :** स.सदस्यांनी जो प्रश्न मांडला तो बरोबर आहे. परंतु शहरातील प्रत्येक ठिकाणचे व्हॅल्युशन वेगळे आहेत. त्यानुसार भाडेवाढ करावी लागेल. त्यानुसार संबंधीत अधिकारी यांनी दुकानाचे भाडे १००% वाढ करणेची कार्यवाहीस मंजुरी देण्यांत येते.

**श्री. रशिदखॉन (मामु) :** बऱ्याचशा शॉपिंग सेंटर व्यक्तीकडे टाकलेले आहेत. (रु. एक लाख) १,००,०००/-,७५,०००,५०,०००, इतपत भाडे थकलेले आढळुन आलेले आहेत तर संबंधीत अधिकारी यांनी अशा लोकांवर काय कार्यवाही केली याची माहिति द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** अशा शॉपींग सेंटर भाडेपट्टे धारकांच्या मालाची मनपा जप्ती करते व त्याचेकडे जे दुकान दिलेले असेते ते नियमाप्रमाणे ताब्यात घेऊन दुसऱ्याला देण्यांत येते.

**मा. सभापती :** अशा प्रकारची थकीत वसुली असल्यास अशा दुकान धारकांबाबत मालाची जप्ती करुन प्रशासनाने कार्यवाही करावी. व कोर्ट मॅटर असल्यास त्यांचे बाबतची प्रशासकीय कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध ठिकाणी असलेली दुकाने मुळ भाडेकरुने पोटभाडेकरु ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अशा दुकानांच्या मुळ भाडयामध्ये ५०% ऐवजी १००% वाढ करुन मुळ दुकानधारकाचा भाडेपट्टा रद्द करण्यांत यावा व पोट भाडेकरुच्या नांवे भाडेपट्टा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२१/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जयविश्वभारती कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्न डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने र.रु. ४,८५,८९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती मध्ये प्रस्ताव क्र. ११६/८ दिनांक १६-८-९७ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च "पुर्न डांबरीकरण" ९६-९७ या लेखा शिर्षामधुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिमतारखे पर्यंत एकुण ४ (चार) कोरी निविदा पत्रके विकल्या गेल्या व निविदापत्रके स्वीकृतीच्या अंतिम तारखपर्यंत ४ (चार) निविदापत्रक दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खाली प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | २१.८६% | कमी दराने |
| २. | श्री. डी. अजितसिंग | २१.२१% | --//-- |
| ३. | श्री. के.बी. पाथ्रीकर | १३.६६५ | --//-- |
| ४. | श्री. मे. अदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ०१% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१.८६% कमी दराची मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन क. यांची निविदा आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१.८६% कमी दराची मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन कं. याची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयविश्वभारती कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८६% कमी दराची मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२२/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स.न. ४३ श्रेयनगर येथील मंजुर रेखांकनांत १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणे आहे. त्यासाठी र.रु. २,२२,२९४/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवुन त्यास स्थायी समिती चा ठराव क्र. १४५/४ दि. १६-८-९७ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. कार्यालयानी निविदा सुचना क्र. ५७/९७ जी की. दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सतरा (१७) निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण सात (७) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजीवनी कंन्स्ट्रक्शन | १२.०७% | कमी |
| २. | श्री. एस.एस. काथार | २०% | --//-- |
| ३. | श्री. एस.के. मिसाळ | २५.११% | --//-- |
| ४. | श्री. डी.के. कंन्स्ट्रक्शन | १८% | --//-- |
| ५. | श्री. सुरेश साधवाणी | २७% | --//-- |
| ६. | श्री. बसरा कंन्स्ट्रक्शन | ११.२७% | --//-- |
| ७. | श्री. अथर अली | २७.५% | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. अथर अली यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.५% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. स.अथर अली यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.५% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रेयनगर येथील स.नं. ४३ या मंजुर रेखांकनात १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वांत कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.५% कमी दराची श्री.सैय्यद अथर अली यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२३/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो सिध्दार्थनगर येथील १०० ते १५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु.जी. आर.सी.सी. ड्रेनेज लाईन काढुन नविन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. ४,९९,०००/- चे परिसर अभियांत्रिकी च्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम लेखाशिर्षक देखभाल व दुरुस्ती ९७-९८ यातुन प्रस्तावित केले आहे. सदरील कामास

**संवाद**

**श्री. मोतीराम घडामोडे :** सदरील पाईप लाईन ही कोणत्या वर्षी टाकण्यात आलेली आहे.

**कार्यकारी अभियंता :** मो. सिध्दार्थनगर येथील जुनी पाईप लाईन ही सन ८२-८३ या वर्षी टाकण्यात आलेली आहे. चुकीने प्रस्तावामध्ये उल्लेख केलेला नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थनगर येथील १०० मी.मी. व १५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु.जी. ड्रेनेज लाईन काढुन नविन २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,९९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२४/६ :**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, लेखापरिक्षक विभागातील वरीष्ठ लेखा परीक्षक यांना रुपये २००/- प्रतिमाह व कनिष्ठ लेखापरिक्षक यांना रुपये १५०/- प्रतिमहा वाहन भत्ता दि. १-४-९३ पासुन देण्यांत येतो तथापी सध्या पेट्रोल व तेलाचे किंमती वाढलयामुळे वरील पदांना खालील प्रमाणे वाढीव वाहन भत्ता देण्यांचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | प्रतिमहा देय असणारा वाहन | प्रतिमाह प्रस्तावित वाहन भत्ता. |
|---|---|---|---|---|
| १. | वरीष्ट लेखा परिक्षक | १ | रु. २००/- | रु. ५००/- |
| २. | कनिष्ठ लेखा परिक्षक | ४ | रु. १५०/- | रु. ४००/- |

उपरोक्त प्रमाणे सुधारीत वाहन भत्ता दि. १-११-९६ पासुन देण्याचेही प्रस्तावित आहे.

प्रस्ताव स्थायी समितीचे विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. संजय पवार :** सदर प्रस्तावात नांव दर्शविलेले कर्मचारी यांना प्रतिमहा वाहन भत्ता वाढविण्यास हरकत नाही. परंतु इतर अधिकाऱ्यांना जर प्रतिमहा भत्ता वाढ केली असेल तर यांना करण्यात यावी.

**उप आयुक्त-१ :** इतर दुसऱ्या अधिकाऱ्यांना प्रतिमहा वाहन भत्ता वाढ केलेली आहे. सदरील प्रस्तावात दर्शविलेल्या कर्मचाऱ्यांना वाढ केलेली नव्हती म्हणुन हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

**मा. सभापती :** मनपातील इतर अधिकाऱ्यांना वाहन भत्ता वाढ केलेली होती. परंतु प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांना १) वरीष्ठ लेखापरिक्षक २) कनिष्ठ लेखापरिक्षक यांना वाहन भत्ता वाढ झालेली नव्हती म्हणुन त्यांना वाहन भत्ता वाढ रु. ५००/- व रु. ४००/- प्रतिमहा दि. १-११-९६ पासुन यापुढे प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे देण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लेखा परिक्षण विभागातील वरीष्ठ व कनिष्ठ लेखा परिक्षक यांना पेट्रोलच्या व तेलाच्या किंमती वाढल्यामुळे वरील पदांना खालील प्रमाणे वाहन भत्ता वाढवुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | प्रतिमहा देय असणारा वाहन | प्रतिमाह प्रस्तावित वाहन भत्ता. |
|---|---|---|---|---|
| १. | वरीष्ट लेखा परिक्षक | १ | रु. २००/- | रु. ५००/- |
| २. | कनिष्ठ लेखा परिक्षक | ४ | रु. १५०/- | रु. ४००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२५/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथे बॉक्स टाईप कल्व्हर्ट तयार करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ४,१८,९२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खंडी रस्ते" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ३१-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच स्थायी समितीत दि. २१-१-९७ रोजी अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे. प्रस्तावित कामा साठी फेर निविदा मागविण्यात आली असता अंतिम तारखेपर्यंत एकुण (९) निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | २०.१०% | कमी |
| २. | श्री. मन्नान खॉन | १२.७८% | --//-- |
| ३. | श्री. सोहेल सिद्यीकी | ७.९९% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०-१०% कमी दराची असलेली श्री. कुलवंतसिंग यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यांत येतो.

**विषय क्र. ३२६/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बेगमपुरा येथे समाज मंदिरावर वाचनालयासाठी पहिला मजला बांधवयाचा आहे. त्यासाठी सा.बां. विभागाचे सन ९६-९७ च्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रु. ५,१२,४६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. ३०-९-९७ रोजी मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च रु. ५,००,०००/- मा. आमदार श्री. शालीग्राम बसैय्ये (बंडु) यांचे आमदार निधीतुन करण्यात येईल. तसेच उर्वरित रक्कम रु. १२,४६०/- ही महानगरपालिका फंडातुन करावयाची आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बेगमपुरा येथील समाज मंदिरावर वाचनालयासाठी पहिला मजला बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ५,१२,४६०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च रु. ५ लाख आमदार निधीतुन व उर्वरित रु. १२,४६०/- मनपा फंडातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२७/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बन्सीलाल येथे साईट क्र. ९५ वर वाचनालय व सांस्कृतिक हॉल बांधवयाचे आहे. त्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ४०.०० लाखाचे तयार करण्यात येऊन प्रशासकीय ठराव क्र. १६७ दि. ११-१०-९७ अन्वये मंजुरी देण्यांत आली आहे. सदर कामासाठी निविदा सुचना क्र. ४५४/९४ जी.की. दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये मे.एस.वाय. कंन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७५% कमी दराची निविदा ही प्रशासकीय ठराव क्र. ६८३ दि. २५-११-९४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

मुळ निविदेतील रक्कम रु. ४०.०० लाख एवढी आहे. प्रत्यक्षात मुळ निविदेप्रमाणे काम अंतिम टप्प्यात असतांना कामामध्ये वळोवळी मा. खासदार मा.आयुक्त स. नगरसेवक व संबंधीत वास्तुविशारद यांनी इमारत आकर्षक होण्याकरिता बदल सुचविले त्यानुसार काम चालु आहे. जागेवरील स्थितीनुसार पुर्वीपेक्षा बांधकामत वाढ झाल्याने व इमारतीचे सौदर्य वाढविण्याच्या दृष्टीने ज्यादा बाबी विचारात घेता मुळ निविदेतील किंमतीपेक्षा प्रत्यक्षात खर्च रु. ११,२१,५००/-जास्तीचा होणार आहे. म्हणजेच प्रत्यक्ष कामावर एकुण खर्च ४०-११.२१= ५१.२१ लाख एवढा येणार आहे. वाढीव काम मुळ गुत्तेदार मे. एम.वाय. कंन्स्ट्रक्शन यांच्यातर्फे मंजुर दरानुसार म्हणजेच २.७५ कमी या दरामध्ये करुन घेण्यात येणार आहे. तसेच वाढीव रक्कम रुपये ११.२१ लाख व मे. एम.वाय. कंन्स्ट्रक्शन यांच्यातर्फे वाढीव कामकरुन घेण्यास सर्वसाधारण सभेने दि. ५-११-९७ च्या ठरावानुसार मान्यता दिली आहे. त्या अन्वये पुर्वीचे गुत्तेदार मे. एम.वाय. कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन कामाचे पुर्वीचे मंजुरी दरानुसार सुधारित करार करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद**

**श्री. गौतम लांडगे** : या प्रस्तावाबाबत काम करणारे विशारद कोण होते याची माहिती त्याठिकाणी वास्तु विशारद याचे शैक्षणिक पात्रता असावी असा मनपाने ठरविलेले आहे. काय? कोणत्या आधारावर ठरविल्या जाते.

**श्री. संजय जोशी** : बी.ई. म्हणुन अर्किडकटचे काम देणे योग्य नाही. संबंधीत आर्किटकटचे दिल्ली येथील डिग्रीचे प्रमाणपत्र मिळाविलेले आहे. काय? यासर्व माहिती बाबत मनपाने कार्यवाही करावयास पाहिजे होती. आपल्या मनपाकडे बी.ई. इंजिनिअर कुणीही नाहीत काय?

**शहर अभियंता** : संबंधीत कामावर वास्तुविशारद म्हणुन गेल्या २-३ वर्षापासुन आपण नेमणुक दिलेली आहे. या कामासाठी वाढ लक्षात घेता अंदाजपत्रका वाढ झालेली आहे.

**श्री. अ. रशिद खाँन (मामु) :** सर्वसाधारण प्रस्ताव मंजुर झालेला आहे.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बन्सीलालनगर येथील वाचनालय व सांस्कृतिक हॉल बांधण्याचे कामामध्ये वाढ झाल्यामुळे वाढीव रक्कम रु. ११.२१ लाख च्या अंदाजपत्रकास तसेच सदर वाढीव काम पुर्वीचे गुत्तेदार मे. एम.वाय. कंन्स्ट्रक्शन यांचेतर्फे २.७५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२८/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरात विविध ठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांच्यामार्फत रोवण्यात आलेल्या विद्युत पोलवर लावण्यासाठी टयुब फिक्चर खरेदी करण्यासाठी सा.बां. खात्याच्या दरसुचीनुसार र.रुपये ४,३९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन ९७-९८ च्या "विद्युत देखभाल व दुरुस्ती" या शिर्षकाखाली करण्यांत येईल.

यापुर्वी मे. पगारीया इंटरप्रायजेस औरंगाबाद यांच्याकडुन अशा प्रकारचे टयुब फिक्चर रु. ८७७/- प्रति नग या दराने ५०० टयुब फिक्चर खरेदी केली आहेत व या दरास स्थायी समितीची मान्यताही झालेली आहे. शहरात रोवण्यात आलेल्या पोलवर टयुब पिक्चर लावणे बाबत बरेचशे नगरसेवक/नगर सेविका मागणी करीत आहेत. त्यामुळे टयुब फिक्चर लवकारत लवकर खरेदी करणे भाग आहे. मे. पगारीया इंटरप्रायजेस यांनी मागील दराने टयुब फिक्चर पुरविण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी नविन ५०० नग टयुब फिक्चर मे. पगारिया इंटरप्रायजेस औरंगाबाद यांच्या कडुन मागील मंजुर दराने म्हणजे रु. ८७८/- प्रति नग या दराने खरेदी करण्यास व या करिताच्या र.रु. ४,३९,०००/- च्या खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील पोलवर बसविण्याकरिता टयुब फिक्चर खरेदी करण्याकरिता तयार केलेल्या र.रु. ४,३९,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रति फिक्चर रु. ८७८/- या पुर्वीच्याच दराने मे. पगारिया इंटरप्राजेस यांचेकडुन एकुण ५०० नग खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२९/११ :**

औरंगाबाद महानगरपालिकेचा सन ९६-९७ चा वार्षिक अहवालावर विचार विनियम करणे.

**मा. सभापती** : दि. २८-११-९७ रोजी या बाबतची एक विशेष बैठक बोलविण्यात येत आहे. या बैठकीत विभाग निहाय टिप्पनी संबंधीत अधिकाऱ्यांनी तयार करुन सादर करावी.

**ठराव :**

याबाबत एक विशेष स्थायी समितीची सभा आयोजित करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३३०/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे विविध गल्लीत शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. ११३८४५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम हे ५% कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षकातुन करण्यात येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ४-१-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तसेच सर्वसाधारण सभेत दि. ३१-५-९७ रोजी अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण २१ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याचे अंतिम तारखे पर्यंत एकुण ७ निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सरवदे एस.पी. | २९% | कमी |
| २. | श्री. मन्नान खान | २५.९९% | --//-- |
| ३. | श्री न्यु रुद्रार कंन्स्ट्रक्शन | २५% | --//-- |
| ४. | श्री. एस.एम. मंडोरे | २०.९८% | --//-- |
| ५. | श्री. शेख शरीफ | १८.७०% | --//-- |
| ६. | श्री. अब्दुल सलाम | १७% | --//-- |
| ७. | श्री. संजीवनी कंन्स्ट्रक्शन | १३.६९% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९% कमी दराची असलेली श्री. सरवदे एस.पी. यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे विविध गल्लीत शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २९% कमी दराची श्री. एस.पी. सरवदे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ३३१/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालननगर व स्टॅण्डर्ड सिल्क कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९५-९६ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर दराने र.रु. ५,८६,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास स्थायी समितीच्या सभेमध्ये प्रस्ताव क्र. ११५/९ दि. १६-८-९७ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च "पुर्नडांबरीकरण" सन ९६-९७ या लेखा शिर्षामधुन करण्यांत येईल.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण ४ (चार) निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी.अजितसिंग | १९% | कमी दराने |
| २. | श्री. मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन | १५.८६% | --//-- |
| ३. | श्री के. पाथ्रीकर | १३.९१% | --//-- |
| ४. | श्री. मे. अदिनाथ कंन्स्ट्रक्शन | -- | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने १९% कमी दराने मे. डी.अजितसिंग यांची निविदा आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९% कमी दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालननगर व स्टॅण्डर्ड सिल्क कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १९% कमी दराचा मे. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. ३३२/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रोकडिया हनुमान कॉलनी अंतर्गत व हॉटेल मिगलिग समोरील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे व वार्डातील पॅचेसचे काम करणेसाठी सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ९,०२,०६४/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च पुर्ण डांबरीकरण या लेखा शिर्षकाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोकडिया हनुमान कॉलनी अंतर्गत व हॉटेल मिगलिग समोरील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे व वार्डातील पॅचेसचे काम करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,०२,०६४/- च्या अंदाजत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३३/१५ :**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अस्थापनेवर असलेल्या स्वच्छता निरिक्षक यांना १४०० ते २६०० ही श्रेणी देण्यांत आली आहे. व जेष्ठ स्वच्छता निरिक्षक यांना १४०० ते २६०० ही वेतनश्रेणी आहे. जेष्ठ स्वच्छता निरिक्षक व स्वच्छता निरिक्षक यांचे मुळ वेतनात फरक पडत नाही.

करिता जेष्ठ स्वच्छता निरिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु. १४०० ते २६०० ऐवजी १६४० ते २९०० ही वेतन श्रेणी देण्यास प्रस्ताव स्थायी समिती चे विचारार्थ.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या अस्थापनेवर जेष्ठ स्वच्छता निरिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु. १४०० ते २३०० ऐवजी १६४० ते २९०० ही वेतनश्रेणी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३४/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे फायबरचे सुरदारी खांब, कमाची (नक्षिदार) खिडक्या व झरोके इत्यादी काम करावयाचे आहे. त्यानुसार मा. आयुक्ताच्या पुणे भेटीत तसेच मा. बाबासाहेब पुरंदरे यांच्या औरंगाबाद भेटीत मा. आयुक्त यांनी मा. बाबासाहेब पुरंदरे यांना या कामासाठी मदतीचे आवाहन केले होते. त्यानुसार बाबासाहेब पुरंदरे यांनी पुणे येथील महाराजा प्रतिष्ठान तर्फे श्री. चेतक दाटे यांची कलात्मक काम असल्यामुळे शिफारस केलेली आहे.

मा. आयुक्त व मा. बाबासाहेब पुरंदरे यांचे भेटीत व चर्चेत असे ठरले की, सहादालनापैकी पर्यटकास पुरातन काळात गेल्याचा भास व्हावा त्यानुसार फायवरचे सुरदारी खाब, कमाणी (नक्षीदार) खिडक्या, व झरोके इ. तयार करण्याचे ठरले.

त्यानुसार प्रत्येकी दोन खाब, अेक कमान, एक खिडकी व एक झरोके या अशा एक संचाचा खर्च रक्कम रु. १९,४७५/- एवढा कोटेशन करुन येत आहे. हा खर्च फक्त कच्चा मालाचा आहे.

तरी ५०X३० च्या एका दालनासाठी असे एकुण दहा संचाची आवश्यकता आहे. त्यासाठी रु. १,९४,७५०/- ऐवढा खर्च होत आहे. एकुण श्री. चेतक दाटे यांनी दिलेल्या दरानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,९४,७५०/- चे अंदाजपत्रक व हे काम बिना निविदा श्री. चेतक दाटे यांचेकडुन दिलेल्या दराने करणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद**

**भगवान घडामोडे** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. चेतक दाटे यांनाच हे काम करता येऊ शकते का.

**श्री. अ.रऊफ अ. माबुद :** फाबरचे सुरदारी खांब, कमानी करण्यासाठी यांच्याकडे हे काम दिलेले आहेत परंतु हे काम करण्यासाठी प्रस्तावातील जी रक्कम दाखलेली आहेत ती जास्तीची आहेत.

**मा. सभापती :** सदरील काम फायबरचे जे करतात त्यांचेच असुन कमी दराचे आहे.

**मा. सभापती :** मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे फायबरचे सुरदारी खांब, कमाची (नक्षिदार) खिडक्या व झरोके इ. काम करणेकरिता दहा संच बसविणेकरिता तयार केलेल्या र.रु. १,९४,७५०/- च्या अंदाजपत्रकास व सदरील

काम श्री. चेतक काटे यांचे कडुन विना निविदा करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३५/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे किल्ल्याच्या प्रतिकृती बसविण्याच्या कामासाठी दि. १७-९-९७ रोजीच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १७६/३५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/५८/९७ दि. १६-९-९७ अन्वये प्रगट निविदा मागविण्यात आल्या असता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी श्री. सासमकर यांनी ६'X ४' चे मॉडेल साठी रक्कम रु. ३६,०००/- प्रति किल्ला असे दर दिलेले आहे.

तसेच मा. बाबासाहेब पुरंदरे (पुणे) यांचेशी मा. आयुक्त यांनी समक्ष चर्चा करुन मा. बाबासाहेब यांना विनंती केल्यावरुन श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी श्री. यशोधन गद्रे, या कलाकाराची शिफारस केली असुन श्री. यशोधन गद्रे यांनी १०X१० चे किल्ला बनविण्यासाठी रक्कम रु. २२,२७५/- प्रति किल्ला असा दर दिला आहे.

तरी श्री. सासमकर पी.आर. यांनी ६X४ चे मॉडेल साठी रक्कम रु. ३६,०००/- प्रति किल्ला असा दर दिला असुन श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचे महाराजा प्रतिष्ठान च्या मार्गदर्शनाखाली काम होणार असल्यामुळे तेथील कलाकार श्री. यशोधन गद्रे यांनी १०X१० चे मॉडेलसाठी रक्कम रु. २२,२७५/- प्रति किल्ला असा दर दिला आहे. जेणे करुन वरील दोघा कालाकारामधील दरामध्ये (रु. १३,७२५/-) प्रति किल्ल्यामागे इतका फरक येत आहे.

तरी आपणांस (महानगरपालिकेस) एकुण आठ किल्ल्याच्या प्रतिकृती तयार करावयाच्या आहे. श्री. सासमकर पी.आर. यांचे दरानुसार ०८X३६,०००=२, २८,०००/- इतका खर्च येत आहे. व श्री. यशोधन गद्रे यांनी दिलेल्या दरानुसार ०८X२२,२७५/- एकुण रक्कम रु. १,७८,२००/- इतका खर्च येत असुन श्री. सासमकर पी.आर. यांचे दरप्रमाणे काम करण्याचे ठरल्यास रु. १,०९,८००/- इतका जास्तीचा खर्च महानगरपालिकेस सोसावा लागेल.

करिता हे काम महाराजा प्रतिष्ठान पुरस्कृत पुर्ण येथील कलाकार श्री. यशोधन गद्रे यांचे मार्फत त्यांनी दिलेल्या दरानुसार रक्कम रु. १,७८,२००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी व हे काम श्री. यशोधन गद्रे (पुणे) यांचे कडुन रक्कम रु. २२,२७५/- प्रति किल्ला असे करुन घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे किल्ल्याच्या प्रतिकृती बसविण्याच्या कामासाठी प्रति किल्ला रु. २२,२७५/- दराने श्री. यशोधन गद्रे (पुणे) यांचे कडुन आठ किल्लाच्या प्रतिकृती तयार करुन घेण्यास व यासाठी र.रु. १,७८,२००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३६/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे किल्याची छायाचित्रे लावणेच्या कामासाठी दिनांक १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १७६/३५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/५८/९७ दि. १६-९-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी निविदेप्रमाणे दिपाली पाटील यांचे दरपत्रक आले असुन त्यांचे दरखालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ग्लोसी | ७.१४ प्र.चौ इंच |
| २. | पारदर्शिका | १३.३५ प्र.चौ. इंचे असे |

तसेच मा. आयुक्त यांचे भेटीत व मा. बाबासाहेब पुरंदरे यांच्या औरंगाबाद भेटीत मा. आयुक्त यांनी मा. बाबासाहेब पुरंदरे यांना या कामसाठी मदतीने आवाहन केल्यानुसार मा. बाबासाहेब पुरंदरे यांचे महाराजा प्रतिष्ठान तर्फे पुणे येथील छायाचित्रकार श्री. राजेंद्र टिपरे यांची शिफारस केली आहे. तसेच श्री. राजेंद्र टिपरे यांनी यापुर्वी किल्ल्याच्या छाया कामाचा चांगला अनुभव आहे. असे मा. बाबासाहेब पुरंदरे यांनी औरंगाबाद भेटीत चर्चेत सांगितले आहे. त्यानुसार श्री. राजेंद्र टिपरे यांनी त्यांचे दर खालील प्रमाणे दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ग्लोसी | २.७० प्र.चौ इंच |
| २. | पारदर्शिका | ८.१२ प्र.चौ. इंचे असे |

त्यानुसार संग्रहालयासाठी खालील प्रमाणे आवश्यकता आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | फोटोग्राफ | ३०X४० २० नग |
| २. | ट्रॉन्सलाईड | ३०X४० २० नग |
| ३. | --//-- | २०X२४ २० नग |

अशाप्रकारे एकुण ६० नग या प्रमाणे छायाचित्र विकत घ्यावयाची आहेत सदरील छायाचित्रे विकत घेणेसाठी खालील प्रमाणे खर्च येत आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | आकार | संख्या | किंमत प्रतिनग | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | फोटोग्राफ | ३०X४० | २० नग | ३२४०/- | ०,६४,८००/- |
| २. | पारदर्शिका | ३०X४० | २० नग | ९७५०/- | १,९५,०००/- |
| ३. | --//-- | २०X२४ | २० नग | ४०००/- | ०,८०,०००/- |
| | | | | एकुण रु. | ३,३९,८००/- |

असा एकुण खर्च रु. ३,३९,८००/- येत असुन यात गरजेनुसार फोटोग्रॉफ व पारदर्शिका यांची संख्या मंजुर रक्कमेच्या आत कमी जास्त करता येईल.

तरी श्री. राजेंद्र टिपरे यांनी दिलेल्या छायाचित्राचे दरावरुन अंदाजपत्रक रक्कम रु. ३,३९,८००/- यास व सदरचे काम हे विना निविदा श्री. राजेंद्र टिपरे यांचेकडुन त्यांनी दिलेल्या छायाचित्राचे दराने करुन घेण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे किल्याची छायाचित्रे लावणेच्या कामाकरिता श्री. राजेंद्र टिपरे यांनी दिलेल्या दरानुसार म्हणजेच ग्लोसी -रु. २.७० प्र.चौ.इंच व पारदर्शिका रु. ८.१२ प्र.चौ.इंच या दराने एकुण ६० नग छायाचित्र खरेदीस व त्यासाठीच्या रु. ३,३९,८००/- च्या खर्चास तसेच सदर काम विना निविदा श्री. राजेंद्र टिपरे यांचेकडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३७/१९ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालननगर येथे (शासकीय अनुदानातुन) उद्यान विकसीत करावयाच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ९,२०,६००/- एवढयाचे तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समितीने दि. १६-८-९७ विषय क्र. १७१/३० अन्वये अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येऊन कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६४/९७ दिनांक ४-१०-९७ जी की दै. वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यांत येऊन "बी-१" नमुन्यात निविदा मागविले असता कोरे निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत (११) अकरा विकले गेले व दर भरुन सिलबंद पाकीटात स्विकारणेच्या तारखेपर्यंत (२) दोन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख मसुद | -- | अंदाजपत्रकीय दराचे दर. |
| २. | श्री. सलीम पटेल | २% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी श्री. शेख मसुद यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा आहे. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालननगर येथे उद्यान विकसीत करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची श्री. शेख मसुद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३८/२० :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, आरोग्य विभागासाठी रोगप्रतिबंधक उपायासाठी औषध व प्रथमोपचार बॉक्स खरेदी करण्यासाठी दि. २१-१०-९७ रोजी जाहीर निवेदन देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यामध्ये खालील पुरवठा धारकांकडुन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | टी.व्ही. एम फार्मसिटीकली माफसा गोवा | टॅब डिप्रीम १०००/-रु ९००/-<br>टॅब टिव्हीजेसीक १००/- रु. १११/-<br>टिव्हीफ्लेम फोर्ट १००- रु. १३९/- |
| २. | एस.टी. इंटरप्रायजेस फर्स्ट-एड-बॉक्स मेडिकर | रु. १६५०/- |
| ३. | स्टार मार्केटिंग डिस्ट्रीब्युटर फर्स्ट-एड-बॉक्स मेडिकर | रु. १५००/- |
| ४. | सायटीफिक प्रो. ए.व्ही. --//-- | रु. १३५०/- |

वरील प्रमाणे टिव्हीएम फार्मास्युटीकल, म्हापसा, गोवा हे वरील दर्शविलेल्या औषधाचे मुळ उत्पादकाचे असल्यामुळे त्याचे दर मंजुर करणेसाठी शिफारस केली जाते. यासाठी अंदाजे खर्च रु. ४ लाख येणार असुन सायेटीफिक प्रो. ए.व्ही. यांचे फर्स्ट-एड-बॉक्स मेडीकर चे कमी दर म्हणजेच १३५०/- दर मंजुर करुन खरेदी साठी मंजुरीस्तव सादर.

वरील संबंधीत पुरवठा धारकाचे दर मंजुर करण्यात यावे व संबंधीताकडुन खरेदी करण्यांस मान्यता द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरोग्य विभागासाठी रोगप्रतिबंधक उपायासाठी औषध व प्रथमोपचार बॉक्स खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदाधाकाकडुन खालील दराने खरेदी करण्यास व त्यासाठीच्या रु. ४ लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| १. | टी.व्ही. एम फार्मसिटीकली माफसा गोवा | टॅब डिप्रीम १०००/-रु ९००/-<br>टॅब टिव्हीजेसीक १००/- रु. १११/-<br>टिव्हीफ्लेम फोर्ट १००- रु. १३२/- |
| ४. | सायटीफिक प्रो. ए.व्ही. फर्स्ट-एड-बॉक्स मेडिकर | रु. १३५०/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३९/२१ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला की, स. नगरसेवक श्री. धिरजकुामर खाखोरडीया यांचे घर भोलेश्वर मंदिर लगत असलेल्या महानगरपालिकेच्या दुकानामध्ये बाधीत होत आहे. त्यामुळे तेथील मार्केटचे काम पुर्ण होते नाही.

त्यानुसार दि. ८-८-९७ रोजी श्री. धिरजकुमार खाखोरडीया स.नगरसेवक यांनी पत्र देऊन संपादित केलेल्या जागा ऐवजी पर्यायी जागा बहादुरपुरा येथील मागीतलेली आहे. त्यानुसार संबंधीतास मनपा शाळा, बहादुरपुरा लगत शाळेच्या कुंपण भिंती मधील १५० चौ. फुट (१०'X१५') इतकी पुर्नवसन म्हणुन देण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भोलेश्वर मंदिर लगत असलेल्या महानगरपालिका मार्केटमध्ये बाधित होत असलेली स.सदस्य री. धिरज खाखोरडिया यांचे घराची जागा संपादीत करुन त्यांनी दिलेल्या विनंती पत्राप्रमाणे संपादीत केलेल्या जागेऐवजी बहादुरपुरा येथील मनपा शाळेच्या कुंपण भिंती मधील १५० चौ.फुट (१०'x१५') इतकी जागा पुर्नवसन म्हणुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४०/२२ :**

औरंगाबाद शहरात मराठवाडा वैद्यानिक विकास मंडळाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीतुन "मराठवाडा मुक्ती संग्राम स्मृतीस्तंभ" बांधण्यात येणार आहे. सदरील बांधकाम सार्वजानिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे. हा स्मृतिस्तंभ उभारण्याकरिता "सिध्दार्थ उद्यान" मधील जागा निवडण्यात आलेली आहे. तेथे प्रस्ताविल्याप्रमाणे स्मृतिस्तंभ उभारण्याकरिता /बांधकामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास परवानगी देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

सदरील स्मृतीस्तंभाचे बांधकामामुळे सिध्दार्थ उद्यानाचे मुख्य रस्त्यावर अडचण होणार नसुन उलट उद्यानाचा परिसर विकसीत होणार आहे.

करिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर, मान्यतेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागास स्मृति स्तंभ बांधकाम करण्याची परवानगी दिल्याचे कळविण्यांत येईल.

**संवाद**

**श्री. संजय जोशी श्री. भगवान घडामोडे** : सदरील प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही. परंतु मागील सभेमध्ये मा.ना.श्री. हरिभाऊ बागडे यांच्या स्वेच्छा निधीतुन मो. चिकलठाणा येथील जागेत समाजमंदिर बांधकाम करणेचा प्रस्ताव होता तो मंजुर न होता स्थगित ठेवण्यात आलेला आहे. तेव्हा तो प्रस्ताव पुन्हा ठेवुन मंजुरी द्यावी. यात दुजाभाव करु नये.

**श्री. कचरु नवपुते** : जागे अभावी प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला होता.

**श्री. सै. अली मिरा सलामी, श्री. गौतम लांडगे** : सदरील बांधकाम मनपातर्फे व्हावे व त्याचे सुपरव्हिजन असावे.

**मा. सभापती** : सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मराठवाडा वैधानिक विकास मंडळाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीतुन "मराठवाडा मुक्तीसंग्राम स्मृतिस्तंभ" बांधण्यात येणार आहे. सदरचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे करण्यात येणार आहे. सदरचे स्मृतीस्तंभ सिध्दार्थ उद्यान महानगरपालिका औरंगाबाद येथे उभारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४१/२३ :**

उपआयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/३६८५/९७ दि. ९-७-९७ नुसार डॉ. श्री. दिनकर देशपांडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना त्यांचे स्वत:चे वैद्यकीय तपासणी व उपचार

स्वखर्चाने करणेसाठी परदेशात जाणेसाठी परवानगी देण्यात येऊन, दि. ११-७-९७ पासुन १ महिण्याची वैद्यकीय रजा मंजुर करण्यात आलेली आहे. तथापी त्यांचा औषधोपचार पुर्ण झाल्यामुळे त्यांनी पुढील तीन आठवडयाची वैद्यकीय रजा मंजुरीसाठी विनंती अर्ज पाठविला होता. दि. १९-९-९७ पासुन डॉ. दिनकर देशापांडे हे कर्तव्यार्थ रुजु झालेले आहे. परंतु त्यांची दिनांक १०-८-९७ ते १८-९-९७ या ४० दिवसांची वाढीव वैद्यकीय रजा मंजुर करणे आहे.

तथापी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५७ (३) नुसार ३० दिवसांपेक्षा अधिक रजा मंजुरीचे अधिकार स्थायी समितीस आहेत.

करिता डॉ. दिनकर देशापांडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दि. १०-८-९७ ते १८-९-९७ या कालावधीत उपभोगलेल्या रजेस, वैद्यकीय रजा म्हणुन मंजुरी देण्या बाबतचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.श्री. दिनकर देशापांडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे त्यांचे स्वतः चे वैद्यकीय तपासणी व उपचारकरिता परदेशात गेले होते. त्यांच्या मंजुर ३० दिवसांच्या रजेच्या काळात उपचार पुर्ण न झाल्यामुळे दि. १०-८-९७ ते १८-९-९७ या ४० दिवसांच्या वाढीव रजेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ९-१२-१९९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मंगळवार दि. ९-१२-९७ रोजी मा. सभापती श्री. प्रभाकर सिताराम विधाते यांच्या अध्यक्षते खाली दुपारी ३.०० वाजता "मलीक अंबर" सभागृहात संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात वंदेमातरम् या राष्ट्रगिताने झाली. सभेस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१) स.स. श्री. सुभाष टाकळकर
२) स.स. श्री. कचरु चंद्रभान नवपुते
३) स.स. श्री. अभिमन्यु भालेराव
४) स.स. श्री. विकास जैन
५) स.स. श्री. भगवान घडामोडे
६) स.स. श्री. अब्दुल रशिद खॉन(मामु)
७) स.स. श्री. म.अ.रुऊफ म.अ. माबुद
८) स.स. श्री. सै. अली मिरा सलामी
९) स.स. श्री. संजय जोशी
१०) स.स. श्री. बन्सी गांगवे
११) स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर
१२) स.स. श्री. जयवंत (बंडु) ओक

**संवाद**

**श्री.स.अली मिरा सलामी** : प्रकल्प विभागामार्फत केंद्र शासनाची नेहरु रोजगार योजना ज्या प्रमाणत काम करित होती. त्या अनुषंगाने शहरी दरिद्रय रेषेखालील लोकांसाठी केंद्र शासनाची रोजगार योजने या धर्तीवर सुशिक्षीत बेरोजगारांना रु. ५०/- हजाराचे कर्ज देणे बाबतची योजना आहे. त्यानुसार प्रकल्प विभागामार्फत सदरची योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आली काय याची माहिती दयावी.

**मा. सभापती :** प्रकल्प संचालक अद्याप सभेमध्ये आलेले नाही. तोपर्यंत दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

**श्री. संजय जोशी :** मा. आयुक्त यांचेकडे शिक्षक कर्मचाऱ्यातर्फे एका शिष्टमंडळाव्दारे पत्र दिलेले आहे. त्यानुसार प्रशासनाने खरोखरच काय कार्यवाही केली याची माहिती दयावी. माझ्या माहितीप्रमाणे त्या पत्रात नमुद केल्यानुसार गरवारे स्टेडियम साठी क्रिडा शिर्षकातुन एकास तात्पुरते व्यवस्थापक पदी नेमणुक केल्याचे आदेश प्रशासनाने काढलेले आहे ते खरे आहे काय त्याबाबत सभागृहात माहिती दयावी. जर अशा प्रकारचे आदेश काढलेले असल्यास प्रशासन जेष्ठता डावलुन तर आदेश काढलेले नाहीत. याची खात्री करावी कारण कुणावरही अन्याय होणार नाही यांची खबरदारी घ्यावी.

**अति. शहर अभियंता :** गरवारे स्टेडियमसाठी तात्पुरती नेमणुक श्री. सलीम सैय्यद यांना दिलेली आहे.

**मा. आयुक्त :** सदरील ठिकाणचे पद मंजुर नसल्यास प्रशासनामार्फत सर्वसाधारण सभेकडे किंवा स्थायी समितीकडे पद मंजुरीचा प्रस्ताव ठेवावा लागेल.

**मा. सभापती :** ठिक आहे पद मंजुरी मिळाल्यानंतर क्रिडा शिक्षकांच्या प्रशासनाने मुलाखती घेऊन कार्यवाही करावी.

**प्रकल्प संचालक :** शासनाची नेहरु रोजगार योजना बंद केलेली असुन त्याच अनुषंगाने दुसरी योजना केंद्रशासनाने चालु केलेली आहे. या योजनेअंतर्गत दरिद्रय रेषेखालील झोपडपट्टीतील लोकांना रु. ५०/- हजाराची कर्ज वाटप योजना असुन केंद्र व राज्य शासन पुरस्कृत सुवर्ण जंयती शहरी रोजगार योजना ५०/- हजाराची योजनेपैकी १५% म्हणजे ७५००/- रु. चे अुनदान व कर्ज धारकांकडुन ५% म्हणजे रु. २५००/- बॅकेत भरावयाचे अशा प्रकारची या योजनेचे स्वरुप सर्वसाधारण सभेत याबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात येईल. व ५% लाभार्थीसाठी असुन या बाबतची प्रक्रिया या विभागामार्फत चालु असुन सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवुन मान्यता घ्यावी लागणार आहे.

**मा. सभापती :** दरिद्रय रेषेखालील जे लोक येतात त्या सर्वाना यांचा फायदा मिळावा. केवळ झोपडपट्टीत राहावयास असला म्हणजे त्याचा लाभ मिळावा असा नसु नये याची पाहणी करावी.

**प्रकल्प संचालक :** औरंगाबाद हद्दीत एकुण ५३ स्लम घोषित झोपडपट्टया आहेत या ठिकाणी राहणाऱ्या दारिद्रय रेषेखालील लोकांचा या विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त वर्तमान पत्रात जाहिरात देऊन प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** दारिद्रय रेषेखालील लोकांचा सर्वे आपण करणार त्यावेळेस प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याचे झाल्यास यासाठीचे अंदाजपत्रक शासनाकडुन किती आले याची माहिती दयावी.

**प्रकल्प संचालक :** अद्याप शासनाकडुन बजेट आलेले नाही परंतु शासन लवकरात लवकर या योजने संदर्भात बजेट पाठविणार आहे. त्यानंतर रितसर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. स. अली मिरा सलामी :** प्रकल्प विभागामध्ये याच योजने संदर्भात दोन कर्मचाऱ्याची पदे भरुन कार्यवाही सुरु केली आहे. असे कळाले ते खरे आहे काय?

**प्रकल्प संचालक :** प्रकल्प विभागामार्फत समुदाय ही पदे मंजुर आहेत. मागील प्रशासकांच्या काळात ही पदे मानधनावर भरण्यात आलेली आहेत. सध्या ही पदे भरलेली नाहीत.

**श्री. जयवंत ओक :** केंद्र शासनाची नेहरु रोजगार योजने मार्फत प्रकल्प विभागाचे आतापर्यंत किती लोकांना कर्ज प्रकरणी फॉर्म वाटप केले व किती लाकांचे फॉर्म बॅकेत शिफारस करुन पाठविले. आणि किती बॅकांनी या अर्जावर विचार केला याची सर्व सविस्तर माहिती दयावी. कारण बरेचसे बेकार तरुण कर्ज फॉर्म दाखल केल्यानंतर वारंवार कार्यालयात चकरा मारतात मात्र त्यांना प्रकल्प विभागामार्फत किती अजुन कालावधी लागेल यांची माहिती देता आली नाही. त्यामुळे बरेचसे गरीब लोक सारखे चकरा मारुन त्यांची दैना आशेपोटी झ ाली. यासाठी ज्या योजना गरिब व दारिद्रय लोकांसाठी आहेत ती त्यांच्या पर्यंत तातडीने कार्यवाही करुन पोहोचविणे बाबत संबंधीत विभागाने तातडीने उपाययोजना करावयास पाहिजे.

**मा. सभापती :** कर्ज प्रकरणी बरेचसे लोक फॉर्म भरतात परंतु बॅकेतील ना हरकत प्रमाणपत्र आणण्यासाठी सर्व लोकांना धिरक्या घालतात. व त्यामध्ये एखादया तरी बॅकेत संबंधीताचे काही प्रकरण प्रलंबीत असल्यास ते मिळत नाही. त्यामुळे तसे प्रकरणे सारखी बंद पडतात असे होता कामा नये. ज्या गरिब लोकांना फायदा पाहिजे. तो त्यांनाच व्हावयास पाहिजे याची खबरदारी घ्यावी.

**श्री. जयवंत ओक :** कर्जाच्या संदर्भात कोणत्याही बॅकेत जाण्यास नागरिकांना त्रास होणार नाही याबाबत प्रकल्प विभागाने एक मार्गदर्शन तक्ता तयार करुन नोटीस बोर्डवर लावावे.

**श्री.स.अली मिरा सलामी :** दि. ७ डिंसेबर ९७ रोजी पल्स पोलिओ शहरात किती टक्के यशस्वी झाला. याची माहिती दयावी. व मागील सभेमध्ये विचारणा केल्याप्रमाणे शहरातील हॉटेलमधील पाण्याचे नमुने तपासणी करणे बाबत व शहरालगत धाब्यांवरील पाणी तपासणी करण्याबाबतची माहिती या बैठकीत देणार होते. त्याबाबत काय झाले? शिवाय शहरात मच्छरांचा फार मोठया प्रमाणात प्रादुर्भाव असुन यासाठी मलेरिया विभागाने योग्य ती फवारणी करुन मच्छर नियंत्रणात आणणे जरुरीचे होते. परंतु आरोग्य विभागामार्फत या कामी योजना व्यवस्थित हाताळल्या जात नाही. बरेचसे कर्मचारी फवारणी सुध्दा व्यवस्थित करीत नाही. याकडे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी लक्ष दयावे.

**श्री. जयंवत ओक :** मी मागेही अशी सुचना केलेली होती की, प्रत्येक वार्डनिहाय फवारणी करावी. जेणेकरुन सप्ताहापर्यंत बरेचसे मच्छर नष्ट होऊ शकतील. तेव्हा याबाबतची योजना उद्यापासुन चालु करावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** यावर्षी जवळपास १८२१ मुलांना पोलिओ पल्सचे डोस पाजण्यात आले. पल्स पोलिओ १०१% टक्के यशस्वी झाली. या कामी सर्वाचे सहकार्य लाभले. प्रत्येक केंद्रावरुन घरोघरी जाऊन डोस पाजण्यात आलेले आहे. या विभागाचे डायरेक्टरने या शहरात स्वतः पाहणी केलेली आहे. त्यांनी सुध्दा काम समाधान कारक मत मांडले. काही ठिकाणी स.नगरसेवकांनी सुध्दा सहकार्य केले. याबाबत मा. आयुक्तांसह बऱ्याचशा केंद्रावर जाऊन प्रत्यक्षात पाहणी केलेली आहे. मागील बैठकीत स.स.श्री. कचरु नवपुते यांनी सुचना केल्याप्रमाणे जवळपास ५८ हॉटेलसचे पाण्याचे नमुने घेतलेले आहेत व ते तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहे. काही लायसेंसचे ३३ प्रकरणे प्रलंबीत होते आणि जे आलेले आहे. त्यांना नोटीसा बजावुन कार्यवाही करण्यात येणार आहे. शहरालगत काही धाब्यांवरील पाणी तपासणी मोहिमेची कार्यवाही केलेली आहे. परंतु फुड इन्स्पेक्टर सेवानिवृत्त झालेले आहेत. तेंव्हा कर्मचाऱ्या अभावे बरेचसे कामे प्रलंबीत राहतात. तेव्हा याबाबत काही वेळा विलंब लागण्याची शक्यता असते.

**श्री. स.अली मिरा सलामी :** जी यादी पोलिओ पल्ससाठी केलेली असेल त्याप्रमाणे पुर्णपणे १०१% यशस्वी झाली असेल परंतु जी नविन लहान मुले झालेले असतील व ज्यांची यादीत नांवे समाविष्ट नाहीत त्यांचे बाबतीत काय कार्यवाही केली.

**मा. सभापती :** पल्स पोलिओ कार्यक्रमा अंतर्गत मा. महापौर व मी स्वतः अनेक केंद्रावर पाहणी केलेली आहे. त्यावेळेस जे नविन लहान लहान मुले आहेत त्यांनाही या योजनेत समावेश करण्यात आलेला आहे.

**श्री. स.अली मिरा सलामी :** यापुढील १८ जाने ९८ च्या पोलिओ पल्सच्या कार्यक्रमांबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी वर्तमान पत्राव्दारे जाहिरात देवुन प्रचार करावा. जेणे करुन जास्त प्रमाणात प्रतिसाद मिळेल.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** : प्रत्येक केंद्रावर पोलिओ पल्सच्या बाबतीत रजिस्टर ठेवण्यात आलेले आहेत. व त्यामध्ये व्यवस्थित नोंदी घेण्यात येतात. यामध्ये ज्यांची नांवे नाहीत व जे नविन लोक आहेत. त्यांचाही ऐनवेळी समावेश करण्यांत आलेला आहे. मलेरिया फवारणी बाबत दहा मशीनव्दारे प्रत्येक झानेला १-१ व २-२ वेळेस फवारणी करण्यांत येईल.

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिकेची मध्यवर्ती खडकेश्वर वाचनालयाची इमारत आहे. त्या ठिकाणी सध्या दुमजली बांधकाम झालेले आहे. व अजुनही बराचशा भागाचे काम चालु आहे. त्या ठिकाणी इमारतीत पावसाचे पाणी गळते. तेव्हा त्या ठिकणचे नविन बांधकाम असतांनाही पाणी कसे गळते यांची पाहणी करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. अतिरिक्त शहर अभियंता यांचे सोबत पाहणी करण्यात येईल.

**श्री. जयवंत ओक :** नाला ट्रेचिंग अंतर्गत संरक्षण भिंत बांधण्यात येते. परंतु नाल्यातील मलमुत्र व्यवस्थितपणे साफसुफ होणे आवश्यक आहे. यासाठी वाटल्यास विशेष गॅग देऊन झोनव्दारे कार्यवाही करावी.

**री. संजय जोशी :** नाल्यात साचणारे मलमुत्र व्यवस्थित साफ राहणे आवश्यक आहे. नसता त्यालगत लोकांना त्रास होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

**मा. सभापती :** झोनमधील दैनिक वेतन कर्मचाऱ्यांची विशेष गॅग पाठवुन याबाबतची कार्यवाही व्हावी.

**श्री. जयवंत ओक :** शहरातील किती ठिकाणचे अतिक्रमण काढण्यात आलेली आहेत. आणि अतिक्रमणे काढावयाचे राहिलेले आहेत व किती प्रकरणे कोर्टात याव्दारे गेलेली आहेत आणि प्रलंबित आहेत याची सविस्तर माहिती दयावी या शिवाय किती लोकांनी कोर्टातुन स्टे आणलेले आहेत सध्या अतिक्रमण हटविण्याची मोहिम बंद का करण्यांत आली?

**मा. सभापती** : विधी सल्लागार विचारणा करुनच कोर्टात गेलेले आहेत.

**उपआयुक्त-१ :** सध्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त गेल्या ४-५ दिवसांपासुन अतिक्रमण हटाव मोहिम बंद आहे. पुन्हा नियमीतपणे चालु राहणार आहे. व संपुर्णपणे अतिक्रमण हटविण्याबाबत मोहिम चालुच राहणार आहे.

**श्री. जयवंत ओक :** या अतिक्रमण हटाव मोहिमे अंतर्गत काही भागातील लोकांनी कोर्टात जाऊन स्टे आणलेले आहेत. तेव्हा प्रशासन याबाबतीत काय कार्यवाही करते.

**श्री. कचरु नवपुते :** मागील सभेच्या वेळेस स.स.श्री. अभिमन्यु भालेराव यांच्या एका व्यक्तींने अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे. त्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली. संबंधीत व्यक्तींने अनाधिकृत बांधकाम करुनही कोर्टातुन स्टे आणलेला आहे. तरीही प्रशासनाने आतापर्यंत त्यांच्या वार्डात अतिक्रमण हटाव मोहिम का राबविली नाही.

**उप आयुक्त-१ :** मी संबंधीत स्थळाची पाहणी केलेली आहे. संबंधीतांनी कोर्टात स्टे आणलेला नाही. जरी आणलेला असल्यास स्टे व्हॅकेट करता येईल याची खात्री करुन कार्यवाही करता येईल.

**सौ. यशोदा वाडेकर :** माझ्या वार्डातील श्री. मकबुल शेख यांनी अतिक्रमण करुन रोडमध्ये घर बांधलेले आहे. याबाबत मी कित्येकदा तक्रारी करुनही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. याचे कारण काय?

**प्रशासकीय अधिकारी** : संबंधीताचे घर गेल्या १५-२० वर्षापासुनचे असुन त्यांच्या नावांवर रजिस्ट्री व पी.आर.कार्ड तयार आहे. याबाबतची प्राथमिक चौकशी करुन संबंधीताला नोटीस बजावण्यात आली असता व त्याच्या कडील कागदपत्राची छाननी केली असता असे आढळुन आहे आहे. तरीही प्रथम ३ दिवसांची नोटीस आणि नंतर १५ दिवसांची नोटीस बजावण्यात आली आहे. त्याचेकडील कागदपत्रे सर्व व्यवस्थित असुन घर फक्त रोडवर आलेले आहे.

**श्री. जयवंत ओक :** बऱ्याच भागात उदा. मध्यवर्ती बस स्थानक व हेडगेवार हॉस्पीटल समोरील ठिकाणी प्रशासनाने अनाधिकृत टपऱ्या हटविल्या परंतु पुन्हा त्याच ठिकाणी काही टपऱ्या बसल्या याचे कारण काय? म्हणजे प्रशासनाला टपरीधारक लोक घाबरत नाहीत काय? किंवा प्रशासनाने कठोर भुमिका स्विकारलेली नाही काय?

**उप आयुक्त-१ :** जर असे अनाधिकृत टपऱ्या पुन्हा बसल्या असतील तर त्या अनाधिकृत टपऱ्या पुन्हा काढल्या जातील.

**श्री. जयवंत ओक** : अतिक्रमण हटविल्यानंतर तेथील लोकांना इतर ठिकाणी किंवा शासनाच्या जागेवर टपऱ्या बसविण्याची कार्यवाही करावी, औरंगपुरा, शहागंज वगैरे ठिकाणी या व्यतिरिक्त शहरातील मोकळया ठिकाणी ज्या खुल्या जागा आहेत. त्या ठिकाणी महानगरपालिकाचे वतीने टपरी धारकांना चांगला व सुव्यवस्थित बांधुन देण्याबाबत जळगांव पॅटर्न "धरर्तीवर कार्यवाही करता येईल व त्यामुळे मनपाला आर्थिक फायदा होईल याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. अब्दुल रशिद खॉन (मामु)** : टपरी बाबत शहरात कशाप्रकारे अंमलबजावणी करावी याबाबत योजना आखणे आवश्यक आहे.

**श्री. जयवंत ओक :** औरंगपुरा भाजी मंडई ज्या ठिकाणी आहे. त्याच ठिकाणी मोठे मार्केट महानगरपालिका मार्फत तयार व्हावे.

**मा. सभापती :** ठिक आहे. अंदाजपत्रकीय बैठकीत याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात येईल.

**श्री. संजय जोशी :** शहरातील जे आठवडी बाजार आहेत आणि त्या ठिकाणी महानगरपालिकाने गुत्तेदारांना आठवडी बाजार चालविण्यासाठी दिलेला आहे. त्या आठवडी बाजारातील गुत्तेदार त्या बाजारात विक्रीसाठी खेडयापाडयातुन येणाऱ्या शेतकरी व व्यवसायांकाकाडुन प्रत्येक ॲटम निहाय रु. १०/- ची पावती फाडतात ही बाब योग्य नसुन त्यामुळे विक्री करणारे व्यावसायीक तक्रारी करीत आहेत. याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. शहरातील भाजी मंडईत किती भाडे वसुली केल्या जाते याबाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत संबंधीत विभागाने दयावी.

**मा. सभापती :** अशाच प्रकारे सिध्दार्थ उद्यानास मागील वर्षी तेथील गुत्तेदारा बाबत तक्रार आलेली असतांना त्याबाबत शहानिशा करुन त्यास हटवुन आपण महानगरपालिकातर्फे कार्यवाही करण्यात येत आहे. तशीच पध्दत आठवडा बाजाराबाबत अवलंबीता येईल.

**मालमत्ता अधि. :** आठवडी बाजारातील गुत्तेदारांच्या बाबतीत तशा तक्रारी आलेल्या आहेत. त्यास प्रशासनामार्फत सुचना दिलेल्या आहेत.

**श्री. संजय जोशी :** आठवडी बाजार महानगरपालिका हद्दीत तीन ठिकाणी भरतो. त्याबाबत किती प्रमाणात भाडे वसुल होते व त्या आठवडी बाजाराच्या ठिकाणी संबंधीत गुत्तेदार किती पावत्या फाडतो याची चौकशी व्हावी.

**श्री. कचरु नवपुते :** स.स.श्री. संजय जोशी यांनी सुचना केल्याप्रमाणे ही बाबत योग्य असुन माझ्या वार्डातील चिकलठाणा येथील आठवडी बाजारातील गुत्तेदार अशाच प्रकारची वागणुक तेथील विक्रीसाठी येणाऱ्या शेतकरी व व्यावसायीकांना देत असुन यावर प्रशासनाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** या बाबत एका समिती स्थापन करुन समितीव्दारे शहरातील आठवडी बाजारात अचानक भेट देऊन चौकशी करण्यात येईल व सोमवारला पीरबाजार येथील आठवडी बाजारात रविवारला मोंढा येथील आठवडी बाजारात तर शुक्रवार येथील चिकलठाणा आठवडी बाजारात जाऊन चौकशी करण्यात येईल.

**श्री. सुभाष टाकळकर :** "शहरात सुरत पॅटर्न" मोहित राबविण्यासाठी दुचाकी वाहने काही खरेदी करण्यात आलेले होते. त्या दुचाकी वाहणे खरेदी करता नियमाप्रमाणे निविदा मागविण्यात आलेल्या होत्या काय? माझ्या पाहणीत असे आलेले आहे की, झोन-२ येथे काही दुचाकी गाडया आहेत. त्यातील गाडयांचे गेजची पत्रे तुटलेली आढळली. म्हणजे गाडया खरेदी करतांना किती गेजचे पत्रे असावीत याचा विचार केलेला नाही काय? सध्या त्या दुचाकी गेजच्या गाडया अतिशय खिळखिळया झाल्या असुन एका खेपेस १५ किलो सुध्दा घाण कचरा ओढुन नेल्या जात नाही. अशा प्रकारचे खरेदी करुन प्रशासन महानगरपालिकाचे आर्थिक नुकसान करीत आहे.

**श्री. कचरु नवपुते :** सध्या शहरात सुरत पॅटर्नचे काम चालु आहे किंवा नाही याचा काहीही गाजावाजा दिसुन येत नाही. प्रशासनाचे संपुर्ण काम ठप्प झालेले आहे असे वाटते.

**उपायुक्त -१ :** एकंदरीत २१० हातंगाडयांचे टेंडर काढुन मागविण्यात आलेले होते. जे हातगाडयांचे नमुने बघीतले त्यामध्ये थोडा फार बद्दल करुन त्यातील बेअरिंग कुठे टाकायची व ज्यामुळे लोड गाडी वाहुन नेईल. याची पाहणी करण्यात आलेली आहे. जवळपास ७० किलोचा कचरा वाहुन नेईल इतकी क्षमता त्या गाडीत आहे.

**मा. सभापती :** पुढील बैठकीत याबाबतीत सविस्तर माहिती दयावी.

**श्री. संजय जोशी :** "सुरत पॅटर्न" धरतीवर औरंगाबाद शहरात अतिशय चांगल्या रितीने कामे पार पाडल्या जात होते. संबंधीत अधिकारी सुध्दा दररोज सकाळी ६.०० पासुन आपआपल्या झोनवर जाऊन स्वच्छतेची पाहणी करुन दैनंदिन कामकाज पार पाडीत असत. परंतु गेल्या दोन महिन्यापासुन माझ्या वार्डालगत जवाहर कॉलनी, व उल्कानगरी या भागात इतकी घाण सर्वत्र पसरलेली आहे की, दर्गंधी पसरुन नागरीकांना रोग होण्याची चिन्हे आहेत. त्या भागातील जे स्वच्छता निरिक्षक आहेत. ते कधीच त्या ठिकाणी येऊन कामाचा निपटारा करीत नाहीत वा स्वच्छतेच्या बाबतीत त्यांच्या निष्क्रीय झालेला आहे. याबाबत मा. सभापती यांनी सर्व झोनमधील निरिक्षकांची एक बैठक बोलावुन कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. सर्व झोनमधील स्वच्छता निरिक्षकांची दि. १२-१२-९७ रोजी बैठक बोलावुन कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री. आभिमन्यु भालेराव :** माझ्या वार्डातील एका व्यक्तींने अनाधिकृत टपरी बांधुन जास्तीचे काम केले व कोर्टामार्फत स्टे सुध्दा आणलेला आहे. तेव्हा प्रशासनाने जाणीपुर्वक संबंधीतास स्टे आणण्यापर्यंत गप्प राहिले याचे कारण काय?

**प्रशासकीय अधि.** : संबंधीतांनी स्टे आणलेला असल्यास तो १० तारखेपर्यंत व्हॅकेट करण्यात येईल.

**श्री. आभिमन्यु भालेराव :** दुसऱ्या संस्थेच्या नांवे संबंधीत व्यक्तीने एमआयडीसी परिसरात अनधिकृत बांधकाम केलेले आहे. याबाबत प्रशासनास मा. महापौर, मा. आयुक्त यांनाही या संदर्भात अनेकदा सांगुनही व मा. आयुक्त यांनी सुध्दा संबंधीताचे अनाधिकृत बांधकाम ताबडतोब पाडण्याचे आदेशीत करुनही प्रशासनातील संबंधीत अधिकारी यांनी जाणीपुर्वक चाल खेडुन संबंधीतांना मार्ग मोकळा करुन दिला. म्हणजे या ठिकाणी आम्ही नगरसेवक सभेला येऊन जोरजोरात बोलुन प्रशासनाकडे दाद न मागता प्रशासनातील अधिकाऱ्यांनी त्यांच्या मनपमानी प्रकाराने आम्हास गप्प बसवितात मात्र नगरसेवकांचे म्हणण्याला काहीही किंमत ठेवत नाही. या सभेला काय अर्थ? या सभेत मी प्रशासनाचा निषेध करतो.

**प्रशासकीय अधि. :** संबंधिताने अनाधिकृत केलेले काम ते रिपेरिंअगचे होते.

**श्री. संजय जोशी :** मी स्वत: त्या स्थळी जाऊन आलेलो आहे. गेल्या कित्येक दिवसापासुन स.स. बैठकीत सतत विचारणा करतात परंतु प्रशासनातर्फे दखल घेतल्या जात नाही. याबाबत जे इमारत निरिक्षक त्याठिकाणचे आहेत. त्याच्या दुर्लक्षामुळे संबंधीतानी अनाधिकृत काम केलेले आहे. इमारत निरिक्षक, संबंधीत अधिकारी व अनाधिकृत काम करणारा व्यक्ती या सर्वाचे लागेबांधे या प्रकरणी असल्यामुळेच प्रशासनातर्फे कोणतीही कार्यवाही केलेली नाही. हे उघड आहे. यास सर्वस्वी तेथील इमारत निरिक्षक हाच जबाबदार असुन त्यांचेवर कार्यवाही केलेली नाही.

**मा. सभापती :** स.स. यांनी वेळोवेळी प्रशासनास अनाधिकृत बांधकामा बाबत तक्रारी व सभेमध्ये सुचना प्रथमत: व्हावी. अनाधिकृत कामे थांबविलेले नाही वा हटविण्यात आलेले नाही. तेंव्हा त्या भागातील जो इमारत निरिक्षक असेल त्यांच्या दुर्लक्षांमुळे व बेजबाबदार पणामुळे हा प्रकार घडलेला असुन त्यामुळे महानगरपालिकेची वेळोवेळी आर्थिक व प्रशासनाची निंदा नालस्ती यास्तव संबंधीत इमारत निरीक्षक जबाबदार समजुन त्यावर प्रशासनाने निलंबनाची कार्यवाही करावी.

**श्री. जयवंत ओक :** शहरातील अनाधिकृत बांधकामे पाडीत असतांना काही टपरी धारकांनी कोर्टातुन स्टे का आणला यांची माहिती दयावी. याचा प्रमुख सुमधार कोण आहे याची शहानिशा करावी. अशा प्रकारचे अनेक विभागामध्ये अनाधिकृत कामे पार पाडली जातात. बांधकाम विभागात/ ड्रेनेज/पाणी पुरवठा व विद्युत विभागातीलही कर्मचारी अशा बऱ्याचशा विभागात कर्मचारी/अधिकारी वेगळया मार्गाने कामे करतात. त्या सर्वावर निलंबनाची कार्यवाही करणार काय यांची माहिती दयावी. कुणा एकावर निलंबनाची कार्यवाही करु नये. अशा सर्व विभागातील कर्मचाऱ्यांबाबत प्रशासनाने बारकाईने लक्ष देऊन कार्यवाही करावयास पाहिजे. अनाधिकृत टपऱ्या बांधकामाबाबत चार वेळेस

प्रशासनास सांगुनही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे अशा बऱ्याच प्रकरणात इमारत निरिक्षक त्या त्या भागातील हे सर्वस्वी जबाबदार आहेत. कारण हे शहर जेवढे झपाटयाने वाढले. ज्यात अनाधिकृत वसाहती झालेल्या आहेत त्या इमारत निरिक्षकांच्या दुर्लक्षामुळे व बेजबाबदार पणामुळेचे यासाठी प्रशासनाला मुळ उकरुन काढण्याचे म्हत्वाचे आहे.

**श्री. भगवान घडामोडे :** प्रत्येक झोन मध्ये इमारत निरीक्षक यांच्या बेजबाबदारीमुळे अनाधिकृत घरे व अनाधिकृत टपऱ्या बसलेल्या आहेत. त्याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री. स.सली मिरा सलामी :** माझ्या वार्डात एका व्यक्तींने बांधकाम परवानगी घेऊन बांधकाम केले परंतु ज्या नियमाप्रमाणे बांधकाम करावयास पाहिजे जेवढे क्षेत्र सोडुन चारही बाजुने बांधकाम करावयास पाहिजे ते केलेले नसुन नियमाप्रमाणे सोडण्यात येणाऱ्या जागेवर बांधकाम केलेले आहे. या संदर्भात मी प्रशासकीय विभागात तक्रार नोंदवुन देखील कार्यवाही केलेली नाही. रोडवरती जे घराला लागुन खांब आहे. त्या खाबाला चिटकुन संबंधीत व्यक्तींने अनाधिकृत भिंतीचे काम केलेले आहे. तेंव्हा ते हटविणे आवश्यक आहे.

**प्रशासकीय अधि. :** माझेकडे याबाबतीत तक्रार अर्जच प्राप्त झाला नाही.

**श्री. स.अली मिरा सलामी :** मी. संबंधीत विभागाकडे तक्रार अर्ज देवुनही अधिकाऱ्यांना माहित नसते. माझ्या वार्डातील सब्जीमंडी येथील राशनच्या दुकानाजवळील घर या ठिकाणचे अनाधिकृत बांधकामाबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** दि. १२-१२-९७ रोजी स्वच्छता निरिक्षक व इमारत निरिक्षक यांची संयुक्त बैठक बोलविण्यात येईल.

**श्री. संजय जोशी, श्री. भगवान घडामोडे :** जगप्रसिध्द बिबीका मकबरा शेजारी अनेक विटभट्टया आहेत. त्यामुळे प्रदुषण होऊन मकबऱ्याला धोका निर्माण होणाऱ्या संभव आहे. व शासनाने सुध्दा कार्यवाही करण्याचे सागुंनही प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही.

**प्रशासकीय अधि. :** स.स.श्री. मिरा सलामी यांनी विचारलेल्या प्रकरणी उद्याला प्रत्यक्षात पाहणी करुन निर्णय घेण्यात यईल.

**मा. सभापती :** ठिक आहे. संबंधीत अधिकारी यांनी उद्याला पाहणी करुन अनाधिकृत बांधकाम असल्यास कार्यवाही करावी व सर्व साहित्य उचलुन आणावे.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** माझ्या वार्डात मागील सभेत सांगितल्यानुसार ३५० लाईट लावले. परंतु कोणत्या कोणत्या ठिकाणी व कोणत्या रस्त्यावर लाईट लावले याची शहानिशा प्रशासनानेच करावी. आपली गाडी कोणत्या दिशेने व कुठेकुठे गेली. यांची संबंधीत अधिकाऱ्यांना कल्पना आहे काय? माझ्या वार्डात ५०० लाईट लावण्याची मंजुरी मिळुनही १५० सुध्दा लाईट लावलेले नाहीत व ३५० लाईट लावले म्हणुन या ठिकाणी सांगितल्या जाते. तेंव्हा सभेतील उपस्थित स.सदस्य मा. महापौर, मा. सभापती व मा. आयुक्त यांचे समवेत प्रत्यक्षात पाहणी करावी व मोजणी करावी की किती ठिकाणी लाईट लावण्यात आले.

**उपअभियंता (लाईट) :** संबंधीत लाईट लावलेले असुन उर्वरित लाईट दोन दिवसांत लावण्यात येणार आहे.

**श्री. आभिमन्यु भालेराव :** माझ्या वार्डात एकंदरीत किती लाईट लावल्या गेले याची सविस्तर माहिती दयावी.

**अति.शहर अभियंता :** ३५० विद्युत दिवे लावण्यात आलेले आहेत. आणखी उर्वरित १५० दिवे राहिलेल्या ठिकाणी लावण्यात येईल व ज्या ज्या ठिकाणी दिवे लावण्याची असल्यास त्या सर्व ठिकाणी दिवे पाहणी करुन लावण्यात येईल.

**श्री. आभिमन्यु भालेराव :** प्रत्यक्षात पाहणी केल्यानंतर माझ्या वार्डातील विद्युत दिवे कोणकोणत्या ठिकाणी लावायचे राहिले त्यावरुनच कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** ठिक आहे अति.शहर अभियंता, व स.स.श्री. आभिमन्यु यांचे समवेत पाहणी करण्यात येईल.

**विषय क्र. ३४२/१ :**

दिनांक २४-११-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

या व इतर दुरुस्त्यासह दिनांक २४-११-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४३/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चिकलठाणा येथील भाजी मार्केटचे शेड तोडुन आर.सी.सी. चे नवीन दुकाने बांधावयाचे आहेत. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९५-९६ चे दरसुचीनुसार रक्कम रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. त्यास मा. स्थायी समितीने ठराव क्र. ४१७/३ दिनांक ५-२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार निविदा मागवुन दिनांक २९-११-९६ चे इतिवृत्त ठराव क्र. ४४५/२० अन्वये मा. स्थायी समितीने मे. एस.एच.असोशियेट्स यांच्यातर्फे ११.१% कमी दराने या दरानुसार काम करुन घेण्यास मान्यता देण्यांत आलेली आहे.

त्याप्रमाणे त्यांच्यातर्फे काम करुन घेण्यात येत आहे. मुळ अंदाजपत्रक हे ढोबळ मानाने तयार करण्यांत आले होते. सद्यास्थितीत चार दुकाने, जिना व बाजुच्या इमारतीवर जाण्यासाठी स्लॅब रस्ता टाकणे इत्यादी कामे करणे बाकी आहे. त्यास रक्कम रुपये. १,३४,९३९/- चे सुधारित वाढीव अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्या मा. आयुक्तांनी दि. २५-१०-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तरी वाढीव कामे हे मुळ गुत्तेदार मे. एस.एच. असोशियेट्स यांचे कडुन मुळ दरानुसार काम करुन घेण्यास व सुधारित अंदाजपत्रकास मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील भाजी मार्केटचे शेड तोडुन आर.सी.सी. चे नवीन दुकाने बांधाणेच्या कामामध्ये सद्यः स्थितीत चार दुकाने जीना व बाजुच्या इमारतीवर जाण्यासाठी स्लॅब रस्ता टाकणेच्या कामाची वाढ झाल्याने वाढीव रक्कम रु. १,३४,९३९/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मुळ गुत्तेदार मे. एस.एच. असोशियेट्स यांचेकडुन पुर्वीचे मंजुर दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४४/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बौध्दनगर, उत्तमनगर स्लम येथे दगडी गटार बांधणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. १,३२,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. सदरील काम ५% कमकुवत घटक योजना "या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २२-१०-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु. १,३२,३००/- या मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बौध्दनगर, उत्तमनगर येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,३२,३००/- च्या अंदाजपत्रकास सदरील काम ५% कमकुवत घटक योजना या लेखाशिर्षातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४५/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर (मुंकुदवाडी) येथे कर्ल्व्हट तयार करणे कामा करिता र.रु. १,५६,००७/- (कर्ल्व्हट बांधणेचे अंदाजपत्रक र.रु. १,२०,३०७/- व अंतर्गत खडी रस्त्याचे रु. ३५,७००/- ) चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांचे दरसुची १९९५-९६ अनुसार तयार करण्यांत आली असुन मा. आयुक्तांनी दि. २५-१०-९७ रोजी स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेश दिले आहे.

सदरील काम १८ खेडी विकास कार्यक्रम अंतर्गत करण्यांचे प्रस्तावीत आहे. करिता मान्यतेस्वत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. संजयनगर (मुंकुदवाडी) येथे कर्ल्व्हट तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,२०,३०७/- व अंतर्गत खडी रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३५,७००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदरील काम १८ खेडी विकास कार्यक्रम अंतर्गत करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४६/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा क्र. ७ (मराठी) औरंगपुरा (दिवानदेवडी) करिता वसंत भुवन येथे पार्टीशल करावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,३७,८४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दिनांक २५-१०-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा ९७-९८ इमारत व देखभाल या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यांत येईल तरी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या प्राथमिक शाळा क्र. ७ (मराठी) औरंगपुरा (दिवानदेवडी) करिता वसंत भुवन येथे पार्टीशल करण्यांचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,३७,८४०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

सदर खर्च ९७-९८ इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षांतर्गत करण्यांत यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४७/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गुलमंडी रोडवर भोलेश्वर मंदिराजवळ मार्केट बांधणेचे उर्वरित काम करणे करिता रक्कम रु. १४,५२,०००/- चे अंदाजपत्रक तयार कण्यांत येऊन त्यास विषय क्र. ४१/४ दि. १६-५-९७ चे इतिवृत्तानुसार मा. स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. मनपा/लेखा/नि./४३/९७ दि. २५-६-९७ अन्वये बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (३) निविदा विक्री झाल्या व तसेच सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेस व वेळेपर्यंत एकुण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याच्या तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सलीम पटेल | ४.९९% | अधिक दराने |
| २. | श्री. एच.बी. संत्रे | ५.००% | अधिक दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% अधिक दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे. संबंधीत गुत्तेदारास दराबाबत वाटाघाटी करण्यांस मा. आयुक्तांचे दालनात बोलवले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराने सदरील कामास मा. आयुक्तांनी दर्शविली आहे. त्यानुसार गुत्तेदारानेही लेखी संमती दर्शविली आहे. सबब सदर काम श्री. सलीम पटेल यांचेकडुन ४.९९% जास्त ऐवजी २% जास्त दराने करुन घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुलमंडी रोडवर भोलेश्वर मंदिराजवळ मार्केट बांधणेच्या उर्वरित कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम अंदाजपत्रक दरापेक्षा २% जास्त दराने श्री. सलीम पटेल यांचेकडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४८/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे फर्निचर तयार करणेच्या कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/७२/९७ दिनांक १८-१०-९७ व्दारे प्रगट निविदा मागविल्या असता विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण तीन (३) निविदा विक्री झाल्या असुन निविदा प्राप्त निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (३) तीन निविदा वर भरलेल्या प्राप्त झाल्या प्राप्त निविदा दिनांक १५-११-९७ रोजी उघडण्यात आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | ठेकेदाराचे नांव व दरपत्रक | | |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र राज्य लघुउद्योग वि.म. | सुपर फर्निचर वकर्स. | मेहेर फर्निचर वर्क्स. |
| १. | श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयासाठी फर्निचर पुरवठा करणे. | | | |
| अ) | भिंती वरील शोकेस ( ) लहान आकाराचे (१२) नग. | रु. १,११,०००/x१२ प्रतिनग. =१३,३२,०००=०० | रु. १,१२,०००x१२ प्रतिनग. =१३,४४,०००/- | रु. १,१७,०००x१२ प्रतिनग. =१४,०४,०००/- |
| ब) | जमिनीवरील शोकेस ( ) लहान आकाराचे (०८) नग. | रु. १८, ००० x ०८प्रतिनग. =१,४४,०००=०० | रु. १९,०००x१८ प्रतिनग =१,५२,०००=०० | रु. १९,३५०x०८ प्रतिनग. =१,५४,८००=०० |
| | अशाप्रकारे दोन्ही आकाराच्या शोकेसेस मराठी एकुण रु. | =१४,७६,०००=०० | =१४,९६,०००=०० | =१५,५८,८००=०० |

अशा प्रकारे वरील प्रमाणे पुरवठादारकडुन दरपत्रके प्राप्त झालेली असुन तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ विकास भवन औरंगाबाद यांचे दरपत्रक प्राप्त झालेले होते.

परंतु पुरवठादाराने दर जास्त दिल्यामुळे त्यांना वाटाघाटीसाठी बोलावुन घेवुन वाटाघाटीव्दारे त्यांनी भिंतीवरील मोठया आकाराचे शोकेस (१२) नग व जमीनीवरील लहान आकाराचे शोकेस (०८) नग अशा प्रकारे दोन्ही आकाराच्या शोकेससाठी त्यांनी दिलेल्या निविदेतील दर रक्कम रु. १४,७६,०००=०० ऐवजी ऐवजी रक्कम रु. १४,५०,०००/- मध्ये काम करुन देणेसाठी हमीपत्र दिले आहे.

तरी पुरवठादाराचे दरानुसार रक्कम रु. १४,५०,०००=०० चे अंदाजपत्रकास व सदरच्या कामासाठी आलेले कमी दराचे ठेकेदार महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ विकास भवन औरंगाबाद यांचे निविदेस वाटाघाटीव्दारे ठरलेली रक्कम रु. १४,५०,०००/- ला मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे फर्निचर तयार करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे ठेकेदार महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (एमएसएसआयडीसी) यांच्या निविदेस व वाटाघाटीद्वारे ठरलेली रक्कम रु. १४,५०,०००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४९/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नेहरु बालोद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात म्युरल्सचे काम करणेच्या कामासाठी दिनांक १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १७६/३५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/५८/९७ दिनांक १६-९-९७ चे निविदा सुचना व्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण चार निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित

तारखेस एकुण चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या प्राप्त निविदा दिनांक २०-१०-९७ रोजी उघडण्यात आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मडीलगेकर्स आर्ट स्टुडिओ | रु. १४८०/- | प्रति चौरस फुट |
| २. | श्री. हेमंत पिचवले | रु. १५९३/- | --//-- |
| ३. | श्री. मे. राणा फायबर इंन्डस्ट्रीज | रु. १६००/- | --//-- |
| ४. | श्री. सासमकर पी.आर. | रु. १७००/- | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १४८०/- प्रति चौरस फुट मे. मेडीलगर्क्स आर्ट स्टुडिओ यांचे दर आलेले आहे.

तसेच संबंधीत ठेकेदारास दिनांक १८-११-९७ चे पत्राव्दारे मा. आयुक्त यांचे दालनात चर्चेसाठी बोलावुन ठेकेदाराबरोबर वाटाघाटी करुन रु. १४८०/- प्रति चौरस फुटच्या ऐवजी रु. १४८०/- प्रति चौरस फुट या दराने काम करणेसाठी संबंधीत ठेकेदाराबरोबर वाटाघाटी करुन रु. १४८०/- प्रति चौरस फुट च्या ऐवजी रु. १४८०/- प्रति चौरस फुट या दराने काम करणेसाठी संबंधीत ठेकेदाराने संमती दिलेली आहे.

त्याच प्रमाणे संग्रहालयासाठी एकुण पाच प्रसंग सध्या पुरते तयार करावयाचे असुन त्या मध्ये कमी जास्त प्रसंग होण्याची शक्यता असुन त्या मध्ये कमी जास्त प्रसंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन ठेकेदाराबरोबर मा. आयुक्तांचे दालनामध्ये १०x८=८० चौ.फुट रु. १४००x८०.१,१२,०००/- = ०५ = रु. ५,६०,०००/- इतक्या रक्कमेची आवश्यकता आहे.

तरी ठेकेदाराच्या वाटाघाटी अंती ठरलेल्या दरानुसार रक्कम रु. ५,६०,०००/- चे अंदाजपत्रकास व त्यांचे दिलेल्या दरानुसार सदरील काम हे मे मडीलेगर्क्स आर्ट स्टुडिओ यांचे कडुन र.रु. १४००/- प्रति चौ. फुट प्रमाणे निविदा मंजुर करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नेहरु बालोद्याग येथील छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात म्युरल्सचे काम करणेसाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराने ठेकेदांशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रति चौरस फुट रु. १४००/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५०/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गारखेडा येथील सि.स.नं. १५८४०/पी येथील अंतर्गत खडी रस्त्याचे व दगडी गटाराचे काम करणेसाठी सन ९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने र.रु. ३,६०,०३३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास दि. १६-८-९७ च्या स्थायी समितीच्या विषय क्र. ११९/११ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेस (१०) निविदा पत्रके विक्री झाल्या त्यापैकी निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम

तारखेपर्यंत एकुण (१०) दहा निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाले असुन त्याचा तुलनात्मकतक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. एस.एच. असोशिएटस | ३५.५३% | कमी दराने |
| २. | श्री. बदरवीन कंन्स्ट्रक्शन | ३३.९७% | --//-- |
| ३. | मे. आकाश कंन्स्ट्रक्शन | ३३.३५% | --//-- |
| ४. | श्री.जी. के पवार | ३१.९९% | --//-- |
| ५. | श्री. गिरीष बाजपाई | २०.६६% | --//-- |
| ६. | श्री. नरेंद्र शेट्टी | २९.०५% | --//-- |
| ७. | श्री. विलास गो. जाधव | ३१.००% | --//-- |
| ८. | श्री. कुलवंतसिंग | २३.१०% | --//-- |
| ९. | श्री. अब्दुल सलाम | २३.००% | --//-- |
| १०. | मो. रोहिल सिध्दीकी | १९.९२% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीचे दरापेक्षा ३५.५३% कमी दराने मे. एस.एच. असोशिएटस् याची निविदा पत्रक आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रु. ३,६०,०३३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे. एस.एच.असोशिएटस् यांच्याकडुन ३५.५३% कमी दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**विषय क्र. ३५१/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर (जीन्सी) येथे १५० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु. ५,८५,७००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवुन त्या स्थायी समितीचा ठराव क्र. १४८/७ दिनांक १६-८-९७ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ५७/९७ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवुन बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण अकरा (११) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण चार (४) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. सोहेल सिद्यीकी | ४.४४% | जास्त |
| २. | श्री.स.अथर अली | ८% | जास्त |
| ३. | श्री. मन्नानखान | ०.०५% | कमी |
| ४. | श्री. बी.एम. कन्स्ट्रक्शन | ५% | जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. मन्नानखॉन यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी असा दर आहे.

तरी श्री. मन्नानखॉन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर (जीन्सी) येथे १५० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. मन्नान खॉन याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५२/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कल्पतरु गृह निर्माण सोसायटीत १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रुपये १,२६,१६१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कल्पतरु गृहनिर्माण सोसायटीत १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,२६,१६१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५३/१२ :**

गौतमनगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनिःसारण वाहिनी टाकणे बाबतच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये १,०२,३५०/- चे तयार करण्यांत आले असुन सदर कामावर होणारा खर्च हा "झोपडपट्टी सुधारणा पा.पु. जलनिःसारण ९७-९८ या लेखा शिर्षकातुन करण्यांत येणार आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळाली असुन रुपये १,०२,३५०/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गौतमनगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,०२,३५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५४/१३ :**

हर्सुल जलकुंभापासुन हडको कॉर्नरपर्यंत १५० मी.मी. व १०० व्यासाची एसी. जलवाहिनी टाकणेसाठी परिसर अभियांत्रिकीच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. २,८४,५००/- चे तयार करण्यांत आले असुन या कामावर होणारा खर्च पाणीपुरवठा भांडवली कामे ९७-९८ मधील तरतुदीमधुन करण्यांत येणार आहे. सदर कामाला प्रशासकीय मंजुरी मिळाली असुन सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २,८४,५००/- चे प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल जलकुंभापासुन हडको कॉर्नरपर्यंत १५० मी.मी. व १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,८४,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५५/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कांचनवाडी स्लम येथे श्री. निकाळजे यांच्या घराजवळील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरिता रक्कम रु. १,७०,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९६-९७ अनुसार तयार करण्यात आले असुन मा. आयुक्तांनी दि. २५-१०-९७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रधान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास कार्यक्रम ९७-९८ अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कांचनवाडी स्लम येथे श्री. निकाळजे यांच्या घराजवळील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम १८ खेडी विकास कार्यक्रम ९७-९८ अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५६/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पडेगांव कत्तलखाना येथे खालील तीन प्रकारची वेगवेगळी कामे करावयाची आहेत. त्यासाठी सा.बां. खात्याच्या ९६-९७ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रके तयार करण्यांत आली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | कत्तलखाना इमारतीमध्ये कॉक्रिंट करणे. | १,०९,१००/- |
| २. | इमारतीच्या मागील बाजुस हौदाभोवती घाण पाणी वाहुन जाणे करिता गटार बांधणे व खांडकी पेव्हींग करणे. | १,०७,७००/- |
| ३. | खडी रस्ता तयार करणे. | २४,९९०/- |
| | | २,४१,७९०/- |

असे एकुण तीनही कामाचे अंदाजपत्रके मिळुन २,४१,७९०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. २५-११-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब तीनही कामाचे र.रु. २,४१,७९०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी बाबतच्या प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर. सदरील खर्च अदयावत कत्तलखाने लेखाशिर्षा मधुन सन ९७-९८ या आर्थिक तरतुदीमधुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगांव कत्तलखाना येथे इमारतीमध्ये कॉक्रीट करणे, इमारतीमागील बाजूस गटार बांधुन खांडकी पेव्हींग करणे व खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या एकुण र.रु. २,४१,७९०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च अद्ययावत कत्तलखाने या लेखाशिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५७/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, फाजलपुरा लेबर कॉलनी, गणेश कॉलनी, रस्ता ते शहागंज भाजीमंडी पपं रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याच्या डि.एस.आर. दराने रु. ७,६१,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षाखाली सन ९७-९८ च्या सदराखाली करण्यांत येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फाजलपुरा लेबरकॉलनी, गणेश कॉलनी, रस्ता ते शहागंज भाजीमंडीपर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेसाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ७,६१,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५८/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दलालवाडी भागात १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. २,२६,५६५/- एवढयाचे तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती च्या तरतुदीमधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक र.रु. २,२६,५६५/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर. उपलब्ध गुत्तेदारांकडुन करुन घेणे.

**ठराव :**

प्रस्तावा दर्शविल्याप्रमाणे, दलालवाडी भागात १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,२६,५६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सदर काम उपलब्ध गुत्तेदाराकडून तातडीने करुन घेण्यात यावे.

**विषय क्र. ३५९/१८ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. बाबुराव सांळुके बेगमपुरा येथे १०X२० आकाराची जागा मिरची कांडपसाठी

प्रतिमहा भाडे रु. ३००/- प्रमाणे देण्यांत आली होती. त्यांनी मनपात रु. १८००/- जमा केलेले आहेत. तसेच मुद्रांक पेपर ही दिलेले आहेत. परंतु मिरची कांडप साठी बांधकाम सुरु असतांना दिनांक २३-६-९७ रोजी अर्ज देवून तेथील नागरिकांनी हरकत घेतली होती. त्यामुळे त्यांना ती जागा देता आली नाही.

दिनांक २६-१०-९७ ला मा. खासदार यांनी पत्र देवुन सुचित केले होते की, त्यांना पर्यायी जागा दयावी. त्या अनुषगांने हर्सुल परिसरातील जागा देणे बाबत प्रकरण सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडे वर्ग करण्यांत आले असता त्यांनी अभिप्राय दिला आहे की, हर्सुल परिसरातील न.भु.क्र. ४१ मधील रस्ता सोडुन अस्तीत्वात असलेली १०X२० या आकाराची जागा देता येऊ शकेल.

तरी त्यांना हर्सुल येथील जागा मिरची कांडपसाठी नगररचना विभाग ठरविल्या त्या दरानुसार भाडेपट्टयावर देणे बाबत प्रस्ताव स्थायीसमिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. बाबुराव सांळुके यांना मिरची कांडपसाठी हर्सुल परिसरातील न.भु. क्र. ४१ मधील रस्ता सोडून अस्तित्वात असलेली १०X२० आकाराची जागा नगररचना विभाग ठरविल त्यादरानुसार भाडेपट्टयावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६०/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. ३ मधील विविध रस्ते हे वार्षीक देखभाल संबंधीच्या कामासाठी दिनांक १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २१२/११ अन्वये र.रु. ४,९९,५००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण १९ (एकोणावीस) निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (३) तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या प्राप्त निविदा पत्रके दिनांक ७-११-९७ रोजी उघडण्यांत आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आकाश कंन्स्ट्रक्शन | ७.७८६% | कमी दराने |
| २. | मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | २.५% | जास्त दराने |
| ३. | मे. फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन | ०.१% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीचे दरापेक्षा ७.७८६% कमी दराने मे. आकाश कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा आहे.

तरी तुलनात्मक दृष्टया व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ७.७८६% कमी दराची मे. आकाश कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभाग क्र. ३ मधील विविध रस्ते दुरुस्तीवार्षीक देखभालीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराची मे. आकाश कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६१/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र. ४४ अंतर्गत खाडकी रिपेअरिंग व आर.एस.फ्लोरिंगचे काम करणेच्या कामासाठी स्थायी समिती सभा दि. १७-९-९७ च्या सभेमध्ये विषय क्र. २२७/२६ अन्वये र.रु. ४,८१,८१५/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र./मनपा/लेखा/नि/६५/९७ दि. ८-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण पंधरा (१५) निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या प्राप्त निविदा पत्रके दिनांक ७-११-९७ रोजी उघडण्यांत आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. श्री. शेख शरीफ | ०.१% | कमी दराने |
| २. | मे. बसरा कन्स्ट्रक्शन | २% | जास्त दराने |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | ३.५% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री. शेख शरीफ यांची निविदा आहे.

तरी सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१% कमी दराने श्री. शेख शरीफ यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ४४ अंतर्गत खाडकी रिपेअरिंग व आर.एस.फ्लोरिंगचे काम करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री. शेख शरीफ यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६२/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील जुनी इमारत (बॅक व पोस्ट ऑफिस) पाडुन नवीन आर.सी.सी. दुकान व कार्यालय बांधणे या कामासाठी र.रु. १३,६८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले त्यास मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. ५/२ दि. ३१-५-९७ (इतिवृत्त) अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/६१/९७ दि. २३-९-९७ अन्वये बी-१ नमुन्यात अंतिम तारखे पर्यंत एकुण (१०) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम

तारखेपर्यंत एकुण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. २०-१०-९७ रोजी उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सोहेल सिद्यीकी | ३.३६% | कमी दराने |
| २. | श्री. नंदकुमार घोडेले | १.००% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३६% कमी दराची निविदा श्री. सोहेल सिद्यीकी यांची आहेत त्यास मा. आयुक्तांनी दि. २०-११-९७ अन्वये मान्यता दिली आहे.

सबब सदरील काम श्री. सोहेल सिद्यीकी यांचे कडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३६% कमी दराने करुन घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील जुनी इमारत (बॅक व पोस्ट ऑफिस) पाडुन नवीन आर.सी.सी. दुकान व कार्यालय बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३.३६% कमी दराची श्री. सोहेल सिद्यीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६३/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. नेहरुनगर कटकटगेट येथील २० खाटी रुग्णालयाचे कामास पुर्वी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ११९/६ दि. २७-१२-९५ अन्वये २५.०० लक्ष इतकी तरतुद शासकीय अनुदानातुन उपलब्ध करुन देण्यात आली होती. खुल्या जागेंच्या आकारानुसार व उपलब्ध तरतुदीचा विचार करुन सिल्कमील कॉलनी येथील २० खाटी रुग्णालयाचे धर्तीवर अंदाजपत्रक तयार करुन ६७०.५५ चौ.मी. क्षेत्राकरिता अंदाजपत्रकास मान्यता घेण्यात आली होती. त्यानंतर कटकटगेट येथील नेहरुनगर येथील खुल्या जागेमध्ये २० खाटी रुग्णालय करावयाचे ठरले सदर जागेचे योग्य नियोजन व्हावे या दृष्टीकोनातून वास्तुशास्त्रज्ञाकडुन नकाशे तयार करुन घेण्यात आलेले आहेत.

प्राप्त नकाशांच्या नुसार प्रत्यक्ष स्थळावर काम करीत असतांना जमीन खोलगट स्वरुपाची असलेली तळघर, तळमजला व पहिला मजला बांधण्याचे ठरले त्यानुसार सदर कामासाठी लागणारे सर्व बाबींचे (अतिरिक्त बाबींसह) सुधारित एकत्रित अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या दराने रु. ३९,२७,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. त्यामधुन पुर्वीचे मंजुर (वाढीव रक्कमेसह) रक्कम रु. २९,३३,०००/- वजा जाता रु. ९,९४,०००/- चे समायोजन-

१) शासकीय अनुदान (१० कोटी पैकी) अंतर्गतचे काम हर्सुल येथे तलावामध्ये झुलता पुल उभारणे मधील उर्वरित र.रु. ६,०८,२३५/- तसेच.

२) विकास इमारती व शाळा दवाखाने या लेखा शिर्षामधुन रु. ३,८५,७६५/- या प्रमाणे करण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

करिता सदरील कामाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यतेसाठी तसेच या कामाचे गुत्तेदार मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन पुर्वीचे मंजुर दराने पुर्ण करुन घेण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नेहरुनगर कटकटगेट येथील २० खाटी रुग्णालयाचे बांधकामासाठी अतिरिक्त बाबींसाठी सुधारित अंदाजपत्रक रु. ३९,२७,०००/- ला मंजुरी देऊन यातील वाढीव काम रु. ९,९४,०००/- पुर्वीचेच गुत्तेदार मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन पुर्वीचे मंजुर दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६४/२३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कैसर कॉलनी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. ६,१२,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २१८/१७ अन्वये मंजुरी देण्यात आली. कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६५/९७ जी की दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यात येवुन "बी-१" निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दहा (१०) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण चार (४) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. स.अथर अली | २.५% | जास्त |
| २. | श्री. स. सुजात अली हाशमी | ५.२५% | --//-- |
| ३. | श्री. ए.एम. फारुकी | -- | अंदाजपत्रकीय दर |
| ४. | श्री. शेख शरीफ | ०.३५% | कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. शेख शरीफ यांचा आहे. म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३५% कमी असा दर आहे.

तरी श्री. शेख शरीफ यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३५% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैसर कॉलनी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३५% कमी दराची श्री. शेख शरीफ यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांतय येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६५/२४ :**

मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांनी गणवेश व गणवेश साहित्य खरेदीचा प्रस्ताव मा. आयुक्तांचे मान्यतेनुसार अग्निशमन दलासाठी असलेल्या गणवेश व गणवेश साहित्य खरेदीची आर्थिक तरतुद ९ लाख मधुन जाहिर निविदेनुसार तीन निविदा स्विकारण्यात आल्या. त्यामधील वाटाघाटी नुसार दर कमी करुन दोन निविदा सर्वात कमी असलेले दर मंजुर करण्यांत आले. त्यामधील मे. विजय जनरल स्टोअर्स यांचे दरास व श्री.

सर्वासेस यांचे दरास मान्यता देण्यांत आली आहे. विजय जनरल स्टोअर्स यांचेकडून रु. ३,२१,६७९/- व श्री. सर्वासेस यांचेकडुन रु. ५९,९८७/- चे गणवेश व गणवेश साहित्य असे एकुण रु. ३,८१,६६६/- च्या प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व वैधानिक कार्यवाहीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांसाठी (अग्निशमन दलासाठी) गणवेश व गणवेश साहित्य खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सर्वात कमी दराने निविदाधारक मे. विजय जनरल स्टोअर्स यांचेकडुन रु. ३,२१,६७९/- व श्री. सर्वासेस यांचेकडुन रु. ५९,९८७/- चे गणवेश व गणवेश साहित्य असे एकुण रु. ३,८१,६६६/- चे साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६६/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मोगलपुरा येथे बालवाडीसाठी खोली बांधावयाची आहे. त्यासाठी सा.बां. विभागाचे सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. २,६५,३१५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. २५-१०-९७ रोजी मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च विकास सुधारित शाळा व दवाखाने ९७-९८ या लेखा शिर्षाखाली सुधारित अंदाजपत्रकातील वाढीव तरतुदीतुन करण्यांत येणार आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोगलपुरा येथे बालवाडीसाठी खोली बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु २,६५,३१५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च विकास सुधारित शाळा व दवाखाने या लेखा शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६७/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महात्मा फुले चौक ते तापडीया टेरेसेस या रस्त्यावरील रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेच्या कामासाठी दि. ४-१०-९७ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. ९३/५ अन्वये अंदाजपत्रक र.रु. २०,८०,०००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/७३/९७ दि. २३-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (१९) एकोनावीस निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या प्राप्त निविदा दि. २-१२-९७ रोजी उघडण्यांत आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सलीम पटेल | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. शेख शरीफ | ०३.८३% | जास्त दराने |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | ०४.४४% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा अंदाजपत्रकीय दराने श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे.

परंतु दर जास्त झाल्याने संबंधित ठेकेदारास मा. आयुक्त यांचे दालनात बोलावुन दराबाबत वाटाघाटी करुन वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराच्या ५% कमी दराने काम करण्यास ठेकेदाराने संमती दिल्यानुसार सदरच्या निविदेस दि. ९-१२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने च्या ऐवजी वाटाघाटी अंती ५% कमी दराने श्री. सलीम पटेल यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महात्मा फुले चौक ते तापडीया टेरेसेस या रस्त्यावरील रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रकधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम श्री. सलीम पटेल यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६८/२७ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा गणवेश विनियम क्र. २५ दि. १८-६-९३ नुसार खालील स्त्री कर्मचारी/कामगार यांना दरवर्षी मकर संक्रात निमित्त प्रत्येकी दोन साडया व ब्लाऊज पिसेस तथा स्त्री स्विपर यांना शर्ट सलवार व ओढणीचे कापड देणे आहे.

वरील साहित्य देणेसाठी वर्तमानपत्रातुन जाहिरात देण्यात आली, प्राप्त निविदा तीन (३) निविदा या विभागास प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा व साहित्याचे नमुने विविध संघटनाच्या पदाधिकाऱ्यांना व उपस्थित कामगार प्रतिनिधींना दाखविण्यांत आले. पसंत केलेल्या नमुन्यांवर संबंधीतांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या.

पसंत केलेल्या नमुन्याचे विवरण व येणारा खर्च खालील प्रमाणे-

१) साडी ८ मीटर -रंगीत : कंपनी बुट्टा रंग दोन प्रकारचा - निळा व जांभळा - डिझाईन पसंत केलेल्या नमुन्यानुसार दर ४३७/- रुपये प्रतिनग खरेदी - ७०० नग.

खर्च - ३,०५,९००/- रुपये.

२) साडी ५ मीटर - रंगीत - कंपनी बुट्टा रंग दोन प्रकारच्या - निळा व जांभळा - डिझाईन पसंत केलेल्या नमुन्यानुसार.

दर - २७०/- नग.

३) साडी ८ मीटर - पांढरी - कंपनी बुट्टा डिझाईन - पसंत केलेल्या साडी नुसार. दर - ४३७/- रुपय्र प्रतिनग.

खर्च - १९,४४००/-

४) साडी ५ मीटर - पांढरा रंग - कंपनी बुट्टा डिझाईन - पसंत केलेल्या साडी नुसार. दर - २७०/- रु. प्रतिनग.

खर्च - ११४ नग.

५) साडी ५ मीटर - पांढरी प्लेन (नर्सेस व परिचारीका यांचेसाठी) कंपनी बुट्टा साडी पसंत केलेल्या नमुन्या प्रमाणे.

खरेदी - ६४ नग.

दर - २७०/- प्रतिनग.

खर्च - १७,२८०/- रुपये.

६) शर्ट - सलवार कापड - प्रत्येकी ७ मीटर. कंपनी - मार्व्हल - रंग निळा व राणी कलर. डिझाईन - पसंत केलेल्या नमुन्या प्रमाणे.

दर - ३९०/- प्रतिनग.

खरेदी - १४० नग

खर्च - ५४,६००/- रुपये.

७) ओढणी कापड - कंपनी - पुनम - प्रत्येकी २.५ मीटरप्रमाणे खरेदी - १४० नग दर - ७२/- प्रतिनग.

खर्च - १०,०८०/- रुपये.

८) ब्लाऊज पिस - रंगीत - रंग दोन प्रकारचे - निळा व जांभळा एकुण ७७२ नग. दर - ४०/- रु. प्रतिनग प्रत्येकी १ मीटर कापड देणे.

खर्च - ३०,८८०/- रुपये.

९) ब्लाऊज पिस - पांढरे एकुण - २३२ नग.

दर - ४०/- रु. प्रतिनग.

खर्च - ९,२८०/- रु.

वरील साहित्याचे खरेदीसाठी एकुण रक्कम रु. ५,०१,८३८/- इतका खर्च येणार असुन सदर साहित्य हे मे. शा. मथुरादास छाविलदास, औरंगाबाद यांचे कडुन खरेदी करण्यांत येणार आहे.

करिता प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा गणवेश विनियम क्र. २५ नुसार स्त्री कर्मचारी/कामगार यांना प्रत्येकी दोन साडया व ब्लाऊज पिसेस तथा स्त्री स्विपर यांना शर्ट सलवार व ओढणीचे कापड देण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी पसंत केलेल्या नमुन्याप्रमाणे प्रस्तावितील अ.क्र. १ ते ९ (एक ते नऊ) च्या ॲटमसमोर दर्शविलेल्या दराने मे. शा. मथुरादास छविलदा, औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करण्यास व यासाठी येणाऱ्या रक्कम रुपये ५,०१,८३८/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. मकर संक्रातीपुर्वी सदर साडया व कपडा पुरवठा करावयाचा असल्याने या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६९/२८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा जकात नाक्याच्या चौकी करिता एफ.आर.बी. कॅबीन तयार करावयाचे आहेत. त्यासाठी रक्कम रु. ३,९३,५००/- चे

अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा. आयुक्तांनी दि. ५-४-९७ रोजी मंजुरी दिलेली आहे. मा. स्थायी समितीने देखील ठराव क्र. ३७/३६ दि. २९-४-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकही- निविदा विक्री झाली नाही. त्यामुळे शहरातील एफ.आर.बी. कॅबीन तयार करण्याऱ्या विविध सहा कंपन्याना पत्र देऊन त्यांच्यातर्फे मागविली असता सहा पैकी ३ कंपन्याकडुन दरपत्रके प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ. क्र. | कंपनीचे नांव | आकार | दर |
|---|---|---|---|
| १. | मिटको फायबर | अ) १२'X१५'X१०<br>ब) ४'X५'X८' | १,३५,०००/-<br>१९,८५०/- |
| २. | मारोती फायबर | अ) १२'X१५'X१०'<br>ब) ४'X५'X८' | १,७५,०००/-<br>७५,०००/- |
| ३. | फायब्रो स्लड | अ) १२'X१५'X१०'<br>ब) ४'X५'X८' | ३,७४,०००/- |

दरम्यानच्या काळात सुवर्णा फायब्रोटेक यांचे देखील दरपत्रक प्राप्त झाले त्यांचे दर पुढील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | आकार | १२'X१४'X८' | १,२९,०००/-<br>१,५३,५०१/- | ८% एक्साईज डयुटी १३% सेल टॅक्स् |
| ब) | आकार | ४'X५'X८' | १४,५००/-<br>१७,१९४/- | ८% एक्साईज डयुटी १३% सेल टॅक्स् |

असे दर प्राप्त झाले.

मा. आयुक्त यांचे दि. ८-१०-९७ च्या आदेशानुसार संबंधीत चारही कंपन्याना दराबाबतच्या वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले. वाटाघाटी अंती सर्वात कमी मिटको फायबर यांचे १२'X१५'X१०' = १०९०००/- रुपये व ४'X५'X८'= १३,५००/- रु. असे दर ठरविण्यात आले. (मा. आयुक्त यांचे दालनांत) त्यास मा. आयुक्तांनी दि. २६-११९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार मिटको फायबर इंडस्ट्रीज यांचे कडुन सदरील काम १२'X१५'X१०'साठी १,०९,०००/-व ४'X५'X८' साठी १३,५००/- या दराने करुन प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा जकात नाक्याच्या चौकी करिता एफ.आर.बी. कॅबीन तयार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी वाटाघाटीत ठरल्यानुसार मिटको फायबर इंडस्ट्रीज यांचेकडुन सदरील काम १२'X१५'X१०' साठी रु. १,०९,०००/- व ४'X५'X८' साठी रु. १३,५००/- या दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १७-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. बुधवार दिनांक १७-१२-९७ रोजी मा. सभापती श्री. प्रभाकर सिताराम विधाते यांच्या अध्यक्षते खाली स्थायी समिती सभा दुपारी ४.०० वाजता "मलीक अंबर" सभागृहात संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात वंदेमातरम् या राष्ट्रगिताने झाली. सभेस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. गिरजाराम नानासाहेब हाळनोर | स.सदस्य |
| २) | स.स. श्री. त्रिंबक तुपे | --//-- |
| ३) | स.स. श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ४) | स.स. श्री. कचरु चंद्रभान नवपुते | --//-- |
| ५) | स.स. श्री. अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ६) | स.स. श्री. विकास जैन | --//-- |
| ७) | स.स. श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ८) | स.स. श्री. अब्दुल रशिदखॉन (मामु) | --//-- |
| ९) | स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| १०) | स.स. श्री. संजय जोशी | --//-- |
| ११) | स.स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| १२) | स.स. श्री. बन्सी गांगवे | --//-- |
| १३) | स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |

**संवाद**

**श्री. त्रिंबक तुपे :** महानगरपालिकेच्या शाळा सुरु होऊन ८ महिनेचा कालवधी संपलेला असुन अदयाप हा शाळेत खेळाचे साहित्य वाटप झालेले नाही. याचे कारण काय? याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** याबाबत शिक्षण अधिकारी यांनी माहिती दयावी.

**मा. शिक्षणाधिकारी :** खेळाच्या साहित्या बाबत आपण मागणी केली होती. परंतु त्यात सामान बरेचशे सामान व चांगल्या (क्वॉलिटी) प्रकारचे नसल्यामुळे ते साहित्य परत पाठवावे लागले व आता नविन साहित्य मागविण्यात येणार असुन त्यांस थोडा उशिर लागला आहे.

**मा. सभापती :** हया साहित्याबाबत आपण पाहणी करुनही चार (४) महिने झालेले आहेत तरी कार्यवाही केलेली नाही. हे योग्य नाही. या संदर्भात मा. खासदार, मी. स्वतः व स.स.श्री. संजय जोशी इ.नी. मिळुन क्रिडा साहित्याचे नमुने पाहणी करुनही प्रशासनाने निर्णय न घेण्याचे कारण काय?

**श्री. त्रिंबक तुपे, श्री. गौतम लांडगे :** जुन ९७ महिन्यात क्रिडा साहित्य करणेची संचिका सुरु झालेली होती. त्यास ६ महिने गेलेले असुनही क्रिडा साहित्य खरेदीच्या प्रशासनाने का मांडलेला नाही. पुर्ण वर्ष संपल्यानंतर मागविण्यात अर्थ काय? ज्यामुळे कित्येक शाळेत साहित्याचा पुरवठा नसल्याने काही करता येत नाही.

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिके मार्फत विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य दिल्या जाते. साहित्या बाबत मागणी करुनही वेळेवर दिल्या जात नाही माहे जून पासून साहित्य वाटप बाबत गरज असतांना तातडीने साहित्य मागविण्याची शिफारस करुन मागविलेले नाही. त्यास ६ महिने पुर्ण लोटलेले आहे आता मुलांच्या परिक्षा जवळ येऊन ठेपल्या आहेत. तरीही क्रिडा साहित्य मागविण्यात आलेले नाही. संबंधीत अधिकारी यांनी याबाबत काहीही कार्यवाही केलेली नाही व बेजबाबदारपणे ते काम करतात. त्याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** क्रिडा अधिकारी या सभागृहात नाहीत त्या आल्यानंतर योग्य खुलासा करतील तरी दुसऱ्या विषयांवर चर्चा करावी.

**श्री. कचरु नवपुते, श्री. अभिमन्यु भालेराव :** चिकलठाणा येथील महानगरपालिकेच्या उर्दु शाळेमध्ये विदयार्थी संख्या माहितीप्रमाणे इयत्ता १ ली ४१ दुसरा वर्ग-२४ तिसरा वर्ग- १८ व चौथा वर्गात २२ एवढी संख्या असे एकुण १०५ असुन ही त्या ठिकाणी दोनच उर्दु शिक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी एक शिक्षिका जास्त कालवधीच्या सुट्टीवर गेलेल्या आहेत तर दुसरी शिक्षिका गैरहजर आहेत. शाळेवर शिक्षक नसल्यामुळे तेथील पालक लोक आमच्याकडे येतात. शाळेच्या नियोजना बाबत तक्रारी करतात. उदा. शिक्षक वेळेवर शाळेत येत नाही. कधी-कधी शिक्षक शाळेवर नसतात. मुले ओटयावर जाऊन बसतात. तरी ही शिक्षकाचा पत्ता रहात नाही. ही परिस्थिती त्या ठिकाणी झालेली आहे. एक शिक्षक रजेवर गेलेला असेल तर दुसरा शिक्षक शाळा बंद करुन वेळेच्या आत घरी जातात हे कुठल्या नियमाने काल तेथील शिक्षिका अभावी शाळा बंद होती. शिक्षणाधिकारी यांच्याकडे ज्या शिक्षकांची जास्त दिवसांची रजा मंजुरी साठी आल्यास त्या ठिकाणी तात्पुरत्या कालावधीसाठी पर्यायी शिक्षक नेमावा व यापुढे असे होता कामा नये. असे झाल्यास संबंधीत अधिकारी हे बेजबाबदारपणे, मनमाणी पणाने वागतात. शिक्षक कर्मचारी वर्ग यांच्यावर त्यांचा अंकुष नाही. असे वाटते. नविन शिक्षक मिळण्याबाबत त्यांच्याकडे तक्रारही केली पण त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही. याबाबत विदयार्थ्यांचे नुकसान होत असुन तेथील शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहे. याची प्रशासनाने दखल घेऊन कार्यवाही करावी व धोरणात्मक निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा. शिक्षणाधिकारी :** सदरील शाळेवर नविन शिक्षक देण्यासाठी कार्यवाही सुरु आहे. त्या ठिकाणी एक शिक्षिका हया बांळतपणासाठी दिर्घकालीन रजेवर गेलेल्या आहेत. व एकच शिक्षक त्या ठिकाणी आहे. आणखी एक शिक्षक आपण लवकरात लवकर देण्याची कार्यवाही करु.

**श्री. कचरु नवपुते, श्री. अभिमन्यु भालेराव :** दिर्घकालीन एक शिक्षिका रजेवर गेल्यावर एकच शिक्षक शाळेवर असतो. तेव्हा एका शिक्षकाने एवढे चार वर्ग सांभाळावे का? असा आपला हेतु आहे काय? त्या ठिकाणी पर्यायी दुसरा शिक्षक आपण देत नाही याची माहिती आपणांस नसते काय? यावर कार्यवाही झाली पाहिजे. या भागातील शाळेतील ३-३ क्रिडा महानगरपालिकेच्या विविध क्रिडा स्पर्धेच्या कामाकरिता काढुन घेतलेले आहे. त्यामुळे शिक्षाणावर परिणाम होतो व विदयार्थ्यांची संख्या रोडावते हे लक्षात घ्यावे नसता गेल्या ६

महिन्यापासुन वार्डातील तक्रारी शिक्षण विभागा संदर्भाने दुर होत नसल्यास मी राजीनामा देईन.

**शिक्षणाधिकारी :** दोन दिवसांत प्रतिनियुक्तीवर शिक्षक या शाळेवर देण्यात येईल.

**मा. सभापती :** ठिक आहे. चिकलठाणा येथील शाळेत पर्यायी व्यवस्था म्हणुन प्रतिनियुक्तीवर एका शिक्षकांची दोन दिवसांत नेमणुक करावी.

**श्री. संजय जोशी :** शिक्षकांची संख्या महानगरपालिकेत कमी आहे मग दोन दिवसांत उर्दु शाळेवर नेमणुक कोठून करणार?

**शिक्षणाधिकारी :** ज्या शाळेत अतिरिक्त उर्दु शिक्षक आहेत त्यांची नेमणुक त्या शाळेवर करण्यात येईल.

**श्री. त्रिंबक तुपे :** माझ्या वार्डातील जी रोहिदासपुरा येथे जी जुनी शाळेची इमारत होती ती सोडुन त्या ठिकाणी नविन शाळेच्या इमारतीचे काम चालू आहे. आतापर्यंत ते काम पुर्ण झालेले नाही एवढया छोटयाशा कामासाठी दिड वर्षापासुन हे काम चालु आहे. महानगरपालिकेत संध्या एका खाजगी घरमालकाला भाडे देते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. संबंधीत अधिकारी यांनी या कामास वेळ का लावला याची माहिती दयावी.

**शहर अभियंता :** तेथील नविन शाळेचे जे बांधकाम चालू आहे तेथे मुलांना बसण्याच्या सोयीने तो हॉल लहान होत होता. त्यामुळे तेथील एका खाजगी माणसाकडुन जिण्यासाठी थोडी जास्तीची जागा वाटाघाटीव्दारे शाळेच्या हॉल लगत घेऊन हे बांधकाम करण्यात येणार आहे. ती जागा आहे तेथील जादा कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यामुळे बांधकामास उशिर लागलेला आहे. एक ते दोन महिन्यात सदरील काम पुर्ण होईल.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांना मी सुचना करतो की, सदरील शाळेच्या कामास खुप वेळ लागलेला आहे. त्यामुळे एक (१) महिन्याच्या आत स.स.श्री. तुपे यांच्या वार्डातील शाळेचे काम पुर्ण करावे.

**शहर अभियंता :** ठिक आहे एक महिन्यापर्यंत काम पुर्ण करण्यात येईल.

**श्री. त्रिंबक तुपे :** महापौर चषक क्रिकेट स्पर्धा व इतर काही यावर्षीच्या स्पर्धा घेण्यात आल्या त्या संबंधात महानगरपालिकाने किती रक्कमेचे अंदाजपत्रक ठेवलेले होते. याची माहिती दयावी.

**मा. सभापती :** क्रिडा अधिकारी यांनी माहिती दयावी.

**क्रिडा अधिकारी :** एकुण क्रिकेटसाठी १.५० लाख रु.चे बजेट ठेवलेले होते.

**श्री. त्रिंबक तुपे :** महापौर चषक क्रिकेट स्पर्धेसाठी १.५० लाखाचे बजेट ठेवले असतांना आपल्या महानगरपालिकेचे जे खेळाडु आहेत त्यांना अे संघातील खेळाडुंना बुट देण्यात आलेले नाही एक-एक लाखाचे बक्षिसे देतात आणि खेळाडुंना योग्य त्या सुविधा देत नाही याचे कारण काय? हे योग्य नसुन या स्पर्धात सर्वोतोपरी भष्ट्राचार झालेला आहे असे माझे मत आहे.

**श्री. संजय जोशी, श्री. भगवान घडामाडे :** महापौर चषक क्रिकेट स्पर्धेसाठी लाखो रु. खर्च होतो. परंतु त्या पैसाचा योग्य तो उपयोग होत नाही. त्या पैसाची उधळपट्टी होते. माझ्या मते या संपुर्ण स्पर्धेत भ्रष्टाचार झालेला आहे हे मी पुराव्यानीशी आपल्याला दाखवु शकतो.

**श्री. अब्दुल रशिद खॉन (मामु) :** औरंगाबाद महानगरपालिकेची अगोदर अे टीम उत्तरलेली होती नंतर बी टिम उत्तरली त्यामुळे या टिमतील ४ खेळाडुंना वेळेवर बुट मिळालेले नाही.

**श्री. संजय जोशी, श्री. भगवान घडामोडे :** महापौर चषक क्रिकेट स्पर्धेकरिता खेळाडुंना बुट न देण्याचे कारण काय? सदरील खेळांसाठी जे साहित्य आणले जाते याची खरी शहानिशा होत नाही वाटेल त्या किंमतीत हे साहित्य आणुन संबंधीत अधिकारी हे काही जुनेच साहित्य वापरुन दुकानदाराकडुन खोटया पावत्या सुध्दा बनवुन आणलेल्या आहेत हे मी निदर्शनास आणुन देऊ इच्छितो. संबंधीत आधिकारी यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे व या खेळा साठी किती खर्च झाला याची संपुर्ण माहिती सभागृहात संबंधीत अधिकारी यांनी दयावी.

**उपआयुक्त - २ :** क्रिडा समन्वयक व अति. शहर अभियंता यांची या सर्व खेळांसाठी नेमणुक करण्यात आलेली आहे. व या संदर्भाने क्रिडा अधिकारी यांनी मला काहीही कल्पना दिलेली नाही.

**मुख्य लेखाधिकारी :** क्रिकेट स्पर्धेसाठी साहित्य खरेदीचा अंतर्भाव नव्हता. कारण माहे. फेब्रु. ९७ ला क्रिकेट चे सर्व साहित्य व खेळाडुंनाही सर्व सुविधा पुरविण्यात आलेल्या होत्या. क्रिकेट टिमचा कॅप्टन श्री. सलिम यांना बोलावून याबाबत चर्चा केलेली होती. त्यांनी सांगितल्यानुसार खेळाडुंनी जे जे साहित्य लागते. ते घेतलेले होते. व त्यांनीच सुचविल्याप्रमाणे काही साहित्य घेतलेले नाही. तरीही वेळेवर धावपळ होऊ नये यासाठी कॅप्टनला खेळाडुचे ड्रेस/बुट व इतर साहित्य व्यवस्थित आहेत किंवा नाही त्याबाबत पुर्व कल्पना देण्यात आलेल्या होत्या. परंतु ऐनवेळेवर औरंगाबाद मनपाचा दुसरा संच "ब" संघ तयार करण्यात आलेला होता. त्या संघातील काही ४ खेळाडुंना बुट मिळालेले नसल्याचे समजते त्यांनाही बुट खरेदीसाठी कॅप्टनला सांगितले असता त्या दिवशी संबंधीत दुकान बंद असल्याने खरेदी करता येऊ शकले नाही. "ब" संघातील सर्व खेळाडुंना ड्रेस देण्याची मंजुरी वेळेवर मी स्वत: पुढाकाराने दिलेली आहे.

**श्री. त्रिंबक तुपे :** जे साहित्य खरेदी केले त्यावेळेस मी त्याच ठिकाणी होतो. श्री. सलीम संघाचे कॅप्टन हे ही होते संबंधीत अधिकारी हे सभागृहाची दिशाभुल करत आहे. यामध्ये आपले जे संघातील खेळाडु आहेत त्यांना योग्य त्या सुविधा का पुरविण्यात आल्या नाहीत हा मुद्दा महत्वाचा आहे. संबंधीत अधिकारी हे सभागृहात अयोग्य उत्तरे देतात.

**श्री. संजय जोशी :** असे काही उदाहरणे आहेत की सांगता येत नाही. महानगरपालिकेच्या क्रिडा साहित्य खरेदीसाठी अर्धे साहित्य विकत आणले जाते तर अर्धे साहित्याचे खोटे बिले आणल्या जाते. हा फार मोठा भ्रष्टाचार क्रिडा विभागात आहे. याची गंभीर दखल घ्यावी.

**क्रिडा अधिकारी :** महापौर चषक स्पर्धेसाठी खेळाडुंना पुरेसे साहित्य मिळालेले नसल्यास मी सभागृहाची माफी मागते.

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिकेतर्फे प्रत्येक वेळेस खेळाचे आयोजन झाल्यावर नविन (सामान) साहित्य आणावे लागते. गेल्या फेब्रुवारी ९७ मध्ये घेतलेले खेळाडुंसाठी साहित्य गेले कोठे? याची चौकशी व्हावी. त्यानंतर एकदाच खेळाचे आयोजन करण्यात आलेले होते. प्रत्येक वेळेस खेळाचे सामान खरेदी करावेच लागते काय? यांची संबंधीत अधिकारी माहिती का देत नाही. नुकतेच पार पडलेल्या महापौर शरिर सौष्ठक स्पर्धेत ५०० खेळाडु भाग घेणार होते पण त्यात फक्त ५० खेळाडु भाग घेतात. त्यासाठी १ लाख

रुपये खर्च केला. हे कोणत्या नियमाने आपण अंदाधुंदी पणाने पैशाची उधळ पट्टी केली ही बाब प्रशासकीय दृष्टया योग्य नाही याची माहिती दयावी.

**मा. सभापती :** महापौर चषक सर्व स्पर्धाकरिता किती खर्च झाला याकरिता एक समिती नेमण्यात येईल व नंतरच निर्णय घेता येईल.

**श्री. संजय जोशी :** महापौर चषक क्रिकेट स्पर्धा खेळल्या जातात आणि वृत्तपत्रामध्ये ८ तारखेला बातमी छापुन आली की संबंधीत शरिर शौष्ठव यांच्या नावाने बातम्या छापुन येतात. आपले जनसंपर्क अधिकारी काय करतात अशा प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रातुन का छापुन येतात? यावर कार्यवाही झाली पाहिजे. व पुन्हा वृत्तपत्रातुन खुलासा येणे आवश्यक आहे.

**श्री. अ. रशिदखॉन (मामु) :** खेळाचे आयोजन महानगरपालिकेने संस्थेमार्फत केलेले आहे ज्याचे रजिस्ट्रेशन धर्मादाय आयुक्त यांचे आहे. त्याचे प्रमाणपत्र सुध्दा आहे. बऱ्याच वेळेस असे निदर्शनास आले आहे की, एका खेळासाठी दोन दोन संघटना व संस्थानी खेळाचे प्रायोजकत्व स्विकारण्याची हमी घेतली त्यामुळे दुरावा होत होता. आणि प्रशासनाला अडचणी येत होत्या.

**श्री. संजय जोशी, श्री. भगवान घडामोडे :** सभागृहाची दिशाभुल करु नये. धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात ५०/- रु. देऊन तेथील ज्यांनी ज्यांनी रजिस्ट्रेशन करुन परवानगी काढलेली आहे. अशा कोणत्याही संस्थाना आपण हे काम दिलेले आहेत काय?

**श्री. अ. रशिद खॉन (मामु) :** अशा संस्थाना हे काम दिलेले नव्हते. ज्या संस्था अनुभवी आहेत. नावाजलेल्या अशा संस्थेला या क्रिडा चषक खेळाचे ही जबाबदारी देऊन त्यांनी या कामाबाबत उपाययोजन केलेली होती. त्यांचेकडे ही जबाबदारी दिलेली असुन फक्त झालेला खर्च संबंधीत संस्थाना हिशेब दाखल झाल्यानंतर देणार आहे. सध्या महानगरपालिका औरंगाबादची क्रिकेट संघ व फुटबॉलचा संघ जिंकत असल्याने त्यांचे अभिनंदन सभागृहात व्हावे.

**श्री. संजय जोशी :** सदरील स्पर्धा हया मराठवाडा पातळीवर घेण्यात आल्या आणि स्पर्धा सुरु होण्याच्या अगोदर फक्त एक दिवस पुर्वी वृत्तपत्रामध्ये स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. अशा प्रकारची बातमी वृत्तपत्रामध्ये छापुन येते तर स्पर्धेमध्ये जे खेळाडु भाग घेण्यासाठी येणार आहेत ते कसे येतील याचा विचार आपल्या संबंधीत अधिकारी यांनी करावयास पाहिजे होता त्या स्पर्धेत किती स्पर्धा होते व त्याचा एकुण खर्च किती याबाबत मा. महापौर यांनी चौकशी करावी कारण मा. महापौरांच्या नावावर सर्व स्पर्धा राज्यपातळीवरील संपन्न होत आहेत. त्यानुसार स्पर्धेची उत्सुकता आणि जाहिराती याकडे प्रशासनाने डोळेझाक केले आहे असे वाटते. जे पंच म्हणुन निवड केली. त्यांनी कधी राष्ट्रीय पातळीवर खेळलेले आहे काय? पंच म्हणुन त्यांना नेमणेबाबत वरिष्ठ पातळीवरुन काय कार्यवाही केली. पंचाची परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे काय? कोणत्या अधारे आपण पंच म्हणुन निवड करतो. उद्याला जर कुणी आक्षेप घेतल्यास त्यास जबाबदार कोण राहणार?

**मा. सभापती :** ज्या स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये अधिकारी यांनी यापुढील होणाऱ्या स्पर्धा, व स्पर्धकांना चुकीची कामगिरी करु नये व प्रत्येक स्पर्धेत खेळाडुंना योग्य त्या सुविधा उपलब्ध करुन दयावयात यांची नोंद घ्यावी व यापुढे नॅशनल पातळीवर जे पंच करणाऱ्या खेळांडुना बोलावले जातील यांची नोंद घेऊन

मा. महापौर यांनी या झालेल्या स्पर्धाबाबत संपुर्ण चौकशी करावी अशी मी शिफारस करतो. यापुढे ज्या संस्थानी धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणी प्रमाणपत्र अधिकृतरित्या आहे त्यांचाच याबाबतीत विचार व्हावा.

**श्री. संजय जोशी :** शरीर शौष्ठेसाठी ज्या स्पर्धा झालेल्या त्यात ही अशाच प्रकारचे भ्रष्ट्राचार दिसुन आले कोणत्या खेळासाठी किती बखिसे ठेवली होती यांची माहिती दयावी. संपुर्ण महापौर चषक खेळामध्ये भ्रष्ट्राचार होत असुन मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली चौकशी व्हावी.

**मुख्य लेखाधिकारी :** शरीर शौष्टव स्पर्धेसाठी सुरवातीला ५०० खेळांडु येणार असे जाहिर परंतु प्रत्यक्षात बरेच प्रत्यक्षात बरेच खेळाडु स्पर्धेत आलेल्या नाही. यात बुध्दीवान कॅरम व क्रिकेट स्पर्धेकरिता प्रत्येकी रु. २५/- हजार अग्रीम म्हणुन संबंधीत संस्थाना दिलेले आहेत त्या संस्था ज्यावेळेस संपुर्ण खर्च मनपास सादर करतील त्यावेळेस त्या संस्थेना पैसे अदा करावे. लागतील. संबंधित खेळांसाठी जे अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे. त्याबाबत किती खेळाडू बाहेरुन आले. त्यांचा भत्तात भोजन व्यवस्थेचा खर्च या बाबतचा संघानिहाय खर्चाचा हिशेब पाहुन तपासुन करुन पुढील झालेला खर्च अदा करण्यात येईल. केवळ प्राथमिक स्वरुपात मनपाने अग्रीम दिलेले आहेत कोणत्याही संस्थानी महानगरपालिकेतर्फे पुर्ण पैसे अदा केलेले नाहीत.

**मा. सभापती :** महापौर स्पर्धा नावानिशी औरंगाबाद महानगरपालिकेने या विविध स्पर्धा राज्यापातळीवरील औरंगाबाद महानगरपालिकेने भरविलेली आहे. आणि या स्पर्धासाठी काही संबंधीत संस्थानी मा. महापौरांच्या नावांच्या उल्लेख वृत्तपत्रातुन केलेला नाही. ही बाब खेदजनक आहे. अशा संस्थांना खबरदारी घेण्याची क्रिउा विभागाचे समन्वयक यांनी नोंद घ्यावी.

**श्री. अ.रशिद खॉन (मामु) :** शहरातील जे शॉपिंग सेंटर आहेत आतापर्यंत मालमत्ता अधिकारी यांनी किती भाडे वसुली केलेली आहेत. बऱ्याचशा दुकानाधारकाकडे भाडे थकलेले आहेत. भाडे देत नसेल तर त्यांच्याकडून दुकानाचे हक्क काढुन घ्यावेत व थकलेली रक्कम वसुल करावी. बऱ्याच दुकान भाडे धारकांकडे ५०/- हजार, ७०/- हजार रु. अशा थकबाकी आहे. संबंधीत अधिकारी हे भाडे कधी वसुल करणार याची सभागृहात माहिती दयावी.

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी माहिती दयावी.

**मालमत्ता अधिकारी :** शहरातील ज्या शॉपिंग सेंटर (दुकाने) व इतर ठिकाणे महानगरपालिकेने भाडेतत्वावर जे भाडे धारकांना दिलेले आहेत ते येत्या मार्च अखेर संपुर्ण वसुल करण्यांत येईल.

**म.अ.रऊफ अ. :** ज्या दुकानधारकांकडे १०-१५ वर्षाचे भाडे थकलेले आहेत ते भाडे कधी वसुल करणार? ते का वसुल करण्यात येत नाही.

**म.माबुद :** संबंधीत अधिकारी यांनी या बाबत कार्यवाही केली पाहिजे.

**मालमत्ता अधिकारी :** ज्याच्या कडे १०-१०,१५-१५ वर्षाचे जरी भाडे असेल तरी मार्च-९७ अखेर वसुल करण्यांत येईल व याबाबतची संपुर्ण प्रक्रिया कार्यान्वीत आहे.

**श्री. गौतम लांडगे, संजय जोशी, श्री. भगवान घडामोडे :** बेगमपुरा येथे एक व्यक्तींनी रस्त्यावर टपरी नसतांना त्यांनी ती टपरीसाठी जागा एका कमिटी यांच्याकडुन १५ वर्षापासुन ती जागा घेतलेली आहे. त्याचेकडे पी.आर.कार्ड असुन त्याने महानगरपालिकाकडे टॅक्सपण आतापर्यंत भरलेला आहे. त्या

व्यक्तींचे नांव श्री. अब्दुल वाहेद असे असुन त्या ठिकाणी त्याचे पंक्चरचे दुकान होते. त्या ठिकाणी संबंधीत अधिकारी जाऊन ती टपऱ्या हटवलेली आहे संबंधीत अधिकारी यांनी मनपाच्या जागेवर टपरी असलेल्या काही टपऱ्या झालेल्या आहे त्या अतिक्रमणाच्या टपऱ्या असुन त्या हटविल्या नाहीत आणि ज्या व्यक्तींचे सर्व कागदपत्र व्यवस्थीत असतांना त्याने टॅक्स वगैरे मनपाकडे भरलेले असतांनाही त्याची टपरी काढलेली आहे. संबंधीत अधिकारी यांनी कोणाच्या दबावाखाली ती टपरी हटविलेली आहे? संबंधीत अधिकारी हे बेजबाबदार पणे कामे करतात. त्याच्यावर निलंबनाची कार्यवाही झाली पाहिजे. ज्या लोकांनी अनाधिकृत बांधकाम करुन रस्त्यावर टपरी बसविली त्याची टपरी हटविली नाही. व ज्याचे नियमाप्रमाणे सर्व कागदपत्रे आहेत. परवानगी आहे त्याची टपरी मात्र हटवितात याबाबत प्रशासनाने शहानीशा करावी.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी माहिती दयावी.

**प्रशासकीय अधिकारी :** ती जी टपरी होती ती रस्त्यावर होती त्या व्यक्तींला जी जागा दिलेली आहे ती त्या टपरीच्या मागे आहेत. ती टपरी रस्त्यावर आलेली होती. म्हणुन ती काढण्यात आलेली आहे.

**श्री. संजय जोशी, श्री. गौतम लांडगे :** संबंधीत अधिकारी हे सभागृहात दिशाभुल करीत आहेत. त्या टपरी समोर अतिक्रमणाचे बांधकाम झालेले आहेत. काही टपरी अतिक्रमणाच्या आहेत त्या का पाडण्यात आल्या नाही हया गरिब होतकरु व्यक्तींचीच टपरी का पाडण्यात आली?

**श्री. घडामोडे :** अतिक्रमणाच्या आहेत त्या का पाडण्यात आल्या नाही हया गरिब होतकरु व्यक्तींचीच टपरी का पाडण्यात आली?

**मा. सभापती :** संबंधीत अधिकाऱ्यांना अशा सुचना देण्यांत येतात की, तेथील टपरी पाडलेली असल्यास त्या व्यक्तींला परत त्या जागेवर टपरी बसवु दया त्याचे संपुर्ण कागद पुन्हा तपासणी करुन पहावे व व्यवस्थीत असतांना आपण असे करणे योग्य नसुन समोरील अतिक्रमणाचे बांधकाम झालेले आहे ते आपण का पाडले नाही पक्षपाती पणाची किंवा कोणाच्या दबावाखाली कोणते ही अतिक्रमण काढु नये. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. यापुढे असे आढळुन आल्यास आपणावर निलंबनाची किंवा दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**श्री. त्रिंबक तुपे :** शहरात साफ सफाईची मोहिम चालु होती. परंतु बऱ्याच ठिकाणी साफसफाई दिसुन येत नाही. साफ सफाईच्या दृष्टीने मागे कचरा कुंडया येणार होत्या परंतु अद्यापपर्यंत त्या आलेल्या नाहीत तर कचरा कुंडया मागविल्या नाहीत काय? खुलासा करावा. व ज्याच्या वार्डात अरुंद गेल्या आहेत. तेथे कचरा वाहुन नेणाऱ्या ज्या चार चाकी गाडयावर त्या या रस्त्यामध्ये जाऊ शकत नाही. त्यासाठी अशा अरुंद रस्त्यात हया कुंडया जागोजागी ठेवण्यात याव्यात.

**लेखाधिकारी :** कचरा कुंडया आलेल्या आहेत. त्याचे झोनवाईज लवकर मागणीनुसार वाटप करण्यांत येतील.

**मा. सभापती :** शहरातील साफ सफाई होण्याच्या दृष्टीने कुंडया मागविल्या होत्या त्या आलेल्या असुन लवकरच झोनवाईजकडे त्या वाटप करुन कार्यवाही करण्यांत येईल व शहरातील ज्या वार्डात अरुंद रस्ते (गल्ल्या) आहेत. त्या

ठिकाणी जागोजागी त्या कुंडया ठेवण्याच्या सुचना ही संबंधीत अधिकारी यांना देण्यांत याव्यात.

**सौ. यशोदा वाडेकर :** माझ्या वार्डात मकबुतू मिस्तरी यांनी रोडवर बांधकाम (अतिक्रमण) केलेले आहेत. मी बऱ्याच वेळा सभागृहात या बाबत तक्रार केली परंतु संबंधीत अधिकारी हे कार्यवाही करीत नाहीत.

**प्रशासकीय अधिकारी :** संबंधीताचे घर १०-१५ वर्षापासुनचे असुन त्यांच्यानावांवर रजिष्ट्री व पी.आर.कार्ड तयार आहे सर्व कागदपत्राची पुर्तता असतांना आपणांस ते घर पाडता येणार नाही. ते फक्त त्याने रोडवर बांधकाम केलेले आहेत त्या बाबत कार्यवाही करता येईल तारिही संबंधीतास नोटीस बजावण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :** संबंधीताने बांधकाम नियमानुसार केले असेल तर पाडता येणार नाही. तेथील पाहणी करुनच पुढील कार्यवाही करावी.

**श्री गौतम लांडगे :** माझ्या असे निदर्शनास आले आहे की, शासनाकडे ३०० सफाई मजुरांचे पदे भरणेबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव पाठविलेला आहे. तो प्रस्ताव मंजुर झाला म्हणुन या मनपाच्या आवारात काही पोटभरु मंडळी विशिष्ठ दै. वेतन वरील कर्मचाऱ्यांकडुन कायम स्वरुपी नोकरी होणेसाठी रु. १०-१५ हजारावर अग्रीम घेत असुन कर्मचाऱ्यांना फुस लावण्याचे प्रकारे दिसत आहेत. तेव्हा शासनाकडील २०० पदांची मंजुरी आली आहे काय? जर आलेली असल्यास प्रशासनाने कार्यवाही चालु केलेली आहे काय? याची सविस्तर माहिती द्यावी.

**उप-आयुक्त-२ :** शासनाकडुन २०० सफाई मजुरांच्या पदाची मंजुरी झालेली नाही. कोर्टाच्या निर्णयानुसार जी यादी आहे. ती यादी पाहुनच एकत्रित यादिची तपासणी करुन मांडणी करण्याबाबत विभागास फक्त सुचना देण्यांत आल्या आहेत.

**श्री. गौतम लांडगे, श्री. संजय जोशी :** मागे सभागृहात चर्चा झाली होती की, जे २१ अधिकाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत पैकी त्यातील १६ अधिकाऱ्यांना आदेश देण्यांत आलेल्या आहेत परंतु जे ५ अधिकाऱ्याच्या/कर्मचाऱ्याच्या वेतनवाढी बाबत प्रस्ताव/सभागृहात प्रशासनामार्फत ठेवणार होते, परंतु तो अद्याप पर्यंत ठेवलेला नाही त्यास एवढा उशीर का होतो? त्याचे कारण काय?

**उप आयुक्त-**२ **:** ठिक आहे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

**मा. सभापती :** पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**श्री. गौतम लांडगे :** माझ्या वार्डालगत सुलभ शौचालय बांधुन देण्याबाबतचा प्रस्ताव होता गरवारे कंपनीच्या लगत जर बांधकाम करता येत नसल्यास स्मशानभुमीची जी जागा आहे. त्याच्याजवळ, याबाबतची कार्यवाही व्हावी कारण या ठिकाणी रहदारीची जास्तीची दैनंदिन होत असुन भर रस्त्यालगत योग्य वाटत नसल्यास इतर ठिकाणी स्मशानभुमीच्या जवळ कार्यवाही करावी.

**शहर अभियंता :** योग्य ती पाहणी करुन कार्यवाही करावी लागेल.

**मा. सभापती :** त्या जागेवर कोणाचे ऑब्जेक्शन नसेल तर त्या ठिकाणी काम सुरु करु दयावे.

**विषय क्र. ३७०/१ :**

दिनांक ५-१२-९७ रोजीच्या तहकुब सभेचे आणि ९-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**श्री. रशिदखॉन (मामु) :** पृष्ट क्र.९ वर एमआयडीसी येथील अतिक्रमण एका व्यक्तींने केल्या प्रकरणी इमारत निरिक्षक श्री. भरत जैस्वाल यांस दोषी ठरवून निलंबीत करण्याचे मागील बैठकीत घोषित केले होते. त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** सदरील एमआयडीसी विभागातील एका जागेवर जे बांधकाम झाले ते अजिंठा हाऊसिंग सोसायटी असे नसुन एलोरा हाऊसिंग सोसायटीतील ही व्यक्तीं एका सभासद आहे व सदरील संस्थेशी पत्रव्यवहार केला असता सदरील जागा एमआयडीसी च्या अंतर्गत येते.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** प्रशासकीय आधिकारी यांच्याकडे त्याबाबतचे काही रेकार्ड नाही काय ही जागा सोसायटीच्या मालकीची आहेत काय? तेथील रोड किती फुट रुंद असावा याची सविस्तर माहिती द्यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**नगररचनाकार :** सदरील बाब एम.आय.डी.सी. च्या अंतर्गत येते.

**श्री. संजय जोशी श्री. भगवान घडामोडे श्री. अभिमन्यु भालेराव :** ती जागा एमआयडीसी च्या मालकीची असतांना आपण संबंधितांना नोटीस का देण्यांत आली जेथे अतिक्रमण होते तेथे संबंधित आधिकारी कार्यवाही करीत नाही. मनपाच्या ज्या जागेवर कसलाही संबंध नाही. नसतांना तेथे व्यक्तींना नोटीसा बजावतात कायदयानुसार त्या व्यक्तींने मनपा त्या नोटीसच्या आधारे कार्यवाही केली तर हा पैसा कोर्टात कोणी खर्च करावयाचा याची समज संबंधित अधिकाऱ्यांना नसावी कां? बेजबाबदारीने संबंधित अधिकारी का वागतात? वेळीच शहानिशा का करीत नाही.

**मा. सभापती :** सदरील जागा ही एम.आय.डी.सी. च्या मालकीची असतांना संबंधितावर आपण नोटीस का बजावण्यात आली? सभागृहात चुकीची माहिती संबंधित आधिकारी यांनी दिलेली आहेत व श्री. जैस्वाल यांच्यावर जी निलंबनाची कार्यवाही करण्यात आली ती कार्यवाहीचा आदेश मागे घेण्यात येते. यापुढे संबंधित आधिकारी यांनी योग्य ती शहानिशा करुनच मनपा सभागृहाची नालस्ती होणार नाही यांची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मागील इतिवृत्त दि. २४-११-९७ चा ठराव क्र. ३३३/१५ अन्वये मंजुर झालेला आहे. त्यास सन १९९७ पासुन वेतनश्रेणी लागु करावी अशी दुरुस्ती व्हावी.

**श्री. गौतम लांडगे :** माझ्या वॉर्डातील अनेक भागात अतिक्रमणे झालेली आहेत. अनेक अनाधिकृत बांधकामे होत आहेत. याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली, ज्याप्रमाणे मो. नारळीबाग व मसनतपुर येथे वस्त्या अनाधिकृत आहेत आणि पर्यायाने आता सर्व सुविधा मागण्या होत आहेत त्या प्रमाणे इतर भागांतही मनपास करावा लागेल याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**श्री. कचरु नवपुते :** दि. २८-१०-९७ रोजी झालेल्या स्थायी समितीचे ठराव क्र. २२४/२३ पृष्ट क्र. ११ मध्ये असे नमुद केले आहे की, मुळ प्रस्तावातील ठरावात पुर्णतः बदल करुन रक्कमेतही वाढ केलेली होती. त्यात दुरुस्ती करुन मुळ प्रस्तावाप्रमाणे ठराव मंजुर करण्यात येतो. असे लिहिलेले आहे. परंतु मा. सभापती व मी स्वतः याबाबत सदरच्या प्रस्तावातील जागेची आवश्यकता असल्याने गट नंबर ४१० मधील पुर्वीची जागा ६ एकर पैकी ३ एकर जागा ज्या दराने मनपाने खरेदी केलेली आहे. त्याच दराने सुध्दा पुन्हा उर्वरित ३ एकर जागा जुन्या दरानेच खरेदी करावा असे असावे. याबाबतीत इतिवृत्तात

अशा प्रकारची नोंद योग्य रित्या घेण्यात आलेली नाही. त्यामुळे मो. चिकलठाणा येथील आठवडी बाजारासाठी सन १९९५ मध्ये जी जागा मनपाने ज्या दराने खरेदी केलेली आहे. त्याच दराने उर्वरित प्रस्तावातील ३ एकर जागा मनपाने खरेदी करुन रजिस्ट्री सहीत खर्चास मंजुरी द्यावी. अशी फेर दुरुस्ती करुन प्रस्तावात नमुद करावा व ठरावात तशी नोंद घ्यावी.

**मा. सभापती :** ठिक आहे स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे दि. २८-१०-९७ च्या ठराव क्र. २२४/२३ मध्ये वरील प्रमाणे दुरुस्तीची नोंद घ्यावी. व संबंधित विभागाने दुरुस्ती प्रस्ताव सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. २८-१०-९७ रोजी ठराव क्र. २२४/२३ पृष्ट क्र. ११ मध्ये नमुद केले होते की, मुळ प्रस्तावात पुर्णतः बदल करुन रक्कमेतही वाढ केलेली होती, यामध्ये गट नं. ४१० मधील ३ एकर जागा मनपाने सन १९९५ मध्ये ज्या दराने घेतलेली होती. त्याच दराने म्हणजे जुन्या दरान्वये सदरील जागा घेणे बाबत संबंधित विभागाने दुरुस्ती प्रस्ताव सादर करावा. या व इतर दुरुस्त्यासह दि. १७-१२-९७ च्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७१/२ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, (उत्कर्ष गणेश मंडळ) श्रेयनगर येथील मनपाच्या खुल्या जागावर तार कुंपण करावायचे आहे. त्यासाठी मुळ अंदाजपत्रक रक्कम रु. ३१,१५७/- एवढयाचे तयार करण्यांत आले होते. सदरील अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले होते. परंतु माजी महापौर श्री. गजानन बारवाल व स्थानिक नागरिकांना सदर ठिकाणी तार कुपंण न करता दगडी संरक्षित भिंत व त्यावर लोखंडी जाळी बांधण्याची मागणी केली आहे. सदरची मागणी लक्षात घेता सुधारित कामासाठी रक्कम रु. १,३२,९९२/- एवढयाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले आहे. मुळ अंदाजपत्रकातील निविदेचा दर हा श्री. यादव भिमराव अदमाने यांचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी दराची दर आहे. व त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

सबब सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. १,३२,९९२/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम मुळ निविदेतील मान्यता प्राप्त एजन्सी श्री. यादव भिमराव अदमाने यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी या दराने करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रेयनगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर तार कुंपण करण्याचे कामासाठी कामामध्ये वाढ झाल्याने सुधारित अंदाजपत्रक र.रु. १,३२,९९२/- ला तसेच सदरील काम मुळ निविदाधारक श्री. यादव भिमराव अदमाने यांचेकडुन मंजुर दराने म्हणजेच अं.प. दरापेक्षा २१% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ३७२/३ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला आरेफ कॉलनी मनपा शाळेजवळ येथे उद्यान विकसीत करण्या बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. १०.०० लाखांचे तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकात खालील नमुद केलेल्या कामाचे प्रयोजन आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | उद्यान विकास करणे. | रु. ८.० लाख |
| २. | विद्युतीकरण करणे. | रु. १.० लाख |
| ३. | खेळणी बसविणे व बगीचा तयार करणे. | रु. १.० लाख |

वरील प्रमाणे अपेक्षीत खर्च रु. १०.०० लाख हा विशेष शासकीय अनुदान सन ९७-९८ च्या तरतुदी अंतर्गत करणे प्रस्तावित आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. आरेफ कॉलनी मनपा शाळेजवळ उद्यान विकसित करण्याकरिता (उद्यान विकास रु. ८.०० लाख, विद्युतीकरण रु. १.०० लाख, खेळणी बसविणे व बगीचा तयार करणे रु. १.०० लाख) तयार करण्यात आलेल्या र.रु. १०.०० लाखाच्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च विशेष शासकीय अनुदान ९७-९८ च्या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७३/४ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला व्यंकटेश नगर व सेव्हन हिल कॉलनी येथे उद्यान विकसित करण्याच्या बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. १०.०० लाखाचे तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकात खाली नमुद केलेल्या कामाचे प्रयोजन आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | उद्यान विकास करणे. | रु. ८.०० लाख |
| २. | विद्युतीकरण करणे. | रु. १.०० लाख |
| ३. | खेळणी बसविणे बगीचा तयार करणे. | रु. १.०० लाख |

वरील प्रमाणे अपेक्षित खर्च रु. १०.०० लाख हा विशेष शासकीय अनुदान सन ९७-९८ च्या तरतुदी अंतर्गत करणे प्रस्तावित आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. व्यंकटेशनगर व सेव्हनहिल कॉलनी येथे उद्यान विकसित करण्यासाठी तयार कलेल्या (उद्यान विकास रु. ८.०० लाख, विद्युतीकरण रु. १.०० लाखाच्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम विशेष शासकीय अनुदान सन ९७-९८ मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७४/५ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला संत एकनाथ सोसायटी येथे उद्यान विकसित करण्याच्या बाबतचे अंदाजपत्रके रक्कम रु. ५.०० लाखाचे तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकात खाली नमुद केलेल्या कामाचे प्रयोजन आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | उद्यान विकास करणे. | रु. ४.५० लाख |
| २. | विद्युतीकरण करणे. | रु. ०.२५ लाख |
| ३. | खेळणी बसविणे बगीचा तयार करणे. | रु. ०.२५ लाख |

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. संत एकनाथ सोसायटी येथे उद्यान विकसित करण्यासाठी तयार केलेल्या (उद्यान विकास रु. ४.५० लाख, विद्युतीकरण रु. ०.२५ लाख, खेळणी व बगीचा रु. ०.२५ लाख) एकुण रु. ५.०० लाखाच्या अंदाजपत्रकास तसे सदर खर्च विशेष शासकीय अनुदान ९७-९८ मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७५/६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला भावसिंगपुरा (मनपा शाळेजवळ) येथे उद्यान विकसित करण्याच्या बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५.०० लाखाचे तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकात खाली नमुद केलेल्या कामाचे प्रयोजन आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | उद्यान विकास करणे. | रु. ४.०० लाख |
| २. | विद्युतीकरण करणे. | रु. ०.२५ लाख |
| ३. | खेळणी बसविणे बगीचा तयार करणे. | रु. ०.७५ लाख |

वरील प्रमाणे अपेक्षित खर्च रु. ५.०० लाख हा विशेष शासकीय अनुदान सन ९७-९८ च्या तरतुदी अंतर्गत करणे प्रस्तावित आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध वाहतुक बेटाचा विकास करण्यासाठी व वाहतुक सुरळीत होण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,९१,९२४/- च्या अंदाजत्रकांस तसेच सदर खर्च शहर सौदर्यीकरण या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७६/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील विविध वाहतुक बेटाचा विकास करण्यासाठी व वाहतुक सुरळीत होण्याच्या कामासाठी सन १९९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये अंदाजपत्रक रक्कम रुपये २,९१,९२४=०० चे तयार करण्यात आले असुन सदर कामाचा खर्च शहर सौदर्यीकरण या लेखा शिर्षकाखाली सन १९९७-९८ च्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध वाहतुक बेटाचा विकास करण्यासाठी व वाहतुक सुरळीत होण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,९१,९२४/- च्या अंदाजपत्रकांस तसेच सदर खर्च शहर सौंदर्यीकरण या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७७/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला की, हॉटेल अमरप्रित समोरील ८० फुट विकास रस्त्याच्या चौकामध्ये सौंदर्यीकरणाच्या कामाअंतर्गत "प्रज्वलीत यज्ञकुंड" ची प्रतिकृती बसविण्याच्या कामाचे अंदाजपत्रकास दिनांक २९-१-९७ रोजीच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्रं. ६०६/१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरचे काम करणेसाठी कार्यालयातर्फे निविदा मागविण्यांत येवून काम करण्यात येते. असून काम करते. वेळी मा. आमदार दयारामजी बसैये (बंधु) यांनी या चौकात "प्रज्वलित यज्ञकुंड" भोवती महानगरपालिकेतर्फे इतर चौकात सौदर्यीकरणाचे कामात जशी ग्रिल बसविण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे येथे सुध्दा तशीच ग्रिल बसवावी व यज्ञ कुंडाच्या दक्षिणेकडील ओटयावर पुर्णपणे चेकर्ड टाईल्स बसवावे. तसेच प्रज्वलीत यज्ञकुंडाभोवती बसविण्यात येणाऱ्या ग्रेनाईट (              ) वर "राष्टाय स्वाहा, राष्टाय इंदंनमय "महर्षी दयानंद चौक इत्यादी नांवे लिहावीत अशा सुचना दिल्या आहेत. त्यामुळे मुळ अंदाजपत्रकातील ग्रिल व चेकर्ड टाईल्स च्या बाबी मध्ये मुळ वाढ होत असुन त्यासाठी रु. १,०३,२२०=०० इतक्या रक्कमेची आवश्यकता आहे. मुळ अंदाजपत्रक रक्कम रु. २,१३,७७०=०० तसेच वाढीव रक्कम रु. १,०३,२२०=०० असे एकुण सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. ३,१६,९९०=०० चे होत आहे.

तरी मुळ अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीपेक्षा काम करते वेळी मा. आमदार दयारामजी बसैय्ये (बंधु) यांनी सुचविल्याप्रमाणे काम करणेसाठी ग्रिल व चेकर्ड टाईल्सच्या बाबीमध्ये वाढ होत असल्यामुळे त्यासाठी तयार करण्यात आलेले सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. ३,१६,९९०/- ला मंजुरी मिळणेस्तव व हया कामासाठी काम करित असलेले गुत्तेदार मे. साई कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन त्यांनी दिलेल्या दराने काम करुन घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हॉटेल अमरप्रित समोरिल ८० फुट विकास रस्त्याच्या चौकामध्ये सौंदर्यीकरणाच्या कामामध्ये ग्रील व चेकर्ड टाईल्स इ. बाबीची वाढ झाल्यामुळे वाढीव अंदाजपत्रक र.रु. १,०३,२२०/- व पुर्वीचे र.रु. २,१३,७७०/- अशा एकुण रु.

३,१६,९९०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच सदरील वाढीव काम मुळ कामाचे गुत्तेदार मे. साई कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन मंजुर दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुर देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७८/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. राहुलनगर स्लम भागात खडी रस्ते तयार करणे व मुख्याडांबरी रस्त्याचे साईट करिता रक्कम रु. ५,०९,०००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९६-९७ अनुसार तयार करण्यात आले असुन मा. आयुक्तांनी दिनांक २७-११-९७ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान केली आहे.

सदर काम महानगरपालिका गलिच्छ वस्ती सुधार खडी रस्ते व कलर्व्हट या शिर्षअंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राहुलनगर स्लम भागात खडी रस्ते तयार करणे व मुख्य रस्त्याचे साईट सोल्डरचे खडीकरण करुन रस्ता रुंद करणे च्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ५,०९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७९/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्षनगर स्लम येथील गटारीवर एसएफआरसी ढापे टाकणे व गटार दुरुस्त करणे बाबत कामाकरिता सां.बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. ३४८८६७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खुलीगटार" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांना दि. ४-१-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि. २९-१-९७ ला स्थायी समितीत अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे. प्रस्तावित कामासाठी अकरा निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. बसरा कंन्स्ट्रक्शन | ०.०५% | कमी. |
| २. | श्री. एस.एम. मंडोरे | ३% | जास्त. |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा श्री. बसरा कंस्ट्रक्शन यांची होती. परंतु मा. आयुक्त साहेबांच्या आदेशानुसार ठेकेदारास दराच्या वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता ठेकेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करण्यास लेखी संमती दिली. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दरानी करण्यास लेखी संमती दिली तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची असलेली श्री. बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्षनगर स्लम येथील गटारीवर एसएफआरसी ढापे टाकणे व गटार दुरुस्त करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारक मे. बसरा कंन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अं.प. दरापेक्षा ५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८०/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विशाल नगर गारखेडा येथील ५० रस्त्यांचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने रक्कम रुपये ४०२६=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास स्थायी समिती सभेमध्ये प्रस्ताव क्र. १२४/१६ दि. १८-६-९७ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९७-९८ या लेखा शिर्षातुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२३) तेवीस कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत (८) आठ निविदापत्रके दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आलीफ असोशिएटस् | ३६.३७% | कमी दराने |
| २. | मे. एस.एच. असोशिएटस् | ३५.५३% | --//-- |
| ३. | श्री. आर.बी. चव्हाण | ३१% | --//-- |
| ४. | मो. सोहेल सिद्यीकी | १७.७५% | --//-- |
| ५. | श्री. बदरबिन सालम | २७.८५% | --//-- |
| ६. | श्री. नरेंद्र शेट्टी | २४.८६% | --//-- |
| ७. | श्री. एस.ए. देशमुख | २३% | --//-- |
| ८. | कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन | २५.८५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३६.३७% कमी दराने मे. आलीफ असोशिएटस् कं. यांची निविदा आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३६.३७% कमी दराची मे. आलीफ असोशिएटस् कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव व विचाराथ्र सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विशाल नगर गारखेडा येथील ५० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३६.३७% कमी दराची मे. आलीफ असोशिएटस् कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८१/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जहागिरदार कॉलनी येथील खडी रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. २,९७,६५०/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "भांडवली रस्ते (डांबरीकरण)" या लेखा शिर्षाखाली सन ९८-९९ च्या तरतुदीमधुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जहागिरदार कॉलनी येथील खडी रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,९७,६५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "भांडवली रस्ते (डांबरीकरण)" या लेखा शिर्षाखाली सन १९९८-९९ च्या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. काम त्वरीत सुरु करण्यासाठी नोटीस बोर्डावर निविदा सुचना लावुन किंवा उपलब्ध गुत्तेदारा मार्फत काम करुन घ्यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८२/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भानुदासनगर येथील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ९,८८,६८५/- चे तयार करण्यात आले असुन मा. पालकमंत्री यांनी सदरचे काम मार्च पुर्वी सुरु करावे असे आदेशित केल्यामुळे काम लवकर सुरु करणे जरुरीचे आहे. तरी सदरचा खर्च सन ९८-९९ च्या "भांडवली रस्ते (डांबरीकरण)" मध्ये ठेवण्यात आलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भानुदासनगर येथील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,८८,६८५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च सन ९८-९९ च्या "भांडवली रस्ते (डांबरीकरण)" मधील तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८३/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र. ६१ मधील मगरबी ले-आऊट येथे रोडच्या बाजुला खडीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. १,८६,४५०/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च भांडवली खडी रस्ते या लेखा शिर्षखाली सन ९८-९९ च्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ६१ मधील मगरबी ले-आऊट येथे रोडच्या बाजुला खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १८६,४५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च भांडवली खडी रस्ते या लेखा शिर्षखाली सन ९८-९९

च्या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. नोटीस बोर्डावर निविदा सुचना लावून किंवा उपलब्ध गुत्तेदारा मार्फत काम त्वरीत करुन घ्यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८४/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ जलतरण तलावास रंगरंगोटी करण्याचे कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. १,३२,०५०/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "पोहण्याचा तलाव" या लेखाशिर्षाखाली सन ९७-९८ च्या तरतुदीतुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ जलतरण तलावास रंगरंगोटी करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १,३२,०५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "पोहण्याचा तलाव" या लेखाधिकारी तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८५/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी येथे स.नं. ३३ मधील रेखांकनामध्ये खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजत्रक र.रु. ३,२६,१३३/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "भांडवली रस्ते (खडीकरण) या लेखा शिर्षकाखाली सन ९८-९९ च्या तरतुदी मधुन करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी येथे स.नं. ३३ मधील रेखांकनामध्ये खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी तयार केलेल्या र.रु. ३,२६,१३३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८६/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महावीर चौकामध्ये वाहतुक बेटाभोवती डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,९०,०००/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "भांडवली रस्ते (डांबरीकरण)" या लेखा शिर्षाखाली ९७-९८ च्या वाढीव तरतुदीमधुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महावीर चौकामध्ये वाहतुक बेटाभोवती डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,९०,०००/- च्या अंदाजत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८७/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील जलतरण तलाव परिसरातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्योच डी. एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. १,९१,३००/- चे तयार खर्च "पोहण्याचा तलाव" या लेखा शिर्षखाली सन ९७-९८ च्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथील जलतरण तलाव परिसरातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १,९१,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८८/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पन्नालालनगर ते मुथियान कॉर्नर पर्यंतच्या विकास रस्त्याचे डांबरीकरण (टप्पा-१) करण्याच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ९,९९,९९५/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "भांडवली रस्ते (डांबरीकरण)" या लेखा शिर्षकाखाली सन ९८-९९ च्या तरतुदीमधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पन्नालालनगर ते मुथीयान कॉर्नर पर्यंतच्या विकास रस्त्याचे डांबरीकरण (टप्पा-१) करण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ९,९९,९९५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "भांडवली रस्ते (डांबरीकरण)" या लेखा शिर्षकाखाली सन ९८-९९ च्या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८९/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे शहानुरवाडी स.नं १६/ पैकी चे १५.०० मी. रुंद विकास रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ८,११,१२०/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "भांडवली रस्ते (खडीकरण)" या लेखा शिर्षका खाली सन ९८-९९ च्या तरतुदीतुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे शहानुरवाडी स.नं. १६/ पैकी चे १५.०० मी.रुंद विकास रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ८,११,१२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च "भांडवली रस्ते (खडीकरण)" या लेखा शिर्षकाखाली सन ९८-९९ च्या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९०/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, न्यु शांतीनिकेतन कॉलनी येथे श्री. राठोड ते नरवडे यांच्या घराजवळ हयुम पाईप कल्व्हर्टचे बांधकाम करणेकरिता सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. २,०८,३८५/- चे तयार करण्यात आले असुन सदरच्या खर्च "भांडवली रस्ते खडीकरण" या लेखा शिर्षकाखाली सन १९९८-९९ च्या लेखाशिर्षाकात ठेवण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यात येईल.

करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, न्यु शांतीनिकेतन कॉलनी येथे श्री. राठोड ते नरवडे यांच्या घराजवळ हयुम पाईप कल्व्हर्टचे बांधकाम करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,०८,३८५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "भांडवली रस्ते खडीकरण" या लेखा शिर्षकाखाली सन ९८-९९ च्या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील काम नोटीस बोर्डवर सुचना लावुन किंवा उपलब्ध गुत्तेदारा मार्फत त्वरीत सुरु करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९१/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिल्पनगर येथील मारीया हॉस्पिटल ते दुमीर हॉस्पीटल पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ६,२३,३५२/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च सन १९९८-९९ च्या वित्तीय उपलब्धीतुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरी स्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिल्पनगर येथील मोरिया हॉस्पिटल ते दुमीर हॉस्पीटल पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ६,२३,३५२/-च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च ९८-९९ च्या वित्तीय उपलब्धीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९२/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चिकलठाणा एम.आय.डी.सी. येथील एम.एस.ई.बी. भांडार ते नारेगांव प्राथमिक आरोग्य केंद्र या रस्त्याचे

डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने र.रु. ११,७६,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र. २१९/१२ दि. १०-३-९७ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदर कामाचा खर्च भांडवली रस्ते (डांबरीकरण) सन ९६-९७ या लेखा शिर्षातुन करण्यांत येईल.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सात निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदापत्रक दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे पाच निविदापत्रक दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन | २४.९९% | कमी दराने |
| २. | मे. पाटील कंन्स्ट्रक्शन | २३.८८% | --//-- |
| ३. | श्री. के.बी. पार्थीकर | १९.९०% | --//-- |
| ४. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | १६.८६% | --//-- |
| ५. | मे. जयअर्थ मुव्हर्स | १२६.७७% | --//-- |

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९९% कमी दराची मे. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा एमआयडीसी येथील एम.एस.ई.बी. भांडार ते नारेगांव प्राथमिक आरोग्य केंद्र या रस्त्याचे डांबरीकरण करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९९% कमी दराची मे. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९३/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बडातकीया भागामध्ये खांडकीची दुरस्ती करणे व शहाबादी फरशी बसविणेच्या कामासाठी सन ९६-९७ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने र.रु. ३,६१,४८६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती ठराव क्र. २४९/४ दि. १६-१०-९७ च्या अन्वये मंजुरी मिळाली आहे. सदर कामाचा खर्च ९७-९८ भांडवली रस्ते (खांडकी रस्ते) या लेखा शिर्षामधुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पंचवीस(२५) निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दहा निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख शरीफ | ३२.३६% | कमी दराने |
| २. | श्री. स.अथर अली | ३१.०१% | --//-- |
| ३. | श्री. जी.के. पवार | २४.९९% | --//-- |
| ४. | श्री. विपुल कंन्स्ट्रक्शन | २६% | --//-- |
| ५. | श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | २५% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | श्री. रविंद्र विश्वकर्मा | २५% | --//-- |
| ७. | श्री. कंम्फर्ट कंन्स्ट्रक्शन | २४.०८% | --//-- |
| ८. | श्री. राजासिंग | २१.९९% | --//-- |
| ९. | श्री. कुलवंतसिंग | २७.१०% | --//-- |
| १०. | श्री. मो. सोहेल सिद्यीकी | ११.१६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.३६% कमी दराची श्री. शेख शरीफ यांची निविदा आहे.

तरी निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बडातकीया भागामध्ये खांडकीची दुरुस्ती करणे व शहाबादी फरशी बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दरापेक्षा ३२.३६% कमी दराची श्री. शेख शरीफ यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९४/२५ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बसैय्येनगर बायजीपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. ८,५३,६००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम लेखा शिर्षक "नाला ट्रेनिंग" यातुन प्रस्तावित केले असुन परिसर अभियांत्रिकीच्या सन ९६-९७ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले आहे. सदर कामास मा. आयुक्तानी दि. २७-११-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बसैय्येनगर बायजीपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ८,५३,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम "नाल ट्रेनिंग" या लेखा शिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९५/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वेदांतनगर येथील उद्यानात विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी सन ९७-९८ च्या सा.बां. विभागाच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ३,१८,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "विद्युत वायरिंग" गार्डन फिटींग" या लेखा शिर्षकाखाली ठेवण्यात आलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वेदांतनगर येथील उद्यानात विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी तयार केलेल्या र.रु. ३,१८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च

"विद्युत वायरिंग" गार्डन फिटींग" या लेखा शिर्षकाखाली असलेल्या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९६/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शाहुनगर (बन्सीलालनगर जवळील) येथील महानगरपालिकेच्या उद्यानात विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी सन ९७-९८ च्या सा.बां. विभागाच्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. १,६३,५००/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च "नविन उद्यान" या लेखा शिर्षकाखाली सन ९८-९९ च्या तरतुदीमधुन करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शाहुनगर (बन्सीलालनगर जवळील) येथील मनपाच्या उद्यानात विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १,६३,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च "नविन उद्यान" या लेखा शिर्षकाखाली सन ९८-९९ च्या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९७/२८ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला की, श्री. शेख मसा शेखचॉद यांना महेशनगर येथे जालना रोड गादिया पार्क या रस्त्याच्या बाजुला ५x६ या आकाराची टपरीसाठी जागा देण्यात आली होती. वरील टपरीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्याने व त्याठिकाणी असलेले चौकाचे सुशोभिकरणाचे काम चालु असल्याने त्यांची टपरी त्या ठिकाणाहुन प्रशासनातर्फे हटविण्यात आली होती.

सदर टपरी काढु नये म्हणुन अर्जदाराने न्यायालयातुन मनाई हुकुम आणाले होते.

स.न्यायालयाचे आदेशाचे उल्लघंन होऊ नये म्हणुन त्यांना पर्यायी जागा देणे आवश्यक आहे. तरी त्यांना रघुवीरनगरकडे जाणाऱ्या आतील भागात ५x६ या आकाराची टपरीसाठी जागा देणे बाबत प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. शेख मुसा शेख चाँद यांची महेशनगर भागातील टपरी हटविण्यात आल्यामुळे व मा. न्यायालयाचे आदेशाचे उल्लघंन होऊ नये म्हणुन त्यांना रघुवीरनगरकडे जाणाऱ्या आतील भागात ५x६ या आकाराची टपरीसाठी पर्यायी जागा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९८/२९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राणानगर मंजुर रेखांकनात १०० ते १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र.रु. २,१०,८२५/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास स्थायी समिती ठराव क्र. १४४/३ दि. १६-८-९७ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्या प्रमाणे कार्यालयाची निविदा सुचना क्र. ३४/९७ जी काढण्यात येऊन बी-१ निविदा सुचना मागविण्यात आल्या असता

निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. हुसेन अली | ०.२५% | कमी दराने |
| २. | श्री. मो. सोहेल सिद्यीकी | २.५०% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दरापेक्षा ०.२५% कमी दराची श्री. हुसेन अली यांची निविदा आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राणानगर येथील मंजूर रेखांकरनात १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दरापेक्षा ०.२५% कमी दराची श्री. हुसेन अली यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९९/३० :**

लॉरकॉम कंपनी ते चिकलठाणा गावापर्यंत १५० व ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अं.प. रक्कम रु. १२,०८,१००/- चे तयार करण्यात येऊन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. २१२/५ दि. १०-३-९७ अन्वये मंजुरी मिळाली होती. त्या अनुषंगाने सदर कामासाठी वर्तमानपत्रातुन निविदा मागविल्या असता विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २६ (सव्वीस) निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण ८(आठ) निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सलीम पटेल | २८.२१% | कमी दराने |
| २. | श्री. आर.बी. चव्हाण | २३.५% | --//-- |
| ३. | श्री. व्ही.जी. स्वामी | २८.००१% | --//-- |
| ४. | श्री. शेख शरीफ | २२.४९% | --//-- |
| ५. | श्री. राणा कंन्स्ट्रक्शन | २०% | --//-- |
| ६. | श्री. नंदकुमार घोडेले | १८% | --//-- |
| ७. | श्री. न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन | ६.७८७% | --//-- |
| ८. | श्री. उदय इंजिनिअरींग | ४% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २८.२१% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे. तरी निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लॉरकॉम कंपनी ते चिकलठाणा गावापर्यंत १५० व ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २८.२१% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४००/३१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट ते मकबरा रोडवर सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ६,८०,५७३/- च्या अंदाजपत्रकास यापुर्वीच स्थायी समितीचा ठराव क्र. १५१/१० दि. १७-९-९७ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण अकरा निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी (३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. सुवर्णा इलेक्ट्रीकल्स | १% | कमी दराने |
| २. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ०.३% | --//-- |
| ३. | मे. सुरेश इलेक्ट्रीकल्स | ५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची मे. सुवर्णा इलेक्ट्रीकल्स यांची निविदा आहे. करिता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट ते मकबरा सोडीयम व्हेपर दिवे लावून विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १% कमी दराची मे. सुवर्णा इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०१/३२ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हॉटेल अभिरुची ते गारखेडा खिंवसरा पार्क या रोडवर सोडीयम व्हेपर दिवे लावण्याचे अंदाजपत्रक र.रु. ४,६०,०००/- चे सन ९७-९८ च्या सा.बां. खात्याच्या दरसुचीनुसार तयार केले आहे. सदरील कामाचा खर्च ९८-९९ च्या बजेटमधुन करणेस्तव सादर केला आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हॉटेल अभिरुची ते गारखेडा खिंवसरा पार्क या रोडवर सोडीयम व्हेपर दिवे लावण्याकरिता तयार केलेल्या र.रु. ४,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च ९८-९९ च्या बजेटमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०२/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शांतीपुरा ते भिमनगर भावसिंगपुरा या रोडवर सोडीयम व्हेपर दिवे बसविण्याचे अंदाजपत्रक रु. ९,८६,६७४/- (९७-९८) नुसार तयार केले आहे. सदरील कामाचा खर्च सोडीयम लाईट ५० लक्ष या शिर्षकातुन करण्यात येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शांतीपुरा ते भिमनगर भावसिंगपुरा या रोडवर सोडीयम व्हेपर दिवे बसविण्याचे कामाकरिता तयार केलेल्या र.रु. ९,८६,६७४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०३/३४ :**

अति.शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मुख्य बसस्थानक परिसरात हायमास्ट लाईट बसविण्याच्या कामासाठी र.रु. १०.०० लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च शासनाकडुन प्राप्त र.रु. ४.०० कोटीच्या अनुदानातुन करण्यात येईल.

तरी वरील कामाकरिता तयार करण्यात आलेले र.रु. १०.०० लाखाचे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुख्य बसस्थानक परिसरात हायमास्ट लाईट बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १०.०० लाखाच्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च शासकीय अनुदान रु. ४.०० कोटीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०४/३६ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गुलमंडी येथे हायमास्ट लाईट बसविण्याच्या कामासाठी र.रु. १०.०० लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले अनुदानामधुन करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुलमंडी येथे हायमास्ट लाईट बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १०.०० लाखाचे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम शासकीय अनुदान रु. ४.०० कोटीमधुन करण्यास सर्वानुमते मंजरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०५/३६ :**

एन-७ सेक्टर याठिकाणी पाणी पुरवठा करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ४१,२५,८१२/- चे तयार करुन निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १३ निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार (४) निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मल्ल इंटरप्रायजेस | १०.% | कमी दराने |
| २. | श्री. राणा कंस्ट्रक्शन | १९.२६% | --//-- |
| ३. | श्री. सलीम पटेल | २३.४९% | --//-- |
| ४. | श्री. शिवा कंन्स्ट्रक्शन | २३.२३% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २३.४९% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे. तरी निविदा स्विकृतीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-७ सेक्टर सिडको या ठिकाणी पाणी पुरवठा करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २३.४९% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०६/३७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हायकोर्ट चौक येथे स्वयंचलित वाहतुक संकेताकं बसविण्याच्या कामासाठी वाहतुक दरसुची नुसार ९६-९७ र.रु. ३,५९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च शासनाकडुन वाहतुक सुविधा अंतर्गत प्राप्त अनुदानामधुन करण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रु. ३,५९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हायकोर्ट चौक येथे स्वयंचलित वाहतुक सकेतांक बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,५९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०७/३८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बजरंग चौकात स्वयंचलित वाहतुक संकेताक बसविण्याच्या कामाकरिता सन ९६-९७ च्या वाहतुक दरसुचीनुसार र.रु. ४,४२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च शासनाकडुन वाहतुक सुविधा अंतर्गत प्राप्त अनुदानातुन करण्यात येईल.

तरी सदर कामासाठीचे र.रु. ४,४२,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बजरंग चौकात स्वयंचलित संकेताक बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,४२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०८/३९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. पगारिया कॉलनी येथे सांस्कृतिक हॉल बांधण्याचे कामाकरिता सा.बां. विभागाचे सन ९६-९७ चे दर सुचिनुसार र.रु. १,६८,०००/- चे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षातुन सन ९८-९९ च्या आर्थिक तरतुदीतून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. पगारिया कॉलनी येथे सांस्कृतिक हॉल बांधण्याचे कामाकरिता तयार केलेल्या र.रु. १,६८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षतून सन ९८-९९ च्या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०९/४० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. पद्मपाणी कॉलनी येथे वाचनालय बांधावयाचे आहे. त्यासाठी सा.बा. विभागाच्या सन ९६-९७ च्या दर सुचीनुसार र.रु. ४,५४,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च इतर वाचनालय या लेखाशिर्षातुन सन ९८-९९ च्या आर्थिक तरतुदीतुन करण्यांत येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. पद्मपाणी कॉलनी येथे वाचनालय बांधण्याकरिता तयार केलेल्या र.रु. ४,५४,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च इतर वाचनालय या लेखाशिर्षातुन सन ९८-९९ च्या आर्थिक तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१०/४१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संत एकनाथ रंगमंदिर येथील विश्रामगृहाचे स्वच्छतागृह सर्व साधारण स्वच्छातागृहाची दुरुस्ती व इतर खर्च किरकोळ दुरुस्ती तसेच दर्शनीभागास रंगरंगोटी करणे या कामासाठी एकत्रित अंदाजपत्रक र.रु. १,३५,०००/- ला स्थायी समिती ठराव क्र. ४८१/११ दि. २९-११-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झ ाालेली आहे. सदर कामासाठी निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/१३०/९६ दि. १३-१२-९६ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा श्री. प्रशांत शर्मा यांच्या तर्फे करुन घेण्यात आलेले आहे.

त्यानंतर सदर कामामध्ये आवश्यक त्या बाबीचा समावेश करुन सुधारित अंदाजपत्रक २,५१,७३३/- चे मंजुर करण्यात आलेले असुन सदर मंजुर रक्कमेच्या हमी पावेतो पुर्ण झालेले आहे. आता पुर्वीच्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ठ नसलेल्या बाबीचे वेगळे अंदाजपत्रक रु. १,५८,६२७/- ला मा. आयुक्तांनी दि. १०-१२-९७ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. अशा प्रकारे एकुण ४,१०,३६०/- इतकी होत असल्याने व सदर काम पुर्वीच्याच गुत्तेदाराकडुन म्हणजेच प्रशांत शर्मा व यांचे कडुन मुळ मंजुर दरानुसार काम करुन घेण्यासाठी व सुधारित करारनामा करुन घेण्याबाबत तसेच सुधारित अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंग मंदिर येथील विश्रामगृहाचे स्वच्छतागृह व सर्वसाधारण स्वच्छतागृहाची दुरुस्ती व इतर किरकोळ दुरुस्ती तसेच दर्शनी भागास रंगरंगोटी करणेच्या कामामध्ये काही बाबींची वाढ झाल्यामुळे मुळ अंदाजपत्रक रु. ५१,७३३/- व वाढीव अंदाजपत्रक र.रु. १,५८,६२७/- असे एकुण ४,१०,३६०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच सदरील काम पुर्वीचेच गुत्तेदार श्री. प्रशांत शर्मा यांचे कडुन मुळ मंजुर दरानुसार करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४११/४२ :**

उपआयुक्त-१ हयांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अस्थापनेवर कार्यरत असलेले वाहन चालक यांना महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एस.आर. व्ही. १०९५/प्रक्र. १९५/बारा, दि. ८ जुन १९९५ अन्वये रु. १२००-१८०० ही वेतनश्रेणी देण्यांत आलेली आहे. ज्येष्ठ वाहन चालक पद रु. १४००-२३०० या वेतनश्रेणीत विषय क्र. ४८७/१७ अन्वये मंजुर करुन शासनाची मंजुरी घेणेत यावी असा स्थायी समिती ठराव पारित केलेला आहे.

ज्येष्ठ वाहन चालकाचे पद इतर महानगरपालिकामध्ये किंवा शासकीय कार्यालयामध्ये नसल्यामुळे धोरण म्हणुन शासनाकडे प्रस्ताव प्रसतावित करण्यांत आलेला होता. तथापी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४) चे स्पष्टीकरण अन्वये वेतनश्रेणी वाढ २०० ते ५०० हया मर्यादेत करण्याची झाल्यास स्थायी समिती सक्षम आहे.

तसेच दि. १४-११-९७ च्या महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनुसार ज्येष्ठ वाहन चालक यांना रु. १४००-२३०० ही वेतश्रेणी देण्यांची मागणी केली ही वेतनश्रेणी मान्य करण्याचे कर्मचारी संघटना पदाधिकारी व मा. महापौर तथा अन्य पदाधिकारी व अधिकारी यांचे बैठकीत मान्य करण्यांत आलेले आहे.

करिता ज्येष्ठ वाहन चालकांना सुधारित वेतनश्रेणी रु. १४००-२३०० ही लागु करणेबाबत फेर प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अस्थापनेवर कार्यरत असलेल्या वाहन चालकांना मुं.प्रां.मपना अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) चे स्पटीकरण अन्वये तसेच दि. १४-११-९७ च्या महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनुसार व संघटनेचे पदाधिकारी यांनी मान्य केल्यानुसार जेष्ठ वाहन चालक यांना रु.

१४००-२३०० ही वेतनश्रेणी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१२/४३ :**

ऐनवेळया विषय उप-अभियंता श्री. मतीन कादरी यांचे अपिल.

**संवाद**

**श्री. गौतम लांडगे :** श्री. मतीन कादरी, उप-अभियंता याचा दिनांक १७-१२-९७ रोजी एक अपील स्थायी समिती सभेसाठी आलेला असुन त्यांच्या अपिलावर नियमाप्रमाणे चर्चा करुन योग्य तो निर्णय व्हावा. (चौसरनगर डांबरीकरण बाबतचा प्रस्ताव)

**मा. सभापती :** ठिक आहे. श्री. मतीन कादरी यांच्या अपीलावर विचार करुन दिनांक २५-७-९७ अन्वये त्याची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षाकरिता गोठविलेली आहे. त्याबाबत अपीलावर सहानुभुतीपुर्वक विचार करुन नियमाप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

ऐनवेळच्या चर्चेव्दारे प्रस्तावानुसार असे ठरले की, श्री. मतीन कादरी, उप-अभियंता यांचा दिनांक १७-१२-९७ च्या अपील अर्जाव्दारे त्यांना दिलेली शिक्षा एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षाकरिता गोटवण्यात आली ती रद्द करण्यांत यावे यास स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर "जन गन मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २६-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शुक्रवार दिनांक २६-१२-९७ रोजी मा. सभापती श्री. प्रभाकर सिताराम विधाते यांच्या अध्यक्षते खाली स्थायी समिती सभा दुपारी ४.०० वाजता "मलीक अंबर सभागृह" येथे संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदेमातरम्" या राष्ट्रगिताने झाली. सभेस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. त्रिंबक तुपे | स.सदस्य |
| २) | स.स. श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ३) | स.स. श्री. कचरु चंद्रभान नवपुते | --//-- |
| ४) | स.स. श्री. अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ५) | स.स. श्री. विकास जैन | --//-- |
| ६) | स.स. श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ७) | स.स. श्री. अब्दुल रशिदखॉन (मामु) | --//-- |
| ८) | स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ.माबुद | --//-- |
| ९) | स.स. श्री. संजय जोशी | --//-- |
| १०) | स.स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ११) | स.स. श्री. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १२) | स.स. सौ. जयवंत (बंडु) ओक | --//-- |

**संवाद**

**श्री. कचरु नवपुते :** महानगरपालिकेच्या शाळा सुरु होऊन ८ महिनेचा कालवधी संपलेला असुन अदयाप हा शाळेत खेळाचे साहित्य वाटप झालेले नाही. याचे कारण काय? याचा खुलासा करावा.

**श्री. भगवान घडामोडे :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे. कन्नड तालुक्याचे आमदार मा. स्व. रायभान जाधव यांना सभागृहात २ मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात येते. (सभागृहात ००.०२ मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**श्री. कचरु नवपुते :** बेगमपुरा येथील बिबीच्या मकबऱ्या लगत असणाऱ्या विटभट्ट्या अतिक्रमण मोहिमे अंतर्गत हटविण्यात आलेल्या आहे. परंतु प्रशासनाने किराडपुरा येथील विटभट्ट्या आतापर्यंत का हटविल्या नाहीत याची माहिती दयावी.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी अद्यापपर्यंत सभागृहात आलेले नाही. त्यामुळे पुढील बैठकीत या बाबत खुलासा करण्यात येईल.

**विषय क्र. ४१३/१ :**

दिनांक १७-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. त्रिंबक तुपे :** पृष्ठ क्र. ९ वर ज्या ज्या वार्डात "अरुंद रस्ता" असे चुकीने टंकलिखीत झालेले आहे. त्याऐवजी ज्या वार्डात "५ ते ६ फुट गल्ल्या" (रस्ता) आहेत. अशा रस्त्यात जागोजागी कचरा कुंडया ठेवण्यात याव्या अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती :** स.स.श्री. त्रिंबक तुपे यांच्या वाक्यात "अरुंद रस्ता" असे टंकलिखित झालेले आहे. त्याऐवजी जेथे वार्डात "५ व ६ फुट गल्ल्या" (रस्ता) आहे. अशा रस्त्यात जागोजागी कचरा कुंडया ठेवण्यात याव्या अशी दुरुस्ती करण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १७-१२-९७ च्या इतिवृत्तातील पान क्र. ९ वर सफाई मोहिमे अंतर्गतच्या चर्चेत "अरुंद रस्ता" त्याऐवजी जेथे ५ ते ६ फुट रुंदीच्या गल्ल्या आहेत" अशा दुरुस्ती करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वरील दुरुस्तीसह दि. १७-१२-९७ रोजीच इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४१४/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जयसिंगपुरा, कुतूबपुरा भागातील खांडकी व फरशी बसविण्याच्या कामासाठी दि. १६-१२-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २८२/२ अन्वये अंदाजपत्रक र.रु. १,०१,८७३/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८०/९७ दिनांक १३-११-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (१२) बारा निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणे या नियोजित तारखेस (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या प्राप्त निविदा पत्रके दि. १०-१२-९७ रोजी उघडण्यांत आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राठोड एम.के. | २% | कमी दराने |
| २. | श्री. मझहर सिद्यीकी | ०.०१% | कमी दराने |
| ३. | श्री. एस.एस. सत्तार | १०% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% कमी दराने श्री. राठोड एम.के. यांची निविदा आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% कमी दराने श्री. राठोड एम.के. यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयसिंगपुरा, कुतुबपुरा भागातील खांडकी व फरशी बसविण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २% कमी दराची श्री. एम.के. राठोड यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१५/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कैलासनगर येथील गल्लीत फरशी बसविण्याच्या कामासाठी दि. १६-१०-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २८५/५ अन्वये अंदाजपत्रक र.रुपये २,१३,५००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८०/९७ दि. १३-११-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (८) आठ निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणे या नियोजित तारखेस एकुण दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राठोड एम.के. | ०.१०% | कमी दराने |
| २. | श्री. एस.एम. सज्जाद | १०% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री. राठोड एम.के. यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलासनगर येथील गल्लीत फरशी बसविण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प.दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री. एम.के. राठोड यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१६/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बारापुल्ला दरवाजा ते लिटील प्लॉवर स्कुल पर्यंतच्या रुंदीकरण (खडीकरण) करुन दुभाजक टाकणेच्या कामासाठी दि. १०-३-९७ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. १९६/१३ अन्वये अंदाजपत्रक र.रु. १०,५४,२००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/नि/३२/९७ दि. ३-५-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३२% कमी दराने श्री. आर.बी. चव्हाण यांचे निविदेस स्थायी समिती सभा दि. १६-८-९७ अन्वये विषय क्र. १९०/४९ व्दारे मंजुरी मिळालेली आहे.

सदरच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करते वेळी रस्त्याची पुर्ण रुंदी मिळणे अपेक्षित नव्हते. त्या ठिकाणी बारापुल्ला कडुन जाताना उजव्या बाजुने एक दोन ठिकाणी अतिक्रमणे व रसंवत्या होत्या त्याना हटविण्यात आले आहे. अतिक्रमण काढल्यामुळे रोडच्या दोन्ही बाजुनी रिकामी जागा सुटत आहे. त्यामुळे तेथे रोड रुंदीकरण झाल्या की जागा सुरक्षित राहील व तेथे पुन्हा अतिक्रमण होणार नाही.

तसेच वाढीव काम मुळ मंजुर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या आत होणार आहे. त्यासाठी वाढीव रक्कमेची आवश्यकता नाही. कारण सदरील कामासाठी ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३२% कमी दराने आलेली असुन कमी दर असल्यामुळे कामामध्ये र.रु. ३,३७,३८८/- इतकी बचत होत असुन वाढीव कामासाठी लागणारी र.रु. ३,०६,३०९/- इतकी होत आहे. वाढीव काम करणे साठी ज्या रक्कमेची आवश्यकता आहे. ती रक्कम

निविदा कमी दराने आल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या आत होणार असुन सदरचे काम हे मुळ गुत्तेदार श्री. आर.बी. चव्हाण हे त्यांनी दिलेल्या दरात म्हणजे ३२% कमी दराने वाढीव काम करण्यास तयार आहे.

तरी सदरील कामाच्या बाबीं अंदाजपत्रकीय दिलेल्या बाबीपेक्षा वाढव असल्यामुळे त्यासाठी लागणारे र.रुपये ३,०६,३०९/- ला व वाढीव परिमाणासह मुळ गुत्तेदार श्री. आर.बी. चव्हाण यांचे कडुन त्यांनी दिलेल्या दराने काम करुन घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बारापुल्ला दरवाजा ते लिटल फ्लॉवर स्कुल पर्यंतचया रस्त्याचे खडीकरण करुन दुभाजक र.रु. ३,०६,३०९/- ला व सदरील काम मुळ कामाचे गुत्तेदार श्री. आर.बी. चव्हाण यांचे मंजुर दराने म्हणजेच अं.प. दरापेक्षा ३२% कमी दराने सदर काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१७/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागेश्वरवाडी प्रभागा अंतर्गत रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी दि. १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २०९/८ अन्वये अंदाजपत्रक र.रुपये २,३८,६००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/६५/९७ दिनांक ८-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (९) नऊ निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (६) सहा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आर.बी. चव्हाण | ३४% | कमी दराने |
| २. | मे. संजिवणी कंन्स्ट्रक्शन | ३०.४०% | कमी दराने |
| ३. | श्री. एस.एम. मंडोरे | २८.५०% | कमी दराने |
| ४. | श्री. राजासिंग | २७.९९% | कमी दराने |
| ५. | श्री. एस.एल. देशमुख | २३% | दराने |
| ६. | श्री. मोहम्मद रऊफ | २४.९७% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३४% कमी दराने श्री. आ.बी. चव्हाण यांची निविदा आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३४% कमी दराची श्री. आर.बी. चव्हाण यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागेश्वरवाडी प्रभागा अंतर्गत रोडचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३४% कमी दराची श्री. आर.बी. चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१८/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा गरवारे क्रिडा संकुलणाच्या दक्षिण दिशेकडील सीमेलगतचे अस्तीत्वात असलेले तार फेन्सींग काढुन कम्पांऊड वॉल बांधणेच्या कामाकरिता सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. २,१०,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन ९७-९८ च्या "क्रिडा संकुल बांधकामे" या लक्षच्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी र.रु. २,१०,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गरवारे क्रिडा संकुलाच्या दक्षिणेकडील सीमेलगतचे अस्तित्वात असलेले तार फेन्सींग काढुन कंपौंड वॉल बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. २,१०,५००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील खर्च ९७-९८ च्या "क्रिडा संकुल बांधकामे" या तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१९/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. १,२ व ३ अंतर्गत डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणेसाठी दि. १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २२६/२५ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ५,४६,७७०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८५/९७ दिनांक ८-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (४) चार निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण दोन (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्म तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ०७.००% | जास्त दराने |
| २. | श्री. डी. अजितसिंग | ०८.००% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०७.००% जास्त दराने मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा आहे.

सदरील कामाचे ठेकेदाराने निविदेत जास्त दर दिल्यामुळे त्यांना मा. आयुक्त यांचे दालनात वाटाघाटी साठी बोलावले असता त्यांनी निविदेत दिलेले दर ०७.००% जास्त च्या ऐवजी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०२.००% जास्त दराने काम करण्यासाठी संमती दिली.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०२.००% जास्त दराने केलेल्या वाटाघाटीनुसार श्री. मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं यांची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. १,२ व ३ अंतर्गत डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दरापेक्षा २%

जास्त दराची मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२०/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विभाग क्र. १ अंतर्गत रस्त्याची देखभाल दुरुस्ती करणेच्या कामासाठी दि. १७-९-९७ च्यास्थायी समिती च्या सभेमध्ये विषय क्र. २०७/६ अन्वये अंदाजपत्रक र.रुपये ४,९९,३९५/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयाने निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/६५/९७ दिनांक ९-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (१३) तेरा निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (५) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या प्राप्त निविदा पत्रके दि. ७-११-९७ रोजी उघडण्यात आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मो. सलाम | ३६% | कमी दराने |
| २. | श्री. आर.बी. चव्हाण | ३५% | --//-- |
| ३. | श्री. मो. रऊफ | २७% | --//-- |
| ४. | श्री. अब्दुल सलाम | २५% | --//-- |
| ५. | श्री. कुलवंतसिंग | २८.१०% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३६% कमी दराने श्री. मो. सलीम यांची निविदा आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३६% कमी दराची श्री. मो. सलीम यांची श्री. मो. सलीम यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. १ अंतर्गत रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३६% कमी दराची श्री. मो. सलीम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२१/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, असीफबाग स.नं. १/२ मधील श्रीमती असगरी बेगम यांच्या मंजुरी ले आऊट मधील रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी दि. १६-८-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १४३/२ अन्वये र.रुपये ४,५३,४००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/६५ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (१५) पंधरा निविदा विक्री झाल्या असुन निविदास्विकारणेच्या नियोजित तारखसे एकुण (५) पाच निविदा दर

भरलेल्या प्राप्त झाल्या निविदा दि. ७-११-९७ रोजी उघडण्यांत आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख इकबाल अहमद | ३५.७८% | कमी दराने |
| २. | श्री. एस.चंद्रपॉल | ३५.०७% | कमी दराने |
| ३. | श्री. आर.बी. चव्हाण | ३४% | कमी दराने |
| ४. | श्री. एस.ए. देशमुख | २१% | कमी दराने |
| ५. | श्री. मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | २१.१३% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.७८% कमी दराने श्री. शेख इकबाल अहमद यांची निविदा आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३५.७८% कमी दराने श्री. शेख इकबाल अहमद यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आसीफबाग स.नं १/२ मधील श्रीमती असगरी बेगम यांच्या मंजुरा ले आऊट मधील रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३५.७८% कमी दराची श्री. शेख इकबाल अहमद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२२/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हॉटेल वेदांत ते एकनाथनगर रोडवर मिना शॉपिंग सेंटर बांधावयाचे आहे. या कामासाठी र.रु. १०,६६,३०३/- चे अंदाजपत्रक तयार करुन मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवला असता सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३७/३४ दि. २१-६-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र./मनपा/लेखा/नि/५७/९७ दि. ८-९-९७ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१९) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (५) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. २४-९-९७ रोजी उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आर.बी. चव्हाण | १७% | कमी दराने |
| २. | श्री. हावये कंन्स्ट्रक्शन | ७.९९९% | कमी दराने |
| ३. | श्री. एस.एम. मंडोरे | ४.५०% | कमी दराने |
| ४. | श्री. शेख मसुद | ३.८५% | कमी दराने |
| ५. | श्री. कमफर्ट कंन्स्ट्रक्शन | १६.८६% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दराची निविदा दर श्री. आर.बी. चव्हाण यांचे आहेत.

सबब सदर कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% कमी दराचे श्री. आर.बी. चव्हाण यांची निविदा विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. संजय जोशी :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रक्कम जास्तीची असुन सदरील काम बरोबर होणार नाही. त्यासाठी प्रस्ताव रिकॉलसाठी ठेवण्यात यावा.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव रिकॉलसाठी ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्तावित कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी.

**विषय क्र. ४२३/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजय नगर बायजीपुरा स्लम वार्ड-३१ मध्ये उर्वरित गल्ली मध्ये शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. ४,१२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते" या शिर्षकातुेन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १७-१२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु. ४,१२,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर बायजीपुरा स्लम वार्ड क्र. ३१ मध्ये उर्वरित गल्ली शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,१२,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "खांडकी रस्ते" या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२४/१२ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार सिटीचौक ते गुलमंडी मार्ग रंगारगल्ली ५० फुट रुंद रस्ता संपादन खाजगी वाटाघाटी ने करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (७७) नुसार मा. आयुक्तांनी गेल्या दोन-तीन वर्षापासुन तेथील नागरिकासोबत व अधिकाऱ्यांबरोबर ज्या बैठका घेतल्या त्या प्रमाणे सर्व मिळकत धारकांनी सदर रस्ता ४० फुट रुंद करावा. असा आग्रह धरला त्यानुसार १० फुट कमी करुन ४० फुट रुंद करण्यांत आला ही करतांना ७ सात फुट पुर्वेकडुन व ३ फुट पश्चिमेकडुन कमी करण्याचे ठरले. त्यानुसार प्रारुप विकास योजना औरंगाबाद शहर मध्ये हया रस्त्याची रुंदी ४० फुट केली आहे. त्यास विकास समिती व सर्वसाधारण सभेची मान्यताही मिळालेली आहे.

आता हा रस्ता त्वरेने करण्यासाठी ज्या बैठका घेण्यात आल्या त्या अनुषंगाने सदर रस्त्याचे बांधीत जागेस मिळकतदारास शिर्षसिध्द गणक १९९५ (शासकीय दर) त्या दराने मोबदला द्यावयाचे सर्वानुमते ठरले आहे.

सहाय्यक संचालक नगररचना मुल्यांकन औरंगाबाद यांचेकडे चौकशी केली त्यानुसार खुल्या जागेचा दर रु. ७०००/- प्रति चौ.मी. असा आहे. (सन १९९५) बांधीव

क्षेत्राचा मोबदला न देता सदर मिळकतीवरील बांधकाम काढुन घेण्यासाठी मिळकत धारकास रु. १३०/- प्रति चौ.मी. अतिरिक्त रक्कम देण्यांत ठरले आहे.

ज्यांना रस्ता रुंदीच्या बाधीत जागेचा मोबदला वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक पाहिजे असल्यास त्यांना (एफ.एस.आय.) देण्यांत येईल.

तरी वरीलप्रमाणे वाटाघाटीने जमिनीच्या मोबदल्यासाठी ठरलेल्या दरास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव स्थायी समिती पुढे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटीचौक ते गुलमंडी मार्गे रंगारगल्ली या ४० फुट रुंद रस्त्यामध्ये बाधीत जागेस मिळकतधारकांस १९९५ च्या शिघ्रसिध्द गणक (शासकीय दराने) खुल्या जागेचा दर प्रति चौ.मी. रु. ७०००/- व बांधकाम काढुन घेण्यासाठी बांधीव क्षेत्राचा मोबदला न देता रु. १३०/- प्रति चौ.मी. अतिरिक्त रक्कम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२५/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कासारी बाजार चौक वार्ड क्र. ४४ येथील रोडचे पुर्नरडांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक १६-८-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. १७५/३४ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ६,९३,३५०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/६५/९७ दि. ८-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (४) चार निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | ०५% | जास्त दराने |
| २. | मे. अहमद सिद्यीकी | १०% | जास्त दराने |
| ३. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ११% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०५% जास्त दराने मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा आहे.

तसेच सदरील कामासाठी ठेकेदराने निविदा भरतेवेळी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०५% जास्त दराने निविदा भरल्यामुळे त्यांना मा. आयुक्तांच्या दालनात दराच्या वाटाघाटीसाठी बोलवून वाटाघाटी अंती त्यांना अंदाजपत्रकाचे दरापेक्षा काम करण्यासाठी संमती दिलेले आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दराने मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कासारीबाजार चौक वार्ड क्र. ४४ मधील रोडचे पुर्नरडांबरीकरण करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२६/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठणगेट ते दलालवाडी भागातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. १६-१०-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २८३/३ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ७,५१,४००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८०/९७ दि. १३-११-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (४) चार निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा पत्रके दि. १०-१२-९७ रोजी उघडण्यांत आल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. चांदराम आशान्ना | २१% | कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १७.१५% | --//-- |
| ३. | मे. मॉस्कोट कंन्स्ट्रक्शन कं. | १५.८६% | --//-- |
| ४. | श्री. डॉ. अजितसिंग | १९.८८% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१% कमी दराची श्री. चांदराम आशान्ना यांची निविदा आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१% कमी दराने श्री. चांदराम आशान्ना यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट ते दलालवाडी भागातील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २१% कमी दराची श्री. चांदराम आशान्ना यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२७/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अर्थ संकल्पीय अंदाज सन ९७-९८,३०५५ मार्ग परिवहन ८०० इतर खर्च महानगरपालिका, यांना वाहतुक सुविधा अंतर्गत देण्यात येणार सहाय्य अनुदानातुन रस्ते रंगविण्याचे कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ४,२७,११०/- चे तयार

करण्यात आले असुन सदरचा खर्च राज्य शासनाकडुन मिळणाऱ्या ट्रॅफीक फंडातुन करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाहतुक सुविधा अंतर्गत देण्यात येणारे सहाय्यक अनुदानातुन रस्ते रंगविण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,२७,११०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च शासनाकडुन मिळणाऱ्या ट्रॅफिक फंडातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२८/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ जलतरण तलाव मनपा औरंगाबाइ एस.आर. १० क्लोरोईट खरेदी करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु. १,८०,९५०/- चे तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्तांची मंजुरी दि. ३०-९-९७ नुसार मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत (४) चार निविदापत्रके विक्री झाल्या त्यापैकी निविदापत्रके स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (३) तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. फैज इंटरप्राइजेस | ४.८०% | जास्त दराने |
| २. | मे. ॲक्वा केमीकल प्रोसेस | ७.८०% | --//-- |
| ३. | मे. वॉटर ट्रीटमेंट सव्हीसेस | ८% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया जास्त व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.८०% जास्त दराने मे. फैज इंटरप्राईजस यांची निविदा आहे.

तसेच सदरील कामाच्या ठेकेदाराने दर जास्त दिल्यामुळे त्यांना मा. आयुक्त साहेब यांच्या दालनात वाटाघाटीस बोलावून दराबाबत वाटाघाटी करुन ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिलेली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,८०,९५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम मे. फैज इंटरप्राईजेस यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलावासाठी एस.आर. १० क्लोरोट्राट खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रक धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच यासाठी येणाऱ्या र.रु. १,८०,९५०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२९/१७ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हिमायत बाग ते पानचक्की मुख्य जलनि:सारण वाहिनी सिव्हर बी-२ कामाकरिता अंदाजपत्रकीय र.रु. २४.८६ लक्ष स्थायी समिती ठराव क्र. ९९/४४ दि. २८-६-९७ प्रमाणे मंजुरी मिळालेली होती.

सदरील काम मेससन राणा कंन्स्ट्रक्शन यांना मिळालेले आहे. प्रत्यक्षात काम सुरु केले असता पुर्वी टाकलेली वाहिनीची पातळी (लेव्हल) या नविन वाहिनीशी मिळत नसल्यामुळे जुना वाहिनी काढुन परत टाकावीलागत आहे. याबाबीचा समावेश मुळ अंदाजपत्रकात नाही, तसेच सदरील वाहिनी खाम नदीच्या पात्रात असल्याने व जमिनीपातळीच्या वर येत असल्यामुळे त्यास कांक्रिट केसिंग करणे आवश्यक आहे.

वरील दोन्ही कारणास्तव अतिरिक्त बाब र.रु. ७८,०८२/- चे होत आहे, व वाढीव र.रु. ४,३८,६०६/- चे होत आहे. या खर्चास मा. आयुक्त साहेबांनी दि. ९-६-९६ प्रमाणे मंजुरी दिलेली आहे तरी सदरील प्रस्ताव स्थायी समिती समोर अतिरिक्त बाब अंदाजपत्रकीय दराने व वाढीव बाब पुर्वी मंजुर झालेल्या दराप्रमाणे ४०% जास्तीच्या दराने मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिमायत बाग ते पानचक्की मुख्य जलनि:सारण वाहिनी सिव्हर बी-२ च्या कामामध्ये पुर्वीच्या जलवाहिनीची पातळी (लेव्हल) मिळत नसल्यामुळे जुनी वाहिनी काढुन परत टाकावी, लागत असल्याने व सदर वाहिनी खाम नदीच्या पात्रात असल्याने कॉक्रीट केसींग करण्याचे अतिरिक्त कामामुळे अतिरिक्त बाब र.रु. ७८,०८२/- चे काम अंदाजपत्रकीय दराने व वाढीव र.रु. ४,३८,६०६/- चे काम पुर्वीच्या मंजुर दराने म्हणजेच अं.प. दरापेक्षा ४०% जास्त दराने पुर्वीचेच गुत्तेदार मे. राणा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३०/१८ :**

मा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहरातील आरोग्य केंद्र रुग्णालय व आरोग्य विभागासाठी लागणारी औषधी व साहित्य खरेदी करणे जरुरी आहे. या खरेदी करणेसाठी स्थायी समितीने दि. १३-२-९७ रोजी मंजुरी केलेल्या दरानुसार व मंजुर केलेल्या मंजुर पुरवठाधारक यांचे कडुन खरेदी करण्यास मंजुरी द्यावी.

| | मंजुर पुरवठाधारक | त्याचे मंजुर केलेले कमी दरपत्रक |
|---|---|---|
| १. | अल्ट फार्मासिटीकल्स, औरंगाबाद (वाळुज) | |
| २. | अश्विनी फार्मासिटीकल्स, औरंगाबाद | |
| ३. | किंकर ब्रदर्स गिरगांव, मंबई | |

या खरेदीस अंदाजपत्रकातील औषधी व साहित्य खरेदी या सदरातून अंदाजित केलेल्या रक्कमेमधुन रु. ४ लाख ५० हजार येणाऱ्या खर्चासह करणेसाठी मान्यता द्यावी. सदरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील आरोग्य केंद्र व रुग्णालय व आरोग्य विभागासाठी लागणारी औषधी व साहित्य खरेदी करण्यासाठी प्रस्तावातील अ.क्र. १ ते ३ च्या पुरवठा धारकांकडुन मंजुर केलेल्या दराने खरेदी करण्यास व यासाठी येणाऱ्या र.रु. ४ लाख ५० हजाराच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३१/१९ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. कबाडीपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अं.प. रक्कम रु. १०,९३,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकीच्या दरसुची ९६-९७ नुसार तयार करण्यात आले आहे. सदरील कामास स्थायी समिती विषय क्र. २९१/११ दि. १६-१०-९७ अन्वये मंजुरी मिळाली आहे. सदरील कामास जा.क्र. मनपा/लेखा/नि/८०/९७ दि. १६-१०-९७ अन्वये बी-१ नमुन्यात जाहिरात देवुन निविदा मागविल्या असता एकुण १२ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी २ निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. स. सुजात अली हाश्मी | ५% | अ.प. दरापेक्षा जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने मे. बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. सदरील कामास मा. आयुक्तांनी दि. १८-१२-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कबाडीपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी अंदाजपत्रकीय दराची मे. बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३२/२० :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भवानीनगर तक्षशिलानगर येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाच्या जिल्हा दरसुचीनुसार ९६-९७ नुसार अंदाजपत्रकीय र.रु. १८,४६,३००/- चे तयार करण्यात आले होते. सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभा दि. ४-१०-९७ ला विषय क्र. ८४/५ ने संमत झालेला आहे.

सदरील कामाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/७३/९७ दि. २३-१०-९७ अन्वये बी-१ नमुन्यात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकुण १६ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी फक्त (तीन) ३ निविदा प्राप्त झाल्या . त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल सलाम | ४.९९% | अं.प. दरापेक्षा जास्तीच्या दराने |
| २. | श्री. एलोरा कंन्स्ट्रक्शन | ७.३०% | --//-- |
| ३. | श्री. एस.ए.नवाब | ९.३०% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अं.प. दरापेक्षा ४.९९% जास्तीच्या दराने श्री. अब्दुल सलाम यांची निविदा आहे. परंतु सदरील दर जास्तीच्या असल्यामुळे सदरील ठेकेदारास दर कमी करण्यासाठी पत्र दिले असता त्यांना सदरील अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दिलेली आहे. सदरील दरास मा. आयुक्तांनी दि. १७-१२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी श्री. अब्दुल सलाम यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भवानीनगर तक्षशिलानगर येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. अब्दुल सलाम यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३३/२१ :**

मा. शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका वाचनालयाकरिता पुस्तके खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता सर्वाधिक सुट देणे बाबत सुट देणारी निविदा मागविणे आली होती. त्यानुसार पुस्तके खरेदी वरील सर्वाधिक सुट भाषेप्रमाणे आणि वाङःमयीन दर्जाप्रमाणे निश्चित केलेली आहे. सदरील दर मराठी १५% इंग्रजी १०% ऊर्दु १५% दिवाळी अंक १०% मराठी मासिके ५% बाल संदर्भिय ऊर्दु १०% आणि शासकीय प्रकाशने लॉबुक्स दुर्मिळ साहित्य करिता सुट नाही. परंतु ऊर्दु करिता अनुक्रमे १% ४% २% प्रमाणे सुट निश्चित केली आहे. उपरोक्त निश्चित केलेल्या दरांस अधीन राहुन व पुस्तक निवड समितीच्या शिफारशी प्रमाणे मराठी, उर्दु व विशेष वाचनालयाकरिता एकुण ६ लक्ष व शिक्षण विभागाकरिता १० हजार रुपयांची पुस्तके खरेदी करावयाची आहेत. सर्वसाधारण पणे त्याचे पृथःकरण या प्रमाणे आहे. मराठी/संदर्भिय ३ लक्ष, ऊर्दु १लक्ष, क्रमिक /संदर्भिय १लक्ष, इंग्रजी ७० हजार, हिंदी ३० हजार व शैक्षणिक साहित्याचा १० हजार याप्रमाणे पुस्तके खरेदी करावयाची आहेत. प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका वाचनालयाकरिता तसेच शिक्षण विभागाकरिता मराठी, ऊर्दु व हिंदी पुस्तके खरेदी करण्यास व त्याकरिता येणाऱ्या र.रु. ६ लक्ष च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३४/२२ :**

न.भु.क्र. ७९८६ ही संपुर्ण मिळकत आरक्षण क्रमांक रस्ता मोतीकांरजा ते मोंढा चौक या रस्त्याचे ही बाधीत आहे. या मिळकती लगतच्या दोन मिळकती महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत. सदर रोडने बाधित जागेचा मोबदला मिळणेसाठी मिळकत धारकांनी मागणी केलेली आहे.

सिध्द शिघ्रगणकानुसार या भागातील जमिनीचे दर घेऊन या प्रकरणी मुल्यांकन करता रस्त्याखालील बाधित १६९.०० चौ.मी. क्षेत्राचा रु. १२,०३,८७१/- निश्चित केले आहे. खाजगी वाटाघाटीमध्ये मिळकत धारकाने वरील मुल्याकंनास मान्यता दिली आहे. तसेच खरेदी खताचा खर्च मनपाने ५०% रक्कम रु. ६०,२५०/- वगळती करुन उर्वरित र.रु. ११,४३,६२१/- (रु. अकरा लाख त्रेचाळीस हजार सहाशे एकवीस फक्त) मिळकत धारक श्री. नगीनदास पन्नालाल २) रमनलाल पन्नालाल शहा ३) श्री. लालदास पन्नालाल शहा यांची जागा संपादन करुन त्यांना देण्याचे मान्यतेस्तव सादर तसेच खरेदी खताच्या खर्चाचा र.रु. १,२०,५००/- श्री.डी.डी. कालेले श.अ. यांना अग्रीम म्हणुन देण्यात यावी.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र. ७९८६ ही संपुर्ण मिळकत आरक्षण क्रमांक रस्ता मोतीकारंजा ते मोंढा चौक या रस्त्याचे बाधित आहे. या मिळकत लगतच्या दोन मिळकती मनपाच्या ताब्यात आहेत. या भागातील जमिनीचे दर घेऊन या प्रकरणी मुल्यांकन करता रस्त्या खालील बाधित १६९.०० चौ.मी. क्षेत्राचा रु. १२,०३,८७१/- निश्चित केला आहे. याबाबत खाजगी वाटाघाटीमध्ये मिळकत धारकाने वरील मुल्यांकनास मान्यता दिली आहे. तसेच खरेदीचा ५०% खर्च रु. ६०,२५०/- वळती करुन उर्वरित र.रु. ११,४३,६२१/- (अक्षरी रु. अकरा लाख त्रेचाळीस हजार सहाशे एकवीस फक्त) मिळकतधारक १) श्री. नगिनदास पन्नालाल २) रमनलाल पन्नालाल शहा ३) श्री. लालदास पन्नालाल शहा यांची जागा संपादन करुन खरेदी खताची रक्कम रु. १,२०,५००/- श्री. डी.डी. कालेले, शाखा अभियंता यांनी अग्रीम देण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३५/२३ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. मनोज रमेश पाटील यांनी ज्युबली पार्क पाण्याच्या टाकी जवळील मनपा निवासस्थानाचे पश्चिमेकडील जागेपैकी २०x३० या आकाराची जागा दिर्घ मुदतीवर निवासस्थानासाठी मिळणे बाबत विनंती केली आहे.

सदरील प्रकरणात शहर अभियंता, सहाय्यक संचालक नगर रचना व कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांनी कळविले आहे, (ईएसआर) च्या क्षेत्राचे बाहेर असुन तेथे कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव विकास योजनेत येत नाही.

यापुर्वी मयत कर्मचारी यांचे वारसाचे अशा प्रकारे जागा दिलेली नाही याबाबत ठरलेले नाही. अथवा बी.पी. एम.सी. नियमाने तरतुद नाही. बेघर मनपा कर्मचारी यांचे वारस म्हणुन स्थायी समितीने विचार केल्यास सहाय्यक संचालक नगररचना ठरविल त्या भाडयाने व जागा दिल्यास शासनाने मंजुरी घ्यावी लागेल या बाबत मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. विकास जैन श्री. भगवान घडामोडे श्री. अभिमन्यु भालेराव :** श्री. मनोज रमेश पाटील यांनी जागेचा ताबा देऊन नंतरच शासनाकडे प्रस्ताव पाठवावा.

**सभापती :** विशेष बाब म्हणुन संबंधीत नियमाप्रमाणे जागेचा ताबा देण्यात यावा व प्रस्ताव शासनाकडे मजुरीस्तव पाठवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. मनोज रमेश पाटील यांनी ज्युबलीपार्क पाण्याच्या टाकीजवळील मनपा निवासस्थान पश्चिमेकडील जागेपैकी २०X३० या आकाराची जागा दिर्घ मुदतीवर निवासस्थानासाठी मिळणेबाबत विनंती केली. मयत मनपा कर्मचारी यांचे वारसाचे अशा प्रकारे जागा दिलेली नाही. अथवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात याबाबत तरतुद नाही. तरी बेघर मनपा कर्मचारी यांचे वारस म्हणुन सहा. संचालक नगर रचना विभाग यांनी जागेचा भाडे ठरवुन ताबा देणे बाबत कार्यवाही करावी. व विशेष बाब म्हणुन शासनाकडे मंजुरीस्तव प्रस्ताव पाठविण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३५-अ/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. राजनगर (शहानुरवाडी) येथे आयुर्वेदिक दवाखाना बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. १७५/१३ दि. १९-१२-९६ अन्वये रक्कम रु. ६,६५,४४०/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली असून ठराव क्र. ११/१० दि. २९-४-९७ अन्वये सदरील कामाचे अंदाजपत्रक दरापेक्षा ६.२१% कमी दराने स्थायी समितीची मान्यता मिळाली असुन सदर कामाचे कार्यादेश ही देण्यात आले आहे. सदर काम चालु असतांना इमारतीचे नकाशेमध्ये त्या प्रभागाचे स.नगरसेवक मा. आयुक्त, इमारतीचे वास्तु विशारद, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे सहमतीने नकाशामध्ये बदल केल्याने बांधकामाचे क्षेत्रात वाढ झाली. त्यास मा. आयुक्त यांनी त्या वाढीचे अंदाजपत्रकास दि. २६-१२-९७ रोजी रु. २.९०/- ६,६५,४४०=९,५५,४४०/- लाख स्थायी समिती समोर सादर करणे बाबत मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. ९,५५,४४०/- यांस व मंजुर निविदेतील गुत्तेदार मे. एस.एच. असोशियेटस् यांचेकडुन निविदा दरानुसार काम करुन घेण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राजनगर (शहानुरवाडी) येथे आयुवैदिक दवाखाना बांधणेच्या कामामध्ये नकाशात बदल केल्यामुळे बांधकाम क्षेत्रात वाढ झाल्यामुळे वाढीव अंदाजपत्रक र.रु. २ लाख ९० हजार व मुळ अंदाजपत्रक र.रु. ६,६५,४४०/- असे एकुण ९,५५,४४०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम मुळ गुत्तेदार मे. एस.एच. असोशिएटस् यांचेकडुन निविदा दरानुसार करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३६/२५ :**

चिकलठाणा, औरंगाबाद येथील आठवडी बाजार पुर्वीच्या प्रशासकीय ठराव क्र. २६२ दि. ४-१-९४ अन्वये ६ एकर जागा गट नं. ४१० चिकलठाणा मधील घेण्याबाबत मान्यता

मिळाली होती. परंतु ठराव क्र. २२२ दि. ६-४-९५ अन्वये त्यावेळी ३ एकर जागा घेण्यात आली. आता प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती तेथील नागरिक व स.सदस्य यांचे मागणीनुसार उर्वरित ३ एकर जागा घेणे आवश्यक आहे. तरी सदर ३ एकर वाढीव हद्दीची जागा घेण्याबाबत संबंधीत मिळकत धारक यांना ३१-७-९७ रोजी वाटाघाटीस्तव बोलविले असता मिळकत धारकाने चालु शिघ्र गणकाचे दराने जागा महानगरपालिकेस देण्याचे मान्य केले आहे.

वाटाघाटी प्रमाणे मिळकत धारक १) श्री. मोहंमद रजा खॉन पिता गेसुदरास खॉन २) श्री. मोहंमद युसुफ खॉन पिता मोहंमद गेसुदरास खॉन ३) श्रीमती तैयुबुन्निसा बेगम भ्र. सिराज अहेमद खॉन ४) श्रीमती प्यारी बेगम भ्र गेसुदरास खॉन यांना मिळकतीचा मोबदला रु. ९,७४,८३६/- द्यावा लागेल करिता जमीन मुल्य व जमीन संपादनाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मान्येनंतर रितसर नोंदणीकृत दस्तऐवजाने जमीन हस्तांतरीत करुन घेण्यात येईल. नोंदणीकृत दस्तऐवजाकरिता/ खरेदी खता करिता येणारा खर्च एकुण रुपये ९७,७००/- महापालिका करणार आहे. करिता शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणुन देण्यात यावी.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद**

**श्री. कचरु नवपुते :** मो. चिकलठाणा औरंगाबाद येथील आठवडी बाजारातील गट नं. ४१० मधील ३ एकर जागा घेण्याचा प्रस्ताव मंजुर झालेला होता पैकी ३ एकर जागा सन १९९५ मध्ये घेण्यात आली होती उर्वरित ३ एकर जागा त्याच जुन्या दराने व रजिस्ट्रीच्या खर्चासहित मनपाने घ्यावी असे या प्रस्तावात नोंद घ्यावी व एका मिळकत धारकाचे नांव सुटलेले आहे ते कुतुबउन्नीसा बेगम भ्र. महेमुद उर रहेमान ही दरुस्ती प्रस्तावात करावी.

**श्री. अ. रशिद खॉन (मामु) :** स.स.श्री. कचरु नवपुते यांनी जो तोंडी प्रस्ताव मांडलेला आहे. त्यास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे स.स.श्री. सुचित केल्याप्रमाणे प्रस्तावानुसार ३ एक जागा जुन्या दराने सन १९९५ ला ज्या दराने घेण्यात आलेली होती. त्याच दराने व रजिस्ट्रीच्या संपुर्ण खर्चासह मनपाने कार्यवाही करावी. व संबंधित जमीन मालकास तातडीने पैसे अदा करावे. व वाटाघाटीसाठी संबंधित मिळकत धारकांस बोलाविले असता त्यांनी नविन दराने घेण्याचे नाकारले आहे. करिता जुन्याच दराने घेण्याची मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा औरंगाबाद येथील आठवडी बाजार पुर्वीच्या प्रशासकीय ठराव क्र. २६२ दि. ४-१-९४ अन्वये ६ एकर जागा गट नं. ४१० मधील घेण्याचा प्रस्तावास मान्यता मिळालेली होती. परंतु मनपाचा ठराव क्र. २२२ दि. ६-४-९५ अन्वये त्यावेळी ३ एकर जागा घेण्यात आली. आता प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती व स.स. यांच्या मागणीनुसार उर्वरित ३ एकर जागा घेणे आवश्यक आहे. वाटाघाटी प्रमाणे मिळकत धारक १) श्री. मोहंमद रजाखॉन पिता गेसुदरास खॉन २) श्री. मोहमंद युसुफखॉन पिता महंमद गेसुदरास खॉन ३) श्रीमती तैयुबुन्नीसा बेगम भ्र सिराज अहमद खॉन ४) श्रीमती प्यारी बेगम भ्र. गेसुदरास खॉन ५) कुतुबउन्नीसा बेगम भ्र महेमुद उर रहेमान यांना मिळकतीचा मोबदला जुन्याच दराने म्हणजे सन १९९५ ला ३ एकर जागा ज्या दरान्वये घेण्यात आली.

त्याच दरान्वये उर्वरित रितसर जागा मिळकत धारकांकडुन मनपाने घेऊन रितसर नोंदणीकृत दस्त ऐवजाने जमीन हस्तांतरण करुन घेण्यासाठी खरेदी खताकरिता येणारा रजिस्ट्री सहीत खर्च मनपाने अदा करण्यास लागणारा सर्व खर्च शाखा अभियंता श्री. काळेले यांचे नांवे अग्रीम देण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३७/२६ :**

उप आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विभागातील मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे पद रु. २०००-३५०० या संवर्गात आहे. सदरील पद तांत्रिक पद असुन उप-अभियंता संवर्गाप्रमाणे रुपये २२००-४००० ही वेतनश्रेणी सदरी पदाचा वाढता व्याप व कार्य तसेच शहर औद्योगिक पट्ट्यातील अपघात अनुसरुन तात्काळ निर्णय घेण्यासाठी अग्निशमन विभागातील २४ तास सेवेमधील मुख्य अग्निशमन अधिकारी या पदास रु. २२००-४००० ही वेतनश्रेणी वर्ग-१ चा दर्जासह देण्याची शिफारस करण्यात येते.

सदरील वाढीमुळे मनपावर फार आर्थिक बोजा पडणार नाही. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे पद रु. २०००-३५०० या संवर्गात आहे. सदरील पद तांत्रिक ही वेतनश्रेणी सदरील पदाचा वाढता व्याप व कार्य तसेच शहर व औद्योगिक पट्ट्यातील अपघातास अनसुरुन तात्काळ निर्णय घेण्यासाठी अग्निशमन विभागातील २४ तास सेवेमधील मुख्य अग्निशमन अधिकारी या पदास रु. २२००-४००० ही वेतनश्रेणी वर्ग-१ च्या दर्जासह देण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३८/२७ :**

उप आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कामगार अधिकारी हे पद रु. २००० ते ३५०० या वेतनश्रेणीत आहे महानगरपालिकेचा वाढता कामाचा व्याप व वाढते कार्यक्षेत्र लक्षात घेता व प्रस्तावित पदाच्या कामाच्या जबाबदाऱ्या लक्षात घेऊन विभागीय अधिकारी व इतर अधिकारी यांना रु. २२०० ते ३७०० वाढीव वेतन श्रेणी लागु करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर कामागार अधिकारी या पदास वाढीव वेतनश्रेणी रु. २२०० ते ३७०० लागु करण्यास स्थायी समितीची मान्यता देण्यात यावी.

सदरील पदास वाढीव वेतनश्रेणी दिल्यास महानगरपालिकेवर फार आर्थिक बोजा पडणार नाही.

करिता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**मा. सभापती :** मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा अस्थापनेवरील कामगार अधिकारी हे पद रु. २००० ते ३५०० या वेतनश्रेणीत आहे. महानगरपालिकेचा वाढता व्याप लक्षात घेत व प्रस्तावित पदाच्या कामाच्या जबाबदाऱ्या लक्षात घेऊन विभागीय अधिकारी व इतर अधिकारी यांना रु. २२०० ते ३७०० वाढीव वेतनश्रेणी लागु करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर कामगार अधिकारी या पदास वाढीव वेतनश्रेणी रु. २२०० ते ३७०० लागु करण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३९/२८ :**

उप आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी प्रकल्प विभाग महानगरपालिका तर्फे विविध वसाहतीमध्ये एकुण १३ अभ्यासिका साठी क्रमिक पुस्तके खरेदीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. खालील एजन्सीज मार्फत तीन निविदा प्राप्त झाल्यात १) ज्योती प्रकाशन २) व्यंकटेश बुक सेंटर ३) स्कॉयलाईन, औरंगाबाद निविदा धारकांना मा. आयुक्तांच्या दालनात दि. २४-१२-९७ रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यांत येऊन आयुक्तांनी खालील प्रमाणे पुस्तक खरेदीसाठी दरांना मान्यता दिली आहे. तपशील खालील प्रमाणे

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | | निविदा दर. | वाटाघाटीनंतर प्रस्तावित दर. |
|---|---|---|---|---|
| १. | ज्योती प्रकाशन | १. क्रमिक पुस्तके<br>२. इनसायक्लोपिडीया<br>३. अभियांत्रीकी | ७%<br>१६%<br>१०% | ७%सुट<br>१६%सुट<br>१०%सुट |
| २. | व्यंकटेश बुक सेंटर | १. इयर बुक<br>२. सामन्य ज्ञान<br>३. कला,वाणिज्य, विज्ञान पदवी पुस्तके | १५.७५%<br>१५.७५%<br>१०.५०% | १६%सुट<br>२०%सुट<br>११%सुट |
| ३. | स्कायलाईन | १. क्रमिक बुक्स<br>२. इनसायक्लोपिडीया<br>३. इयर बुक्स<br>४. सामान्य ज्ञानाची<br>५. शाखा : कलाप्रथम व्दितीय, तृतीय वर्ष<br>६. वाणिज्य : प्रथम व्दितीय, तृतीय वर्ष.<br>७. विज्ञान : प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष<br>८. अभियांत्रिकी | ५.५%<br>१०.०१%<br>१०.०१%<br>१०.०१%<br><br>५.५%<br><br>५.५% | मुळ दर कायम आहेत. त्यामुळे खरेदी प्रस्तावित नाही. |

वाटाघाटीत कमी करण्यांत आलेल्या दर मान्य झाल्यास रु. २,७५,०००/- चे ग्रंथ खरेदी करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १९९७-९८ या आर्थिक वर्षासाठी प्रकल्प विभागातर्फे विविध वसाहतीमध्ये चालविण्यात येणाऱ्या अभ्यासिकांकरिता क्रमिक पुस्तके खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी वाटाघाटीत ठरल्यानुसार अ.क्र. १) ज्योती प्रकाशन यांचेकडुन क्रमिक पुस्तके, इनसायक्लोपिडिया, अभियांत्रिकीची पुस्तके आणि अ.क्र. २) व्यंकटेश बुक सेंटर यांचेकडुन इयर बुक, सामान्य ज्ञान, कला, वाणिज्य, विज्ञान पदवी पुस्तके खरेदी करण्यासव तसेच सदरील खरेदीसाठी येणाऱ्या र.रुपये २,७५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४०/२९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. राजीव गांधीनगर येथे १५० व २५० मी.मी. व्यासाची जलनि:सारण वाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९४-९५ व ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ५,९३,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेल्या असुन सदरील विशेष शासकीय अनुदान मधुन करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. तसेच या भागातील नागरिक अत्यावश्यक सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता उपोषण केले होते. त्या अनुषंगाने यापुर्वी सदरील कामाचा एक भाग म्हणुन स्थायी समिती रु. २.०० लाखाचे कामास उपलब्ध ठेकेदाराकडुन काम करुन घेण्यास मान्यता दिली होती. व त्यानुसार रु. २.०० लाखाचे काम श्री. जी.आर. घोडेले यांना देण्यात आले होते व या प्रस्तावानुसार काम रु. ३,९३,०००/- चे अंदाजपत्रक मंजुर करुन कामाची तातडी लक्षात घेता त्याच गुत्तेदाराकडुन करुन घ्यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. राजीवगांधीनगर येथे १०० ते २५० मी.मी. व्यासाची जलनि:सारण वाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९४-९५ व ९५-९६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ३,९३,०००/- चे अंदाजपत्रक तयार केले होते. यापुर्वी रु. २.०० लाखाचे कामास दि. १३-८-९७ च्या स्थायी समितीने मंजुरी दिली होती व काम सुरु असुन त्याच अंदाजपत्रकापैकी राहिलेल्या उर्वरित वाढीव रक्कम रु. ३,९३,०००/- च्या खर्चास "विशेष शासकीय अनुदानातुन" आहे तेच गुत्तेदार श्री. जी.आर. घोडेले यांचेकडुन काम करुन घ्यावे जेणे करुन संबंधीत भागातील नागरीकांनी केलेले उपोषण व कामाची निकड लक्षात घेता काम लवकर होईल. सदरील अंदाजत्रकास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४१/३० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, स्लुस व्हॉलव खरेदी करण्याकरिता रु. ५,२०,६४०/- ची निविदा काढण्यात आली त्यामध्ये खालील प्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. विजय इंटरप्रायजेस | ०.५४% | कमी दराने |
| २. | मे. सुरज इटरप्रायजेस | ०.०४% | --//-- |

तुलना केली असता मे. विजय इंटरप्रायजेस यांची निविदा सर्वात कमी दराची आहे. मे. सुरज इंटरप्रायजेस यांनी कार्यालयात इंडियन व्हॉन्व इंटरनॅशनल, नाशिक यांचे पत्र सादर केलेले आहे की, मे सुरज इंटरप्रायजेस हेच आय.व्ही. कंपनीचे अधिकृत वितरक आहेत.

मे. विजय इंटरप्रायजेस यांची निविदा सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५४% कमी दराची असुन ते माल पुरवठा करण्यास तयार असल्याने मे.विजय इंटरप्रायजेस यांची निविदा मंजुर करणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्लुस व्हॉलव खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५४% कमी दराची मे. विजय इंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. जर मे. विजय एन्टरप्रायजेस यांनी आय.व्ही.आय ब्रॅडचे स्लुस व्हॉलव पुरवठा केला नाही. तर मे. सुरज एन्टरप्रायजेस कडुन खरेदी करण्यांत यावी.

**विषय क्र. ४४२/३१ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नेहरुनगर कटकटगेट रुग्णालयाचे विद्युतीकरण करणे करिता रु. २,९३,५००/- चे अंदाजपत्रक सन ९७-९८ च्या जिल्हा दरसुचिनुसार सा.बां. अन्वये तयार करण्यात आले आहे. सदर काम खर्च "व्यापारी संकुले व उर्वरित इमारती" या लेखा शिर्षाखाली करण्यात आला होता. परंतु तरतुदी अभावी सन ९८-९९ च्या तरतुदी मधुन प्रस्तावित खर्च करण्याच्या अटी मान्यता मा. आयुक्तांकडुन मिळाली आहे.

तरी नेहरुनगर कटकटगेट रुग्णालयाचे विद्युतीकरण करणे करिता रु. २,९३,५००/- अंदाजपत्रकीय खर्च स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुनगर कटकटगेट रुग्णालयाचे विद्युतीकरण करणे तयार करण्यात आलेल्या र.रु. २,९३,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "व्यापारी संकुले व उर्वरित इमारती" या लेखा शिर्षाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४३/३२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. गारखेडा परिसरातील सर्व्हे नं. ७ (सी.टी.एस.नं. १५२९६) मधील खुल्या जागेस संरक्षित तार कुंपण करावयाचा अंदाजपत्रकास स्थायी समितीने ठराव क्र. १३/१२ च्या अन्वये मंजुरी घेण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ४०/९७ दि. ६-६-९७ व्दारे वर्तमान पत्रात जाहिरात देऊन "बी-१" निविदा नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१५) पंधरा

विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण (३) तीन निविदा प्राप्त झाल्या. त्या खाली प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. स.खर्शिद हसन | ०.१४% | कमी दराने |
| २. | श्री. एस.एम. मंडोरे | २% | जास्त दराने |
| ३. | श्री. अमित नटवरलाल पटेल | ३% | --//-- |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. स.खुर्शिद हसन गुत्तेदार यांची अं.प. रु. १,६२,२००/- दरापेक्षा ०.१४% कमी दराची आहे. करिता प्रस्ताव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गारखेडा परिसरातील स.नं. ७ (सि.टी.एस.नं. १५२९६) मधील खुल्या जागेस तार कुंपण करण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.१४% कमी दराची श्री. खुर्शीद हसन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४४/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अजित दालमिल ते जिन्सी चौक रेगंटीपुरा मुख्य रस्त्यावर सोडीयम व्हेपर फिंलीग बसविणे करिता अंदाजपत्रकीय र.रु. २,३७,४२९/- सदर कामाकरिता जा.क्र. मनपा/लेखा/नि/६५/९७ दिनांक ८-१०-९७ प्रमाणे एकुण चौदा निविदा विकल्या गेल्या पैकी एकुण चार मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या दि. ७-११-९७ रोजी मा. लेखाधिकारी यांचे दालनात उघडण्यांत आल्या तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. परवेज इलेक्ट्रीकल्स | ०९% | कमी दर |
| २. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ५% | जास्त दर |
| ३. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | | अंदाजपत्रकीय दर |
| ४. | मे. सुरेश इलेक्ट्रीकल्स | ५% | जास्त दर |

वरील प्राप्त एजन्सीच्या निविदापैकी एजन्सीचे दर्शविलेल्या दरापेक्षा कमी असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९% कमीचे दर्शविलेले आहेत.

तरी मा. आयुक्त यांचे आदेशानुसार मे. परवेज इलेक्ट्रीकल्स यांचे निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९% ने कमी आहे. तरी अजितदालमिल ते जिन्सी चौका पर्यंत सोडीयम फिटींग बसविणे करिता अंदाजपत्रकीय र.रु. २,३७,४२९/- मे. परवेज इलेक्ट्रीकल्स ०.९% कमी असलेली दरनिविदा स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अजित दालमिल ते जिन्सी चौक रेंगटीपुरा मुख्य रस्त्यावर सोडीयम व्हेपर फिटींग बसविणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात

कमी व अं.प. दरापेक्षा ०.९% कमी दराची मे. परवेज इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४५/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोंढा ते निजामगंज सोडीयम फिटींग बसविणेकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,९७,७००/- सदर कामाकरिता जा.क्र./लेखा/नि/६५/९७ दिनांक ८-१०-९७ प्रमाणे मागविण्यात आलेल्या पैकी खालील पाच एजन्सीच्या निविदा प्राप्त होवून दि. ७-११-९७ रोजी मा. लेखाधिकारी यांचे दालनात उघडण्यांत आल्या तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. सुरेश इलेक्ट्रीकल्स | ०.५% | कमी दर |
| २. | मे. बिटा इलेक्ट्रीकल्स | ३% | कमी दर |
| ३. | मे. कॅपको एजन्सीज | २% | जास्त दर |
| ४. | मे. सुवर्णा इलेक्ट्रीकल्स | ५% | जास्त दर |
| ५. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ०.३% | कमी दर |

वरील प्राप्त एजन्सीच्या निविदा पैकी मे. बिटा इलेक्ट्रीकल्स यांचे निविदेचे दर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा इतर एजन्सीने दर्शविलेले दरापेक्षा ही कमीचे असुन ३% कमी दर्शविलेले आहेत.

तरी मा. आयुक्त यांचे आदेशानुसार मोंढा ते निजामगंज रोडवर सोडियम फिटींग लावणे करिता अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा रुपये ४,९७,७००/- ३% कमी असलेली मे. बिटा इलेक्ट्रीकल्स यांची कमी दर निविदा स्थायी समिती समोर मान्येस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोंढा ते निजामगंज सोडीयम फिरींग बसविणे करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३% कमी दराची मे. बिटा इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४६/३५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला की, महावीर चौक ते रेल्वेस्टेशन या १०० रस्त्याचे रुंदीकरण (खडीकरण) करुन पुलाचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी दि. १९-१०-९६ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. १२२/४ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ११,२५,०५०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचनेव्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजत्रकीय दरापेक्षा २९.०१८% कमी दराने श्री. निसार अहमद यांचे निविदेस दि. १४-३-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ९ अन्वये मान्यता मिळाली आहे.

तसेच सदरचे काम करण्यासाठी मुळ अंदाजपत्रकात दुमीर हॉस्पीटल समोरिल पुलाचे काम व आर.टी.ओ. ऑफीसजवळच्या पुलाचे बांधकाम करणेसाठी ९०० एम.एम. व १२०० जाडीचे आर.सी.सी. पाईपची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु काम करते वेळी तेथे प्रत्यक्षात रस्त्याच्या पुर्व बाजुस जलवाहिनी तसेच उप जलवाहिनी टाकलेली आहे त्यामुळे तेथे पाईप टाकुन पुलाचे बांधकाम करणे अशक्य आहे. त्या साठी रस्त्याच्या दोन्ही बाजुस दगडी भिंत बांधुन त्यावर स्लॅब टाकणे जरुरीचे आहे.

परंतु मुळ अंदाजपत्रकात रस्त्याच्या दोन्ही बाजुस दगडी भिंत बांधण्यासाठी तरतुद नसल्यामुळे सदरील कामासाठी अतिरिक्त बाब र.रु. १,४२,५००/- चे तयार करण्यात आलेले आहे.

तरी वरील प्रमाणे काम करण्यासाठी अतिरिक्त बाब र.रु. १,४२,५००/- ला मंजुरी मिळणेस्तव व सदरील काम हे मुळ ठेकेदार श्री. निसार अहमद यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीर चौक ते रेल्वस्टेशन या १०० फुट रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे कामामध्ये रस्त्याच्या पुर्व बाजुस जलवाहिनी च्या वरुन दगडी भिंत बांधुन स्लॅब टाकणेच्या कामाची वाढ झाल्याने या कामाकरिताचे र.रु. १,४२,५००/- च्या वाढीव अंदाजपत्रकास तसेच सदरील काम गुत्तेदार श्री. निसार अहमद यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४७/३६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समर्थनगर स्मशानभुमीत सुविधा उपलब्ध करण्याच्या अंदाजपत्रकास स्थायी समितीने ठराव क्र. २३४/३३ च्या अन्वये मंजुरी घेण्यात आली असुन कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८४/९७ दि. १३-११-९७ व्दारे वर्तमान पत्रात जाहिरात देऊन "बी-१" निविदा नमुन्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण (१०) निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (३) तीन निविदा प्राप्त झाल्या व त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.ए. नवाब | ०.०३% | कमी |
| २. | श्री. एस.ए. देशमुख | ४% | जास्त |
| ३. | श्री. स.सुजात अली हरश्मी | ६% | जास्त |

सदर निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. एस.ए.नवाब गुत्तेदार यांची अंदाज पत्रकीय रु. ४,०६,१५०/- दरापेक्षा ०.०३% कमी दराची आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर स्मशानभुमीत सुविधा उपलब्ध करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा

०.०३% कमी दराची श्री. एस.ए.नवाब यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४८/३७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. गरमपाणी धोबीघाट येथे खोल्या बांधणे व इतर कामे करण्यासाठी मा. स्थायी समिती दि. २७-६-९७ ठराव क्र. १२९/२२ अन्वये र.रु. ८,७५,९८४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/६१/९७ दि. २३-९-९७ अन्वये बी-१ नमुन्यात अंतिम तारखेपर्यंत एकुण कोऱ्या (१७) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (७) निविदा प्राप्त झाल्या. त्या दि. २०-१०-९७ रोजी गुत्तेदारासमक्ष उघडल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुजात अली हाश्मी | ७% | कमी दराने |
| २. | श्री. मोहमंद सलीम | २२% | कमी दराने |
| ३. | श्री. एस.एम. मंडोरे | २३.८६% | --//-- |
| ४. | श्री. मे. कंम्फर्ट कंन्स्ट्रक्शन | २६.०७% | --//-- |
| ५. | श्री. श्री. ए.एम. फारुकी | २०.२१% | --//-- |
| ६. | श्री. मे. बी.एस. कंन्स्ट्रक्शन | २५.२% | --//-- |
| ७. | श्री. एस.ए. नवाब | १७.५३% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.०७% कमी दराची मे. कंम्पर्ट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. सदरील प्राप्त कमी दरात मा. आयुक्त यांनी दि. २४-१२-९७ अन्वये मंजुरी देऊन प्रस्ताव स्थायी समितीमध्ये सादर करण्यासाठी शिफारस केलेली आहे.

सबब तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.०७% कमी दराची मे. कंम्पर्ट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गरमपाणी धोबीघाट येथे खोल्या बांधणे व इतर कामे करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २६.०७% कमी दराची मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४९/३८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चिकलठाणा येथील जुनी व्यायामशाळा तोडुन त्या ठिकाणी नविन आर.सी.सी. इमारत बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. ५,०९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सन ९७-९८ या वर्षातील विकास इमारती शाळा दवाखाने बांधणे या लेखातील तरतुद संपल्यामुळे सुधारित अंदाजपत्रकात वाढीव तरतुदीचे

अधिन राहुन मा. आयुक्तांनी स्थायी समितीसमोर सादर करण्याबाबत दि. २७-१२-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी र.रु. ५,०९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती शाळा दवाखाने बांधणे लेखा शिर्षामधुन सुधारित अंदाजपत्रकात सन ९७-९८ वाढवुन दिलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. चिकलठाणा येथील जुनी व्यायामशाळा तोडुन त्या ठिकाणी नविन आर.सी.सी. इमारत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ५,०९,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च विकास इमारती शाळा दवाखाने लेखाशिर्षामधुन सुधारित अंदाजपत्रकीय तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५०/३९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आमखास मैदान येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधवयाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार र.रु. २०.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. ११७/३ दि. २०-९-९६ अन्वये मान्यता दिलेली होती. त्यानुसार जा.क्र. मनपा/लेखा/नि/४/९७ दि. ९-१-९७ अन्वये निविदा मागविल्या असता मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचे ७.७८६% सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झाली. त्यास मा. स्थायी समितीने ठराव क्र. ६६४/११ दि. १३-२-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील मंजुर रक्कमेत ग्राउंड फ्लोअर अप्पर लेव्हलचे आ.सी.सी. स्ट्रक्चरन पुर्ण झ ालेलेग आहे. तरी सदरील इमारत उपयोगात आणण्याकरिता ग्राउंड फ्लोअर अप्पर लेव्हलचे आर.सी.सी. स्ट्रक्चर पुर्ण झालेल्या हद्दी पर्यंत ११ खोल्या २ टॉयलेट व जिना इत्यादी कामे पुर्ण करणे आवश्यक आहे या शिवाय इमारत पुर्ण होऊन वापरात येणार नाही सदरील कामे पुर्ण होण्याच्या दृष्टीने ९.९५ लाखाची वाढीव तरतुद आवश्यक आहे. सदरील रक्कमेस मा. आयुक्त यांनी दि. २४-१२-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

करिता अंदाजपत्रक २०-९-९५= २९.९५ लक्षचे अंदाजपत्रक मुळ निविदा दर ७.७८६% कमी सन ९५-९६ च्या मुळ मंजुर अंदाजपत्रकाच्या दराप्रमाणे मुळ गुत्तेदार मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन करुन घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधण्याच्या कामामध्ये इमारत वापरात आणण्याचे दृष्टीने आर.सी.सी. स्ट्रक्चर पुर्ण झालेल्या हद्दीपर्यंत ११ खोल्याश २ टॉयलेट व जिना इ.कामे पुर्ण करणेच्या दृष्टीने वाढीव कामाचे अंदाजपत्रक र.रु. ९,९५ लाख तसेच मुळ अंदाजपत्रक र.रु. २० लाख असे एकुण २९.९५ चे सुधारित अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम मुळ निविदाधारक मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन मंजुर दराने म्हणजेच ७.७८६% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५१/४० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, तक्षशीलनगर येथे १५० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र.रु. २,९८,५००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवुन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २००/२५ दि. ३-१०-९७ अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे. दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण चार (४) निविदा कोऱ्या विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुरेश बी. साधवानी | ५.५०% | जास्त |
| २. | मे. सफुरा इंन्टरप्रायजेस | ०.१०% | जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मक दृष्टया कमी दर हा मे. सफुरा इंटरप्रायजेस यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी असा दर दिलेला आहे.

तरी मे सफुरा इंटरप्राजेस यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तक्षशीलनगर येथे १५० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दरापेक्षा ०.१०% कमी दराची मे. सफुरा इंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५२/४१ :**

मा. शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा अंतर्गत असलेल्या शाळेसाठी व स. नगरसेवकांच्या वार्डातील किंवा इतरत्र मागणी नुसार क्रिडा साहित्य खरेदी करावयाचे त्यासाठी १९९७-९८ च्या वार्षिक तरतुदीमधुन अंदाजे दीड लाखाचे क्रिडा साहित्य शाळेसाठी व स. नगरसेवकाच्या मागणीनुसार स्वेच्छा निधीतुन करण्यात येईल.

यासाठी एकुण चार निविदा प्राप्त झाल्या.

१. मे. इंटरनॅशन स्पोर्टस ॲन्ड सायटिफिक हाऊस निराला बाजार औरंगाबाद.
२. मे. फरा इंटरप्राईजेस.
३. मे. आर.एल. दौलताबादकर
४. मे. सिलव्हर स्पोर्टस आहेत.

सिलव्हर स्पोर्टस

| अ.क्र. | वस्तुचे नांव | किंमती |
|---|---|---|
| १. | शॉपटपुट - ८ पौडं | १००/- |
| २. | शॉटपुट : १२ पौडं | १५०/- |

मे. इंटरनॅशनल स्पोर्टस

| | | |
|---|---|---|
| १. | लेझीम | २०.०० |
| २. | डबल्स | २५.०० |
| ३. | घुगरु काठी | १५.०० |
| ४. | टेनीक्वाईट रिंग (स्पंच) | १२.०० |
| ५. | उडया मारण्याच्या दोऱ्या (कॉ.) | ३०.०० |
| ६. | थाळी (एक किलो) | १४०.०० |
| ७. | थाळी (दिड किलो) | १८०.०० |
| ८. | कॅरमबोर्ड (मोठा) | ४३०.०० |
| ९. | सिथेटीक फुटबॉल | २४०.०० |
| १०. | फुटबॉल बुट | २८०.०० |
| ११. | फुटबॉल स्टॉफिंग (नॉयलोन) | ३८.०० |
| १२. | व्हॉलीबॉल सिथोटिक | २३०.०० |
| १३. | व्हॉलीबॉल लेदर | २७०.०० |
| १४. | व्हॉलीबॉल नेट (कॉटन) | १४५.०० |
| १५. | व्हॉलीबॉल पोल (जोडीस्टील) | १०५०.०० |

आर.एल. दौलताबादकर

| | | |
|---|---|---|
| २२. | व्हॉसल (प्लॉस्टिक) | ६६.०० |
| २०. | मजरींग टेप (५० मीटर) | १५०.०० |
| ४२. | हॉकी ग्लोज | २९०.०० |
| ४४. | वेस्ट गार्ड | ११०.०० |
| ४५. | हेलमेट | २४०.०० |
| ४६. | गोलपिपॉंग ड्रेस | ६५०.०० |
| १०१. | हॉकी हेल्मेट | ३१०.०० |
| १०५. | क्रिकेट स्कोर बोर्ड (ऑलस्टिल-फुलसाईज) | ३१८०.०० |
| ६४. | वेट लिफ्टींग सेटप्रपौडं | १३.०० |
| १५. | बास्केट बॉल (कोस्को) | २३९.०० |
| १६. | बास्केट बॉल (पोल) जोडी (पुर्ण स्टील वाटरप्रफ) | १३८००.०० |
| १७. | बॅडमिंटन रॅकेट्स | १४०.०० |
| १८. | शटल्कॉक (बॉक्स) (स्तीना/एजरफ्लाईट) | १५०.०० |
| १९. | बॅडमिंटन पोल (जोडी (स्टील) | १४००.०० |
| २०. | बॅडमिंटन नेड | १२०.०० |
| २१. | खोखो पोल (जोडी) | १२५०.०० |
| २२. | व्हीसल (प्लॉस्टिक) | ६.५० |
| २३. | स्टॉप वॉच | ४००.०० |
| २४. | क्रिकेट वॅट | ५००.०० |
| २५. | क्रिकेट बॉल | १२०.०० |
| २६. | क्रिकेट बुट | ४५०.०० |

| | | |
|---|---|---|
| २७. | मेजरिंग टेप | १९०.०० |
| २८. | बॅटींग पॅड (जोडी) | २४०.०० |
| २९. | बॅटींग ग्लाज (जोडी) | ११०.०० |
| ३०. | एलबो गार्ड | ६०.०० |
| ३१. | थॉय पॅड ६ | १६०.०० |
| ३२. | | |
| ३३. | हेल्मेट | ४६५.०० |
| ३४. | स्टप्सं | ४०.०० |
| ३५. | व्हीकेट किंपीग (ग्लोज) | ३३०.०० |
| ३८. | हॉकी शुज | २९५.०० |
| ३९. | हॉकी बॉल | ९०.०० |
| ४०. | | |
| ४१. | हॉकी स्टीक | ३८.०० |
| ४२. | हॉकी ग्लोज | १३०.०० |
| ४३. | हॉकी पॅडट पेअर | २४००.०० |
| ४४. | चेस्ट गार्ड | १५०.०० |
| ४५. | हेलमेट | २९५.०० |
| ४६. | गोल किपींग ड्रेस | ६५०.०० |
| ४७. | | |
| ४८. | हायजंप पोल (जोडी) | १०००.०० |
| ४९. | स्पार्डक्स (जोडी) | २२५.०० |
| ५०. | स्टार्टींग व्हाल्ट (ऑमेटल) | २३०.०० |
| ५१. | कॅनव्हॉस शुज | १४०.०० |
| ५२. | शॉटपुट ८ पौड, | १००.०० |
| | १२ पौड | १५०.०० |
| ५३. | ट्रक सुट | ४१५.०० |
| ५४. | मशीन (डॉक्टर मॉडेल) वजन करण्याचे यंत्र | ९००.०० |
| ५५. | (पिस्टल) | ९५०.०० |
| ५६. | टेबल टेनिस (चिपटॉप) | ६८००.०० |
| ५७. | टेबल टेनिस बॅट | ११०.०० |
| ५८. | टेबल टेनिस बॉल | ६.५० |
| ५९. | बॉल बॅडमिटन रॅकेटे | ११०.०० |
| ६०. | बॉल बॅडमिटन (एव्हरेस्ट) | २०.०० |
| ६१. | बॉल बॅडमिटन पोल ( जोडी) | १५००.०० |
| ६२. | निकॅप | १८.०० |
| ६३. | ॲक्लेट | १८.०० |
| ६४. | पेटलीफटींग सेट (४० पौड) | ६९०.०० |
| ६५. | पोटलीफटींग सेट (७० पौड) | १०५०.०० |
| ६६. | वेट लिफटींग सेट (११० पौड) | १४५०.०० |
| ६७. | डबेल्स १० पांऊडस | १३०.०० |

| | | |
|---|---|---|
| | १५ पांऊडस | १९५.०० |
| | २० --//-- | २६०.०० |
| | २५ --//-- | ३६५.०० |
| ६८. | डबल बार (जोडी) | १३००.०० |
| ६९. | सिंगल बार (नग) | १६००.०० |
| ७०. | प्लॅट गेथ | ४२५०.०० |
| ७२. | डिंग लाईन बेंच | ५२५०.०० |
| ७३. | टुस्टर | ३२००.०० |
| ७४. | रोमनरिंग सेट | ७९००.०० |
| ७५. | स्टॅमक प्रेस | १३५००.०० |
| ७६. | लेग प्रेस | १९५००.०० |
| ७७. | इकसर साईज साईकल (हिरोमेक) | ३७००.०० |
| ७८. | मल्टी निम | ५८५००.०० |
| ७९. | मल्टीजिम - १२ | १,१२,०००.०० |
| ७९. | मलटीजिम - ८ | ८१.०००.०० |
| ८१. | मल्टीजिम - १६ | १,४८,०००.०० |
| ८२. | (अ) बॅड साहित्य | |
| १. | बास डेस - २४ | १०७५.०० |
| २. | साईट ड्रम - १४ | ४८०.०० |
| ३. | हाफ ढोल - १८ | ५७०.०० |
| ४. | खजोरी - १० | ९०.०० |
| ५. | बासरी - पितळ | ३४.०० |
| ६. | खुळ (जाडी) | ६०.०० |
| ७. | झांज | १७०.०० |
| ८. | बिगुल | १९०.०० |
| ८०. | (ब) क्रिकेट स्वेटर (फुलसाईज) | १९५.०० |
| ८२. | (क) बास ड्रम (स्ट्रीट) | १८००.०० |
| ८३. | टि.शर्ट | ९०.०० |
| ८४. | हाफ पॅट | ६३.०० |
| ८५. | स्कर्ट | १२५.०० |
| ८६. | स्वीमींग कॉस्टुम (जेन्डस/चॅम्पमेक) | ६०.०० |
| ८७. | स्वीमींग ड्रेस | २६५.०० |
| ८८. | जिम्नॅस्टीक कॉस्टुम (लेडीज) | २१०.०० |
| ८९. | जिम्नॅस्टीक कॉस्टयुम (जेन्टस) | ८०.०० |
| ९०. | रेसिंग कॉस्टुम | ११०.०० |
| ९१. | क्रिकेट पॅन्ट | १९०.०० |
| ९२. | क्रिकेट(शर्ट) | ३१०.०० |
| ९३. | क्रिकेट स्वेटर | २७०.०० |
| ९४. | ज्युडो ड्रेस | ३३५.०० |
| ९५. | कराटे ड्रेस | ३२५.०० |

| | | |
|---|---|---|
| ९६. | फुटबॉल (शिनगार्ड) | ४५.०० |
| ९७. | गोलकिपर टिशर्ट | ५.०० |
| ९८. | गोलकिपर टिशर्ट | १३०.०० |
| ९९. | क्रिकेट नेट कॉटन | १४८०.०० |
| १००. | क्रिकेट नेट (नॉयलॉज | १६५०.०० |
| १०१. | हॉकी हेलमेंट | ३१०.०० |
| १०२. | हॉकी चेस गार्ड | ३५०.०० |
| १०३. | हॉकी शुज | २९५.०० |
| १०४. | हॉकी गोल पोस्ट (जोडी) | १२५००.०० |
| १०५. | क्रिकेट स्कोअर बोर्ड | ३१८०.०० |
| १०६. | ट्रक सुट | ५०५.०० |
| १०८. | डफली (हलगी) | २७५.०० |
| १०९. | बेस बॉल | ६५.०० |
| ११०. | बेस बॅट | १७५.०० |
| १११. | ढालकी | २७५.०० |
| ११२. | जॉगी सुट | ४००.०० |

वरील निविदामध्ये दिलेल्या दराना मान्यता देण्याबाबत प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. दराची मंजुरी मिळाल्यानंतर आवश्यक ती खरेदी करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका अंतर्गत असलेल्या शाळांसाठी व सन्माननीय नगरसेवकाच्या वार्डातील किंवा इतरत्र मागणीनुसार क्रिडा साहित्य खरेदी करण्याकरिता १९९७-९८ च्या वार्षिक तरतुदीमधुन अंदाज दीड लाखाचे क्रिडा साहित्य शाळांसाठी व स. नगरसेवकांच्या मागणीनुसार स्वेच्छा निधीतुन खरेदी करण्याकरिता मागविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार १) लिव्हर स्पोर्टस् २) मे. इंटरनॅशनल स्पोर्टस, ३) आर. एल. दौलताबादकर या दरपत्रक धारकांच्य नांवापुढे दर्शविल्या क्रिडा साहित्य व त्यांचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५३/४२ :**

उप आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेवर अस्थापनेवर लघुलेखक (उच्चश्रेणी) या पदावर दोन कर्मचारी २०००-३२०० या वेतनश्रेणीत कार्यरत आहेत. या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विविध बैठकांना उपस्थित राहणे, म्हत्वाची प्रशासकीय कामे पार पाडणे, गोपनीय पत्रव्यवहार करणे आदी महत्वाची कामे पदोन्नतीच्या संधी अभवानेच मिळतात. तेव्हा या दरास रु. २०००-३५०० ही वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस स्थायी समितीकडे करण्यात येते. ही वेतनश्रेणी लागु केल्यामुळे मनपाच्या आर्थिक परिस्थितीवर कोणताही भार पडणार नाही. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवर लघुलेखक (उच्चश्रेणी) या पदावर दोन कर्मचारी रु. २०००-३२०० या वेतनश्रेणीत कार्यरत आहेत. या पदावर काम करण्याऱ्यांना विविध बैठकांना उपस्थित राहाणे महत्वाची प्रशासकीय कामे पार पाडणे, गोपनीय पत्रव्यवहार करणे आदी महत्वाची कामे पार पाडावी लागतात. तथापी या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी अभावानेच मिळतात. तेव्हा या पदास रु. २०००-३५०० ही वेतनश्रेणी लागु करण्याची कार्यवाही प्रशासनाने तातडीने करावी. ज्यामुळे मनपा आर्थि परिस्थितीवर कोणताही भार पडणार नाही. यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५४/४३ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नगररचना विभागाकडुन रंगारगल्ली रस्ता रुंदी करणातील बाधित होणाऱ्या दुकान धारकांना औरंगपुरा येथील भाजी मंडई जवळील मनपाने बांधून पुर्ण केलेल्या दुकाना (चिट्ठी टाकुन) ड्रॉ पध्दतीने देण्यात आल्या आहे.

सहाय्यक संचालक नगररचना विभागकडुन त्या दुकानाची भाडे अनामत रक्कम खालील प्रमाणे निश्चित करुन देण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| १. | अनामत रक्कम रु. ४०००/- प्रति चौरस मीटर |
| २. | दुकानाचे भाडे ८०% प्रति चौरस मिटर प्रतिमहा |

याप्रमाणे भाडे निश्चित करुन देण्यात आले असुन सदरील अनामत रक्कम व भाडे मंजुरीसाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

रंगारगल्लीतील रस्ता रुंदीकरणातील बाधित दुकानधारकांना देण्यात आलेल्या औरंगपुरा भाजी मंडई जवळील दुकानांना नगररचना विभागाने निश्चित केलेल्या अनामत र.रु. ४०००/- प्रति चौरस मीटर व दुकानाचे भाडे रु. ८०/- प्रति चौरस मीटर प्रतिमहा आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५५/४४ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रल्वे उड्डाण पुलाचे काम जलद गतीने व्हावे या बाबत मा. पालक मंत्री यांनी दि. १-१२-९७ रोजी सुभेदारी विश्रामगृहात बैठकीत आदेशित केलेले आहे.

डेक्कन फ्लोअर मिल समोरुन हमालवाडा कडे जाणाऱ्या ८०" रुंद रस्त्यात व उड्डाण पुलाचे विस्तारीत भागात खालील लोकांचे विटामाती व पत्रांचे घरे बाधीत होतात. त्याची नावे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जयराम सुखाजी साळवे | १२X१० खाली |
| २. | श्री. सुंदर सुखाजी साळवे | १९X१३.६ खाली व १३X९ शेड |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्री. सुंदर सुखाजी साळवे | १३.६X१० खाली व ११X९ शेड |
| ४. | श्री. सर्जेराव सुखाजी साळवे | ११X९ खाली |
| ५. | श्री. उत्तम सुखाजी साळवे | १०X१० खाली |

वरील लोकांना बनेवाडी पंप हाऊस चे पश्चिमेस बाजुस जागा देणे आवश्यक आहे.

तसेच डेक्कन फ्लोअर मिल समोरील भागातील २४ टपऱ्या यांना पर्यायी जागा देणे बाबत फ्लोअरमील ते हमालवाडा कडे जाणाऱ्या ८०" डी.पी. रोडच्या फुटपाथ वर देणे बाबत नगर रचनाकार यांनी अभिप्राय मागविला असता सदरील जागा चा मनपाने अद्याप ताबा घेतलेला दिसत नाही. ताबा घेतल्यानंतर त्वरीत सदरील टपऱ्या हलविण्याबाबत कार्यवाही करता येईल. सहाय्यक संचालक नगररचना यादी सदरील जागा त्वरीत संपादन करुन ताब्यात घेणे बाबत कार्यवाही करावी.

तसेच वरील पाच लोकांना जी पर्यायी जागा देण्यात येणार आहे. त्याबाबत सर्वसाधारण धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. यापुर्वी अतिक्रमण टपऱ्या काढल्या नंतर पर्यायी जागा दिलेल्या नाही. तसेच त्या बाबत नगर रचनाकार जे भाडे निश्चित करतील त्या नुसार भाडे आकारणी करण्यात येईल. तरी प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डेक्कन फ्लोअर मील समोरुन हमालवाडाकडे जाणाऱ्या ८० फुट रुंद रस्त्यात व उड्डाण पुलाचे विस्तारीत भागात बाधित होणाऱ्या प्रस्तावातील अ.क्र. १ ते ५ च्या लोकांना त्यांची जागा या योजनेत बाधित झाल्याने पर्यायी जागा बनेवाडी पंप हाऊसचे पश्चिमेस नगर रचनाकार जे भाडे निश्चित करतील. त्या दराने देण्यात यावी. तसेच ज्या टपऱ्या हटवाव्या लागणार आहेत. त्यांना हमालवाडाकडे जाणाऱ्या ८० फुटडी.पी. रोडच्या फुटपाथवर देण्याबाबत जागा संपादीत केल्यानंतर योग्य भाडे आकारुन देण्याचा विचार व्हावा. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५६/४५ :**

दिनांक २४-१२-९७ च्या श्री. महेंद्र खैरनार, लेखाधिकारी म.न.पा. यांचे निलंबन आदेशाविरुध्द चे अधिनियमाचे कलम ५६ (४) अन्वये अपील.

**ठराव :**

मा. सभापती : महानगरपालिकेचे लेखाधिकारी श्री. महेंद्र पंडीतराव खैरनार यांनी त्यांचेवर प्रशासनाने केलेल्या निलंबनाच्या कार्यवाही विरुध्द दिनांक २४-१२-९७ रोजी अपील सादर केलेले होते. त्या अनुषंगाने मी उपरोक्त प्रकरणात मा. जिल्हा सरकारी वकील यांचे मत मागविले होते. त्यांनी दिलेल्या कायदेशीर सल्ला व मा. सभागृहाची भावना लक्षात घेता अधिनियमाचे कलम ५६(४) नुसार मी खालील निर्णय देत आहे.

"दिनांक २४-१२-९७ च्या श्री. महेंद्र खैरनार, मुख्य लेखाधिकारी यांना बाजावलेली नोटीस रद्द करण्यात येते. व आयुक्तांना आदेशीत करण्यात येते की, ज्या संचिकेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने सापळा रचला त्या प्रकरणा बाबत श्री. महेंद्र खैरनार यांची सखोल चौकशी करण्याचा आदेश देण्यात येतो. न्यायालीयन प्रकरणांचा अंतिम निकाल

लागेपर्यंत श्री. महेंद्र खैरनार यांना त्वरीत कामावर घेण्याचे आदेश देतो. तसेच न्यालयाचा अंतिम निर्णय त्यांच्यावर बंधनकारक राहील.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ३१-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. बुधवार दिनांक ३१-१२-९७ रोजी मा. सभापती श्री. प्रभाकर सिताराम विधाते यांच्या अध्यक्षते खाली स्थायी समिती सभा दुपारी ४.०० वाजता "मलीक अंबर सभागृह" येथे संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरुवात "वंदेमातरम्" या राष्ट्रगिताने झाली. सभेस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | स.सदस्य |
| २) | स.स. श्री. त्रिंबक तुपे | --//-- |
| ३) | स.स. श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ४) | स.स. श्री. कचरु चंद्रभान नवपुते | --//-- |
| ५) | स.स. श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव | --//-- |
| ६) | स.स. श्री. विकास जैन | --//-- |
| ७) | स.स. श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ८) | स.स. श्री. अब्दुल रशिदखॉन (मामु) | --//-- |
| ९) | स.स. श्री. अ. रऊफ म.अ. माबुद | --//-- |
| १०) | स.स. श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ११) | स.स. श्री. संजय जोशी | --//-- |
| १२) | स.स. श्री. गौतम लांडगे | --//-- |
| १३) | स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १४) | स.स. श्री. बन्सी गांगवे | --//-- |

**संवाद**

**मिरा सलामी** : स्थायी समितीने श्री. महेंद्र खैरनार, मुख्य लेखाधिकारी यांनी लाचलुचपत खात्याचे पैसे घेतांना रंगेहात पकडले होते. त्यानंतर कार्यालयाने त्यांना निलंबीत केले. परंतु स्थायी समितीने त्यांचे निलंबन रद्द कोणत्या नियमान्वये केले. शासनाचे असे कोणतेही निकर्ष किंवा नियम नाहीत जे की, एकदा पैसे घेतांना रंगेहात पकडल्या नंतर नियमाप्रमाणे निलंबीत केल्यानंतर जोपर्यंत कोर्टाचा आदेश मिळत नाही तो पर्यंत कार्यालयाने निलंबन रद्द करु नये. परंतु स्थायी समितीने श्री. खैरनार यांचे केलेले निलंबन रद्द करणे हा शासनाच्या नियमान्वये चुकीचे आदेश आहे. याबाबत सभागृहात माहिती द्यावी. अशा प्रकारच्या निर्णय समिती घेऊ शकत नाही.

**मा. सभापती :** श्री. खैरनार यांचे बाबतीत स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे व तो कायम करण्यांत आलेला आहे.

**श्री. मिरा सलामी :** मी विचारलेल्या प्रश्नांची माहिती या सभागृहात मला मिळत नसल्यामुळे सभेचा व प्रशासनाचा "निषेध व्यक्त करतो. (वेळ ४.३० वा.) सभागृहाबाहेर जातात.

**मा. सभापती :** ठिक आहे. निषेधाची नोंद घ्यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** मो. पुंडलिकनगर येथील नागरिकांना पिण्याचे पाण्याचे पाण्यासाठी लोकवर्गणी पोटी २५% भरणा केलेली आहे. त्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिति द्यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** येथील रहिवांशी लोकवर्गणीपोटी रु. १०.०० लाख जमा करावयास पाहिजे होते. परंतु प्रत्यक्षात रु. ४.०० लाख जमा करण्यांत आलेले आहे. ज्या ज्या वसाहतीतील नागरिकांनी लोकवर्गनी २५% प्रशासनाकडे जमा केलेली आहेत. त्यांना सुविधा देण्यांत येते.

**मा. सभापती :** ज्या भागातील नागरीकांनी २५% लोकवर्गणी प्रशासनाकडे भरणा केलेला आहे. त्यांना मनपातर्फे नागरी सुविधा पुरविण्यांत येईल.

**श्री. गौतम लांडगे :** माझ्या वार्डातील गेले कित्येक दिवसांपासुन रस्त्यावरील लाईट बंद असुन अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांना लेखी व तोंडी सुचना देऊनही अद्यापही कार्यवाही झालेली नाही जर संबंधित अधिकाऱ्यांकडुन लाईट बाबतच्या तक्रारीचे निराकरण करणे शक्य नसल्यास त्याची माझ्या भागातून इतरत्र बदली करावी.

**श्री. कचरु नवपुते :** स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे उपअभियंता विद्युत श्री. बनकर यांचे काम समाधानकारक नसल्याने त्यांचे अधिपत्याखाली काम करणारे लाईनमन कर्मचाऱ्यांवर त्यांचा वचक नाही. त्यामुळे कामे सुरळीत पार पाडत नाहीत. माझ्या वार्डातील चिकलठाणा भागातीलही कित्येक लाईट बंद अवस्थेत आहेत.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सदरील लाईटचे काम उपअभियंता श्री. बनसोडे यांचेकडे पुर्णपणे सोपवावा व फक्त मेंटेनन्सचे काम श्री. बनकर उपअभियंता यांचेकडे द्यावे अशी मी प्रशासनास सुचना करतो.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :** श्री. बनकर उपअभियंता विद्युत यांना प्रशासनाने समज देऊन स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे. यापुर्वीही त्यांचे अनेक तक्रारी आहेत. याबाबत श्री. बनकर यांचेवर पुढील आठवडयात कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री. कचरु नवपुते :** ट्रिटमेंट प्लॅन्टसाठी रु. २.०० कोटीची तरतुद केलेली आहे. तेव्हा याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता :** ट्रिटमेंट प्लॅन्टसाठी प्रशासनाने नारेगांव व झाल्टा या ठिकाणी कार्यवाही सुरु केलेली आहे. झाल्टा गांव येथे रु. ५०.०० लाखाची तरतुद केलेली असुन या बाबत निविदा मागविण्यांत आली, तीन निविदाधारकांनी टेंडर भरलेले आहे. संबंधित डिझाईन काढुन त्यांचे टेंडर काढण्यासाठी क्वॉलिफॉम केले असता त्या निविदा धारकांनी क्वॉलिफॉम केलेले नसल्याने फेरनिविदा मागविण्याची कार्यवाही केलेली आहे.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** बऱ्याचशा भागात ड्रेनेज लाईन पडलेल्या आहेत. त्यामुळे दुर्गंधी होऊन लोकांना त्रास होण्याची शक्यता असते. त्या गुत्तेदारावर कार्यवाही करावी. तसेच बऱ्याच भागात ड्रेनेज लाईन सारखी चोकअप होत असते. त्यासाठी संबंधीत अधिकारी यांनी वेळोवेळी पाहणी करणे आवश्यक आहे.

**श्री. कचरु नवपुते :** ठिकठिकाणी डांसाची दुर्गंधीमुळे साचली होते. यासाठी मेनलाईन पासुन छोटया छोटया लाईन व्यवस्थित आहेत किंवा नाही ते पहावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** मो. नारेगांव चिकलठाणा येथील ज्या ज्या ठिकाणी पाण्याची लाईन टाकण्यांत आलेल्या आहेत. त्या ठिकाणी काही विटभट्टया चालु आहेत. आणि शेतीवाले आहेत ते नविन पाईप लाईन फोडुन अनाधिकृत पाणी घेतात त्यामुळे बऱ्याच ठिकाणी लाईन फुटते व पाणी साचते. या बाबत संबंधितावर कार्यवाही करण्यांत येते. परंतु अशा पाईपलाईन फुटून रस्त्यावर पाणी दुर्गंधी सुटते.

**मा. सभपती :** अशा प्रकारचे अनेक भागातील सर्व्हे करुन जे शेतकरी किंवा विटभटयावाले अनाधिकृत पाणी घेतात त्यांचेविरुध्द कार्यवाही करावी.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** या बाबत स. सदस्य ची एक पाहणी पथक ठेवावे.

**मा. सभापती :** ठिक आहे. पाहणी पथक ठेवण्यास हरकत नाही.

**श्री. त्रिंबक तुपे :** आकाशवाणी समोर जुना जकात नाका आहे. त्या ठिकाणी पोलिस चौकी आहे. त्याच स्थितीत आहे ती त्यांना अधिकृत दिलेली आहे कार्य? त्यामुळे अतिक्रमणात वेळोवेळी ट्रॉफीकला अडचणी होतात.

**मा. सभपती :** ठिक आहे या बाबतत संबंधित जकात नाका मागे हटविण्यांची कार्यवाही करावी.

**श्री. रशिद मामु :** नुकतीच मा. जिल्हाधिकारी यांचेकडे डिपीडीसी ची बैठक झाली तीत रु. २.०० कोटी झोपडपट्टीतील कामे करण्यास डिपीडीसीने मनपास दिले आहे. त्याबाबत डिसीडीसीचे अध्यक्ष, मा. पालकमंत्री व सदस्यांचे अभिनंदन करतो.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** स्लम झोपडपट्टयामधुन कर आकारणी मनपाने केलेली नाही त्यामुळे मनपास उत्पन्न पुर्णपणे मिळत नाही मात्र सुविधा सर्वत्र मागीतल्या जाते. याचे उदा. द्यावयाचे झाल्यास माझ्या स्वतःच्या घराला टॅक्स लागलेला नाही. याबाबत प्रशासनाने निमंत्रण असावे जेणे करुन प्रशासनाला आर्थिक लाभ होईल.

**श्री. संजय जोशी :** मालमत्ता कर फार कमी प्रमाणात वसुली होत आहे असे दिसते यासाठी झोनवाईज माहिती द्यावी.

**श्री. कचरु नवपुते :** मागील वेळेस सर्वसाधारण झोनवाईज मालमत्ता कर वसुली माहिती द्यावी व किती वसुली होण्याचे शिल्लक आहे. याची सविस्तर माहिती झोनवाईज द्यावी व झोन-५ अंतर्गत किंवा इतर स्लम भागामध्ये ज्या घरांना टॅक्स लागलेला नसेल त्या ठिकाणी ताबडतोब सर्व्हे करुन कार्यवाही करावी.

**श्री. कचरु नवपुते :** मालमत्ता कराबाबत ज्यांच्याकडे बरीच मालमत्ता कर थकीत आहे व कोर्टात प्रकरणे प्रलंबीत आहेत त्यांचे बाबतीत वकील पॅनेल तयार केलेले आहे काय?

**श्री. भगवान घडामोडे :** डीपीसी अंतर्गत रु. २.०० कोटीचा निधी मनपास दिलेला आहे. त्याचे प्रशासनाने कोणत्या कामावर खर्च करण्याचे प्रयोजन केलेले आहे.

**श्री. संजय जोशी :** संभाजी पेठेतील रेलिंग पुर्ण केलेली नाही. तेव्हा कोणत्याही कामाचे डिझाईन पुर्ण न करता प्रशासनाने कामे देवु नये या शिवाय क्रांती चौकातील डिझाईन का बदल केलेला आहे.

**मा. सभापती :** अति. शहर अभियंता यांनी माहिती द्यावी.

**अति. शहर अभियंता :** पोलिस विभागाने सांगितल्याने त्याप्रमाणे सांगितल्याचे त्याप्रमाणे डिझाईन तयार करुन कार्यवाही होत आहे. मागे अनिल केमिकल्स यांनी केलेले आहे. त्याची नविन उंची वाढविण्याची काम करण्यात येणार आहे.

तेथील ग्रिल व्यवस्थीत नाही. त्यामुळे अपघाप होतात. तेव्हा प्रशासन जबाबदार राहणार नाही म्हणुन उंची वाढवून कार्यवाही होत आहे.

**मा. सभापती :** नुकत्याच महापौर स्पर्धा संपलेल्या आहेत. आणि गरवारे स्टेडियमवर क्रिडा शिक्षक श्री. सलीम यांना व्यवस्थापक म्हणुन प्रशासनाने तात्पुरती नेमणुक दिलेली आहे. आता त्यांची त्यांना शाळेवर काम करण्यासाठी प्रशासनाने आदेशित करावे.

**श्री. गौतम लांडगे :** आंबेडकरनगर येथील ड्रेनेज लाईन सारखी चोकअप होत असते. यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी व ज्या ठिकाणी लाईन अपुरी व फुटलेली आहे त्या ठिकाणी लाईन बदण्यात यावी. तसेच बॉराआऊट करणे वारवांर आवश्यक आहे.

**कार्यकारी अभियंता :** या भागातील ५० फुटावर ड्रेनेज लाईन आहे त्या ठिकाणी अनेक ठिकाणी ढापे काही लोक उघडे करुन ठेवतात. त्यामुळे माती व कपडयांचे बोळे त्यात पडल्याने लाईन चोकअप होते.

**श्री. त्रिंबक तुपे :** मोंढाभाग हा अतिशय रहदारीच्या मार्गाने वाहतुकीने अडथळे होतात व या ठिकाणी काही रिकामे ट्रक्स उभे राहतात. मोंढा दुसरीकडे हलणार आहे.

**श्री. संजय जोशी :** रहदारीसाठी ट्रक्समुळे शाळेकरी व पादचारांना त्रास होतो. त्याचप्रमाणे हॉस्पीटल यांनाही वेळोवेळी त्रास होतो येथील मोंढा दुसरीकडे हालणार आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** जालना रोडवरील वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. याकरिता पोलिस ट्रॉफिक यांना पत्राव्दारे सुचना केलेली आहे.

**सहा संचालक नगर रचना :** लक्ष्मणचावडी ते स्मशानभुमी पर्यंतच्या भुसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यांत आलेला आहे.

**मा. सभापती :** मोंढा रोडवरील ट्रक उभ्या राहुन रस्त्यावर दर्गारोड निर्माण करतात अशा ट्रकधारकांवर उद्यापासुन मनपातर्फे कार्यवाही व्हावी.

**श्री. गिराजाराम हाळनोर :** त्याचप्रमाणे हॉटेल अमरप्रित ते शहानुरमिया दर्गारोड याठिकाणी विटांच्या गाडया सारख्या उभ्या राहतात. त्यावरही मनपातर्फे काही फिस आकारणी करावी किंवा त्यांचेवर कार्यवाही करुन विटा जप्त कराव्यात.

**मा. सभापती :** जालना रोडवर ज्या विटांचा ट्रक अनाधिकृतपणे रस्त्यावर उभे राहतात. त्यांच्या विटा जप्त करुन कायदेशीर कारवाई करावी.

**श्री. संजय जोशी :** पिरबाजार येथील "फिश बाजार" व बिफ मार्केट" आहे त्याठिकाणी मनपातर्फे परवानगी दिलेली असल्यास रस्त्यावर दुकाने टाकुन बसलेल्या दुकानदारांना दुकानासमोर जाळी बसवुन व्यवसाय करावे अशा सुचना द्याव्यात. कारण रस्त्यावरील माझ्या सारख्या घोघावतात व लोकांनाही त्याचा त्रास होतो. किंवा त्यांच्या आतील बाजुस मांसे व्यवसाय करण्याऱ्यांना वेगळे गाळे बांधुन द्यावे.

**मा. सभापती :** पिरबाजार हा रस्त्यावर भरतो त्यापेक्षा बाजुला नाला आहे. त्या ठिकाणी एक स्लॅप टाकुन आठवडी बाजार भरवावा यासाठी काही नागरिकांनी एक निवेदनही दिलेले आहे.

**श्री. कचरु नवपुते :** मुंकुदवाडी बस स्टॉप येथील मटन मार्केट आहे ते सुध्दा उघडयावर व्यवसाय करतात. तेथुन हटवून त्यांना दुसऱ्या ठिकाणी बसवावे.

**मा. सभपती :** ठिक आहे. प्रशासनाने त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**विषय क्र. ४५७/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समर्थनगर येथील "श्रीराम कॉलनी येथे उद्यान विकसीत करणे बाबतचे अंदाजपत्रक र.रु. २,८१,५२०/- एवढयाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९६-९७ च्या दर सुचीनुसार तयार करण्यात आले असुन सदर कामावर होणारा खर्च नविन दराने तरतुदी अंतर्गत करण्यात येणार असुन प्रस्तावास मा. आयुक्त यांची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेण्यात आली आहे.

सबब २,८१,५२०/- रु. एवढयाचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर येथील श्रीराम कॉलनी येथे उद्यान विकसित करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,८१,५२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५८/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इमारतीस रंगकाम करणे साठीचे अंदाजपत्रक र.रु. ३,३५,६६६/- एवढयाचे तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त यांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे सदर कामावर होणारा खर्च हा "उद्यान दुरुस्ती" तरतुदी अंतर्गत करण्याच्या प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इमारतीस रंगकाम करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,३५,६६६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५९/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मिलींदनगर येथील महापालिकेच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करावयाचे आहे. त्यासाठी र.रु. ५.०० लक्ष एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे व त्यास स्थायी समितीची मान्यता घेण्यात येऊन निविदा मागविले असता कोरे निविदा विक्री दि. ४-११-९७ पर्यंत दहा (१०) विकले गेले व स्विकृती च्या अंतिम तारखपर्यंत दर भरुन सिलंबद पाकीटात (३) तीन निविदा प्राप्त झाल्या असून प्राप्त निविदेचे तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एन.बी. पाटील | १०.१२% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर. |
| २. | श्री. फार्वव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | ३.५०% | --//-- |
| ३. | श्री. सोहल सिद्यीकी | ३.३३% | --//-- |

या अनुषंगाने प्राप्त निविदे मध्ये तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच श्री. एन.बी. पाटील गुत्तेदार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.१२% कमी या दराची निविदा प्राप्त आहे.

सबब श्री. एन.बी. पाटील गुत्तेदार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.१२% कमी या दराची निविदा तसेच सदर कामासाठीचे खर्च हे शासकीय अनुदान ९७-९८ अंतर्गत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलिंदनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसित करण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १०.१२% कमी दराची श्री. एन.बी. पाटील यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६०/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भावसिंगपुरा स्लम येथील समशानभुमीस भिंत बांधणे बाबतचे अंदाजपत्रक र.रु. १,४८,५९०/- एवढयाचे सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन त्यास प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली आहे.

सबब र.रु. १,४८,५९०/- एवढयाचे प्रस्तावास तसेच सदर कामावर होणारा खर्च "स्मशानभुमी विकास" या तरतुदी अंतर्गत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा स्लम येथील स्मशानभुमीस भिंत बांधणे च्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,४८,५९०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. घाटी जयभिमनगर स्लम येथे शहाबाद फरशी बसविणे व सिमेंट रोड तयार करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसुची नुसार रु. २,०२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १८-१२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु. २,०२,०००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. घाटी जयभिमनगर स्लम येथे शहाबादी फरशी व सिमेंट रोड तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. २,०२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६२/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिवशक्ती कॉलनी जालनारोड येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत संरक्षीत भिंत बांधणे खेळणी बसविणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसुची अन्वये र.रु. १,५९,७००/- एवढयाचे तयार करण्यात आले असुन त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

सबब रु. १,५९,७००/- एवढयाच्या अंदाजपत्रकास लागणारा खर्च (निधी) विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण" या तरतुदी अंतर्गत करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिव शक्ती कॉलनी जालना रोड येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे खेळणी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १,५९,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६३/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कटकटगेट वार्ड क्र. ३३ अंतर्गत रविंद्रनगर कॉलनी येथील मोकळया जागेवर फक्शन हॉल बांधण्याच्या कामासाठी रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीने विषय क्र. ५८३/३ दि. ८-३-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराऐवजी (दराच्या वाटाघाटीनुसार) अंदाजपत्रकीय दराचे श्री. फारुकी मुनताह यांच्या निविदेस मा. स्थायी समितीने ठराव क्र. २६०/३९ दि. २१-१-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर जागेवर एका समाजाच्या नागरिकांनी आक्षेप घेतल्यामुळे काम थांबवावे लागले. झेंडयाची जागा सोडुन उर्वरीत जागेवर दि. २२-११-९६ ला मा. विरोधी पक्ष नेता यांनी अर्ज देऊन मा. आयुक्तांशी दि. २७-१-९७ ला प्रत्यक्ष चर्चा करुन सदरचा हॉल २५x२५ क्षेत्रा ऐवजी १००x५० चा हॉल बांधावा असे प्रस्तावित केले. मा. आयुक्तांनी सुचविल्याप्रमाणे सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रु. २१,२५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले त्या मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. २४४/३ दि. १०-३-९७ अशी मंजुरी दिली आहे की, रु. ५,००,०००/- पर्यंतचे काम मुळ मंजुर एजन्सीकडुन म्हणजेच श्री. फारुकी मुनताह यांच्याकडुन मंजुर दरानुसार करुन घेण्यात यावे व उर्वरित १६,५०,०००/- चे कामाकरिता फेर निविदा काढण्यात याव्यात परंतु नंतर त्यामध्ये ३१-५-९७ च्या इतिवृत्तान्वये यामध्ये अशी दुरुस्ती करण्यात आली की र.रु. १६,५०,०००/- चे कामाकरिता फेर निविदा मागविण्याच्या ऐवजी र.रु. ५,००,०००/- अधिक १६,५०,०००/- एकुण र.रु. ५० लक्षाचे काम मुळ गुत्तेदार श्री. फारुकी मुनताह यांचे कडुन करुन घेण्यात यावे पैकी ५.०० लाखाचे काम निविदेतील मंजुर दरानुसार व रुपये १६,५०,०००/- चे काम चालु दरसुचीनुसार करण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| अ) | एकुण जागेवर क्षेत्रफळ | १००७.१६ चौ.मी. |
| ब) | नियमानुसार अनुज्ञेय क्षेत्र (१०%) | १००.७१६ चौ.मी. |
| क) | उपरोक्त जागेवर बांधावयाचे | ४६४.५ चौ.मी. |

(म्हणजे समोर ४६%) इमारतीचे चढईक्षेत्र. (मा. सर्वसाधारण सभेने मंजुर केल्याप्रमाणे २१.५० लक्ष रु.)

सबब वार्ड क्र. ३३ अंतर्गत रविंद्रनगर कॉलनी येथील मोकळया जागेवर फंक्शन हॉल बांधण्याच्या कामाचे सुधारित अंदाजपत्रकास व सुधारित करारनामा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कटकटगेट वार्ड क्र. ३३ अंतर्गत रविंद्रनगर कॉलनी येथील मोकळया जागेवर फक्शनहॉल बांधण्याच्या कामासाठी रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ५८३/३ दि. ८-३-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराऐवजी (दराच्या वाटाघाटीनुसार) अंदाजपत्रकीय दराचे २५x२५ क्षेत्राचे हॉल बांधकाम बाबत श्री. फारुकी मुमताह यांच्याकडुन रु. ५.०० लाखापर्यंतचे काम मुळ मंजुर एजन्सीजकडुन करुन घेण्यांत यावे असे ठरले. परंतु पुन्हा मा. आयुक्तांनी व मा. विरोधीपक्ष नेता यांनी चर्चेव्दारे १००x५० चा हॉल बांधकमासाठी एकूण अंदाजित खर्च रक्कम रु. २१,२५,०००/- अंदाजपत्रक तयार करण्यांत आले पैकी फक्त मुळ अंदाजपत्रकातील रु. ५.०० लाखाचे मुळ खर्चास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. व उर्वरित रु. १६,५०,०००/- च्या अंदाजपत्रकीय खर्चाचे काम दरसुचीनुसार व सुधारित करारनामा करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६४/८ :**

सिडको एन-११/सी-१ व सी-५ या सेक्टर मध्ये १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रु. १२,८१,३२९/- चे तयार करण्यात आले असुन सर्वसाधारण सभा ठराव क्र. माक २१०/३ दि. १०-३-९७ अन्वये मंजुरी मिळालेली होती. त्यानुसार निविदा मागविल्या असता विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १९ निविदा विक्री झाल्या आणि सिलबंद निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेला एकुण ७ (सात) निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. ए.एम. फारुकी | ३०.८६% | कमी दराने |
| २. | श्री. सलीम पटेल | २८.५०% | --//-- |
| ३. | श्री. मे. लक्ष्मण कंन्स्ट्रक्शन | २७.९९% | --//-- |
| ४. | श्री. नंदकुमार घोडेले | २२.००% | --//-- |
| ५. | श्री. राणा कंन्स्ट्रक्शन | १७.०२% | --//-- |
| ६. | श्री. व्ही.जी. स्वामी | ८.५५% | --//-- |
| ७. | श्री. न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन | २% | --//-- |

उपरोक्त प्रमाणे सर्वात दराची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.८६% कमी दराची श्री. ए.एम. फारुकी यांची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर ठेवण्यांत आला होता. स्थायी समिती ठराव क्रमांक १८४/४३ दि. १६-८-९७ अन्वये फेर निविदा मागविण्याचा निर्णय झाला होता. या निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा ३०.८६% कमी दराची आहे. गुत्तेदाराने वरील दराने स्पेशिफीकेशन प्रमाणे काम करण्याचे लेखी दिले आहे.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.८६% कमी दर असेलेली श्री. ए.एम.फारुकी यांची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या फेर विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-११/सी-१ व सी-५ या सेकटरमध्ये १०० व १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.८६% कमी दराची श्री. ए.एम. फारुकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६५/९ :**

आंबेडकरनगर साठी २५० मी.मी. व्यासाची सी.आय.पाईप लाईन क्रॉस कनेक्शन करण्यासाठी अंदाजपत्रक र.रु. १,७४,५००/- चे परिसर अभियांत्रिकी यांच्या १९९६-९७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदरील कामावर होणारा खर्च देखभाल व दुरुस्ती १९९७-९८ या लेखाशिर्षकातील तरतुदीमधुन करण्यात येणार आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्ताची मंजुरी झालेली आहे.

तरी आंबेडकरनगर येथे क्रॉस कनेक्शन करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये १,७४,५००/- चे प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकरनगरसाठी २५० मी.मी. व्यासाची सी.आय.पाईपलाईन क्रॉस कनेक्शन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १,७४,५००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६६/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिल्कमील कॉलनी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी रक्कम रु. १,२२,१७०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास स्थायी समितीचा ठराव क्रमांक २७१/२६ दिनांक ३-१०-९७ अन्वये मंजुरी देण्यांत आली. त्या अनुषंगाने कार्यालयाची निविदा सुचना क्रमांक ८०/९७ जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवून बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच (पाच) कोऱ्या निविदा विक्रीझाल्या व सिलंबद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण तीन (३) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. धनेश दौलतानी | २३.५५% | कमी |
| २. | श्री. सुरेश बी. साधवानी | २७.५१% | कमी |
| ३. | श्री. एम.एस. काथार | २९.७१% | कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. एम.एस. काथार यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.७१% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. एम.एस. काथार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.७१% कमी दराची निविदा स्विकृतीसह व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमील कॉलनी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.७१% कमी दराची श्री. एम.एस. काथार यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६७/११ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यांत येते की, कु. अनुराधा लिंबाजी चौथमल यांनी अर्ज दिला आहे. झुणका भाकर केंद्र सिध्दार्थ उद्यान बसस्टॅन्ड जवळ असुन सदरील केंद्रासमोर मेन रोड असल्याने येणाऱ्या लाभार्थीना बसण्यास जागा नसल्यामुळे या केंद्राच्या बाजुला योग्य तो लाभ घेता येत नाही. तरी केंद्राच्या बाजुला मनपाची खुली जागा १० फुट x १० फुट जागा मला लिजवर दयावी बाबत विनंती केली आहे.

सदर प्रकरणात उद्यान अधिक्षक व नगररचना या विभागाने अभिप्राय दिला आहे की, मागणी केलेली जागा सिध्दार्थ उद्यानचे आतील कुंपण भिंतीचे आत मनपा हद्दीतील क्षेत्रापैकी असुन आतील बाजुस प्रवेश न देण्याचे अटीवर उद्यान अधिक्षक यांनी अभिप्राय दिला असुन जागा आतील बाजुस असल्याने रस्त्यावरील रहदारीस पोलिस विभागाचे अपेक्षेनुसार अडचण होणार नाही. या अटीवर व तसेच नगररचना विभाग सदरील जागेचे जे भाडे निश्चित करतील व इतर नेहमीच्या अटी-शर्ती नुसार जागा देण्याबाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कु. अनुराधा लिंबाजी चौथमल यांनी त्याचे सिध्दार्थ उद्यान येथील झुणका भाकर केंद्राच्या बाजुला असलेल्या सिध्दार्थ उद्यानाचे आतील कुंपण भिंतीचे आत मनपा हद्दीतील क्षेत्रापैकी १० फुट x १० फुट जागा मागणी केल्यानुसार लिजवर देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. उद्यान अधिक्षक व नगररचना विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार रस्त्यावरील रहदारीस पोलिस विभागाचे अपेक्षेनुसार अडचण होणार नाही. या अटीवर तसेच नगररचना विभाग जे भाडे निश्चित करील त्या भाडयाने व इतर नेहमीच्या अटी-शर्तीनुसार जागा देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदरील ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६८/१२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, लिटील फ्लॉवर शाळा ते लक्ष्मीकॉलनी पर्यंतची १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी ही रस्ता रुंदीकरणामध्ये आल्यामुळे स्थंलातरीत करावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९६-९७ च्या दर सुचीनुसार रक्कम रु. २,६१,९७३/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या लेखा शिर्षकामधुन करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लिटील फ्लॉवर शाळा ते लक्ष्मीकॉलनी पर्यंतची १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी ही रस्ता रुंदीकरणात आल्याने स्थलांतरीत करण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. २,६१,९७३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६९/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, फाजलपुरा एस.टी.कॉलनी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,०५,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा व देखभाल व दुरुस्तीच्या लेखा शिर्षकामधुन करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फाजलपुरा एस.टी. कॉलनी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,०५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७०/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जयभिमनगर घाटी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. २,६१,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च ही पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती हया लेखा शिर्षकाच्या तरतुदीमधुन करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयभिमनगर घाटी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. २,६१,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७१/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अहिसांनगर येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रोड बांधणे बाबतचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन १९९६-९७ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले असून त्यास प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली आहे सबब "विकास योजने अंतर्गत भुखंडाचे संरक्षण" तरतुदी अंतर्गत सदर कामावर होणारा खर्च तसेच रु. १,८०,९००/- चा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अहिंसानगर येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी शेड बांधणेकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,८०,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७२/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चेलीपुरा येथील ५० फुट डी.पी. रोडचे रुंदीकरण करुन खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी दिनांक १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २११/१० अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. १,५४,२००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/६५/९७ दिनांक ८-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (०८) निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (०५) पाच निविदा दर भरलेल्या प्राप्त झालया असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. महिन्द्रा कंन्स्ट्रक्शन | ३५% | कमी दराने |
| २. | श्री. एस.एम. मंडोरे | ३०% | कमी दराने |
| ३. | मे. आकाश कंन्स्ट्रक्शन | २८.२९% | --//-- |
| ४. | श्री. मझहर सिद्यीकी | २०% | --//-- |
| ५. | श्री. गुलाम रसुल | २२.८६% | --//-- |

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३५% कमी दराने महिंन्द्र कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा असुन प्रस्ताव मंजरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चेलीपुरा येथील ५० डी.पी. रोडचे रुंदीकरण करुन खडी रस्ता तयार करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ३५% कमी दराची मे. महिंद्र कन्स्ट्रक्शन कं. याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७३/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, परीमल गृह निर्माण सोसायटीमध्ये १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी रक्कम रु. १,३४,७३१/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २६९/२४ दि. ३-१०-९७ अन्वये मान्यता देण्यांत आली आहे. त्याप्रमाणे कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८०/९७ जी की, दै. वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (८) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण तीन (०३) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुरेश बी. साधवाणी | ८% | कमी |
| २. | श्री. एम.एस. काथार | -- | अंदाजपत्रकीय दर |
| ३. | श्री. डी.ए. दौलतानी | ५% | कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. सुरेश बी साधवाणी यांचा आहे. परंतु नियमानुसार निविदेसोबत त्यांनी अनामत रक्कम दाखल केलेली नाही. त्यामुळे त्यांची निविदा बाद ठरविण्यांत आली असुन दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री. डी.ए. दौलतानी यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी असा दराची निविदा स्विकारणास प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे.

तरी श्री. डी.ए. दौलतानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे परिमल गृह निर्माण सोसायटीमध्ये १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ५% कमी दराची श्री. डी.ए. दौलतानी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७४/१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पदमपुरा भागातील कामानवस्तीमध्ये १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र.रु. १,२७,८००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन स्थायी समितीचा ठराव क्र. २६६/२१ दि. ३-१०-९७ अन्वये मंजुरी देण्यांत आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८०/९७ जी की दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण सहा सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. यु.के. पंडीत | २०.०२% | कमी |
| २. | श्री. अरविंद पवार | २२% | कमी |
| ३. | श्री. सफुरा इंटरप्रायजेस | २२.२५% | कमी |
| ४. | श्री. सुरेश बी. साधवानी | २६.५५% | कमी |
| ५. | श्री. शेख जहीद | २८.५% | कमी |
| ६. | श्री. एम.एस. काथार | २८.७१% | कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. एस.एम. काथार यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.७१% कमी असा दर दिलेला आहे. तरी श्री. एम.एस. काथार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.७१% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पदमपुरा कमानवस्ती मध्ये १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.७१% कमी दराची श्री. एम.एस. काथार यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७५/१९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, फत्तेसिंगपुरा जलकुंभाच्या फिटींगसाठी ३०० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकणे यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ३,१५,१००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या लेखा शिर्षकातुन करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फत्तेसिंगपुरा जलकुंभच्या फिडींगसाठी ३०० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ३,१५,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७६/२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दिवान देवडी येथील अतुल बेकरीच्या गल्लीत १०० मी.मी.व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र.रु. १,०२,४४०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २६४/१९ दि. ३-१०-९७ अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८०/९७ जी की, वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार (४) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुरेश बी. साधवाणी | ४% | कमी |
| २. | श्री. एम.एस. काथार | १०% | कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. एम.एस. काथार यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. एम.एस. काथार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिवानदेवडी येथील अतुल बेकरीच्या गल्लीत १०० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची श्री. एम.एस. काथार यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७७/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कैसर कॉलनी प्रभागा अंतर्गत फरशी बसविणे व जुनी दुरुस्त करणेच्या कामासाठी दिनांक १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २०८/७ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रुपये २,७२,५००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/६५/९७ दिनांक ८-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (१३) तेरा निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण दोन (०२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. बसरा कंन्स्ट्रक्शन कं | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन | २% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने मे. बसरा कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी प्रभागातर्गत फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया कमी दराची मे. बसरा कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७८/२२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ. आंबेडकर कॉलेज ते लक्ष्मी कॉलनी पर्यंत १०० व २५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी रक्कम रु. १२,३१,२२०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ९१/३ दि. ८-१०-९७ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. त्याप्रमाणे कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८०/९७ जी की, काढण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सात कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण पांच सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नंदकुमार घोडेले | १५.७८६% | कमी |
| २. | श्री. बसरा कंन्स्ट्रक्शन | २८.११% | --//-- |
| ३. | श्री. स. अथर अली | २६.०१% | --//-- |
| ४. | श्री. बी.ए. काल्डा | २३.०५% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री. एम.एस. काथार | २३.७५% | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दर हा मे. बसरा कंन्स्ट्रक्शन यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.११% कमी असा दर दिलेला आहे. तरी मे. बसरा कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.११% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. आंबेडकर कॉलेज ते लक्ष्मी कॉलनी पर्यंत १०० व २५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.११% कमी दराची मे. बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७९/२३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो दलालवाडी भागात १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी रक्कम रु. १,६३,०९४/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २६७/२२ दि. ३-१०-९७ अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८०/९७ जी की, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सात (सात) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (३) तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एम.एस. काथार | ०१% | कमी |
| २. | श्री. सुरेश साधवाणी | -- | दर दिलेला नाही. |
| ३. | श्री. यु.के. पंडीत | -- | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दर हा श्री. एम.एस. काथार यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. एम.एस. काथार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दलालवाडी भागात १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री. एम.एस. काथार यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८०/२४ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किलेअर्क येथील मस्जीद पासुन श्री. फैय्याज यांचे घरापर्यंत नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७,००,०००/- (रु. सात लाखा) ला स्थायी समिती सभा दि. १७-९-९७ ला विषय क्र. १९७/५६ ने संमत झालेला आहे. सदरील कामाची निविदा सुचना जा.क्र./मनपा/लेखा/नि/६१/९७ दिनांक २३-९-९७ अन्वये बी-१ नमुन्यात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकुण (दहा) १० निविदा विक्री झाली व त्यापैकी ३ निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. आर.एस. भाटीया | ४.५% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तच्या दराने |
| ३. | श्री. साईबाबा कंन्स्ट्रक्शन | ८.२५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने मे. बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. सदरील दरास मा. आयुक्तांनी दि. २६-१२-९७ ला मंजुरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किलेअर्क येथील मस्जीद पासुन श्री. फैय्याज यांचे घरापर्यंत संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८१/२५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सुंदरनगर नागेश्वरवाडी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे त्यासाठी र.रु. ३,९९,३३०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २६२/१७ दि. ३-१०-९७ अन्वये मंजुरी घेण्यांत आली आहे. सदर कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८०/९७ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण आठ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुरेश बी. साधवाणी | ०.१०% | कमी |
| २. | श्री. डी.ए. दौलतानी | ४% | जास्त |
| ३. | श्री. एम.एस. काथार | ३% | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. सुरेश बी. साधवाणी यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. सुरेश बी. साधवाणी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुंदरनगर नागेश्वाडी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८२/२६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गारेखडा येथील अधार गृह निर्माण संस्था येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे त्यासाठी रक्कम रु. १,९०,५३७/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २६८/२३ दि. ३-१०-९७ अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे, कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८०/९७ जी की, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण बारा (१२) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण आठ (८) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मोहम्मंद इस्माईल | ३०.०१% | कमी |
| २. | श्री. अफजाल खॉन | ८.१७% | --//-- |
| ३. | श्री. नरेंद्र शेट्टी | १०.९५% | --//-- |
| ४. | श्री. भालेराव एस. जी. | १५.०५% | --//-- |
| ५. | श्री. सुरेश बी. साधवाणी | २९.५% | --//-- |
| ६. | श्री. अरविंद पवार | २५.००% | --//-- |
| ७. | श्री. एम.एस. काथार | २०.००% | --//-- |
| ८. | श्री. धनेश दौलतानी | २६.७५% | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मक दृष्टया कमी दर हा श्री. मोहम्मंद इस्माईल यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. मोहम्मंद इस्माईल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील आधार गृ.नि. संस्था येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराची श्री. मो. इस्माईल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८३/२७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथील मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-

९६ च्या दरसुचीनुसार रु. ५,०३,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदरील काम "डांबरीकरण" या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ३१-१०-९६ ला प्रशासकीय मंजुर दिलेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागवून काम हाती घेण्यात आले व हे काम श्री. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन हया एजन्सीस अंदाजपत्रकीय दराने देण्यांत आले. या भागातील डांबरीकरण पुर्वी ५ मी. रुंदीचे घेण्यात आले होते. परंतु "स्वच्छ औरंगाबाद" मोहिम अंतर्गत ते आता ७ ते ८ मीटर फेस टु फेस करावयाचे असल्याने जादा रक्कम रु. २४३५२४/- चा खर्च अपेक्षित आहे. या वाढीव खर्चाचे अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २३-१२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी वाढीव कामाचे अंदाजपत्रक रु. २,४३,५२४/- व सदरील काम हे मंजुर गुत्तेदार श्री. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्याकडुन म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने हे काम करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथील मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरणेच्या र.रु. २,३४,,५२४/- ला तसेच वाढीव काम पुर्वीचेच गुत्तेदार मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८४/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सेव्हन हिल सुराणा नगर महेशनगर, भागातील खडी रस्त्याचे काम करण्यासाठी दि. १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २१६/१५ अन्वये अंदाजपत्रक र.रु. १,५७,८००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/६५/९७ दि. ८-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (२१) एकवीस निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण (१२) बारा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्या तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. महेंद्र कंन्स्ट्रक्शन | ३६% | कमी दराने |
| २. | श्री. एच.डी. पडुळ | ३३.३२% | --//-- |
| ३. | श्री. काजीकर मोहियोद्दीन | ३२.५% | --//-- |
| ४. | श्री. एस.एम. सज्जाद | ३२.०२% | --//-- |
| ५. | श्री. राजसिंग | ३१.८६% | --//-- |
| ६. | श्री. सुखबार सिंग | ३१.२१% | --//-- |
| ७. | श्री. खुर्शीद हसन | २९.९९% | --//-- |
| ८. | श्री. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | २९% | --//-- |
| ९. | मे. स्टार कंन्स्ट्रक्शन | १५% | --//-- |
| १०. | श्री. कृष्णा कुतीमल | २९.९९% | --//-- |
| ११. | श्री. सलीम पटेल | २१.२३% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | श्री. सुजात अली हाशमी | २८.९९% | --//-- |

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३६% कमी दराने मे. महेंद्र कंन्स्ट्रक्शन यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेव्हन हिल सुराणानगर महेशनगर भागातील खडी रस्त्याचे काम करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६% कमी दराची मे. महेंद्र कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८५/२९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मुंकुदवाडी गावात काही ठिकाणी नवीन शहाबाद फरशी बसविणे व काही ठिकाणी अस्तित्वात असलेली खांडकी काढुन दुरुस्त करणे व पुन्हा बसविणे काही भागात खांडकीला पाइटिंग करणे व नवीन खांडकी बसविणे इत्यादी कामा करिता र.रु. ५,७०,८५७/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दि. २४-९-९७ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान केली आहे. तसेच दि. १६-१०-९७ रोजी संपन्न झालेली स्थायी समिती विषय क्र. २९७/१७ दि. १६-१०-९७ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८४/९७ दि. १३-११-९७ व्दारे मागविण्यात आल्या असता निविदा विकण्याची अंतिम तारखे २१-११-९७ पर्यंत एकुण १२ (बारा) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्या या तारखेस फक्त दोन (२) मोहर बंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. १०-१२-९७ रोजी उपस्थित ठेकेदार समक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.पी. सरवदे | ०.०५% | अं.प. दरापेक्षा कमी |
| २. | श्री. कल्यानी कंन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा श्री. एस.पी. सरवदे यांची निविदा आहे.

करिता श्री. एस.पी. सरवदे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंकुदवाडी गावात काही ठिकाणी नविन शहाबाद फरशी बसविणे व काही ठिकाणी अस्तित्वात असलेली खांडकी काढुन दुरुस्ती करणे व पुन्हा बसविणे काही भागात खांडकीला पॉईटिंग करणे व नविन खांडकी बसविणे इ. कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. एस.पी. सरवदे यांची निविदा स्विकारणे सर्वानुमते मंजुर देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८६/३० :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारेगांव ते टेचिंग ग्राऊंड करिता १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेचे (अंदाजपत्रक र.रु. ९,८६,०००/-) निविदा मागविण्यांत आल्या असता एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मेसर्स बसरा कंन्स्ट्रक्शन | -- | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. शेख मसुद | ५% | जास्त दराने |

उपरोक्त प्रमाणे तुलनात्मक तकत्यानुसार सर्वात कमी दराची निविदा श्री. मेसर्स बसरा कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची आहे. तरी मेसर्स बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव ते ट्रेचिंग ग्राऊंड करिता १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८७/३१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. हर्षनगर येथे मंगल कार्यालय कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. १७२/५ दि. ४-११-९५ अन्वये र.रु. २,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. तसेच सदर कामाचा निविदा मागविल्या असता प्राप्त निविदामध्ये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.१०% जास्त दराऐवजी दराचे वाटाघाटीनुसार ३% जास्त दराची श्री. गुलामरसुल यांचे निविदेस मा. आयुक्तांनी दि. ३-७-९७ अन्वये मंजुरी मिळाली असुन दि. २-८-९६ ला संबंधित कार्यादेश देण्यांत आला आहे. ज्या ठिकाणी मंगल कार्यालय बांधवयाचे आहे. ती जागा स. नगरसेवक यांनी दाखविली होती. सदर ठिकाणी मनपाचे सार्वजनिक शौचालय बांधलेले आहे. सदर जागेची मा. महापौर मा. आयुक्त मा. स. नगरसेवक यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केलेली आहे. सदर ठिकाणी मंगल कार्यालय बांधावे असे ठरले व त्यानुसार मुळ कामात र.रु. ८६,७६७/- ची वाढ होत आहे. म्हणजेच सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक र.रु. २,८६,७६७/- अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे वाढीव रक्कमेसह सुधारीत अंदाजपत्रक र.रु. २,८६,७६७/- ला नविन प्रस्तावित केलेल्या नाल्याकाठच्या जागेवर इमारत बांधणेच्या मंजुरीस्तव व सदर कामाची मुदत जागा बदल्यामुळे दिनांक ३०-१-९८ पर्यंत वाढवुन देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो हर्षनगर येथे मंगल कार्यालय बांधणेच्या कामासाठी मा. महापौर मा. आयुक्त स. नगरसेवक यांनी स्थळ पाहणी केल्यानुसार अस्तित्वात असलेल्या शौचालयाची जागा सोडुन सदर काम नाल्या काठच्या जागेवर बांधण्यामुळे सदर कामासाठी चे वाढीव अंदाजपत्रक र.रु. ८६,७६७/- तसेच सुधारीत अंदाजपत्रक रु. २,८६,७६८/- ला तसेच जागा बदल्यामुळे संबंधित गुत्तेदारास कामाची मुदत दि. ३०-१-९८ पर्यंत वाढवुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. या प्रस्तावास या सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८८/३२ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गुरुकुज हॉ. सोसायटी येथे भारत माता मंदीर बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. १८,८१,१४०/- एवढयाचे तयार करण्यांत येऊन त्यास सर्वसाधारण सीीत मंजुरी घेण्यात आली आहे. सदर कामासाठी निविदा मागविले असता कोरे निविदा पिक्री दि. १८-११-९७ पर्यंत (७) सात विकले गेले व दर भरुन स्विकृतीची दि. २७-११-९७ पर्यंत दोन निविदा प्राप्त झाले त्या खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रविण गोविंदराव पवार | ०५.०% | अं.प. दरापेक्षा जास्त |
| २. | श्री. जी.आर. घोडेले | १५% | --//-- |

या अनुषंगाने तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच श्री. प्रविण गोविंदराव पवार यांचे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ५.०% जास्त प्रकारचे दर प्राप्त आहे.

सबब र.रु. १८,८१,१४०/- व सर्वात कमी दराची एजन्सी श्री. प्रविण गोविंदराव पवार यांचे तर्फे तसेच सदर कामासाठी विषय आर्थिक तरतुद उपलब्ध करुन देऊन सदर काम करणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुरुकुज हॉ. सोसायटी येथे भारत माता मंदिर बांधण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८९/३३ :**

मो. बायजीपुरा येथील न.भु. क्र. १२२०२/अ/१, १२२०२/अ/२ व १२२०२/अ या मिळकती मधुन अतिरिक्त शहर अभियंता यांनी रस्त्याचे काम केलेले असुन प्रत्यक्ष जागेवर या न.भु. क्रमांकामधील तेवढया क्षेत्राचा रस्ता म्हणुन वापर होत आहे. आता संबंधिताने जमिनमालकाने रस्त्या करिता वापरण्यात आलेल्या जागेचा मोबदला मिळावा म्हणुन मागणी केली आहे.

सिद्धशीघ्र गणकानुसार या भागातील जमीनीचे दर घेऊन या प्रकरणी मुल्यांकन करता रस्त्याखालील बाधीत क्षेत्र (१) न.भु. क्रमांक १२२०२/अ/१-१०६ ८७ चौ.मी. (२) न.भु. क्र. १२२०२/अ/२-५३.७५ चौ.मी. व (३) न.भु.क्र. १२२०२/अ/-४२७.५० चौ.मी. चा मोबदला अ.नु.क्र. रु. १,४९,३७२/- (२) रु. ७५,१२५/- (३) रु. ४,६४,९३१/- निश्चित करण्यात

आलेला आहे. खाजगी वाटाघाटीमध्ये मिळकतधारकाने वरील मुल्याकनास मान्यता दिली आहे.

तसेच खरेदी खताचा खर्च मनपाने ५०% व मिळकत धारकाने ५०% करावयाची मान्यता मिळकतधारकाने दिली आहे. तसेच खरेदी खतासाठी लागणारी ५०% रक्कम अनुक्रमे १) ६,७५०/- (२) ३,४००/- (३) रु. २१,०००/- वळती करुन उर्वरित रक्कम अनुक्रमे (१) रु. १,४२,६२२/- (२) रु. ७१,७२५/- (३) ४,४३,९३१/- मिळकतधारक १) श्रीमती अहमदी बेगम भ्र. असदउल्ला खॉ २) अमानउल्लाखॉन पि. असदलउल्ला खॉन ३) मो. मोईनखॉ पी. असदउल्लाखॉ. ४) श्रीयुत मोईन खॉ. पि. असदउल्ला खॉ यांचे तर्फे मुख्त्यार आम श्री. माईलखॉ पिता असदउल्लाखॉ यांची जागा संपादी करुन एकुण मो. बदला र.रु. ६,५८,२७८/- (रु. सहा लक्ष अठ्ठावन हजार दोनशे अठ्ठयात्तर फक्त) श्री. मोईनखॉन पिता असदउल्लाखॉन यांना देण्याचे मान्यतेस्तव सादर तसेच खरेदी खताचा खर्चाची र.रु. ६२,३००/- (रु. बासष्ट हजार तीनशे फक्त) डि.डी. काळेले शा. अ. यांना अग्रीम म्हणुन देण्यात यावी.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा येथील न.भु.क्र. १२२०२/अ/१,१२२०२/अ/२ व १२२०२/अ या मिळकतीमधुन रस्त्याखालील बाधीत क्षेत्र अनुक्रमे १०६.८७ चौ.मी. ५३.७५ चौ.मी. व ४२७.५० चौ.मी. चा मोबदला अनुक्रमे रु. १,४९,३७२/- (२) रु. ७५,१२५/- व रु. ४,६४,९३१/- संबंधित जमीन मालक १) श्रीमती अहमदी बेगम भ्र. असदुल्लाखा, २) अमानउल्लाखॉन पि. असदुल्लाखॉन, ३) मो. मोईनखॉ. पि. असदुल्लाखा, ४) श्री. मोईन खॉ. पि. असदुल्लाखॉन यांचेतर्फे मुख्त्यार आम श्री. मोईन खॉन पि. असदुल्लाखॉन यांना एकुण रक्कम रु. ६,५८,२७८/- (सहा लक्ष अठ्ठावन हजार दोनशे अठ्ठयाहत्तर फक्त) देण्यास व खरेदी खताचा खर्च ५०% वळती करुन उर्वरित रक्कम अदा करणेस तसेच खरेदी खताच्या खर्चाची र.रु. ६२,३००/- श्री. डी.डी. काळेले, शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९०/३४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लोटा कारंजा येथील सर सय्यद हॉल चे आधुनिकी करणासाठी तळमजल्यावर अर्धा भाग हा सभागृह आणि अर्धा भाग शाळेसाठी बांधण्याकरिता अंदाजपत्रक र.रु. २५,५२,०००/- ला सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३८/३ दि. ३०-१०-९६ अन्वये मंजुर प्राप्त झाली होती. परंतु स. नगरसेवक वास्तुतज्ञ यांनी सुचविल्याप्रमाणे कार्यक्रमांच्या वेळेस वाहने उभे करण्यासाठी अडचण निर्माण होऊ नये या करिता अधिक तळ मजला पार्किंगसाठी करणे आवश्यक आहे. तसेच पाहिल्या मजल्यावर शाळेसाठी अडचण निर्माण होऊ नये करिता दुसरा मजला बांधण्याची तरतुद ठेवण्यात आली असुन अधिक तळमजला व दुसरा मजला बांधणे साठी अतिरिक्त र.रु. १०.०० लक्ष होत आहे म्हणजेच ३५.५२ लक्ष होत आहे.

तरी प्रस्ताव सुधारीत अंदाजपत्रक व करारनामा करणेस मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटाकारंजा येथील सर सय्यद हॉल आधुनिकीकरणासाठी तळमजल्यावर अर्धा भाग हा सभागृह आणि अर्धा भाग शाळेसाठी बांधण्याच्या कामात स. नगरसेवक व वास्तुतज्ञांनी वाहन तळ (पार्कींग) साठी तळमजला व शाळेसाठी अडचणी निर्माण होऊ नये. या करिता दुसरा मजला बांधण्याकरिता अतिरिक्त र.रु. १०.०० लक्ष तसेच एकुण अंदाजपत्रक ३५.५२ लक्षाला व सुधारीत अंदाजपत्रक तसेच करारनामा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याच्या सभापती ने घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १९-३-९८ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्प अंदाजपत्रकीय स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मा. सभापती श्री. प्रभाकर विधाते यांच्या अध्यक्षेतेखाली दि. १९-३-९८ रोजी दुपारी १२.३० वा. बैठक झाली. बैठकीस खालील स. सदस्य तथा अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | स.सदस्य |
| २) | श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३) | श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| ४) | श्री. नवपुते कचरु चंद्रभान | --//-- |
| ५) | श्री. अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ६) | श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ७) | श्री. अ. रशिदखॉन (मामु) | --//-- |
| ८) | श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद | --//-- |
| ९) | श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| १०) | श्री. जोशी संजय रामदास | --//-- |
| ११) | श्री. गौतम लांडगे | --//-- |
| १२) | सौ. वाडेकर यशोदा धनंजय | --//-- |
| १३) | श्री. ओक जयवंत केशवराव | --//-- |

**विषय क्र. ४९१/१ :**

सन १९९७-९८ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे बाबत.

**संवाद**

**मा. आयुक्त :** औरंगाबाद महानगरपालिकेचा सुधारीत सन १९९७-९८ व मुळ ९८-९९ चा अर्थसंकल्पा बाबत आपले मनोगत सभागृहात वाचुन दाखविला व मा. स्थायी समिती सभापती यांना अर्थसंकल्प सादर केला. (मा. आयुक्त यांनी स्थायी समितीला अर्थसंकल्प सादर केला.)

**श्री. कचरु नवपुते :** मागील वर्षी एकंदरीत ८२.०० कोटीचा अर्थसंकल्प होता त्यापैकी किती खर्च व किती प्रमाणात शिल्लक आहे याची लेखा शिर्षानिहाय माहिती द्यावी.

**श्री. मिरा सलामी :** मागील अर्थसंल्पावर चर्चा करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखा अधिकारी :** अर्थसंकल्प पुस्तिकेतील पृष्ठ क्र. ३० मध्ये झोपडपट्टी सुधारणा यात "अ व ब" साठी एकंदरीत ३.५ कोटी रु. अर्थसंकल्पात तरतुद केलेली होती, पैकी आता पर्यंत कमी प्रमाणात खर्च झालेले आहेत यावर्षी ४.१ कोटीची यात तरतुद केलेली आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पाणी पट्टी वाढ या मताशी आम्ही सहमत नाही. परंतु प्रशासनाने शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन किती आहेत ते शोधून त्याबाबत धोरणात्मक निर्णय अवलंबिने महत्वाचे आहे. तेंव्हा झोननिहाय संबंधित माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** पाणीपट्टीत मागील वर्षी रु. २.०० कोटीने तुट का आली याची माहिती द्यावी. झोननिहाय पाणीपट्टी वसुली पुर्णपणे उद्दिष्टानुसार होत नाही काय? शहरातील एकुण अधिकृत व अनाधिकृत नळ कनेक्शनची संख्या किती आहेत. त्यानुसार पाणीपट्टी वसुली होते काय? व्यावसायिक नळ धारकांकडुन किती इंची पाईपलाईन मंजुरी दिली जाते मते शहरातील एकुण घरगुती व व्यावसायिक नळ कनेक्शन धारक यांच्या बाबतीत प्रशासन पुर्णपणे चौकशी करीत नाही व वसुलीही करीत नाही. झोननिहाय पाणीपट्टी वसुली करीत नाही. किती झाली याची सविस्तर माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :** शहरातील पाणीपट्टी वसुली झोननिहाय देणे आवश्यक आहे. परंतु सन १९९४-९५ ला एकुण पाणीपट्टी र.रु. २.९६ कोटी
१९९५-९६ --//-- र.रु. ३.२६ कोटी
१९९६-९७ --//-- र.रु. ३.४७ कोटी.
९७ फेब्रुवारी ला एकुण पाणीपट्टी र.रु. ४.३६ कोटी
याशिवाय अधिकृत आणि अनाधिकृत नळ कनेक्शन बाबत. कार्यकारी अभियंता पा.पु. हे सविस्तर माहिती देतील.

**श्री. मिरा सलामी :** माझ्या माहिती प्रमाणे शहरातील दहा हजारा पेक्षाही जास्तीचे लोकांनी पाणीपट्टी भरणा केलेली नाही. याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** मागील वर्षीपेक्षा या वर्षी पाणीपट्टी फार कमी प्रमाणात वसुली झालेली आहे. ज्या ज्या ठिकाणी अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत त्याबाबत प्रशासकीय धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** माहे फेब्रुवारी ९७ अखेर पर्यंत घरगुती नळधारक ६८,३७२/- तर व्यावसायीक ४८४ व अनाधिकृत १३१० होते. त्यापैकी ज्यांनी रु. १०००/- दंड भरुन नळ रेगुलर केले त्यांना रेग्युलाईज करण्यात आलेले आहे. याशिवाय स. सदस्याच्या सुचनेनुसार शहरातील बऱ्याच भागातील अनाधिकृत घरगुती व व्यावसायीक नळ कनेक्शन धारकांचे शोध मोहिम सुरु आहेत.

**श्री. संजय जोशी :** संबंधित अधिकाऱ्यांनी सभागृहात चुकीची माहिती सांगुन दिशाभुल केलेली आहे. शहरात व्यावयायीक नळ फक्त ४८४ नसुन मोजणी केल्यास दवाखानेच ४८४ आहेत. त्या व्यतिरिक्त गॅरेज, हॉटेल, दुकाने इ. हजारो पटीने व्यवसाय करणारे व व्यावसायिक नळ कनेक्शन घेणारे आहेत. परंतु प्रशासन पुर्णपणे डोळेझाक करते आणि पाहणी न करता सभागृहाला माहिती देते. ही बाब बरोबर नाही तर संपुर्ण शहरात ४८४ व्यावसायीक नळ कनेक्शन आहे. तर याचा सर्व्हे करुन माहिती घेतलेली आहे काय?

**श्री. गौतम लांडगे :** म.न.पा. च्या हद्दीत एम.आय.डी.सी. तील कारखाने हॉटेलस इ. छोटे मोठे उद्योग करणारे व्यावसायिक असुन त्यांचेकडे नळ कनेक्शन आहेत. तेंव्हा फकत ४८४ चा सर्व्हे म.न.पा. ने केलेला आहे काय? त्या व्यतिरिक्त जादा व्यावसायीक नळ कनेक्शन धारक शहरात आहेत याची पुन्हा एकदा सर्व्हे करुन शोध मोहिम सुरु करावी व नंतरच आकडा प्रशासनाने सभागृहाला द्यावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहरात हॉटेल्स, बिअरबार फार मोठया प्रमाणात झालेले आहेत. त्यांचेकडे १ "इंची नळ कनेक्शन सुध्दा अनाधिकृत असतील याचाही शोध घेणे आवश्यक आहे.

**श्री. संजय जोशी :** शहरात एकुण ४८४ व्यावसायीक नळ कनेक्शन धारक आहेत हा आकडाच नेमका चुकीचा आहे. त्यापेक्षा सर्व्हे करुन पुन्हा शोध घेणे आवश्यक राहील.

**श्री. रशिद मामु :** महानगरपालिकेत हॉटेल्स व दवाखाने यांचे रजिस्ट्रेशन किती झालेले आहेत?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** अंदाजे ३०० आहेत.

**श्री. संजय अधिकारी :** शहरातील वसुलीचे कामे प्रशासन बरोबर करीत नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांवर पाणीपट्टी बोजा पडत आहे.

**श्री. मिरा सलामी :** सन १९९५-९६ मध्ये व्यावसायीक नळ कनेक्शन किती होते. याची माहिती द्यावी.

**श्री. त्र्यंबक तुपे, श्री. गिरजाराम हाळनोर :** व्यावसायीक नळ कनेक्शन ४८४ पेक्षा जास्तीचे असतांनाही कमी दाखविलेले आहे. याशिवाय शहरात अजुनही अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत. त्याबाबत झोननिहाय सविस्तर माहिती द्यावी.

**श्री. रशिद मामु :** शहरात आता पर्यंत किती टपऱ्यांना परवानगी दिलेली आहे. याची माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** एकंदरीत ४६५ टपरी धारकांना रितसर परवाना दिलेला आहे.

**श्री. जयवंत ओक :** या शहरात जवळपास पाच हजार अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत. म्हणजे आता पर्यंत पाच हजार अनाधिकृत मालमत्ता झालेल्या आहेत काय? शहरात फार मोठया प्रमाणात अनाधिकृत घरे होत असून याबाबत संबंधितावर प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. रशिद मामु :** मागील सर्वसाधारण सभेमध्ये असे ठरलेले होते की, मालमत्ता धारकांचेकडे नंबरींग टाकण्यात यावे. त्यानुसार काय कार्यवाही झाली यांची माहिती द्यावी.

**श्री. मिरा सलामी :** प्रशासनाची दिरंगाई ही पाणीपट्टी व वसुली करण्यावर दिसून येते. मागील वर्षी रु. ७००/- पाणीपट्टी आकारणी केलेली होती. परंतु शासना कडुन अद्यापही मंजुरी प्राप्त झालेली नाही. आणि पुन्हा या वर्षी नव्याने वाढीव पाणीपट्टीचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेला आहे. त्यापेक्षा संपुर्ण शहराचा नळ कनेक्शनचा सर्व्हे करणे व त्यानुसार कार्यवाही करणे प्रशासनाचे कर्तव्य आहे.

**करमुल्य निर्धारण अधिकारी-१ :** शहरातील प्रॉपर्टी एकुण ९८००० आहे, पैकी ५००-६०० प्रॉपर्टीज सुटलेले असतील याशिवाय सिडको भागातील २३००० नळ कनेक्शन आहेत.

**मुख्य लेखा अधिकारी :** सन १९९१ च्या जनगणनेच्या आधारे सिडको-हडको व शहर भाग धरुन ६.०० लाख लोकसंख्या गृहीत धारकांची संख्या आहेत. परंतु सध्या अस्तितत्वात लक्षात घेता ५२ स्लम घोषित झोपडपट्टया आहेत. त्यांचेकडे नळ कनेक्शन नसतात. बऱ्याच झोपडपट्टी भागात हापसे व सरकारी नळ कनेक्शन दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :** अनाधिकृत नळ कनेक्शनचा सर्व्हे महापालिकेने केलेला नसल्याने आर्थिकदृष्टया नुकसान महापालिकेचे होत आहे कार्यकारी अभियंता, पा.पु. यांनी जी माहिती दिली की व्यावसायीक नळ शहरात ४८४ आणि जवळपास ७०००० नळ कनेक्शन घरगुती बाबत आहेत अशी माहिती सांगितली या सभागृहात स. सदस्यांनी विविध ज्या सुचना केलेल्या आहेत त्यामध्ये

शहरातील व्यावसायीक आणि मोठमोठे हॉटेल्स्, दवाखाने, गॅरेज वगैरे एकंदर जास्तीचे असुन या सर्वाचा महापालिके तर्फे सर्व्हे करुन त्यांना देण्यात आलेले कनेक्शन व कशा स्वरुपाचे आहे. त्यांचे कडुन नळपट्टी त्याप्रमाणे आकारल्या जाते काय? याची पुर्णपणे शहानिशा पाणीपुरवठा विभागाने करुन घ्यावे जर अशा प्रकारे नळ शोधून त्याचे कडुन व्यवस्थितरीत्या पाणीपट्टी आकारणी केल्यास पाणी पट्टी वाढ करण्याची आवश्यकता नाही. परंतु सध्या परिस्थितीत जिवन प्रधिकरण विभागाकडुन पाणी विकत घेऊन विद्युत मंडळ जे विद्युत आकारणी करते. त्याव्दारे महापालिकेवर बोजा होत आहे. यासाठी शहरातील अनाधिकृत नळ शोधनीसाठी एखादा उप अभियंता यांची नेमणुक करुन आवश्यक ती कार्यवाही करणे योग्य राहील. आणि नंतर क्लॉसिफिकेशन करणे आवश्यक आहे.

**श्री. जयवंत ओक :** महापालिकेतील प्रॉपर्टी व पाणीपट्टी टॅक्स संपुर्णपणे वसुली करावयाची झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना व्यावस्थित कामाला लावावे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सहा महिन्यांच्या मुदतीत शहरातील प्रॉपर्टी टॅक्स व पाणीपट्टी अनधिकृत बाबतचे सर्व्हे करुन प्रशासनाने कार्यवाही करावी आणि पाणीपट्टी रु. १०००/- अशी वाढ करावी.

**श्री. संजय जोशी :** झोन निहाय अनधिकृत नळांची सर्व्हे करुन माहिती द्यावी.

**श्री. रशिद मामु :** पाणीपट्टी बाबत बिले देण्यासाठी जसा घर तसा कर याचे कर आकारणी साठी जशी वर्गीकरण केलेले आहे. उदा. "अे.बी.सी.डी" वगैरे त्याच प्रमाणे वर्गीकरण करावे.

**श्री. गौतम लांडगे :** स.सदस्य श्री. रशिद मामु यांनी सुचना केल्याप्रमाणे पाणीपट्टी देयके देते वेळेस अेबीसीडी असे वर्गीकरण करावे व पाणीपट्टी वाढ रु. १०००/- केल्यास त्यानुसार वर्गीकरणाची कार्यवाही करावी.

**श्री. संजय जोशी, श्री. जयवंत ओक :** पाणीपट्टी साठी वर्गीकरण प्रक्रिर्या करणे योग्य नाही.

**श्री. मिरा सलामी :** प्रॉपर्टी टॅक्ससाठी जशाप्रकारे अेबीसीडी वर्गीकरण करुन कर आकारणी केल्या जाते. त्याच प्रमाणे पाणीपट्टी साठी सुध्दा करण्यात यावी. त्याचप्रमाणे शासनाकडुन शहर सौदर्यीकरणासाठी जो निधी उपलब्ध झालेला आहे. त्या खर्चाचा सौदर्यीकरण करणेसाठी उपयोगात न आणता गरिब नागरिकांच्या विकास कार्यासाठी खर्च करण्यात यावा. ज्यासाठी पाणीपट्टी वाढ न करता ज्यांचेकडे थकित वसुली आहे ती व्यवस्थित वसुली करावी, जेणे करुन येथील नागरीकांवर बोजा पडणार नाही.

**श्री. कचरु नवपुते :** शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांचे नळ शोधून त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करुन अधिकृत करावे व अनाधिकृत प्रॉपर्टी धारक आहेत. त्यांचे वरही दंडात्क कार्यवाही करुन टॅक्स लावणेसाठी जाहिर वर्तमान पत्रात निवेदन देऊन नागरीकांन आवाहन करावे जेणे करुन महापालिकेचा आर्थिक फायदा होईल.

**श्री. त्र्यंबक तुपे :** व्यावसायिक व घरगुती नळ धारकांचे कनेक्शन किती आहेत व अनाधिकृत किती आहेत. याचा प्रशासनाने सर्व्हे करुन शोध घ्यावयाचा आहे, त्याच प्रमाणे पाणीपट्टी रु. १०००/- इतकी वाढ करावी.

**श्री. गौतम लांडगे :** शहरातील छोटे मोठे उद्योजग धंदवाले आहेत आणि त्यांच्याकडे पाणीपट्टी व प्रॉपर्टी टॅक्सची थकीत रक्कम आहे. अशा व्यावसायिक

धारकांकडुन तातडीने वसुली करणेसाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** १) शहरात ज्यांचे अनधिकृत घरे आहेत आणि त्यांना टॅक्स आकारणी व्हावयाची आहेत त्या घरांना कर आकारणी झाल्या शिवाय कनेक्शन महापालिकेने देऊ नये.

२) शहरातील जवढेही हॉटेल्स/दवाखाने/ गॅरेज आहेत. त्या त्या ठिकाणचे झोननिहाय सर्व्हे करुन त्यांचेकडे किती इंची नळ कनेक्शन दिलेले आहेत व प्रत्यक्षात किती इंचीचे देयके महापालिकेस देतात या सर्वाचा सर्व्हे करुन प्रशासनाने कार्यवाही करावी.

३) स. सदस्य श्री. रशिद खॉन मामु यांनी सुचना केल्यानुसार पाणी पट्टीचे वर्गीकरण न करता पाणीपट्टी रु. एक हजार करण्याची शिफारस सर्वसाधारण सभेकडे करण्यात येते.

**श्री. मिरा सलामी :** पाणीपट्टी रु. एक हजार वाढ करण्यास माझा विरोध आहे.

**मा. सभापती :** ठिक आहे.

**मुख्य लेखा अधिकारी :** पुणे महापालिकेचे जी जुने शहर आहे. त्यांना नेट रिटेबल प्रमाणे ४०% द्यावे लागते आणि नवीन वस्तीसाठी त्यांना मिटर बसवून आकारणी पाणीपट्टीची केली जाते व जो स्लम भाग आहे. त्यांना वेगळा टॅक्स लावला जातो.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** १) पाणीपट्टी वाढ १/२ इंची साठी रु. एक हजार.

२) शो टॅक्स रु. १००/- ऐवजी रु. २०/- करावे.

**मा. सभापती :** ठिक आहे. स सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे.

१) १/२ इंची साठी रु. एक हजार

२) शो. टॅक्स रु. १००/- ऐवजी रु. २०/-

सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यास मंजुरी दिली जाते. (अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करण्यांत येते. वेळ २.३० वाजता) (सभेला सुरुवात ३.०० वाजता)

**मा. सभापती :**

| | |
|---|---|
| १) तांदुळ | ०.५०% |
| २) तेलबिया | ०.५०% |
| ३) कापुस | निरंक |
| ४) सर्वप्रकारचे भंगार लोखंड व पोलाद. | ६/- रु. प्रति टन |
| ५) रासायनिक खते | २ रु. प्रति टन |
| ६) मोटार पार्ट | १.५०% |

**श्री. गिरजाराम हाळनोर :** जकात करात वाढ करुनही ९९% वसुली प्रशासनाने केली व उद्दिष्ट प्राप्त केले त्याबाबत प्रशासन मा. महापौर, मा. सभापती यांचे अभिनंदन करतो.

**श्री. संजय जोशी :** मागील वर्षी जकात चोरी प्रकरणी किती ठिकाणी रेड टाकल्यागेलीत.

**लेखाधिकारी :** या वर्षात ७५ ठिकाणी घाडी टाकण्यात आल्या. या बाबतचा अहवाल प्रशासनाला ३१ मार्चला सादर करणार आहोत.

**मा. आयुक्त :** जकात हे महानगरपालिकेचे उत्पन्नाचे साधन आहे. त्यानुसार सन

| | |
|---|---|
| १९९४-९५ ला | रु. २४.०० कोटी |
| १९९५-९६ ला | रु. २५.०० कोटी |
| १९९६-९७ ला | रु. ३१.०० कोटी तर |

१९९७-९८ ला रु. ३९.०० कोटी जकात जमा झालेली आहे. तर दरवर्षी १५% वाढ अपेक्षित तरतुद आहे. जकात मधील भरारी पथकाचे स्पृहनीय काम श्री. एल एम. मराठे व श्री. पवार संजय यांनी धाडी टाकून आपली भूमिका चोख बजावलेली आहे. व जकात उत्पन्नात वाढ केलेली आहे. अजुनही जकाती बाबत प्रशासनाला सुधारणा करावी लागणार आहे.

**श्री. गिराजाराम हाळनोर :** ०.५०% जकात आणखी वाढ या वर्षी करावी. आणखी रु. १.०० कोटीची या वर्षीच्या अंदाजपत्रकात वाढ करावी म्हणजे रु. ४७.०० कोटी एवढी असावी.

**श्री. संजय जोशी :** मालमत्ता कराची वसुली यामध्ये वर्षाला रु. १३.०० कोटीची वसुली गृहीत धरलेली होती. पैकी ९.४५ कोटी प्रत्यक्षात वसुली झालेली आहे ते योग्य नसुन सभागृहात अधिकाऱ्यांनी अंदाजे माहिती देवु नये.

**मा. आयुक्त :** (झोन निहाय माहिती मालमत्ता कराच्या संदर्भात सन १९९७-९८ ची वाचुन दाखविली. एकुण रु. ९.४५ कोटी वसुली) यामध्ये रु. २२.०० कोटीची थकबाकी आहेत. व जवळपास मालमत्ता करांच्या १२०० तक्रारी प्रशासनाकडे आहेत. ज्यामुळे प्रलंबित प्रकरणांने वसुली पुर्ण झालेली नाही.

**श्री. संजय जोशी :** मालमत्ता कराच्या वसुली संदर्भात मा. आयुक्त यांनी महिन्यातुन एकदा लोकपंचायत झोन निहाय घ्यावी, ज्यामुळे तातडीने निर्णय घेऊन प्रशासनाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल.

**उपआयुक्त :** याच संदर्भात मागील वर्षी एक समिती नेमलेली होती. त्यांनुसार ४२७ केसेस काढलेल्या आहेत.

**मा. सभापती :** १) जी प्रकरणे मालमत्ता कराच्या वसुली संदर्भात अनेक दिवसांपासुन प्रलंबित आहेत तशी प्रकरणे निकाली काढणेसाठी झोन निहाय बैठका घेऊन प्रकरणे निकाली प्रशासनाने काढावीत जेणे करुन महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नात अधिक भर पडेल.

२) अशी सर्व प्रकरणे १५ दिवसांचे आंतम निकाली काढावीत.

**श्री. मिरा सलामी :** शहरातील बऱ्याच भागात कर आकारणी करतांना बऱ्याचशा चुका झालेल्या आहेत. त्या दुरुस्त्या करणे आवश्यक आहे. तद्‌नंतर कर भरणा संबंधित मालक करणे वेळेवर करतील.

**श्री. जयवंत ओक :** ज्या ज्या भागातील मालमत्ता कराच्या वसुली पुर्णपणे होतात. त्या भागात नागरी सुविधा महापालिकेने द्याव्यात.

**उप आयुक्त :** नागरीकांनी टॅक्स भरणा केला म्हणजे त्यांना नागरी सुविधा देणे बंधनकारक नाही, असा सुप्रिम कोर्टाचा निर्णय आहे. फक्त मानवी दृष्टीकोन ठेवून नियमाप्रमाणे नागरिकांना सुविधा पुरवितो.

**मा. सभापती :** पुढील वर्षा पासुन प्रत्येक मालमत्ता धारकास मालमत्ता व पाणीपट्टी बाबतचे कार्ड देण्यात येणार

**श्री. गिरजाराम हाळनोर श्री. गौतम लांडगे :** अधिकाराचे विकेंद्रिकरणाबाबत प्रशासनाने माहिती द्यावी.

## *"मिनी आयुक्तालय प्रस्ताव"*

१) **मा. आयुक्त :** १) जनतेच्या अडचणी तात्काळ दुर होणे शक्य आहे.

२) कामात सुसुत्रता होऊन त्याचा जनतेचा फायदा होईल.

३) पाणीपुरवठा व ड्रेनेजच्या तक्रारी लवकरात लवकर सोडविणे सहज शक्य होईल.

४) मुख्य कार्यालयातील गर्दी कमी होऊन पत्र व्यवहारात मोठया प्रमाणात घट होईल.

५) आयुक्तांकडील जनतेचा लोंढा कमी होऊन इतर म्हत्वांच्या धोरणात्मक व विकासाच्या कामाला जास्त वेळ देता येईल. त्यामुळे शहराचा सुद्दष्ठ निकोप व सुनियोजित विकास होण्यास मदत होईल.

६) मुख्य कार्यालयातील सर्व अधिकाऱ्यांना त्यांचे विकासाच्या व भांडवली कामाकडे जास्त लक्ष केंद्रित करता येईल. त्यामुळे शहराचे भावी नियोजन व्यवस्थितपणे करणे शक्य होईल. यासाठी प्रत्येक झोनला रु. २५.०० हजाराचे विभाग आयुक्त यांना खर्च करण्याचे अधिकार देण्यात येईल.

७) कर्मचाऱ्यांचे सेवापट, पगार, रजे बाबत आणि झोन मधील स्वच्छता बाबतचे कामे एकंदरीत झोन मधुन केल्या जातील.

८) कामाच्या विकेंद्रीकरणामुळे मुख्य इमारतीचे विस्तारीकरण टाळणे शक्य होईल व तो पैसा विभागीय कार्यालयांकरिता उपलब्ध होऊ शकेल.

**श्री. रशिद मामु :** झोन मधील वाढीव कामांची मंजुरी देणार काय? किती लाखापर्यंत झोनला मंजुरी देणार.

**मा. आयुक्त :** १) रु. २५.०० हजारापर्यंत खर्च करण्याचे अधिकार विभाग आयुक्तांना देण्यात येणार.

२) तातडीचे रु. ३०००/-

३) पाणी पुरवठा व ड्रेनेज साठी रु. ५०००/- नियमाप्रमाणे पीडब्लयुडी नुसार करण्यात येईल.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**श्री. कचरु नवपुते :** दुग्ध नगरी पडेगांव येथुन का हलविण्यात प्रस्ताव आहे. व ते सोईस्कर होणार आहे.

**पशुधन विकास अधिकारी :** मो. पडेगांव येथे दुग्ध नगरी करण्यास प्रस्ताव आहे. व ते सोईस्कर होणार आहे.

**श्री. कचरु नवपुते :** मग चिकलठाणा भागात या दुग्ध नगरीसाठी जी ७५ एकर जागा ठेवलेली आहे त्या ठिकाणी महापालिकेतर्फे एक उद्यान तयार करण्याचा प्रस्ताव ठेवावा. जेणे करुन तेथील जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाहीत.

**श्री. मिरा सलामी :** मागील कित्येक वर्षा पासुन झोन ३ च्या विभागणी बाबत प्रस्ताव होता परंतु काहीही झालेले नाही.

**उप आयुक्त :** या विभागाचे विभागणीचा प्रस्ताव असुन नविन जागेची पाहणी केलेली आहे आणि भाडयाने जागा घेऊन कार्यवाही करावी. लागणार आहे.

**श्री. मिरा सलामी :** मोतीवाला हॉलचे उर्दु वाचनालयाचे प्रपोजल होते काय झाले.

**शहर अभियंता :** नगररचना विभागाच्या नियमाप्रमाणे वाचनालय तयार करण्यांत येणार आहे. याबाबत मा. आयुक्त यांनी चर्चा केल्यानुसार त्या ठिकाणी बहुउद्देशिय हॉल होणार आहे.

**मा. सभापती :** याबाबत ३१ मार्च पर्यंत भुमी पुजन करणार आहोत.

**श्री. मिरा सलामी :** नेहरु भवन मधील मेंटनन्स बाबत काय झाले.

**शहर अभियंता :** येथील मेंन्टनेन्स केलेले असुन त्या ठिकाणी खुर्च्याचे बाबतीत कार्यवाही चालु आहे.

**श्री. मिरा सलामी :** जिन्सी सुत गिरणी येथील मिनी स्टेडियम बाबत काय झाले.

**सहाय्यक संचालक नगररचना :** सहा. संचालक, नगररचना, संचालक पुणे यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही होईल.

**श्री. मिरा सलामी :** माझ्या वार्डात सार्वजनिक संडास आहेत. त्या ठिकाणी शाळा व दुकाने काढावेत.

**शहर अभियंता :** ठिक आहे.

**श्री. मिरा सलामी :** रोषनगेट येथे हॅमर लाईट लावणे बाबत काय झाले?

**उप अभियंता (विद्युत) :** प्रस्ताव आहे.

**श्री. मिरा सलामी :** मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्राबाबत काय झाले.

**शहर अभियंता :** कार्यवाही चालु आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहरात राहणारे नागरिकांना स्वच्छतेसाठी आणि पाणी पुरवठा व ड्रेनेज लाईन टाकणेसाठी सिडको नोटीफाईड अनाधिकृत वसाहतीसाठी पाणी पुरवठा मध्ये जी तरतुद केलेली आहे. आणि जकात मध्ये जी.रु. १.०० कोटी ची वाढ केलेली आहे. त्यानुसारच सिडको नोटीफाईड विभागासाठी रुपये १.०० कोटीची जादा तरतुद करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे.

**श्री. जयवंत ओक :** आता पर्यंत आपण जळगांव पॅटर्न बाबत टपऱ्यांच्या संदर्भात विचारणा करुन तरतुद केलेली आहे काय? पृष्ठ क्र. ३१ मध्ये व्यापारी संकुलासाठी १.५ कोटीचे प्रस्ताव आहे. शहरातील महापालिकेच्या ज्या खुल्या जागा आहेत त्या ठिकाणी महानगरपालिके तर्फे गाळे बांधावे आणि तेथील सुशिक्षित बेरोजगारांना याचा लाभ द्यावा, जेणे करुन रस्त्यावर वेळोवेळी अतिक्रमणे होणार नाहीत.

**मा. सभापती :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अंदाज पत्रकातील सुधारित १९९७-९८ व मुळ १९९८-९९ या वर्षा साठीचे अंदाजपत्रकात दर्शविलेले प्रस्तावातील काही स. सदस्यांनी केलेल्या सुचनांचा आवश्यक विचार करुन दुरुस्तीसह प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. आणि या वर्षाचे
रु. ९२,३५,७१०००/- उत्पन्न गृहीत धरुन
रु. ९२,२४,९७०००/- खर्च वजा जाता.
रु. १०,४,०००/- शिल्लकी अंदाजपत्रकास प्रस्तावातील दुरुस्तीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पातील जे प्रस्ताव नविन अनु.क्र. १ ते १९ पर्यंतचे आहेत त्यातील काही दुरुस्त्या त्याचप्रमाणे खालील जकात दर वाढीस सर्वसाधारण सभेसाठी शिफारस करण्यात येते.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकातील तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १. | पाणीपट्टी | रु. १५००/- प्रति वर्ष | रु. १०००/- प्रति वर्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | शो टॅक्स | रु. १००/- प्रति शो. | रु. २०/- प्रति शो..१ |
| १. | २. | ३. | ४. |
| ३. | कापुस जकात दर | ०.२५% | माफ |
| ४. | सर्व प्रकारच्या सुका मेवा, बदाम, काजु, किसमिस, खारीक पिस्ता, चारोळी, अक्रोड, अंजिर(सुके) जेली जकात दर. | २% | ३% |
| ५. | सर्व प्रकारचे सिमेंट पाईप पत्रे अंसबे स्टॉस, सिमेंट जाळी, सॅमोला अशमोह, जिप्सम, पावडर, चुना, सनला, आणि इमारतीच्या बांधकामासाठी लागणारे इतर साहित्य जकात दर. | ३% | ४% |
| ६. | ग्लेझ, टाईल्स, संगम खडीदगड व स्लॅब, स्टोन, कोटा स्टोन कडप्पा स्टोन, टेरा कोटा टाईल्स ग्रेनाईट, स्टोन, पोखर्ड आग्रा स्टोन धोलपुर स्टोन इ. जकात दर. | २% | ३% |
| ७. | सिंगारेट व सिगारेट होलडर्स स्मोकिंग पाईप्स, सिगारेट कागद, पाईपासाठी वापरली जाणारी तंबाखु, टोबॅको केसेस, पॅकेजेस, सिंगार आणि सिगारेट केसेस, चिस्ट आणि धुम्रपानाच्या वस्तु जकात दर. | ३.५% | ५% |
| ८. | सुंगधी जर्दा, सर्व प्रकारचे सुंगधी तंबाखु, किमान गुटका, सर्वप्रकारचा पान मसाला जकात दर. | १.५% | ५% |
| ९. | खोगीर रेग्झीन पेटया, सुटकेस, एअर बॅग, ब्रिफ केसेस लेडीज पर्स व इतर सर्व प्रकारचे बॅगस, जोडे, चप्पला, स्लिपर्स, पट्टे आणि इतर कातडयापासुन तयार केलेले पादत्राणे जकात दर. | २.५% | ३% |
| १०. | रेडिओ रेडीओग्राम, दुरदर्शन संच ध्वनीवर्धक यंत्र, व्ही.सी.आर. कॅसेट आणि त्यांचे सुटे भाग, ग्रामो फोन, इलेक्ट्रॉनिक वस्तु आणि त्यांचे सुटे भाग घटक सांगिताची साधणे व त्यांचे सुटे भाग व तसेच चित्रप्रक्रिया यंत्र वायरलेस आणि त्यांच्या उत्पादनात वापरली जाणारी सुटे भागाचे जकात दर. | ४% | ५% |
| ११. | सर्व प्रकाराची घडयाळ व त्याचे सुटे भागचे जकात दर. | २.५% | ४% |
| १२. | हातगाडी व फेरीवाल्या कडुन कर. | रु. २.०० प्रतिदिन | रु. १.०० प्रतिदिवस किंवा एकत्रिक रु. २५०.०० |

या व इतर विभागातील प्रस्तावातील दुरुस्त्यासह यावर्षीचे
रु. ९२३५७१ हजार उत्पन्न
रु. ९२२४९७ हजार खर्च
रु. ००१०७४ हजार शिल्लकी अंदाजपत्रक.

यास सर्वानुमते मंजुरी देऊन दुरुस्तीसह व स्विकृतीसह सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २०-३-९८ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्प अंदाजपत्रकीय स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शुक्रवार दिनांक २०-३-९८ रोजी मा. सभापती श्री. प्रभाकर विधाते यांच्या अध्यक्षेतेखाली स्थायी समिती सभा दुपारी ४.०० वाजता "मलीक अंबर सभागृह" येथे संपन्न झ ााली तिचे इतिवृत्त सभेची सुरुवात "वंदेमातरम्" या राष्ट्रगिताने झाली. सभेस अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. त्रिंबक तुपे | स.सदस्य |
| २) | श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ३) | श्री. कचरु चंद्रभान नवपुते | --//-- |
| ४) | श्री. अभिमन्यु भालेराव | --//-- |
| ५) | श्री. विकास जैन | --//-- |
| ६) | श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ७) | श्री. अ. रशिदखॉन (मामु) | --//-- |
| ८) | श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद | --//-- |
| ९) | श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| १०) | श्री. संजय जोशी | --//-- |
| ११) | श्री. गौतम लांडगे | --//-- |
| १२) | सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १३) | श्री. जयवंत केशवराव ओक | --//-- |

**विषय क्र. ४९२/१ :**

सन २६-१२-९७ आणि ३१-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**मा. सभापती :** १) दिनांक ३१-१२-९७ च्या सभेमध्ये अशी चर्चा झाली होती की, महानगरपालिकेतील क्रिडा शिक्षक श्री. डी.पी. जाधव यांना कुस्ती प्रशिक्षक व श्री. सय्यद सलीमोद्दीन यांना फुटबॉल व क्रिकेट प्रशिक्षक म्हणुन गरवारे स्टेडियमवर नियुक्ती देण्यांत यावी अशी नोंद इतिवृत्तात घ्यावी. व त्याबरोबर विषय क्र. १ यास दुरुस्तीसह मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. ३१-१२-९७ च्या सभेतील इतिवृत्तात चर्चा झाली होती की, महानगरपालिकेतील क्रिडा शिक्षक श्री. डी.पी. जाधव यांना कुस्ती प्रशिक्षक व श्री. सय्यद सलीमोद्दीन यांना फुटबॉल व क्रिकेट प्रशिक्षक म्हणुन गरवारे स्टेडियमवर नियुक्ती देण्यांत यावी. तसेच दिनांक २६-१२-९७ आणि ३१-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास या व इतर दुरुस्त्यासह इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विद्यापीठ परिसरात सी.ई.डी.टी. ते गोगानाथ मंदिरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. २,७१,९५८/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "भांडवली रस्ते" (डांबरीकरण) या लेखा शिर्षाखाली करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्यापीठ परिसरात सी.ई.टी.टी. ते गोगानाथ मंदिरपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. २,७१,९५८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९४/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील संगीत कांरजेसाठी चैन लिंक बसविण्यांच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. २,७४,१५९/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "शहर सौदर्यीकरण" (संगीत कांरजे) या शिर्षकातुन करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील संगीत कांरजेसाठी चैन लिंक बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. २,७४,१५९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९५/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, यमुना कॉलनी येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. १,१६,८४३/- चे तयार करण्यांत आले असुन सदरचा खर्च "भांडवली खडी रस्ते" या लेखा शिर्षाखाली करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे यमुना कॉलनी येथे खडी रस्ता तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,१६,८४३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९६/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरु भवन परिसरातील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ४१,७५०/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षकातर्गत करण्यात येईल.

तसेच भारताचे रेल्वे मंत्री मा. श्री. रामविलास पासवान साहेब औरंगाबाद येथे आले होते. त्याचा एक कार्यक्रम महानगरपालिकेच्या मालकीच्या नेहरु भवन या हॉल मध्ये होता तेथील परिसरातील रस्ते बऱ्याच वर्षापासुन केले नव्हते ते अत्यंत खराब झाले होते. त्यामुळे सदरील काम हे उपलब्ध कंत्राटदार श्री. जी.एम. कटारिया यांचेकडुन डांबरीकरणाचे काम करुन घेतले आहे. तरी तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रु. ४१,७५०/- ला व उपलब्ध कंत्राटदार श्री. जी.एम. कटारिया यांचेकडुन काम करुन घेतले असल्यामुळे कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरु भवन परिसरातील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करुन घेण्यास्तव तयार केलेल्या र.रु. ४१,७५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच कामाची तातडी लक्षात घेता सदरील काम उपलब्ध कंत्राटदार श्री. जी.एम. कटारिया यांचे कडुन करुन घेतलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९७/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वैद्यकीय महाविद्यालय जवळ सौदर्यीकरण करणेच्या कामासाठी सन ९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ८६,८००/- चे तयार करण्यांत आले असुन सदरच्या खर्च "भांडवली खडी रस्ते" या शिर्षकातुन करण्यात येईल.

तसेच सदरील काम हे अतिरिक्त हटाव मोहिमे अंतर्गत उठविण्यांत आले आहे ते परत होऊ नये म्हणुन सदरचे काम करणे अंत्यत गरजेचे होते त्या करिता हे काम तातडीने उपलब्ध कंत्राटदार श्री. सोहेल सिद्यीकी यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात येत आहे.

तसेच सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक र.रु. ८६,८००/- ला उपलब्ध कंत्राटदार श्री. सोहेल सिद्यीकी यांचेकडुन करुन घेण्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय महाविद्यालय जवळ सौदर्यीकरण करणेच्या कामाकरिता तयार केलेल्या रक्कम रु. ८६,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने करुन घेतल्याने उपलब्ध कंत्राटदार श्री. सोहेल सिद्यीकी यांचेकडुन करुन घेतलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी स्विकृतीसह देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९८/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पडेगांव कत्तलखान येथे विविध प्रकारची कामे करणेस्तव र.रु. २,४१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. उपरोक्त अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीने ठराव क्र. ३५६/१५ दिनांक ९-१२-९७ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे. दरम्यान निविदा काढणे निविदा मंजुर करणे, कार्यादेश इत्यादी बाबी करिता बराच कालवधी लागणार आहे. कत्तलखान्याचे काम करणे अतिआवश्यक असल्याने उपरोक्त काम हे उपलब्ध गुत्तेदार श्री. शुजात अली हश्मी यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखाना येथे विविध प्रकारची कामे करण्यासाठी तयार केलेल्या र.रु. २,४१,०००/- च्या अंदाजपत्रकास व कत्तल खान्याचे काम तातडीने करुन घेण्यासाठी हे काम उपलब्ध गुत्तेदार श्री. शुजात अली हा शमी यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९९/८ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बनेवाडी गावापासुन ते स्मशान भुमी पर्यंतचा रस्ता मजबुतीकरण करणे व डांबरीकरण करणे करिता र.रु. ४,५५,३००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९६-९७ अनुसार तयार करण्यांत आली असुन मा. आयुक्तांनी दि. २-८-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली. तसेच दि. १६-८-९७ रोजी संपन्न झालेली स्थायी समितीच्या विषय क्र. १७३/३२ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्त पत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेख/नि/७३/९७ दि. २३-१०-९७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. ४-११-९७ पर्यंत एकुण (५) पाच कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या दिवशी फक्त (५) पाच मोहोरबंद निविदा प्राप्त झालया त्या निविदा दि. २-१२-९७ रोजी उपस्थित ठेकेदार समक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. चांदराम अरान्ना | २९% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २. | मेस व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | २३.७९% | --//-- |
| ३. | मेस आदिनाथ कंस्ट्रक्शन | २१% | --//-- |
| ४. | मेस मॉस्कट कंन्स्ट्रक्शन | ११.८६% | --//-- |
| ५. | श्री.डी. अजितसिंग | १७.३% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९% कमी दराची निविदा मेस चांदराम अरान्ना यांनी निविदा आहे.

करिता मेस चांदराम अरान्ना यांची २९% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी गावापासुन ते स्मशानभुमी पर्यंतचा रस्ता मजबुतीकरण करणे व डांबरीकरण करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा २९% कमी दराची मे. चादराम आशन्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी स्विकृतीसह देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५००/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येता की, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात कार्यरत असलेले श्री. अशोक सुखदेव म्हस्के हे ठराविक वेतनावर कार्यरत होते. त्याचे दिनांक २८-४-९७ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी छाया अशोक म्हस्के यांनी दिनांक २३-६-९७ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, त्यांच्या पतीच्या जागी त्यांना नौकरी देण्यांत यावी.

करिता श्रीमती, छाया अशोक म्हस्के यांना त्याचे पति श्री. अशोक सुखदेव म्हस्के यांच्या निधनामुळे दैनिक वेतनावर नियुक्ती देण्यासाठी सहानुभुतीपुर्वक विचार करण्याबाबत विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद**

**श्री. कचरु नवपुते श्री. गौतम लांडगे श्री. रशिद मामु :** सदरील प्रस्ताव स्थायी समिती सभेमध्ये का आला याची माहिती द्यावी. कारण दैनिक वेतनावरील चतुर्थ क्षेणीसाठी न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार जेष्ठता यादीतील लोकांना घेतल्यास कोर्टात स्टे येण्याची शक्यता असते. यापेक्षा प्रशासनानेच कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**सहा. आयुक्त-२ :** श्री. अशोक सुखदेव म्हस्के हा व्यक्ती शिक्षण विभागात दैनिक वेतनावर (ठराविक वेतनावर) कार्यरत होते. व त्याचा मृत्यू झाला. आता त्यांच्या पत्नीने पतीच्या जागेवर दैनिक वेतनावर घेण्यासाठी सहानुभुतीपुर्वक विचार करण्यासाठी विनंती केलेली आहे.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव स्थायी समिती समोर न ठेवता प्रशासनानेच आवश्यक ती कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संबंधित प्रस्तावाबाबत प्रशासनाने आपल्या अधिकारात आवश्यक ती कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०१/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३३ मधील भिम संदेश कॉलनी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९५-९६ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये १,७७,९०२/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "रस्ते देखभाल व दुरुस्ती पुर्नडांबरीकरण या शिर्षकातुन सन ९८-९९ च्या सुधारित अर्थसंकल्पातुन करण्यांत येईल.

तसेच म्हाडा सदरील कॉलनी हस्तांतर बाबतचे करारनामा पत्र उपलब्ध होऊ शकलेले नाही.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक र.रु. १,७७,९०२/- ला मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रसतावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३३ मधील भिमसंदेश कॉलनी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,७७,९०२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०२/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चिकलठाणा येथील जुनी व्यायामशाळा तोडुन त्या ठिकाणी नविन आर.सी.सी. इमारत बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ५,०९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सन ९७-९८ या वर्षातील विकास इमारत शाळा दवाखाने बांधणे या लेखाशिर्षातील तरतुद संपल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रकात वाढीव तरतुदीचे अधिन राहुन मा. आयुक्तांनी स्थायी समितीसमोर सादर करण्याबाबत दि. २७-१२-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी रक्कम रु. ५,०९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. खर्च विकास इमारत शाळा दवाखाने बांधणे या लेखाशिर्षामधुन सुधारीत अंदाजपत्रक सन ९७-९८ वाढवून दिलेल्या तरतुदीमधुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील जुनी व्यायामशाळा तोडून त्याठिकाणी नविन आर.सी.सी. इमारत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ५,०९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०३/१२ :**

अध्यक्ष समर्थकृपा सहकारी गृह निर्माण संस्था गारखेडा या नोंदणीकृत संस्थेने त्यांच्या मंजुर रेखाकंनातील स.नं. ५९ गारखेडा मधील नगरभुमापन क्रमांक १५७२७ ही खुली जागा क्षेत्रफळ १५०५ चौ.मी. संस्थेसाठी सांस्कृतिक सभागृह/जिम्नॅशियम हॉल बांधण्यासाठी भाडेपट्टयाने देण्याबाबत मागणी केलेली आहे.

तरी खालील अटी व शर्तीवर सदरील संस्थेस जागा भाडेपट्टयाने देण्याबाबत शिफारस करण्यांत येते.

१) सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १६०/१ दि. १६-११-९६ नुसार मान्य असलेले भाडे रु. १००/- प्रतिवर्ष राहील.
२) विकास नियंत्रण नियमावली नुसार अनुदेय वापरासाठी व खुल्या जागेच्या क्षेत्राचे १०% अथवा २०० चौ.मी. दोघापैकी जे कमी असेल त्यासाठी रितसर बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजुर करुन घ्यावा लागेल.

३) भाडेपट्टयाची मुदत ३० वर्ष राहील परंतु प्रत्येक ५ वर्षानंतर भाडेपट्टयाचे नुतनीकरण करावे लागेल.
४) जागा प्रदान करावयाचा धोरणानुसार इतर सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन घेऊन जागा ताब्यात देण्याची कार्यवाही मालमत्ता विभागाने करावी.

**संवाद**

**श्री. मिरा सलामी :** सदरील प्रस्तावातील जागा संस्थेची आहे काय? माहिती द्यावी.
**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती दयावी.
**सहा. संचालक नगररचना :** सदरील जागा संस्थेची असुन मोकळया जागेपैकी १०% जागा देण्याबाबत महानगरपालिकेकडे मागणी केलेली आहे व अटी आणि शर्तीनुसार कार्यवाही करता येते.
**मा. सभापती :** मंजुर (स्विकृतीसह)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थकृपा गृह निर्माण संस्था, गारखेडा या नोंदणीकृत संस्थेच्या मंजुर रेखाकंनातील स.न.गारखेडा मधील न.भु. १५७२७ ही खुली जागा क्षेत्रफळ १५०५ चौ.मी. संस्थेसाठी सांस्कृतिक सभागृह/जिम्नॅशियम हॉल बांधण्याकरिता प्रस्तावातील अ.क्र. १ ते ४ च्या अटी व शर्तीनुसार प्रतिवर्ष रु. १००/- भाडेपट्टयाने ३० वर्ष मुदतीकरिता देण्यात येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०४/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरु भवन इमारतीची दुरुस्ती करुन अद्यावत करावयाचे आहे त्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रु. २,७२,०६०/- चे अंदाजपत्रक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुभवन इमारतीची दुरुस्ती करुन अद्यावत करणेसाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,७२,०६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी स्विकृतीसह देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०५/१४ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर (मुंकुदवाडी) स्लम भागात उर्वरित अर्ध गोलाकार गटार बांधणे कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. ७,७०,७७०/- सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९६-९७ अनुसार तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांनी दि. १२-३-९८ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रदान केली आहे.

सदर काम १८ खडी विकास योजना अंतर्गत करण्यांचे प्रस्थापित आहे. करिता मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर (मुंकुदवाडी) स्लम भागात उर्वरित अर्ध गोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ७,७०,७७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०६/१५ :**

स.नगर सेवक वार्ड क्र. ७८ क्र ११ हर्सुल तसेच मिसरवाडी येथील नागरिकांनी खालील ठिकाणी बालवाडया सुरु करण्याबाबत पत्र दिले आहे.

१) जयभवानी नगर एन-२
२) सुरवाडी हर्सुल
३) एकतानगर हर्सुल
४) राधास्वामी कॉलनी (हर्सुल)
५) मिसरवाडी (नारेगांव रोड)

सदील ठिकाणी पाहणी केलेली असता मनपाची जागा नाही त्यामुळे बालवाडी साठी जागा भाडयाने घ्यावी लागेल त्यासाठी प्रत्येक खोलीचे अंदाजे भाडे रु. २५०/- इतके होईल बालवाडी साठी प्रत्येक भागात ३० ते ३५ विद्यार्थी मिळु शकतील.

प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संवाद**

**श्री. गौतम लांडगे :** या प्रस्तावामध्ये मो. लक्ष्मी कॉलनी (प्रज्ञानगर) येथे बालवाडी सुरु करण्यास परवानगी द्यावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. प्रस्तावानुसार व यामध्ये आणखी एका विकाणी मो. लक्ष्मी कॉलनी (प्रज्ञानगर) स्लम भागात बालवाडी सुरु करण्यास परवानगी देण्यांत येते. (स्विकृतीसह)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १) जयभवानीनगर एन-२ २) सुरेवाडी हर्सुल ३) एकतानगर ४) राधास्वामी कॉलनी ५) मिसरवाडी (नारेगांव रोड) व लक्ष्मी कॉलनी प्रज्ञानगर या भागासाठी बालवाडी नव्याने उघडण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. काही ठिकाणी मनपाची जागा नाही. त्यामुळे जागा भाडयाने घ्यावे लागेल त्यासाठी प्रत्येक खोलीचे भाडे अंदाजे रु. २५०/- ते ३००/- इतके राहील व प्रत्येक भागात ३० ते ३५ विद्यार्थी मिळु शकतील याकरिता प्रस्ताव स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०७/१६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्रेयनगर येथील मंजुर रेखाकनांत १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागीच सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार र.रु. १,११,०२०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुद मधुन करण्यांत यईल.

करिता अंदाजपत्रक र.रु. १,११,०२०/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रेयनगर येथील मंजुर रेखांकनात १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,११,०२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०८/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयात हरिणी करिता मोट तयार करावयाची आहे. त्यासाठी ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. ४,५३,६१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. ७-६-९७ अन्वये मंजुरी दिलेले आहे.

सबब सदर कामाचे र.रु. ४,५३,६१०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च प्राणी संग्रहालय विकसीत करणे या लेखा शिर्षातुन सन ९७-९८ या आर्थिक वर्षातुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयात हरिणी करिता मोट तयार करण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,५३,६१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०९/७८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपा प्रशाभ. क्र. ७ (मराठी) औरंगपुरा (दिवानदेवडी) करिता वसंतभुवन येथे पार्टीशन करावयाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रु. १,३७,८४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत त्यास मा. स्थायी समितीने ठराव क्र. ३४६/५ दि. ९-१२-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/८४/९७ दि. १२-१२-९७ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण (९) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख हाश्मी | २% | जास्त दराने |
| २. | श्री. सुजात अली हाश्मी | ०.१०% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा श्री. सुजातअली हाश्मी यांची आहे. परंतु दि. १७-३-९८ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात दराबाबतच्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी ऐवजी ३% दराने मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

त्यानुसार श्री. सुजात अली हाश्मी यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा वाटाघाटी नुसार ३% कमी दराची निविदा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा प्र.शा. क्र. ७ (मराठी) औरंपुरा (दिवानदेवडी) करिता वसंतभुवन येथे पार्टीशन करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम श्री. शुजात अली हाश्मी यांचेकडुन अं.प. दरापेक्षा ३% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१०/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दादाकॉलनी कैलासनगर येथे दवाखाना व वाचनालयासाठी इमारती बांधणे या कामासाठी र.रु. ४,५०,०००/- चे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास स्थायी समितीने ठराव क्र. ३४८/७ दि. ६-१-९६ अन्वये सर्वानुमते मंजुरी दिली आहे. त्यानुसार सदर कामास्तव निविदा मागविल्या असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा मे. अंबावाला ए.एच.एन यांची निविदा प्राप्त झाली दराचे वाटाघाटी अंती ०.०५% कमी दराची कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा मंजुरीच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीने विषय क्र. ५६/१ अ.क्र.-३ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार काम सुरु करण्यांत आले दरम्यान वास्तुशास्त्रज्ञ यांचे कडुन इमारतीचे सविस्तर नकाशे प्राप्त झाले. प्रत्यक्ष स्थळावर मा. आयुक्त व स. नगर सेवक यांचेसह पाहणी झाली व जागेचा सुनियोजित वापर होण्याच्या दृष्टीने वरच्या मजल्यावर फक्त एका खोलीने वाचनालय उद्दिष्ट साध्य होणार नाही अशी स.नगर सेवक यांनी विनंती व मागणी केल्यानुसार जास्तीच्या तीन (३) खोल्या जिना व स्वच्छतागृह इत्यादीचे काम करणे जरुरी भासले वाढीव कामाची दुसरी जागा उपलब्ध नाही. आता हे काम मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यात येत आहे.

त्यानुसार उपरोक्त वाढीव कामाचे सुधारीत अं.प. ७,४२,८२५/- मुळ मंजुर अंदाजपत्रकीय ४,५०,०००/- वाढ २,९२,८२५/- म्हणजेच सुधारित अं.प.र.रु. ७,४२,८२५/- मान्यतेस व सुधारित करारनामा करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दादाकॉलनी कैलासनगर येथे दवाखाना व वाचनालय इमारतीचे कामात वरचा मजल्यावर तीन खोल्या, जिना व स्वच्छता गृह इ. कामात वाढ झाल्याने मुळ अंदाजपत्रकीय र.रु. ४,५०,०००/- व वाढीव र.रु. २,९२,८२५/- अशा एकुण सुधारीत र.रु. ७,४२,८२५/- ला तसेच सदर काम मुळ कामाचे गुत्तेदारांकडुन २% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५११/२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. सादतनगर, राहुलनगर स्लम भागात नाला क्रॉसिंग ठिकाणी गॉक्स कल्व्हर्ट बांधणे कामा करिता र.रु. ६,०८,४४०/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांनी दरसुची ९६-९७ नुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दि. १४-९-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे स्थायी समिती सभेचा विषय क्र. ३०७/६ दि. २८-१०-९७ अन्वये मान्यता मिळाली

नंतर रितसर वृत्त पत्रात कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/८७/९७ दि. ३-१२-९७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखे ११-१२-९७ पर्यंत एकुण (२२) बावीस कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी फक्त (३) तीन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २३-१२-९७ रोजी उपस्थित ठेकेदारसमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदरासमक्ष उघडण्यांत आल्या ठेकेदरांना दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एल.एम. मंडोरे | ०.५% | अं.प. दरापेक्षा कमी दर. |
| २. | श्री. इ.आय. मॅथ्यु | ४% | अं.प. दरापेक्षा जास्त दर. |
| ३. | श्री. सोहल सिद्दीकी | ५% | --//-- |

तुलनत्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा श्री. एस.एम. मंडोरे यांची आहे. म्हणुन मंजुरी साठी मा. आयुक्तांनी सादर केली असता त्यांना सदरील दिलेला दर समाधान कारक वाटले नाही म्हणुन संबंधित ठेकेदारासमक्ष चर्चेसाठी बोलवविण्यात आले व चर्चेस ठरल्याप्रमाणे संबंधित ठेकेदरांनी ०.०५% कमी ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दरानी काम करण्याची हमी दिली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादतनगर राहुनगर स्लम भागात नाला क्रॉसिंग ठिकाणी बॉक्स टाईप कल्व्हेट बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. एस.एम. मंडोरे यांचेकडुन अं.प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१२/२१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नुर कॉलनी येथील नाला ट्रेनिंगचे अर्धवट काम पुर्ण करणे बाबतच्या कामाच्या रु. १०,५७,०००/- च्या अंदाजपत्रकास दि. २७-१०-९७ रोजी मा. सर्वसाधारण सभेत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी देवून निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पंचविस (२५) कोऱ्या निविदा विक्री झाल्या स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण दोन (२) निविदा सिलबंद प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. संजीवनी कॅन्स्ट्रक्शन | १०% | जास्त दराने |
| २. | श्री. बदरविन सालम | २५% | --//-- |

वरील प्रमाणे तुलनात्मक दृष्टया प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराची आहे.

संबंधित गुत्तेदारास दर वाटाघाटी साठी बोलवले असता संबंधित गुत्तेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराने करण्यांस तयार आहे. असे लेखी संमतीपत्र दिले आहे.

तरी मा. आयुक्तांनी संबंधित अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दरास दि. २-१-९८ रोजी मान्यता दिली आहे.

सबब सदर कामासाठी वाटाघाटी अंतीचा दर म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीच्या प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नुर कॉलनी येथील नाला ट्रेनिंगचे अर्धवट काम पुर्ण करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अं.प. दरापेक्षा २% जास्त दराने मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१३/२२ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मसनतपुरा भागात डांबरी रस्ते तयार करणे करिता र.रु. ४,२०,३५३/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९६-९७ डि.एस.आर. ९६-९७ अनुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दि. २०-८-९७ रोजी प्रशासकीय मंजुरी प्रधान केली आहे.

तसेच दि. ३-१०-९७ च्या स्थायी समिती विषय क्र. २५८/१३ अन्वये सदर कामाला मंजुरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्र प्रसिध्दी देऊन कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८४/९७ दि. १३-११-९७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्री या अंतिम दि. २१-११-९७ पर्यंत एकुण (३) तीन कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या दिवशी (३) तीन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. १०-१२-९७ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारानी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. चांदराम आशन्ना | २२.१०% | अं.प. दरापेक्षा कमी दर. |
| २. | श्री. डी. अजितसिंग | १९.८८% | --//-- |
| ३. | मेस. मॉस्कट कंन्स्ट्रक्शन | ११.८६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.१०% कमी दराची असलेली निविदा श्री. चांदराम आशन्ना यांची आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपुर भागात डांबरी रस्ते तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २२.१०% कमी दराची श्री. चांदराम आशन्ना यांची निविदा स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१४/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा येथील प्रा.शाळे समोरील मनपा वाचनालयावर बहुउद्देशिय हॉल दोन मजले व शेजारी स्वच्छतागृह व शेड बांधणे बाबत सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुची नुसार र.रु. ९,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३१/३५ दि. ३१-५-९७ च्या इतिवृत्तानुसार मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना क्र.जा.क्र. मनपा/लेखा/नि/८८/९७ दि. २४-१२-९७ अन्वये जाहिरातील व्दारे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिमतारखे पर्यंत एकुण (९) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याची तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मो. अहमद सिद्यीकी | ०.०१% | कमी दराने |
| २. | मे. हायवे कंन्स्ट्रक्शन | ८% | जास्त दराने |
| ३. | श्री. सुजात हाश्मी | ६% | --//-- |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा श्री. मो. अहमद सिद्यीकी यांची आहे. परंतु दि. १७-३-९८ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात दराबाबतच्या वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दरा ऐवजी ३% कमी दराने मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री. मो. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री. मो. अहमद सिद्यीकी यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा वाटाघाटी नुसार ३% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्येस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किरडापुरा येथील प्राथमिक शाळेसमोरील मनपा वाचनलयावर बहुउद्देशिय हॉल दोन मजले व शेजारी स्वच्छतागृह व रोड बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधाकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरचे काम श्री. मो. अहमद सिद्यीकी यांचेकडुन अं.प. दरापेक्षा ३% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१५/२४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ईटखेडा ते गोलवाडी नाल्या लगत ट्रक सिव्हर एफ साठी ९०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. मुख्य जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास र.रु. ३५,००,०००/- ला विषय क्र. १५१/१५ दि. १६-१२-९७ रोजी सर्वसाधरण सभेने मान्यता दिली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देवून निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सात (७) कोऱ्या निविदा विक्री झाल्या सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण दोन (२) निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. राणा कंन्स्ट्रक्शन | ९% | अं.प. दरापेक्षा जास्त दराने |
| २. | मे. शिवा कन्स्ट्रक्शन | १५% | अं.प. दरापेक्षा जास्त दराने |

वरील प्रमाणे गुत्तेदारास प्रत्यक्ष दर वाटाघाटीसाठी बोलवले असता संबंधित गुत्तेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार आहे. अशी संमती दिली आहे. तरी मा. आयुक्तांनी संबंधित काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास दि. १६-३-९८ रोजी मान्यता दिली आहे.

सबब सदर कामासाठी वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची मे. राणा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ईटखेडा ते गोलवाडी नाल्यालगत ट्रक सिव्हर एफ साठी ९०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. मुख्य ज.नि. वाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरचे काम मे. राणा कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी स्विकृतीसह देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१६/२५ :**

शहर आभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिवराज की, हाऊसिंग सोसायटी मधील मनपाच्या खुल्या जागेवर बहुउद्देशिय हॉल बांधणेसाठी सन ९५-९६ च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रु. २,४२,९१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्या स्थायी समितीने विषय क्र. ५७९/१० दि. ७-१-९७ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी निविदा मागविल्या असता सर्वात कमी दराची निविदा मे. एस.एच. असोशिऐटस् याची ७.२१% कमी दराची निविदा प्राप्त झाली.

त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार काम चालु करण्यात आले आहे. पुर्वीच्या अंदाजपत्रकात संरक्षित भिंतीच्या समावेश करण्यात आलेला नव्हता. स. नगरसेवक यांच्या मागणीनुसार आता उपरोक्त कामात संरक्षित भितींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार सुधारित अंदाजपत्रक र.रु. ४,६०,१७५/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. १-१-९८ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी सुधारित अंदाजपत्रक र.रु. ४,६०,१०५/- चे मान्यतेचा प्रस्ताव तसेच वाढीव काम हे मुळ गुत्तेदार मे. एस.एच. असोशिएटस् यांचे कडुन मुळ मंजुर दरानुसार काम करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवराज को-ऑप सोसायटी मधील मनपाच्या खुल्या जागेवर बहुउद्देशीय हॉल बांधणे करिता सुधारित अंदाजपत्रक र.रु. ४,६०,१७५/- मंजुरी देण्यात येते. तसेच वाढीव काम हे मुळ गुत्तेदार मे. एस.एस. असोशिएटस् यांचे कडुन मुळ मंजुर दरानुसार काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१७/२६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पंचकुवा कब्रस्तान येथे संरक्षित भिंत बांधणे व इतर सुविधा पुरवणे बाबतचे अंदाजपत्रक र.रु. ४,६८,३००/- एवढयाचे तयार करण्यात येऊन त्यास दि. १६-८-९७ रोजी च्या स्थायी समितीची मान्यता घेण्यात येऊन

कार्यालय निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/६५/९७ दि. ८-१०-९७ रोजी शहरातील वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविली असता कोरे निविदा विक्री दि. १६-१०-९७ पर्यंत पंधरा (१५) विकले गेले व दर भरुन स्विकृतीचा दि. २७-१०-९७ पर्यंत चार (४) प्राप्त झाले त्या उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आले असता प्राप्त निविदापत्राकांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजिवनी कंन्स्ट्रक्शन | ३६.३०% | अं.प. दरापेक्षा कमी दराने. |
| २. | श्री. कुलवंत सिंग | २६% | --//-- |
| ३. | श्री. विपुल कंन्स्ट्रक्शन | २५% | --//-- |
| ४. | श्री. शेख शरिफ | १७% | --//-- |

प्राप्त निविदेत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच श्री. संजीवनी कंन्स्ट्रक्शन याचें अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.३०% कमी दराचे दर आहे परंतु श्री. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांनी निविदे सोबत आवश्यक असलेली १% अनामत रक्कम निविदे सोबत दाखल केलेली नाही यामुळे श्री. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोदणीपत्र रद्द करणेसाठी कळविणे तसेच क्र. दोन चे गुत्तेदार श्री. कुलवंतसिंग यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% कमी या दराचे दर प्राप्त आहे. त्यांचे मार्फत सदरील काम करुन घेणे साठी मा. आयुक्तांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

सबब क्र. (१) एक चे गुत्तेदार श्री. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांचे नोंदणीपत्र रद्द करणेस्तव सार्वजनिक बांधकाम विभागास कळविणे तसेच क्र. (२) दोन चे गुत्तेदार श्री. कुलवंतसिंग याचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% कमी या दराने काम करुन घेणेस्तव व विचारार्थ आणि स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचकुवा कब्रस्तान येथे संरक्षित भिंत बांधणे व इतर सुविधा पुरविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन यांनी निविदेसोबत आवश्यक असलेली १% अनामत रक्कम दाखल केलेली नाही. म्हणुन त्यांचे सा.बां. विभागाकडे नोंदणीपत्र रद्द करण्यासाठी कळविणेस तसेच दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे निविदाधारक श्री. कुलवंतसिंग यांचेकडुन अं.प. दरापेक्षा ३६% कमी दराने सदरील काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१८/२७ :**

उपआयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्वच्छ औरंगाबाद मोहिम अंतर्गत जी.आय. पत्र्याच्या शीट (१६ गेज) पासुन (हॅगींग डस्ट्र बीन्स) कचरा कुडया तयार करुन घेण्यासाठी जाहिर निविदा प्रकाशित करण्यात आली. एकुण चार एजन्सीज नी निविदा भरल्या होत्या त्यांनी नमुद केले दर खालील प्रमाणे आहेत.

सदर दर कचरा कुंडया शहरातील विविध भागात रोवण्याच्या खर्चासह आहेत जी आय.शीट पासुन तयार केलेल्या कचरा कुंडयासाठी सर्वात कमी दर रु. १६००/- प्रती कचरा कुंडी मान्य झाल्यास १५० कचरा कुंडया विकत घेण्यात येतील त्यावर रु. २,४०,०००/- खर्च अपेक्षित आहे. या कचरा कुंडया मजबुत व आकर्षक असुन लहान

गल्लीबोळात जेथे ट्रक पोहचु शकत नाही. अशा भागात लावण्यात येतील. हया कचरा कुंडीस रिमान्य करण्यास केवळ काही सेकंद लागतात व आजुबाजुला कचरा पसरत नाही.

| अ. क्र. | एजन्सी | प्रतिनग रुपये जी.आर. शीटपासुन (१६ गेज) | एम.एस.शीटपासुन (१६ गेज) |
|---|---|---|---|
| १. | मे. मुसद औरंगाबाद | २२७७/- | |
| २. | मोना कंन्स्ट्रक्शन | १९३९/- | १६५०/- |
| ३. | राणा कंन्स्ट्रक्शन | १७२५/- | --- |
| ४. | वर्षा मेटल वर्क्स | १६००/- | ११७५/- |

तरी वर्षा मेटल वर्क्स औरंगाबाद यांचे सर्वात कमी दर रु. १६००/- प्रती नग मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वच्छ औरंगाबाद योजने अंतर्गत जी.आय. पत्र्याच्या शीट (१६) गेज पासुन हॅगींग डस्ट बीन्स) कचरा कुंडया तयार करुन घेण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी मे. वर्षा मेटल वर्क्स औरंगाबाद यांचे कडुन प्रति नग रु. १६००/- प्रमाणे कचराकुंडया खरेदी करण्यास तसेच या कामाकरिता येणाऱ्या र.रु. २,४०,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१९/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दैनिक तरुण भारत कार्यालय पासुन ते एम.आय.टी कॉलेज पर्यंत रोड वरील सोडियम व्हेपर दिवे बसविणे बाबत अं.प. ७,७०,१८१/- कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता विक्रीच्या तारखेस (८( निविदा प्राप्त झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत (३) तीन निविदा प्राप्त झाल्यात मा. ले. आ. याच्या समक्ष उघडल्या असता तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ०.३% | कमी दर |
| २. | मे. सुरेश इलेक्ट्रीकल्स | ५% | जास्त दर |
| ३. | मे. कॅपकी एजन्सी | ०.२५% | कमी दर |

करिता तुलनात्मकदृष्टया मे कॅपको एजन्सी याचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% सर्वात कमी असुन सदरील कामाची एजन्सी व दर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दैनिक तरुण भारत कार्यालय पासुन ते एम.आय.डी. कॉलेजपर्यंत रोडवर सोडीयम व्हेपर दिवे बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.२५% कमी दराची मे. कॅपको एजन्सी याची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२०/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पैठणरोड ते राहुलनगर या मुख्य रस्त्यावर भुमिगत केबलव्दारे पथदिव्याची व्यवस्था करणे बाबत अं.प. ३,९६,०००/- कामासाठी निविदा आल्या असता विक्रीच्या तारखेस (१३) तेरा निविदा विक्री झाल्यात व स्विकृतीच्या तारखेपर्यंत (६) सहा निविदा प्राप्त झाल्यात त्या मा. ले.आ. यांच्या समक्ष उघडण्यांत आलेल्या असता तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. नितिन इलेक्ट्रीकल्स | १२% | कमी दर |
| २. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | १९.४% | कमी दर |
| ३. | मे. गजानन इलेक्ट्रीकल्स | २४.२५% | कमी दर |
| ४. | मे. दानिस सेल्स कॉपौ. | २५.१२% | कमी दर |
| ५. | मे. ओम शांती इलेक्ट्रीकल्स | १९.३०५ | कमी दर |
| ६. | मे. लाईट वेल इलेक्ट्रीकल्स | २०.१% | कमी दर |

करिता तुलनात्मक दृष्टया मे. दानिस सेल्स कॉपो एजन्सी यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.१२% सर्वात कमी असुन सदरील कामाची एजन्सी व दर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणरोड ते राहुलनगर या मुख्य रस्त्यावर भुमीगत केबल व्दारे पथदिव्याची व्यवस्था करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २५.१२% कमी दराची मे. दानिस सेल्स कॉर्पोरेशन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२१/३० :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अभिनय टाकीज ते किराणा चावडी पर्यंत रोडवर पोल्सह सोडीयम व्हेपर दिवे लावणे करिता अं.प. ९,७०,११३/- निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/८१/९७ दि. २८-११-९७ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता विक्रीच्या अंतिम तारखे ४-१२-९७ पर्यंत एकुण १२ निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या दि. ११-१२-९७ रोजी एकुण ४ निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे सादर केला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. दानिश सेल्स कॉर्पोरेशन | १.५% | जास्त दर |
| २. | मे. ओमिक्रॉन इंजिनिअर्स | -- | अंदाजपत्रकीय दर |
| ३. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ५% | जास्त दर |
| ४. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स | ५% | जास्त दर |

वरील प्राप्त निविदा पैकी मे. ओमिक्रॉन इंजिनिअर्स यांचे निविदेचे दर इतर एजन्सीने दर्शविलेल्या दरापेक्षा कमी असुन अंदाजपत्रकीय दराने दर्शविलेले आहेत.

मे. ओमिक्रॉन अंजिनअर्स यांचे निविदा दर स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अभिनय टाकीज ते किराण चावडी पर्यंत रोडवर पोलसह सोडियम व्हेपर दिवे लावणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दराची मे. ओमिक्रॉन इंजिनिअर्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२२/३१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला की, नंदनवन कॉलनी ते अभिनंदन कॉलनी (पडेगांव) या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक २५-१०-९६ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ३६९/६ अन्वये अंदाजपत्रक र.रु. २,१०,५५०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील काम हे नंदनवन कॉलनी ते अभिनंदन कॉलनी (पडेगांव) असे मंजुर करण्यांत आले होते. परंतु प्रत्यक्ष काम करतेवेळी सदरच्या ठिकाणी मिलेटरीला अडथळा येत असल्यामुळे तसे मिलेटरी कडुन रस्ता तयार करण्याची परवानगीसह मिळत नसल्यामुळे नियोजित काम करता येत नाही.

तसेच सदरील कामाऐवजी वृदांवन कॉलनी व आशानगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करावयाचे आहे. त्या करिता सन ९५-९६ च्या डी.एस.आर. दराप्रमाणे (सध्याच्या संचिकेतील दराप्रमाणे) अंदाजपत्रक र.रु. २,८७,५१९/- इतकी येते. तर सदरच्या कामाचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रु. ३,२५,७२४/- इतकी येते व या दोन्ही सालातील दरामधील तफावत र.रु. ३८,२०५/- इतकी येत आहे.

तरी सदरील काम हे मुळ कामासाठी आलेले ठेकेदार मे. मॉस्कोट कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन सन ९५-९६ च्या डी.एस.आर. दराच्या ऐवजी सन ९६-९७ च्या डी.एस.आर दराने करुन घ्यावयाचे असल्याने या दोन्ही सालातील दरामधील तफावत र.रु. ३८,२०५/- इतकी जास्त लागत असुन सदर काम हे ठेकेदाराने दिलेल्या दराने म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९५% कमी दराने करुन देण्यास तयार आहेत.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नंदनवन कॉलनी ते अभिनंदन कॉलनी (पडेगांव) रस्त्याचे डांबरीकरणाचे कामात मिलीटरीचा आशानगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरिता सुधारीत अंदाजपत्रक र.रु. ३,२५,७२४/- ला तसेच सदरील कामोच मुळ ठेकेदार मे. मास्कॉट कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन सन ९६-९७ च्या डी.एस.आर. दराने व अं.प. दरापेक्षा १७.९५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२३/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ४३ बुढीलाईन येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी दिनांक १६-१०-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २८४/४ अन्वये अंदाजपत्रक र.रु. ३,६९,८३३/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/८०/९७ दि. १५-११-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (१४) चौदा निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (२) दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक दृष्टया तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. बसरा कंन्स्ट्रक्शन | ०५% | जास्त दराने |
| २. | श्री. एस.ए. देशमुख | -- | अंदाजपकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा अंदाजपत्रकीय दराने श्री. एस.ए. देशमुख यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४३ बुढीलाईन येथे शहाबादी फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दराची श्री. एस.ए. देशमुख यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२४/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील विविध चौकात वाहतुकीचे सोयीसाठी फेरबद्दल करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु. २,९१,२९४/- चे तयार करण्यांत आले असुन त्यास स्थायी समितीची मंजुरी दि. १२-१२-९७ नुसार मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१०) दहा निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२) दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ०१.७०% | कमी दराने |
| २. | श्री. एस.ए. देशमुख | ५% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया जास्त व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०१.७०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग चंडोक यांची निविदा आहे.

तरी सदरील काम ०१.७०% कमी दराने श्री. कुलवंतसिंग चंडोक यांच्याकडुन करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चौकात वाहतुकीचे सोयीसाठी फेरबदल करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प.दरापेक्षा १.७०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग चंडोक यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२५/३४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बेगमपुरा येथील मनपा शाळेसमोर मनपा चे वाचनालयाच्या वरचे बाजुस पाहिल्या मजल्यावर बहुउद्देशिय सांस्कृतिक सभागृह बांधवयाचे आहे. त्यासाठी सा.बां. विभागाचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार रु. ५,१२,४५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले त्यास स्थायी समितीने विषय क्र. ३२६/८ दि. २४-११-९७ च्या ठरावानुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८४/९७ दि. १२-१२-९७ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण (९) निविदा विक्री झाल्या स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. हायवे कंन्स्ट्रक्शन | ०.०९९% | कमी दराने |
| २. | सुजात अली हाश्मी | ४% | जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.०९९% कमी दराची निविदा मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांची आहे. परंतु दि. १७-३-९८ रोजी मा. आयुक्तांचे दालनात दराबाबतच्या वाटाघाटी अंती अं.प. दरापेक्षा ०.०९९% कमी दराऐवजी २% कमी दराने मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांची निविदा अं.प. दरापेक्षा २% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपुरा येथील मनपा शाळेसमोर मनपाचे वाचनालयाच्या वरचे पहिल्या मजल्यावर बहुउद्देशिय सांस्कृतिक सभागृह बांधण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन अं.प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२६/३५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आंबेडकरनगर येथील महात्मा फुले यांच्या पुतळयाशेजारी बालवाडीसाठी इमारत बांधणेच्या कामासाठी सां.बा.विभागाचे सन ९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रु. २,३२,७६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले त्यास मा. स्थायी समितीने ठराव क्र. २८०/३५ दि. ३-१०-९७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामाकरिता कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८४/९७ दि. १२-१२-९७ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (४) निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. व्ही.व्ही. पेड्डी | ४.९९% | जास्त दराने |
| २. | मे. हायवे कंन्स्ट्रक्शन | ०.०५% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा दर मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांचे आहेत. परंतु दि. १७-३-९८ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात दराबाबत वाटाघाटी अंती अं.प. दरापेक्षा ०.०५% कमी ऐवजी २% कमी दराने मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांची निविदा अं.प. दरापेक्षा २% कमी दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकरनगर येथील महात्मा फुले यांच्या पुतळया शेजारी बालवाडी साठी इमारत बाधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी नुसार सदरील काम अं.प. दरापेक्षा २% कमी दराने मे. हायवे कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२७/३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बारापुल्ला भागातील खांडकी पेव्हींग व शहाबाद फरशीचे काम करण्यासाठी दि. १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेत विषय क्र. १५७/१८ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८३/९७ दि. ६-१२-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (२१) एकवीस निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (३) तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन | ००.०१% | कमी |
| २. | मो. साहेल सिद्यीकी | ०१.% | जास्त दराने |
| ३. | श्री. ई. आय. मॅश्यु | ०२% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दरापेक्षा ००.०१% कमी दराची मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन कं. याची निविदा आहे. सदरील कामासाठी ठेकेदाराने जास्त दर दिल्यामुळे त्यांना मा. आयुक्तांचे दालनात दराच्या वाटाघाटीसाठी बोलवले असता त्यांनी सदरचे काम हे त्यांनी दिलेल्या दराने म्हणजे ००.०१% कमी च्या ऐवजी अं.प. दरापेक्षा १०% कमी दराने काम करण्यासाठी संमती दिलेली आहे.

तरी संबंधित ठेकेदाराने दिलेल्या संमतीनुसार त्यांची निविदा अं.प. दरापेक्षा १०% कमी दराने मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारापुल्ला भागातील खांडकी पेव्हींग व शाहाबाद फरशीचे काम करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ००.०१% कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी ठरल्यानुसार सदरील काम अं.प. दरापेक्षा १०% कमी दराने मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन करुन घेण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२८/३७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इमारतीचे रंगकाम करणेसाठी र.रु. ३,३५,६६६/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. ४५८/२ दि. ३१-१२-९७ अन्वये मंजुरी घेण्यात आली आहे.

मा. आयुक्त यांनी दि. ७-२-९८ च्या स्थळ पाहणीचे वेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे बाहेरील रंगकाम करणारी मंजुर दरामध्ये काम श्री. एस्कपर्ट पेंटर्स यांना त्यांच्य मंजुर दरामध्ये काम करणे बाबत विचारणा करणेस सुचीत केले होते. त्याप्रमाणे संबंधित एजन्सीने लेखी संमती दर्शविली आहे.

सबब सदरील काम डॉ. बाबासाहेब आंबडकर संशोधन केंद्र येथील बाहेरील रंगकाम करणार गुत्तेदार एस्क्पर्ट पेंटिग कॉट्रक्टर यांचे मार्फत रु. ३५०/- प्रती चो.मी. या दराने करुन घेणाचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इमारतीचे रंगकामकरण्या करिता रंग कामाचे गुत्तेदार एक्सपर्ट कॉन्ट्रॅक्टर यांचे मार्फत र.रु. ३५०/- चौ.मी. या दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२९/३८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, निरंजन को-ऑप सोसायटी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर सांस्कृतिक केंद्र बांधणेसाठी सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार र.रु. ७,४४,८४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा. सर्वसाधारण सभेने विषय क्र. १८७/४ दि. १०-३-९७ च्या इतिवृत्त अन्वये मान्यता मागविल्या असता सर्वात कमी दराची निविदा मे. साई कन्स्ट्रक्शन यांची ५% जादा दराची निविदा प्राप्त झाली त्यास मा. आयुक्तांनी दर वाटाघाटी करुन ती अंदाजपत्रकीय दराने करुन स्थायी समितीची मंजुरी ठराव क्र. २२१/२० दि. १७-९-९७ अन्वये घेण्यात आली. त्यानुसार त्या निविदा आधारे सध्या स्थितीमध्ये काम चालु आहे. पुर्वीचे मंजुर स्थितीमध्ये संरक्षित भिंत इत्यादी बाबीचा समावेश नव्हता आता स. नगरसेवकांनी केलेल्या मागणीनुसार उपरोक्त कामात संरक्षित भिंत व इतर बाबीचा समावेश करण्यात आला आहे.

त्यानुसार अंदाजपत्रक र.रु. ९,९९,९५०/- चे मान्यतेचा प्रस्ताव तसेच वाढीव काम हे मुळ गुत्तेदार मे. साई कंन्स्ट्रक्शन यांचे मार्फत मुळ मंजुर निविदा दरानुसार करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निरंजन को-ऑप सोसायटी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर सांस्कृतिक केंद्र बांधणेच्या कामामध्ये संरक्षित भिंत व इतर बाबींचा समावेश झाल्याने सुधारीत अंदाजपत्रक र.रु. ९,९९,९५०/- ला तसेच वाढीव काम मुळ गुत्तेदार मे. साई कंन्स्ट्रक्शन यांचे मार्फत मुळ मंजुर निविदा दरानुसार करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३०/३९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ जलतरण तलाव परिसरात डांबरीकरण करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु. १,९१,३००/- चे तयार करण्यांत आले असुन त्यास स्थायी समितीची मंजुरी विषय क्र. ७ दि. १७-१२-९७ नुसार मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (५) पाच निविदा विक्री झाल्या असुन त्यापैकी (२) दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन | ३०% | कमी दराने |
| २. | श्री. चांरराम एन आशन्ना | --- | निविदा दर भरले नाही. |

तुलनात्मकदृष्टया सर्वात जास्त व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३०% कमी दराची श्री. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी सदरील काम ३०% कमी दराने श्री. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्या कडुन करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलाव परिसरात डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दरापेक्षा ३०% कमी दराची श्री. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३१/४० :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रबुध्दनगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. ३,८६,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा झोपडपट्टी सुधारणा या लेखा शिर्षाकाच्या तरतुदी मधुन करण्यांत येईल.

करिता अंदाजपत्रक र.रु. ३,८६,०००/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रबुध्दनगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,८६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या सभेतील सर्व ठरावांना याच सभेत स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

**मा. सभापती :** श्री. मधुकर खंडुजी शिंगारे, वेल्डर (यांत्रिकी विभाग) यांना सध्या प्रतिदिन ४६/- रु. दैनिक वेतन दिले जाते. त्यास त्यांना शासन निर्णय प्रमाणे प्रतिदिन रु. ७५/- दै.वेतन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

श्री. मधुर खंडुजी शिंगारे, वेल्डर (यांत्रिकी विभाग) यांना सध्या प्रतिदिन ४६/- रु. दै. वेतन दिले जाते. त्यांना शासन निर्णयाप्रमाणे प्रतिदिन रु. ६५/- दै. वेतन देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**श्री. जयवंत ओक :** आपल्याकडे नवले हे लघुटंकलेखक म्हणुन दै. वेतनावर कार्यरत होते. त्यांना सहा महिनेसाठी आदेश मनपाने दिलेले होते. परंतु त्यांना कार्यालयीन कामावरुन काढुन टाकलेले आहे ते प्रशासनाचे धोरण योग्य वाटत नाही, यापुर्वी कार्यालयात अनेक अधिकारी/कर्मचारी कामात निष्काळजी पणा व भ्रष्टाचाराने निलंबीतही झालेले आहेत. त्यांना प्रशासनाने पुन्हा कामावर घेतलेले आहे. त्याप्रमाणे श्री. नवले यांनाही कामावर प्रर्वक्त घ्यावे व या बाबतचा निर्णय तातडीने घ्यावा कारण त्याचे वय वाढलेले आहे.

**श्री. गौतम लांडगे :** श्री. नवले हे लघुटंकलेखक म्हणुन कार्यरत दै. वेतनावर होते. परंतु स्थायी समिती सभेतील व सर्वसाधारण सभेतील इतिवृत्त व्यवस्थित घेता येत नव्हते बऱ्याचशा चुका करीत असल्याने स्थायी समितीमध्ये चर्चेव्दारे त्यांना काढुन टाकण्याचे निर्णय घेतलेला होता व प्रशासनाने श्री. नवले यांना लेखी व तोंडी सुचना वारंवार देऊनही त्यांचेवर कामाबाबत काही सुधारणा दिसून आलेली नाही. त्यामुळे सहा महिन्यानंतर काढुन टाकण्यांत आलेले आहे. या शिवाय त्यांचे वय वाढलेले असल्यास सहानुभुतीपुर्वक त्यांना लघुटंकलेखक म्हणुन काम न देता दै. वेतनावर फक्त कनिष्ठ लिपीक (टायपिस्ट) म्हणुन काढावी.

**श्री. रशिद मामु :** सदरील कर्मचारी हा दै. वेतनावर कार्यरत असल्यास स्थायी समितीमध्ये चर्चेव्दारे निर्णय घेता येत नाही याबाबत प्रशासनच निर्णय घेऊ शकते. तर कायम स्वरुपी कर्मचारी असल्यास त्यास कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली असल्यास स्थायी समितीमध्ये अपीलावर चर्चा घडवून निर्णय घेता येऊ शकतो. परंतु दै. वेतनावरील कर्मचाऱ्याचा निर्णय आता घेणे योग्य नाही. या बाबत प्रथमतः प्रशासनाने माहिती द्यावी.

**श्री. कचरु नवपुते, री. गौतम लांडगे :** श्री. नवले, लघुटंकलेखक दैनिक वेतनावर कार्यरत होते. त्यांचे काम समाधानकारक नसल्याने व अनेकांच्या तक्रारी असल्याने प्रशासनाने त्यांना काढुन टाकलेले आहे. ती बाब प्रशासकीय आहे. यामध्ये सदस्यांनी दखल घेऊ नये.

**मा. सभापती :** श्री. नवले लघुटंकलेखक हे दै. वेतनावर कार्यरत होते व त्यांना तात्पुरती म्हणुन नियुक्ती केलेली होती. या बाबत दि. २६-३-९८ च्या स्थायी समिती सभेमध्ये प्रशासन योग्य ती माहिती देईल.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २६-३-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. दिनांक २६-३-९८ रोजी स्थायी समिती सभेची सुरुवात मा. सभापती श्री. प्रभाकर विधाते यांच्या अध्यक्षेतेखाली दुपारी ठिक ४.०० वाजता "वंदेमातरम्" गिताने सभेला सुरुवात झाली. सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हाळनोर गिरजाराम | स.सदस्य |
| २) | श्री. त्रिंबक तुपे | --//-- |
| ३) | श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ४) | श्री. कचरु नवपुते | --//-- |
| ५) | श्री. विकास जैन | --//-- |
| ६) | श्री. अब्दुल रशिदखॉन (मामु) | --//-- |
| ७) | श्री. म.अ.रऊफ म.अ. माबुद | --//-- |
| ८) | श्री. स.अ. मिरा सलामी | --//-- |
| ९) | श्री. संजय जोशी | --//-- |
| १०) | श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ११) | सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| १२) | श्री. गांगवे बन्सी | --//-- |
| १३) | श्री. जयवंत (बंडु) ओक | --//-- |
| १४) | श्री. भगवान घडामोडे | --//-- |

**संवाद**

**श्री. संजय जोशी :** ३१ मार्चला मनपाचा विद्युत पुरवठा बिला अभावे खंडीत करण्यांत येईल असा इशारा महाराष्ट्र विद्युत मंडळाने महानगरपालिकेला या बाबत मनपाने एकुण किती रुपये द्यावयाचे कमिटमेंट केलेली होती. कुणी केली होती. याबाबत चर्चा सभागृहात व्हावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कडील एकुण थकीत रक्कमेपैकी रु. ५.०० कोटी द्यावयाचे ठरले होते. परंतु सध्या दिड (१ १/२) कोटी रु. द्यावयाचे असुन विद्युत पुरवठा करणार नाही अशी अपेक्षा आहे.

**श्री. संजय जोशी :** आपल्याकडे पैसाच शिल्लक नाही तर मनपाने कमिटमेंट म.रा.वि.मं. ला का दिली? यांची माहिती द्यावी. म.रा.वि.मं. ला रु पाच कोटी द्यावयाचे ठरले असतांनाही वर्तमान पत्रात जाहिर इशारा छापुन का आला? ज्यामुळे महानगरपालिकेची बदनामी झाली आहे. जर म.रा.वि.मं. ने चुकीची माहिती वर्तमान पत्रात दिलेली असल्यास तसा खुलासा मनपाने पुन्हा वर्तमान पत्रात करावा व तशी नोटीफिकेशन काढावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** मा. विभागीय आयुक्त यांच्या बैठकीत असे ठरलेले होते की, प्रत्येक महिण्याला रु. ५०.०० लाख द्यावे रु. ५.०० कोटीतुन सध्या रु. १ १/२ (दिड) कोटी द्यावे. जेणे करुन विज पुरवठा न करता नागरिकांना वेळेवर पाणी मिळत जाईल.

**श्री. रशिद खॉन (मामु) :** महानगरपालिकेमध्ये महा. राज्य विद्युत मंडळातील अधिकारी. मनपातील अधिकाऱ्यांची सयुंक्त बैठक मनपामध्ये झालेली होती. त्यावेळी म.रा.वि.मं. ची विद्युत बिले रु. ४५.०० कोटीची थकीत आहे. तेंव्हा असे ठरले होते की, काही पैसे मनपा नक्कीच देणार असे आश्वासन दिले मात्र लिखीत स्वरुपात दिलेले नाही. शहरातील नागरिकांना पिण्याचा प्रश्न भेडसावु नये हा त्या मागील उद्देश होता. म्हणुन महापौर या नात्याने तडजोडीसाठी प्रयत्न केले व त्याचवेळी मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांनाही फॅक्स केले.

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिका कर्जदार एवढया मोठया प्रमाणात आहे तर कमेटमेंट कशासाठी केली याची माहिती प्रशासनाने द्यावी.

**श्री. भगवान घडामोडे :** मराविमं व मनपाच्या संयुक्त बैठकीत थकबाकी बाबत बळीचा बकरा मा. महापौर यांना प्रशासनाने केला असे होऊ नये.

**श्री. रशिद खॉन (मामु) :** तसे काहीच नाही.

**श्री. मिरा सलामी :** मराविमं ची थकबाकी रु. ४५.५० कोटीची किती वर्षापासुनची आहे. याची माहिती द्यावी. आणि वेळोवेळीचे दर काय होते दरवर्षीच्या थकीत रक्कमेवर व्याजदर आकारल्या जात होते काय? याची माहिती द्यावी. व मनपाच्या संबंधित अधिकारी यांनी कधी थकित जादा बिलाची मराविमं स विचारणा केली काय?

**मा. सभापती :** या संदर्भात शासनाकडे मनपाचे सर्व पदाधिकारी व स. नगरसेवकांचे एक शिष्टमंडळ राज्याचे मा. मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्री यांना भेटुन याबाबत सविस्तर चर्चा होऊन निवेदन देण्यात आले. परंतु एका स. सदस्यांनी मा. मुख्यमंत्री यांचे चर्चेच्या वेळी दुसऱ्या मुद्यावर चर्चा करुन त्यास वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे हया बैठकीत काहीही निर्णय झालेला नाही.

**श्री. मिरा सलामी :** शिष्टमंडळात मा. मुख्यमंत्रासमवेत एका स. सदस्यांनी वेगळया मुद्यावर वाद घातलेला असल्यास महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री जेष्ठ असल्याने त्यांनी स. सदस्यास चांगल्या प्रकारे समजुन सांगावयास पाहिजे होते. कारण औरंगाबाद येथील शहरातील पिण्याचा पाण्याचा प्रश्नावर काहीतरी तोडगा निघाला असता परंतु तसे या बैठकीत झालेले दिसत नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. भगवान घडामोडे :** स. सदस्य यांनी विनंती की, त्यांनी मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांना काहीही बोलु नये.

**मा. सभापती :** शहरातील अत्यंत ज्वलंत प्रश्न पिण्याच्या पाण्याचा आहे. यासाठी मनपाने रु. दिड कोटी थकित बिलापैकी रक्कम देऊन कार्यवाही करीत आहे. आता या प्रश्नावर जास्त चर्चा न करता सर्वसाधारण सभेत चर्चा करावी.

**श्री. रशिदखॉन मामु :** स.स.श्री. मिरा सलामी यांनी मराविमं.तील थकीत रक्कमेचे व्याजदर काय आहे. या शिवाय विज पुरवठा होतांना मिटर बसविलेले आहे काय? त्यातील मिटर वेळोवेळी चेक केल्या जाते काय याची माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** प्रत्येक स.स.नी आपआपल्या वार्डातील पाणीपट्टी पुर्णपणे कशी वसुल होईल याकडे लक्ष द्यावे.

**मा. सभापती :** याबाबतची चर्चा सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात यावी.

**श्री. जयंवत ओक :** श्री. नवले या दैनिक वेतनावरील लघुटंकलेखनास सहा महिन्यानंतर कामावरुन काढुन टाकले बाबत आज प्रशासन माहिती देणार होते. तेव्हा प्रशासनाने माहिती द्यावी.

**उप आयुक्त :** श्री. के.एस.नवले, हयांना कार्यालयीन आदेश क्र/मनपा/अस्था-१/९७/२९९३ दि. २७-५-९७ अन्वये लघुटंकलेखक म्हणुन १५०० एकत्रित वेतनावर सहा (६) महिन्या करिता अस्थायी पदावर तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती करण्यात आली त्याप्रमाणे श्री. नवले, हयांना मा. नगरसचिव हयांनी दि. ३-६-९७ रोजी कामावर रुजु करुन घेतलेले आहे.

सदर आदेशाची मुदत दि. २-१२-९७ रोजी संपलेली आहे. मुदतवाढी बाबत मा. नगर सचिव हयांनी त्यांचे कार्यालयीन काम समाधानकारक नाही. असा अभिप्राय दिला.

या अनुषंगाने प्रकरण सादर करण्यात आले असता प्रशासनाची अधिधारणा झाली की, सदरील कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक नाही. इतिवृत्त बरोबर लिहिले जात नाही. त्यात असंख्य चुका असतात. या बाबत इतिवृत्त चुक लिहिल्यामुळे सर्व साधारण सभा व स्थायी समितीत वेळोवेळी चर्चा झाली व इतिवृत्त चुक लिहिले जात आहे.

अशी ठाम भुमिका आहे. त्यामुळे मुदतवाढ देता येत नाही. दुसरा चांगला उमेदवार नेमणे आवश्यक आहे. अशी तजविज केलेली आहे.

त्या प्रमाणे उक्त बाबी प्रमाणे श्री. नवले, हयांना पत्र क्र. मनपा/अस्था-१/६०२/९८ दिनांक २०-२-९८ अन्वये काम समाधानकारक नसल्यामुळे कामावरुन कमी करण्यात आले असल्याचे कळविण्यांत आले आहे.

**श्री. जयंवत ओक :** श्री. नवले यांची निवड कशी करण्यांत आली. याची माहिती सभागृहात द्यावी. श्री. नवले यांनी जवळपास ८० दिवस दै. वेतनावर काम केलेले आहे. आणि पगार देण्यात यावा. ज्यावेळी लघुटंकलेखकाची मुलाखत घेण्यात आली होती. त्यावेळेस किती उमेदवार होते. आणि कमिटी किती लोकांची होती, कमेटीवर कोणकोणे होते मुलाखती घेतांना तोंडी व लेखी परिक्षेतील गुणपत्रिका आधारे निवड केली नाही काय त्यावेळेस कोणता निष्कर्ष लावला याची माहिती द्यावी. माझ्या माहितीप्रमाणे बाहेरील ५७ उमेदवार मुलाखतीसाठी बोलविले होते. व त्यातुन श्री. नवले यांची मुलाखती व्दारे निवड करण्यात आली तेव्हा लघुटंकलेखकाच्या चांगल्या स्पिडमुळेच निवड झालेली असेल ना, मग आज त्यांना कामावरुन कमी करण्याची काय आवश्यकता होती. त्यांचे वय वाढलेले आहे. तेव्हा त्यांना कामावरुन कमी करु नये.

**मा. उपआयुक्त :** दि. २८-३-९७ रोजी लघुटंकलेखना बाबत मुलाखती घेण्यात आल्या यावेळी १४ उमेदवार मुलाखतीस उपस्थित होते. या मुलाखतीच्या वेळी निवड समिती गठण करण्यात आली होती. त्यात उपआयुक्त १ व २ मुख्यलेखा परिक्षक व लेखाधिकारी यांची समिती होती. या समितीने श्री. नवले यांची निवड केली (या बाबत माहिती सभागृहात वाचुन दाखविली.)

**श्री. जयवंत ओक :** उपआयुक्त यांनी वाचुन दाखविलेल्या माहितीची नोंद घ्यावी श्री. नवले यांचे वय वाढत असल्याने त्यांना कामावर पुर्ववत घ्यावे. नसता संबंधित व्यक्ती "आत्मदहन" करतील याबाबत तातडीने प्रशासनाने लक्ष घालावे.

**श्री. गौतम लांडगे :** अशाच प्रकारची एक केस होती दै. वेतनावर श्री. म्हस्के नावाचा व्यक्ती कामावर असतांना मृत पावला. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीने दैनिक वेतनावर नोकरी द्यावी. म्हणुन विनंती अर्ज दिला परंतु स्थायी समितीने दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निर्णय दिलेला नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** ज्यावेळी निवड समिती गठीत करण्यात आलेली होती. त्या मुलाखतीच्या वेळेस उमेदवाराच्या गुणपत्रिका तयार करतांना त्यांना मिळालेली मार्कस चुकीचे आधारे दिलेले होते काय? त्यावेळी उमेदवाराच्या चुका होत्या की नाही निवड समितीला कळालेले नाही काय? मग आताच चुका अधारे प्रशासना त्यांना कामावरुन कमी करणे योग्य वाटत नाही. तेंव्हा त्याना कामावरुन कमी न करता पुन्हा तात्पुरते आदेश काढुन श्री. नवले के.एस. यांना कामावर घ्यावे.

**श्री. त्र्यंबक तुपे :** १८० दिवस श्री. नवले यांनी काम केलेले आहे. त्यावेळेस पासुन प्रशासनाला चुका समजल्या नाहीत काय?

**श्री. कचरु नवपुते :** स्थायी समिती व सर्वसाधारण सभेमध्ये वेळोवेळी स.स. इतिवृत्तातील चुका होत असल्याच्या तक्रारी करीत होते. त्यामुळे प्रशासनाने ही कार्यवाही केली ती योग्य आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रशासनाने निवड समिती गठण करुन व मुलाखती घेऊन श्री. नवले यांची निवड केलेली आहे. त्यामुळे पुन्हा त्यांना कामावरुन कमी करणे योग्य नाही.

**श्री. गौतम लांडगे :** लघुटंकलेखक पदाच्या निवडीवेळी एकुण १४ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविणे होते. त्यावेळेची संपुर्ण माहिती उपआयुक्त यांनी या पुर्वीच्या बैठकीत सविस्तरपणे सांगितलेले आहे. १४ पैकी श्री. नवले हा एकमेव मुलाखातीसाठी आल्याने त्याची निवड समितीने केली. व त्याची दैनिक वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात आदेश काढण्यात आला परंतु हे प्रशासनाची कार्यवाही असल्याने स्थायी समितीमध्ये याबाबत निर्णय घेता येणार नाही. आणि जर दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्याबाबत स्थायी समिती असे निर्णय घेत असल्यास उद्या अनेक कर्मचारी व्यक्ती अन्याय झाला म्हणुन दाद मागण्यासाठी स्थायी समितीकडे येतील.

**मा. सभापती :** श्री. नवले के.एस. यांची लघुटंकलेखक म्हणुन दैनिक वेतनावर (एकत्रित) वेतनवाढ सहा महिनेसाठी आदेश का काढलेला होता. त्यांचे काम समाधानकारक नसल्याने त्यांना प्रशासनाने कामावरुन कमी केले. परंतु प्रशासनाने त्यांना पुर्ववत कामावर घेणेबाबत सहानुभुतीपुर्वक विचार करावा.

**श्री. जयवंत ओक :** अनेक पदांच्या मुलाखती वेळेस निवड समितीने कशा उमेदवारांची निवड केली त्यांची मी नावासह माहिती वाचुन दाखवू शकतो. जे की त्यांना बरोबर येत नाहीत. व अनेक चुका होतात. बऱ्याचशा चुका आताही इतिवृत्तात आहेत आपण कुणाकुणाला कामावरुन कमी करणार याची माहिती द्यावी.

**सौ. वाडेकर :** माझ्या वार्डातील मकबुल मिस्त्री नावाच्या व्यक्तींने रस्त्यामध्ये अतिक्रमणे करुन घरे बांधलेले आहे. आणि गेल्या अनेक दिवसांपासुन मी सतत विचारणा करीत आहे. अद्यापही प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**सहा. संचालक नगररचना :** याबाबत संबंधित व्यक्तीला चर्चेसाठी बोलाविले आहे. परंतु ते आले नाहीत. त्या ठिकाणी लॅन्ड ॲक्वीझिशन कार्यवाही करण्यात येईल.

कारण संबंधिताकडे पी.आर. कार्ड वगैरे कागदपत्रे आहेत. त्या सर्व बाबींची पडताळणी करुनच कार्यवाही करावी लागेल. मा. उपआयुक्त यांचेकडे संचिका सादर केली आहे.

**सौ. वाडेकर :** गेल्या एक वर्षापासुन मी सतत विचारणा करीत असून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावयास पाहिजे होती.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** संबंधित व्यक्तीकडे त्याच्या नावाचे पी.आर.कार्ड व घर बांधकाम परवानगी आहे काय? त्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण करुन प्रशासनाने कार्यवाही करावी.

**सहा संचालक नगर रचना :** संबंधिताचे घर जुने आहे. त्यांनी मनपाचा टॅक्स वगैरे भरलेला आहे काय याबाबतची सर्व कागदपत्रानिशी शहानिशा करुन कार्यवाही करावी लागेल.

**मा. सभापती :** मुंबई प्रांतिक मनपा अधि. १९४९ अन्वये जागा भुसंपादनाबाबत रितसर संबंधित व्यक्तींचे कागदपत्राची तपासणी करुन प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** लोकसभा निवडणुकापुर्वी पासुन माझ्या वार्डात काही मोकळया जागांमध्ये अतिक्रमण झालेले असुन अतिक्रमण पथकास सुचना देवुनही अद्यापही कार्यवाही केलेली नाही. जर अशा प्रकारे अनाधिकृत टपऱ्या दिवसेंदिवस वाढत असल्यास त्यास प्रशासन जबाबदार आहे.

**श्री. संजय जोशी :** अशाच प्रकारे शिवाजीनगरकडे जातांना डाव्या बाजुला मोकळी जागा आहे. तयाठिकाणी १०X१० चे टपऱ्यांचे अतिक्रमण काढु शकले नाही.

**सहा. संचालक नगररचना :** अशाप्रकारचे अनाधिकृत अतिक्रमणे मनपाच्या मोकळया जागावरती अतिक्रमणे होत असल्यास संबंधित व्यक्तींवर फैजदारी गुन्हा दाखल करुन प्रशासकीय कार्यवाही करावी लागेल.

**मा. सभपती :** महानगरपालिकेच्या जागांवर ज्या-ज्या ठिकाणी अतिक्रमणे होत आहेत. व प्रशासकीय विभागाकडे याबाबत तक्रारी येतात. त्यांनी तातडीने पाहणी करुन व पंचनामा करुन अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावी.

**श्री. कचरु नवपुते :** शहरातील टपऱ्यांबाबत सभागृहाने निर्णय घेऊन ही कार्यवाही झालेली नाही. तेव्हा अतिक्रमण बाबत आपण कोणता निर्णय घेणार.

**मा. सभापती :** टपरी बाबतचा निर्णय सर्वसाधारण सभेमुळे चर्चा करुन घ्यावा.

**श्री. संजय जोशी :** कोणत्याही लेआऊट मधी १०% जागा ओपन स्पेस असतात. त्यासाठी काही ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत. त्या ठिकाणचे अतिक्रमण काढुन त्या ठिकाणी सोसायटीसाठी उद्यान विकसित करावे. परंतु प्रशासन या बाबत काहीही कार्यवाही करतांना दिसत नाही. या ठिकाणी माझ्या वार्डामध्ये २०० एकर जागा असुनही प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. आणि त्यामुळे छोटे छोटे अतिक्रमणे वाढतात. ज्यामुळे मनपाच्या खुल्या जागेतील करोडो रुपयांचे नुकसान होते. त्या ठिकाणी मनपाने शॉपिंग सेंटर बांधावे.

**सहा. संचालक नगररचना :** या संदर्भात पाहणी करुन अहवाल देण्यात येईल.

**मा. सभापती :** याबाबत उद्यालाच पाहणी करुन अहवाल सादर करावी.

**श्री. गौतम लांडगे :** शहरात पिण्याचा पाण्याचा प्रश्न बिकट आहे. सिडको भागात टॅकरव्दारे पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. गेल्या दिड वर्षापासुन पाण्याची टाकी झालेली नाही. त्याबाबत तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

**कार्य. अभियंता पा.पु. :** सिडको एन-७ येथे पाण्याची टाकी बांधण्यासाठी टेंडर काढलेले आहे. त्याबाबत कंपरेटीव्ह करुन एजन्सीची मंजुरीस्तव पाठवावे लागेल. सदरील खर्च शासकीय अनुदानातुन केलेला आहे. याबाबतचे टेंडर तीन महिन्यापासुन काढण्यात आलेले असुन एजन्सीला मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

**श्री. संजय जोशी :** गेल्या दिड वर्षापासुन पाण्याच्या टाकीबाबत सभागृहात चर्चा होऊनही कार्यवाही होत नाही. नागरिकांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न सारखा भेडसावत आहे. आणि अद्यापही कामाची सुरुवात न झाल्याने प्रशासनाला नेमकी अडचण काय आहे. याची माहिती द्यावी.

**श्री. विकास जैन :** माझ्या वार्डातील अशा अनेक प्रकारची कामे बऱ्याच दिवसांपासुन प्रलंबीत आहेत. तेव्हा टेंडरला मंजुरी देवुन कार्यवाही व्हावी. बरेचशे रोडची कामे बंद पडलेली आहेत.

**अति. शहर अभियंता :** ज्या ठिकाणी फुटपाथची आवश्यकता नाही. त्या ठिकाणी मेरलिक करुन डांबरीकरण करण्यात येईल. त्या ठिकाणचे टेंडर झालेले आहेत.

**श्री. विकास जैन :** टेंडर काढुन एजन्सी फिक्स झालेली असुन कामास मात्र सुरुवात झाली नाही. ही शोकांतिका आहे जे.स.स. बोलत नाही. त्यांचे बाबतीत कोणतीही कार्यवाही करावयाची नाही असे आहे काय?

**मा. सभापती :** शिल्पनगर येथे डॉ. शमिर हॉस्पीटल ते मरिया हॉस्पीटल पर्यंत रस्त्याचे खडीकरण करुन फुटपाथ तयार करण्याचे काम अंदाजपत्रकास र.रु. ६,२३,०००/- यांस सर्वात कमी दराचे मंजुरी मिळालेली आहे. तेथील कामास संबंधित गुत्तेदाराची मा. आयुक्तांनी वाटाघाटी करुन काम करुन घ्यावे.

**श्री. संजय जोशी :** सिडको एन-७ येथील टाकीबाबत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** सिडकोतील पाण्याच्या टाकीबाबत निविदा डि.एस.आर. दरान्वये मागविण्यात आले होते. मा. आयुक्त यांचे कडुन मंजुरी मिळाल्यानंतर कार्यवाही करण्यांत येईल. गेल्या २-३ महिन्यापासुन आचारसंहितेमुळे कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती :** सदरचा प्रश्न पिण्याच्या पाण्याचा असल्याने तातडीने काम करण्यास मंजुरी द्यावी.

**श्री. भगवान घडामोडे :** खोकडपुरा येथील शिवाजी हायस्कुलच्या समोर काही ठिकाणी वेगवेगळे बोर्ड रस्त्यावर विना परवानगी लावलेले आहेत. त्याबाबत प्रशानाने काय कार्यवाही केली.

**मा. सभपती :** सदरील रस्त्यावरचे अनधिकृत बोर्ड तातडीने प्रशासकीय अधिकारी विभागाने काढुन टाकावे.

**विषय क्र. ५३१/अ :**

ऐनवेळी चर्चेला आलेला विषय श्री. जाधव एस एम. शाखा अभियंता यांचे निलंबनाबाबत विचार विनिमय करणे.

**संवाद**

**श्री. मिरा सलामी :** श्री. जाधव एस.एम. शाखा अभियंता स्लम विभाग मनपा औरंगाबाद यांना भावसिंगपुरा येथिल कामाच्या संदर्भात एक काम पुर्ण होऊनही दुसऱ्या

कल्व्हर्ट कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २४,७००/- तयार करुन पाठविल्याने मा. आयुक्त यांनी त्यांना तातडीने निलंबित केले परंतु प्रत्यक्षात त्या कामाच्या बाबतीत संबंधित शाखा अभियंता यांची काहीही चुक नसुन त्यांचे वरिष्ठ उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांचे सांगण्यावरुन व तया कामाच्या संचिकेत स्वाक्षऱ्या केल्याशिवाय कामाचे अंदाजपत्रक तयार झालेले नाही. तेव्हा श्री. जाधव शाखा अभियंता यांचे बरोबरच उपअभियंता व कार्यकारी अभियंता हे सुध्दा तितकेच जबाबदार राहतील.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** श्री. जाधव शाखा अभियंता यांची भावसिंगपुरा येथील कलव्हर्ट कामाचे बाबतीत चुक झालेली नाही. त्यांनी संबंधित उपअभियंता यांनी सांगितलेल्या कामाप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले होते. तेव्हा त्यांची चुक नसतांना प्रशासनाने श्री. जाधव यांना निलंबित केले ते योग्य नसुन ज्या तांत्रिक सेलच्या टिप्पनीने मा. आयुक्त यांनी श्री. जाधव यांना निलंबित केले त्यांच्या अगोदर कामाची चौकशी करावयास पाहिजे होती. पाठवावयाची नव्हतीच तर अंदाजपत्रक तयार केलेले होते व ते स्लम विभागाच्याच अंतर्गत फिरत होती. कुणी तरी जाणीवपुर्वक ती संचिका मा. आयुक्त यांचेकडे पाठवून मा. आयुक्त यांचा तांत्रिक सेलच्या आधारे गैरसमज करुन दिलेला आहे.

**मा. सभापती :** मा. आयुक्त या बाबत माहिती देतील.

**उप आयुक्त :** (माहिती वाचुन दाखविली)

१) शाखा अभियंता यांनी भिमनगर भावसिंगपुरा येथे श्री. कांबळे यांच्या घरासमोरील कलव्हर्ट दुरुस्त करण्यासाठी सन १९९६-९७ च्या दरसुची नुसार २४,७२०/- चे अंदाजपत्रक तयार केले.

२) उपअभियंता यांनी दि. ५-१-९७ रोजी अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्यासाठी संचिका मुख्य लेखाधिकारी यांचे कडे सादर केली.

३) मुख्यलेखाधिकारी यांनी खर्चास मंजुरी देण्याची ७-१-९८ रोजी शिफारस केली.

४) मा. आयुक्तांनी २४-३-९८ रोजी स्थळ पाहणी केली व तेथे एक नवा पैशाचे काम नसतांना रु. २४,७२०/- चा प्रस्ताव सादर कसा केला या कारणासवरुन शाखा अभियंता श्री. जाधव यांना निलंबीत केले व उपअभियंता श्री. शिंदे व श्री. सिकंदर अली यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे.

**श्री. गौतम लांडगे :** भावसिंगपुरा येथील कामाचे बाबतीत श्री. कांबळे नावाचे व्यक्तींच्या घरासमोर एक मुलगा पडल्याने व स. नगरसेवक यांनी सांगितल्याप्रमाणे या ठिकाणी रु. २.०० लाखाचे काम सुरु होते. त्या कामातुन ड्रेनेजचे कलव्हर्ट कामाचे अंदाजपत्रक रु. २४,७००/- तयार करुन संचिका मंजुरीस्तव फिरत होती. परंतु अचानक लोकसभा निवडणुका आल्याने आचारसंहिता लागली पर्यायाने सदरील काम काही करता आले नाही. त्यामुळे जवळपास दोन महिन्याच्या कालावधीत संबंधित संचिका फिरत राहिल्याने ती तांत्रिक सेलच्या कक्षाकडे जाण्याचे कारण नसतांनाही पाठविल्या गेली व तांत्रिक सेलच्याही कक्ष प्रमुखांनी विभाग प्रमुखांशी कामाचे प्रगतीबाबत विचारणा न करता आपले मत संचिकेत नोंदविले व मा. आयुक्त यांचा या प्रकरणी गैरसमज होऊन ताताडीने स्थळ पाहणी केली आणि जे काम झालेच नाही

तर, कामाचे अंदाजपत्रक तयार करुन कार्योत्तर मंजुरी न घेता डायरेक्ट मा. आयुक्त यांचेकडे मंजुरीस्तव कोणत्या आधारे पाठविली यामध्ये शाखा अभियंता श्री. जाधव यांची चुक धरुन त्यांना तातडीने निलंबित केले. त्याऐवजी श्री. जाधव यांना विचारणा करुन समज द्यावयास पाहिजे होती. तसे न होता व गैरसमजावून श्री. जाधव यांना निलंबित केले. त्याची कोणत्याही प्रकारची चुक या कामात झालेली नाही. याबाबत त्यांचे उपअभियंता यांना सुपुर्ण माहिती विचारणा करावी.

**श्री. रशिद खॉन (मामु) :** माझ्या वार्डात सुध्दा अशाच प्रकारचे काम सुरु असतांना गैरसमज होऊन एका अभियंत्यावर कार्यवाहीची पाळी आली होती. कारण माझ्या माहितीआधारे व संचिका प्रत्यक्षात पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, श्री. जाधव यांची या कामात कोणतीही चुक झालेली नाही. भावसिंगपुरा येथील एक काम चालु होते. त्याच कामातुन उरलेल्या पैशाचे दुसऱ्या स. सदस्यांनी सांगितले प्रमाणे तातडीचे कलव्हर्टचे काम रु. २४,७००/- चे होते. ते सुचनेप्रमाणे करावे. परंतु योगायोगाने आचारसंहिता लागल्याने तेथील काम झाले नाही. आणि संचिका एकाच ठिकाणी राहिली व कुणीतरी सदरील संचिका मा. आयुक्त यांचेकडे पाटविण्याची गरज नसतांनाही पाठविली. त्यावरुन मा. आयुक्त यांचेकडील तांत्रिक सेलच्या टिप्पनीवरुन मा. आयुक्त यांना गैरसमज होऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली व काम झालेच नाही. मात्र अंदाजपकास मंजुरीसाठी संचिका माझ्याकडे कशी आली म्हणुन श्री. जाधव यांना तातडीने निलंबित केले याबाबत संबंधित उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांना विचारणे योग्य आहे. कारण त्यांचे अखत्यारित श्री. जाधव काम करीत होते. कोणतीही चुकी नसतांना श्री. जाधव यांना निलंबित केले ही बाबत प्रशासनाने चौकशी करुन पहावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** भावसिंगपुरा भागातील कलव्हर्ट कामाची दुरुस्तीचे काम करणे आवश्यक होते काय? आणि कामाची दुरुस्ती केली काय? परंतु प्रत्यक्षात संबंधित कामाची पाहणी तांत्रिक कक्षाने केलेली आहे काय? त्या-त्या विभागाच्या विभाग प्रमुखांशी तांत्रिक कक्षाने विचारपुस न करता व प्रत्यक्ष स्थळ पाहणी न करता आपले मत नोंदविले ते योग्य नसुन ज्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर प्रशासकीय कार्यवाहीमुळे बेगुनाह बदनामी होते. तेव्हा अशा तांत्रिक कक्षाची मा. आयुक्त यांचेकडे आवश्यकता नसुन जर महानगरपालिकेतील विविध अधिकारी चांगले काम करुनही त्यांच्यावर भरोसा नाही. असे समजुन तांत्रिक कक्षाची निर्मिती केली असल्यास त्या तांत्रिक कक्षावरच आमचा रोष आहे. ते बंद करावे. अशी आमची मागणी आहे.

**श्री. संजय जोशी :** तांत्रिक कक्षाकडे ज्यावेळी संचिका आली त्यावेळी त्यांनी स्थळ पाहणी केली काय? स्थळ पाहणी न करता आपले मत कोणत्या आधारे नोंदविले याची माहिती द्यावी संबंधित तांत्रिक कक्ष प्रमुखास या ठिकाणी माहिती देण्यास बोलवावे. आणि श्री. जाधव यांचे कामाबाबत संबंधित उपअभियंता यांनी माहिती द्यावी.

**उपअभियंता स्लम :** डिसेंबर ९७ ला दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक शाखा अभियंता यांनी तयार केले. सदरील अंदाजपत्रकाची पाहणी करुन कामाची आवश्यकता असल्यामुळे सदरील दुरुस्तीचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेस्तव कार्यकारी

अभियंताकडे पाटविले. त्यांनीही स्थळ पाहणी करुन सदरील दुरुस्तीच्या अंदाजपत्रकीय कामाची आवश्यकता व दुरुस्तीची जरुरी असल्यामुळे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविले. दि. १०-१-९८ ला श्री. कांबळे यांचा मुलगा सदरील नादुरुस्त पुल ओलांडताना पडुन त्याचा अपघात झाला. त्यामुळे तेथील नागरिकांनी व स. नगरसेवकांनी सदरील नादुरुस्त पुलाची त्वरीत दुरुस्तीचे काम हाती घ्यावे व संभाव्य अपघात टाळुन भविष्यात होणारी जिवित हानी टाळावी. याच दरम्यान आचारसंहिता असल्यामुळे काम सुरु करता येत नाही. असे सांगितले असता स. नगरसेवकांनी व पुशुब्ध झालेल्या नागरिकांनी सदरील काम त्वरीत सुरु करणे बाबतसारखी ओरड केली व प्रशुब्ध जमाव शांत करणेस्तव स. नगरसेवकांनी मा. आयुक्तांची संमती होती असे सांगुन काम सुरु करणेबाबत सुचविले. त्यानुसार सदरील वार्डात पुल बांधकामाचे काम सुरु होणे. त्या गुत्तेदाराकडुन सदरील नादुरुस्त पुलाची दुरुस्ती करुन घेणेबाबत शाखा अभियंता यांना सुचना करण्यात आली. व जाने. ९८ ला शेवटच्या आठवडयात काम सुरु करुन फेब्रु-९८ च्या १ ल्या आठवडयात काम पुर्ण करण्यांत आले. संबंधित कामाचे अंदाजपत्रक जे प्रशासकीय मान्यतेस्तव पाठविण्यात आलेले आहे. त्याबाबत मा. आयुक्त यांना सदरील अंदाजपत्रकातील काम दुर्घटना घडल्यामुळे प्रशुब्ध नागरिकांचा व स. नगरसेवकांच्या दबावामुळे नागरिकांच्या जिविताच्या हितास्तव रद्द करावे. याबाबत टिप्पनी सादर करणेस्तव सुचना देण्यात आल्या दि. १९-२-९८ ला तांत्रिक कक्षाने सदरील नादुरुस्त पुलाचे अंदाजपत्रकाची स्थळपाहणी केली व सदरील पुलाची दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही. असे मत नोंदविले. मा. आयुक्त यांनी या स्थळाची दि. २४-३-९८ ला पाहणी केली.

**श्री. संजय जोशी :** तांत्रिक सेलचे संबंधित अधिकारी यांनी याबाबतची माहिती द्यावी.

**श्री. अब्दुल रऊफ :** जर तांत्रिक कक्ष महानगरपालिकेत पाहिजे असल्यास यासाठी वेगळी लॅब तयार करुन या कक्षाच्या अंतर्गत उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांची नेमणुक करुन येथील संपुर्ण कामाची, साहित्याची उदा. सिमेंट विटा, रेती आदिची कामाची क्वॉलिटी पाहुन देखरेख ठेवण्याचे कार्य या कक्षाने करावे. परंतु प्रत्यक्षात पाहणी न करता तांत्रिक कक्षाने आपले मत नोंदविणे योग्य नसुन मा. आयुक्त यांनीच भरोसा ठेवून शहानिशा करणे योग्य आहे काय याची तपासणी करावी. त्यापेक्षा तांत्रिक कक्षच बंद करावे असे आम्हाला वाटते.

**मा. सभापती :** मा. आयुक्त याबाबत माहिती देतील.

**मा. आयुक्त :** भावसिंगपुरा येथील कलव्हर्ट कामामध्ये जो गैरप्रकार झालेला आहे. तो गैरप्रकार तेथील एक काम झालेले असतांनाही दुसऱ्या कामाचे अंदाजपत्रकास मंजुरी न घेता काम करुन घेतले म्हणुन संबंधित कनिष्ठ अभियंता यांना काल "निलंबित" करण्यात आले असुन उपअभियंता व कार्यकारी अभियंता स्लम या दोघानाही कारणे दाखवा नोटीस" बजाववण्यात आली आहे. या प्रकरणात मो. भावसिंगपुरा येथे कलव्हर्ट बांधकाम माहे डिसेंबर मध्ये चालु केले आहे. आणि या कामाची कोणत्याही प्रकारची कार्योत्तर मंजुरी प्रशासनाने आर्थिक बाबतीत दिलेली नाही. दुदैवानी तया ठिकाणी कलव्हर्ट बांधकाम करावयाचे होते. परंतु प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली

असता त्या ठिकाणी बांधकाम दिसुन आले आणि त्या ठिकाणी तांत्रिक कक्षानेही बाब उघडकीस आणली. व रु. २४,७००/- चा खर्च करण्याची त्या ठिकाणी आवश्यकता नाही असे समजले. तेव्हा संबंधित कामावर खर्च करण्याची आवश्यकता नसतांना कसे काय खर्च केले त्यामुळे स्थळपाहणी केली आणि कलव्हर्ट बांधकाम त्या ठिकाणी केले होते. यास प्रशासनाची कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक होते. स.स.श्री. गिरजाराम हाळनोर व श्री. गौतम लांडगे यांनी सुचना केल्या ती लेखी स्वरुपात नाही. या ठिकाणी संबंधित कामाचे बाबतीत जर उपअभियंता व कार्यकारी अभियंता स्लम हे चौकशी अंती दोषी आढळतील तर त्यांचेवरही प्रशासन कार्यवाही करेल. तेव्हा संबंधित विभागाचे केलेल्या चुकीच्या कामाचे तांत्रिक कक्षाने प्रशासनाच्या ही बाब निदर्शनास आणुन दिल्याने त्यांना एक वार्षिक वेतनवाढ देण्याची शिफारस मी आजच केलेली आहे. तेव्हा कोणत्याही कामा अगोदर कार्योत्तर मंजुरी प्रशासनाची घेणे आवश्यक आहे. कारण स्थायी समिती व सर्वसाधारण सभेमध्ये स.स.ची दिशाभुल कुणीही करुन नये. जर त्या कामाची नितांत आवश्यकता असल्यास त्या कामाची कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक होते. त्यामुळे संबंधितावर केलेली कार्यवाही प्रशासकीय दृष्टया योग्य आहे.

**श्री. गौतम लांडगे :** तेथील काम माहे फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवडयात झालेले आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** तांत्रिक कक्षने दिलेला निर्णय चुकीचा आहे. कारण त्या ठिकाणी तांत्रिक कक्षाने स्थळ पाहणी केलेली आहे काय? आणि पाहणी केलेली असल्यास त्यांनी विचारणा केली काय? मा. आयुक्त यांनी केलेल्या सुचना आम्हाला मान्य नाहीत व तांत्रिक कक्षा कामगिरीवरुन त्यांना वार्षिक वेतनवाढ शिफारीस मंजुर न करता उलट तांत्रिक कक्षाचे काम योग्य नसल्याने त्यांचे दोन वेतनवाढी कमी करण्यात याव्यात असे माझे म्हणणे आहे. व तांत्रिक कक्षाचे समर्थन करणे योग्य नाही.

**श्री. रशिद खॉन (मामु) :** संबंधित कामाची संचिका आचारसंहितेमुळे एकाच ठिकाणी असल्याने हा प्रकार झालेला आहे. कोणाही कर्मचाऱ्यांचे वार्षिक वेतनवाढ वाढ किंवा कमी करु नये. बऱ्याचशा वेळेस मा. आयुक्त निर्णय घेतात त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही. तेव्हा संचिका तिन-तीन महिने का पडलेल्या असतात याची माहिती द्यावी. कारण एका अधिकाऱ्यास वाचवावे आणि दुसऱ्यास शिक्षा द्यावी हे बरोबर नाही. तेव्हा कलव्हर्ट कामाचे बाबतीत संबंधित शाखा अभियंता यांचे वरिष्ठ अधिकारी यांचे सुचनेनुसारच काम झालेले आहे व त्यांनीही या ठिकाणी कामाची पाहणी केलेली असेलच तरीही वरिष्ठांच्या निदर्शनास ही बाब तातडीने आणने आवश्यक होते. तेव्हा तसे न झाल्याने शाखा अभियंत्याचेपेक्षाही वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही या कामी दोषी धरुन निलंबित करावे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सदरील कामाची निवड लक्षात घेता व नागरीकांच्या तक्रारी आणि स. नगरसेवकांच्या आग्रहामुळे तेथील काम कधीपर्यंत करावे असा तांत्रिक कक्षाने पाहणी करुन सुचना केल्या काय?

**श्री. गौतम लांडगे :** मागील स्थायी समितीच्या बैठकीत रु. १.०० लाख व २.०० लाखाचे तातडीच्या कामास वेळेवर मंजुरी दिलेल्या आहेत. त्याच प्रकारे या कामासही मंजुरीसाठी स्थायी समितीकडे संचिका आली असती परंतु काम

झालेले होते. व आचारसंहिता लागल्याने संचिका थांबल्या गेली यामध्ये शाखा अभियंता श्री. जाधव यांचा दोष नसुन त्याचे वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे व नागरिक तथा स. नगरसेवकांच्या आग्रहास्तव तेथील काम सेव्हिंग्ज मधुन तातडीने करुन धेण्यात आलेले आहे. त्यामुळे शाखा अभियंता श्री. जाधव यांना निलंबित करणे योग्य वाटत नाही.

**श्री. रशिद खॉन (मामु) :** शाखा अभियंता श्री. जाधव यांचा यामध्ये कोणत्याही प्रकारचा दोष नसुन त्यांचे निलंबन रद्द करुन त्यांची चौकशी चालु ठेवावी व दोष आढळल्यासच त्यांचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** तांत्रिक कक्षाची निर्मिती करण्यांचे प्रयोजन प्रशासनाचे काय आहे. म्हणजे तेथील अधिकाऱ्यांवर प्रशासनाचा भरोसा नाही काय? याची माहिती द्यावी. कोणत्याही कामाच्या बाबतीत मा. आयुक्तांना कामाच्या व्यापामुळे स्थळपाहणी अथवा तपासणी वेळेवर करता येणे शक्य नाही. म्हणुन मा. आयुक्त तांत्रिक कक्षावर भरोसा ठेवून काम करीत आहेत. तेव्हा तांत्रिक कक्षच चुकीचा असल्याने व कनिष्ठ कर्मचारी असल्याने त्यांनी दिलेल्या मतानुसार मा. आयुक्तांनी निर्णयाची शिफारस करुन कार्यवाही करणे योग्य नसुन तो कक्षच बंद करावा.

**श्री. मिरा सलामी :** मो. भावसिंगपुरा येथील पुल आता तयार केलेला आहे. या कामासाठी कलव्हर्टचे काम संबंधिताने वरिष्ठांच्या सुचनेनुसार केलेले असल्याने त्यात ते दोषी नाहीत काम केले परंतु आचारसंहितेमुळे संचिका पुढे सरकली नाही ती थाबून राहिली आणि वरिष्ठांमार्फत संचिका न जाता तांत्रिक कक्षाकडे गेली व तांत्रिक कक्षाने आपले मत नोंदवून मा. आयुक्त यांचेकडे पाठविल्याने काम झालेले असून अंदाजपत्रक दुसरे तयार करण्याची आवश्यकता नसल्याचे यात आहे. तेव्हा तांत्रिक कक्षाचीही यात चुक नसुन प्रशासनाने या दोघांपैकी कुणाचेही वार्षिक वेतनवाढ वाढवू नये. कमीही करु नये. मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, सांय दै. सांजवार्ता या वर्तमानपत्रात अशी बातमी आली आहे की, जकात विभागातील काही कर्मचाऱ्यांशी एका सायकल दुकानादारांचे बाबतीत जकातीचा भ्रष्टाचार केलेला आहे. व तो स.स.श्री. नरेंद्र पाटील व काशिनाथ कोकाटे यांनी उघडकीस आणुन दिला. त्या प्रकाराबाबत प्रशासनाने गेल्या दोन महिन्यापासुन काय कार्यवाही केली याची कर्मचाऱ्यांची झोन-५ ला बदली केल्याचे सांगितले होते. परंतु त्या कर्मचाऱ्यांना अद्यापही कार्यमुक्त केले नाही. याचे कारण काय?

**जकात अधिक्षक :** जकात विभागातील दोन कर्मचाऱ्यांचे बदल्या केल्याने त्यांचेजागी पर्यायी व्यवस्था केलेली नव्हती त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांस कार्यमुक्त केलेले नाही. कारण जकात विभागात कर्मचारी वर्ग अपुरा आहे. त्यासाठी पर्यायी व्यवस्था तातडीने केल्यास कार्यमुक्त करणेत येईल. तरीही निसार अहमद यास कार्यमुक्त केलेले आहे.

**श्री. मिरा सलामी :** एका व्यक्तीला कार्यमुक्त केले व दुसऱ्या व्यक्तींस कार्यमुक्त केले नाही हे प्रशासनाचे धोरण योग्य वाटत नाही. तेव्हा एका व्यक्तींस कधीपर्यंत कार्यमुक्त करणार याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त :** जकात विभागातील बदली झालेला कर्मचाऱ्याच्या जागी पर्यायी व्यवस्था १ एप्रिलपर्यंत करण्यात येईल. आचार संहितेच्या काळात जकात विभागतील सायकलीचे भ्रष्टाचार प्रकरण आलेले होते. याबाबत १० पट्टीने दंड वसुल संबंधित मालकाविरुध्द केले असुन तेथील कर्मचाऱ्याची इतरत्र बदली करण्यात आली आहे. परंतु जकात विभागाने सबंधितांना पर्यायी व्यवस्थेमुळे कार्यमुक्त केलेले नाही त्या दोन दोषी कर्मचाऱ्याचे वार्षिक वेतनवाढ रोखलेले आहे. १ एप्रिल पर्यंत नविन लिपीक देऊन संबंधिताना कार्यमुक्त करण्यांत येईल.

**मा. सभापती :** स. सदस्य च्या चर्चेवरुन असे लक्षात येते की, शाखा अभियंता श्री. जाधव यांना प्रशासनाने निलंबित केले आहे. त्यांचा काही दोष नाही. प्रशासनाने सखोल चौकशी करावी नंतरच कार्यवाही करावी. सध्या "निलंबन" रद्द करुन त्यांना पुर्ववत कामावर घेण्याचे पशासनाने कार्यवाही करावी असा स्थायी समिती सभेत निर्णय घेण्यात येते.

**श्री. भगवान घडामोडे :** अगोदर प्रशासनाने संपुर्णत चौकशी करावी व नंतरच "निलंबन" रद्द करावा. चौकशीपुर्वी निलंबन रद्द केल्यास बाहेरील नागरीक ओरडत असतात. याकडे लक्ष द्यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चर्चेव्दारे आलेल्या प्रस्तावामध्ये शाखा अभियंता श्री. जाधव एस.एम. यांना मो. भावसिंगपुरा येथील कलव्हर्ट कामाचे अंदाजपत्रक रु. २४,७००/- च्या गैरप्रकाराबाबत प्रशासनाने चौकशी पुर्वी निलंबित केले होते. त्यास सभागृहातील स.स. च्या भावना लक्षात घेता श्री. जाधव त्याचबरोबर त्यांचे वरिष्ठ अधिकारी उपअभियंता, तसेच कार्यकारी अभियंता स्लम यांचेही सखोल चौकशी करावी व चौकशीनंतरच प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी सध्या श्री. जाधव एस.एम. यांचे निलबंन रद्द करुन त्यांना पुर्ववत कामावर घ्यावे. असा स्थायी समिती निर्णय घेते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

**जकात अधिक्षक :** जकात विभागामध्ये ठरविक कर्मचारी आहेत. ज्या दोन कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यांत आल्या त्यांचे जागी पर्यायी व्यवस्था करण्यांत आली नाही ती करावी. श्री. निसार अहमद यांना कार्यमुक्त केलेले आहे.

**श्री. मिरा सलामी :** एका कर्मचाऱ्यास कार्यमुक्त केले आणि दुसऱ्या कर्मचाऱ्यास कार्यमुक्त का केले नाही. अशा प्रकारची सापत्नीक वागणुक प्रशासन का देते.

**श्री. भगवान घडामोडे :** कोणत्याही प्रकारे चौकशी झाल्यानंतरच कर्मचारी अधिकारी यांचे निलंबन रद्द करावे. नसता बाहेरील नागरिक मनपाच्या नावांने ओरडतात.

**श्री. कचरु नवपुते :** रिझवान अहमदखान नाका कारकुन हे कार्यालयात काम करित नाही. म्हणुन ते यापुर्वी पशुधन विभागात कार्यरत होते. आता त्यांचा पगार काढलेला नाही. आणि संबंधित कर्मचाऱ्याच्या हजेरी पटावर स्वाक्षऱ्या असुनही पगार का दिला जात नाही. याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** या बाबत सर्व शहानिशा करुन पुढील बैठकीत माहिती द्यावी.

**विषय क्र. ५३२/१ :**

अतिरिक्त शह अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मुख्य बस स्थानक परिसरात हायमस्ट लाईट बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १०.०० लाखाचे अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ४०३/३४ दि. १७-१२-९७ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कामाकरिता निविदा पत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण पाच कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत यापैकी फक्त चार निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दि. ३-१-९८ रोजी उघडण्यांत आली. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. दानिश सेल्स कॉपोरेशन | ०.८५% | जास्त दराने |
| २. | मे. कॅमको एजन्सीज | ०.४५% | कमी दराने |
| ३. | मे. फिलिप्स इंडिया लि. | २.००% | जास्त दराने |
| ४. | मे. रॉयल इलेक्ट्रीकल्स | १.००% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. कॅपको एजन्सीज यांच्या निविदेचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.४५% कमी आहे. मा. आयुक्तांनी संबंधित निविदाधारकास ०.४५% कमी या दराऐवजी मागील हायमस्टची कामे ज्या दराने मंजुर होती. त्या दराने म्हणजेच १.३०% कमी दराने करण्यास तयार आहेत. तरी मे कॅपको एजन्सीज कडुन अं.प. दरापेक्षा १.३०% कमी दराने करुन घेण्याकरिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्य बस स्थानक परिसरात हायमस्ट लाईट बसविण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अं.प. दरापेक्षा १.३०% कमी दराने मे. केपको एजन्सीज यांचे कडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३३/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कडा ऑफीस ते विशालनगर या ५० फुट डी.पी. रोडवर पथ दिव्याकरिता विद्युतीकरण करणे करिता सा.बां. दरसुची नुसार र.रु. २,९४,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम करिता निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत १२ निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या दिनांकापर्यंत एकुण ४ (चार) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. दानिश सेल्स कॉर्पो. | २५.१२% | कमी |
| २. | मे. गजानन इलेक्ट्रीकल्स | २४.२५% | कमी |
| ३. | मे. लाईटवेल इलेक्ट्रीकल | २०.०१% | कमी |
| ४. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | १९.४% | कमी |

करिता तुलनात्मकदृष्टया मे. दानिश सेल्स कॉर्पो. यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.१२% सर्वात कमी दराचे आहे. करिता अंदाजपत्रक मंजुरी व एजन्सीचे दर विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कडा ऑफीस ते विशालनगर या ५० फुट डी.पी. रोडवर पथ दिव्या करिता विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २५.१२% कमी दराची मे. दानिश सेल्स कॉर्पोरेशन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३४/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जलशुध्दी करणासाठी लागणारी ब्लीचिंग पावडर खरेदी करावयाची आहे. त्यासाठी स्थायी समितीचा ठराव क्र. २७३/२८ दिनांक ३-१०-९७ अन्वये रु. ८,४४,२००/- मंजुरी देण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ९०/९७ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन उत्पादक तथा अधिकृत विक्रेते यांच्या तर्फे नमुना "डी.फॉर्मवर सिलबंद निविदा मागविण्यांत आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन (३) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मिकॉडस फार्मोसिटीकल्स | ४०५=०० प्र. बॅग. |
| २. | शिरीष केमीकल्स | ३९८=०० प्र. बॅग. |
| ३. | केमहेप एजन्सी | ४००=००प्र. बॅग. |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे. शिरीष केमिकल्स यांचा आहे. परंतु त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे त्यांना मा. आयुक्त यांच्या सोबत दिनांक २३-३-९८ रोजी दरा बाबत वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले. त्यामध्ये मा. आयुक्त यांनी रु. ३८०/- (रु. तिनशे ऐशी) प्र. बॅग या दरामध्ये खरेदी करण्यास मान्यता दिली आहे.

तरी वाटाघाटी अंतीम दर रु. ३८०/- प्र.बॅग या दरानुसार मे. शिरीष केमिकल्स यांच्यातर्फे ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलशुध्दीकरणासाठी लागणारा ब्लिचिंग पावडर खरेदी करण्या करिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार मे. शिरीष केमिकल्स यांचे कडुन प्रति बॅग रु. ३८०/- या दराने ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३५/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गुलमंडी येथे हायमस्ट लाईट बसविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ४०४/३५ दिनांक १७-१२-९७ (रु. ९,८१,५९६) मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामाकरिता निविदा पत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदा पत्रके स्विकारण्याच्या अंतिमतारखे पर्यंत यापैकी फक्त चार निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दि. ३-१-९८ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. दानिश सेल्स कॉर्पोरेशन | १.००% | कमी दराने |
| २. | मे. फिलिप्स इंडिया लि. | २.००% | जास्त दराने |
| ३. | मे. कॅपको एजन्सीज | ०.७५% | कमी दराने |
| ४. | मे. रॉयल इलेक्ट्रीकल्स | १.००% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी आहेत.

मा. आयुक्त यांनी मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांचे १.००% कमी या दराऐवजी मागील हायमस्टची कामे ज्या दराने मंजुर होती. त्या दराने म्हणजे १.३८% कमी या दराने मान्यता दिली आहे. व मे. दानिश सेल्स कार्पोरेशन हे सदरील काम १.००% ऐवजी मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या दराप्रमाणे म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३८% कमी दराने करण्यास तयार आहेत.

तरी सदरील काम मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.३८% कमी या दराने करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलमंडी येथे हायमस्ट लाईट बसविण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे दानिश सेल्स कॉर्पोरेशन यांचे कडुन अं.प. दरापेक्षा १.३८% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३६/५ :**

औरंगाबाद शहर विकासासाठी शहर विकासाचे मोठे प्रकल्प हाती घेण्यास्तव पुरेसा निधी उपलब्ध नसल्याकारणामुळे अशा प्रकारे विकासाची कामे हाती होण्यासाठी कर्जरोखे उभारुन अशा प्रकारची कामे हाती घेणे गरजेचे आहे. त्यासाठी मे. क्रिसील क्रेडीट रेटींग इन्फरमेशन सर्व्हीसेस ऑफ इंडिया लि. मुंबई यांचे मार्फत रु. ५०.०० कोटीची कर्ज रोखे उभारण्यास्तव मनपाच्या आर्थिक क्षमते बाबत वर्गवारी ठरविणेस्तव सर्व्हे करण्याच्या कामाकरिताची रेटींग फी रु. ५०/- हजारा व सदरील एजन्सीचे आधिकारी यांचा येण्याजाण्याचा प्रवास खर्चास मान्यता देणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर विकासासाठी शहर विकासाचे मोठे प्रकल्प हाती घेण्यास्तव पुरेसा निधी उपलब्ध व्हावा यासाठी कर्ज रोखे उभारण्याचे कामासाठी मे. क्रिसील रेटींग इन्फरमेशन सर्व्हीसेस ऑफ इंडिया लि.मुंबई यांचे मार्फत रु. ५०.०० कोटीची कर्ज रोखे उभारण्यास्तव मनपाच्या आर्थिक क्षमते बाबत वर्गवारी ठरविणेस्तव सर्व्हे करण्याच्या कामाकरिता रेटींग फी रु. ५०/- हजार व सदरील एजन्सीचे अधिकारी यांचा येण्या जाण्याचा प्रवास खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ५३७/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरु बालोद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयामध्ये पं. गोविंदराव जळगावकर संग्रहीत शिवकालीन वाद्ये ठेवण्याचा प्रस्ताव असुन त्यांनी अंबड सारख्या छोटयाशा गावात संगिताच्या सहवासात संपुर्ण आयुष्य वाद्ये आणि रेकॉर्डर्स गोळा करण्यांत घालवले असुन या छंदापायी त्यांनी त्यांची बरीच जमिन विकावी लागली अत्यंत मेहनतीने, परिश्रमाने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर वेळ प्रंसगी महाराष्ट्रा बाहेरही वाद्यामध्ये संगीत क्षेत्रातील नामवंत कलावंताच्या आठवणी म्हणुन काही वाद्य आहेत. जी वाद्य ते महानगरपालिकेस देवु इच्छितात त्यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सांरगी | : | एकुण संख्या ७ नग<br>यातील दोन सारंग्या किमान ३५० ते ४०० वर्षापुर्वीच्या आहेत व इतर पाच सारंग्या या जवळपास २५० ते ३०० वर्षापुर्वीच्या आहेत. |
| २. | दिलरुबा | : | एकुण संख्या दोन नग<br>जवळपास १५० वर्षापुर्वीच्या आहेत. |
| ३. | इसराज | : | एकुण संख्या १ नग<br>संपुर्ण हस्तादंतात नक्षीकाम केलेला हा इसराज दोनशे वर्षापुर्वीचा असुन इसराज ही दिलरुबाची पुर्वीची आवृत्ती असलेले दुर्मीळ असे वाद्य आहे. |
| ४. | स्वरमंडळ | : | एकुण संख्या २ नग<br>१५० ते २०० वर्षापुर्वीचा १ नग व प्रचलित ५० ते ७० वर्षापुर्वीचा १ नग आहे. |
| ५. | सितार | : | एकुण संख्या १ नग जवळपास १०० वर्षा पुर्वीची आहे. |
| ६. | तानपुरा | : | एकुण संख्या १ नग<br>श्री. संतसमर्थ रामदास स्वामीचे शिष्य श्री. कल्याणस्वामी आणि वेणुबाई कालीन तानतुरा असुन तो जवळपास ३५० ते ३०० वर्षा पुर्वीचा आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | सनई | : | एकुण संख्या १ नग<br>जवळपास १०० वर्षा पुर्वीची आहे. |
| ८. | सुरसोटा | : | एकुण संख्या १ नग<br>पुर्वी सनई वादनात साथ संगतीसाठी वाजवण्यात येणारे दुर्मिळ वाद्य. |
| ९. | रण्याळु | : | एकुण संख्या १ नग<br>१५० ते २०० वर्षा पुर्वीचा आहे.<br>अप्रचलित दुर्मिळ असे वाद्य आहे. |
| १०. | सुंद्री | : | एकुण संख्या १ नग<br>अप्रचिलत दुर्मिळ असे वाद्य आहे. |
| ११. | बासरी | : | एकुण संख्या ३ नग व ती ५० वर्षा पुर्वीची आहे. |
| १२. | मृदंग | : | एकुण संख्या २ नग<br>श्री. संत एकनाथ कालीन मृदंग १ नग नटश्रेष्ठ मा. दिनानाथ मंगेशकरांचा मृदंग १ नग. |
| १३. | ढोलकी<br>नालदी | : | एकुण संख्या २ नग ७५ वर्ष जुनी आहे. |
| १४. | ढोलक | : | एकुण संख्या १ नग श्री. संत रामदास स्वामी शिष्य कल्याण स्वामी काळातील आहे. |
| १५. | चौघडा | : | एकुण संख्या २ नग<br>३५० ते ४०० वर्षापुर्वीचा आहे. |
| १६. | एकतारी | : | एकुण संख्या १ नग प्रचलित |
| १७. | चिपुळी | : | एकुण संख्या २ नग संत कालीन आहे. |
| १८. | कडी | : | एकुण संख्या २ नग ५० ते ६० वर्षापुर्वीची आहे. प्रचलित लोक वाद्य. |
| १९. | संबळ | : | एकुण संख्या १ नग प्रचलित लोक वाद्य. |
| २०. | ऑर्गन | : | एकुण संख्या १ नग<br>कै. नटश्रेष्ठ बाल गंधर्व या ऑर्गन वर गायले आहेत साधारणतः ५० ते ६० वर्षा पुर्वीचा आहे. |
| २१. | पायपेटी | : | एकुण संख्या १ नग ७० ते ८० वर्षा पुर्वीचा आहे. |
| २२. | तबला/उग्गा | : | एकुण संख्या तबला ३ नग<br>एकुण संख्या उग्गा २ नग<br>१०० ते १५० वर्षा पुर्वीचे आहे. यातील एक उग्गा संपुर्ण मातीचा आहे. |
| २३. | जलतंरग | : | एकुण संख्या १ नग (संपुर्ण संच)<br>५० ते ६० वर्षा पुर्वीचे आहे. |
| २४. | व्हायोलिन | : | एकुण २ नग |
| २५. | झांज | : | एकुण संख्या १ नग<br>५० वर्षा पुर्वीची आहे. |
| २६. | मेडीलिन/गिटार | : | एकुण संख्या प्रत्येकी एक नग प्रचलित |
| २७. | शंख | : | एकुण संख्या १ नग प्रचलित. |
| २८. | ग्रामोफोन | : | एकुण संख्या ३ नग<br>७० ते ८० वर्षा पुर्वीचे ग्रामोफोन आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| २९. | दगडी मुर्ती | : | एकुण संख्या ५ नग<br>५०० ते ७०० वर्षा पुर्वीचे अतिप्राचीन मुर्त्या आहेत. |
| ३०. | रेकॉर्डस | : | एकुण संख्या जवळपास ३०० ते ५०० तसेच वेगळी सुची सोबत |

अशाप्रकारे गायनाचार्य पं. गोविंदराव जळगांवकर यांनी त्यांच्या कडील वाद्य संग्रहाल्याची वरील प्रमाणे यादी असुन सदरील संग्रहाचे मोबदल्यात त्यांनी त्यांचे काही प्रस्ताव ठेवलेले आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

१) ते देत असलेल्या वाद्य संग्रहास "गायनाचार्य पं. गोविंदराव जळगांवकर" दालन असे नांव देण्यांत यावे.
२) या वाद्य संग्रहालयात सदस्य म्हणुन त्यांचा मुलगा श्री. धनंजय गोविंदराव जळगांवकर यांची नियुक्ती करण्यात यावी.
३) देत असलेल्या वाद्या प्रित्यर्थ मोबदला म्हणुन २५ वर्षापर्यंत रु. ५,०००/- रोख प्रति महिना देण्यात यावा या काळात ते हयात नसल्यास त्यांची पत्नी सौ. पद्माबाई गाविंदराव जळगांवकर यांचे नांवे देण्यात यावे. तदनंतर या काळात पत्नी हयात नसल्यास त्यांची दोन्ही स्नुषा सौ. निशिगंधा अरविंद जळगांवकर आणि सौ. लक्ष्मी धनंजय जळगांवकर यांचे नावे सम प्रमाणात ही रक्कम देण्यात यावी.
४) तसेच राहण्यासाठी प्लॅट किंवा घर मालकी हक्काने किंवा शासकीय क्वॉर्टर मध्ये निवास व्यवस्था औरंगाबाद येथे शासनातर्फे करण्यात यावी.

शिवकालीन वाद्यांचे दालन करण्यासाठी महानगरपालिकेची संकल्पना असुन इतिहास तज्ञ डॉ. मोरवंचीकर यांचे सह मा. आयुक्त साहेबांनी वाद्यांची पाहणी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात वाद्यांचे एक दालन करण्यास हरकत नाही. तथापी मा. स्थायी समितीने एक उप समिती नेमुन वाद्याची पाहणी करावी व पं गोविंदराव जळगांवकर यांचेशी चर्चा करावी. उपसमितीत वाद्ये योग्य वाटल्यास पंडीत गोविंदराव जळगांवकर यांचेशी चर्चेअंती वाद्यांची किंमत ठरवुन अंतिम निर्णय उप समितीने घ्यावा व तसा अहवाल (प्रस्ताव) स्थायी समितीला ही उपसमिती सादर करील. या अहवालानुसार अंतिम प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर करण्यांत येईल.

तरी वरील सर्व बाबींचा विचार होणेस्तव व या प्रकरणी पाहाणी व अभ्यास करुन अहवाल सादर करणेस्तव उपसमिती स्थापन करणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरु बालोद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयामध्ये पं. गोविंदराव जळगांवकर संग्रहीत शिवकालीन वाद्ये ठेवण्याकरिता प्रस्तावातील अ.क्र. १ ते ३० मध्ये नमुद केलेल्या वाद्यांची अंबड येथे जाऊन पाहणी करुन प्रस्तावातील अ.कं. १ ते ४ चे पं. गोविंदराव जळगांवकर यांच्या प्रस्तावाप्रमाणे निर्णय घेण्या करिता मा. सभापती, स्थायी समिती स्थापन करण्यात येते. सदस्य १) श्री. राजकुमार बचाटे २) श्री. सय्यद अली मिरा सलामी समितीने प्रत्यक्ष पाहणी व अभ्यास करुन स्थायी समिती समोर अहवाल सादर करावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३८/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. सादतनगर (अमान कॉलनी) भागातील रस्ते खडी रस्ते तयार करणे करिता रक्कम रु. ४,१५,९००/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९५-९६ अनुसार तयार करण्यात आली असुन मा. आयुक्तांनी दिनांक १७-१२-९७ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम गलिच्छ वस्ती सुधार खडी रस्ते या शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेली तरतुद ५०,००,०००/- यातुन खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादत नगर (अमान कॉलनी) भागातील खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,१५,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३९/८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्तावा सादर केला आहे की, जयभवानी नगर येथे १५० व २५० मी.मी. व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९६-९७ च्या दरसुची नुसार रक्कम रु. १२,८९,०००/- एवढयाचे तयार करण्यात येवुन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १५२/१६ दिनांक १६-१२-९७ अन्वये मंजुरी देण्यांत आली आहे. कार्यालयातर्फे निविदा सुचना दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यात येवुन बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पधरा (१५) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण चार (४) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सलिम पटेल | २८.११% | कमी |
| २. | श्री. शिवा कन्स्ट्रक्शन | २९.९९९% | कमी |
| ३. | एलोरा कंन्स्ट्रक्शन | २८% | कमी |
| ४. | श्री. आर.एस.भाटीया | २७.५% | कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दर हा मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९९९% कमी असा दर दिलेला आहे.

तरी मे. शिवा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९९९% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयभवानी नगर येथे १५० व २५० मी.मी. व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २९.९९९% कमी दराची मे. शिवा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४०/९ :**

प्रकल्प संचालक यांनी मा. आयुक्तांची मान्यता दि. २४-३-९८ नुसार प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी खालील कलावतां कडुन कॅनव्हास वरील तैलचित्रे खरेदी करणे आहेत. सदर कामासाठी जाहिर निविदा प्रकाशित करण्यात आलेली नाही. अधिष्ठाता, शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद यांचेशी मा. आयुक्तांनी तैलचित्रांच्या दराबाबत सखोल चर्चा दि. २४-२-९८ रोजी केली आहे. तैलचित्र खरेदीसाठी मुख्य लेखा अधिकारी, उपायुक्त-२ व प्रकल्प संचालक यांची समिती स्थापन करण्यात आली होती या समितीने कलावंताशी वाटाघाटी करुन दर कमी केले आहेत. तरी फ्रेमसह तैलचित्रांचे खालील दर मान्यतेस्तव सादर.

| अ. क्र. | कलावंत | चित्राचा आकार | दर प्रति नग | चित्राचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा. दिलीप बडे | ४x६ फुट<br>४x६ फुट<br>२x३ फुट | १५,०००/-<br>१८,०००/-<br>५५००/- | कमी तपशिलाचे<br>जास्त तपशिलाचे<br>पोट्रेक्स |
| २. | श्री. सुनिल बोखंडी | ४x४ फुट<br>४x६ फुट | १४,०००/-<br>१८,०००/- | कमी तपशीलाचे<br>जास्त तपशिल |
| ३. | श्री. विजय कुलकर्णी | ४x४ फुट<br>४x६ फुट<br>४x६ फुट | १४,०००/-<br>१८,०००/-<br>१५,०००/- | कमी तपशिल<br>जास्त तपशिल<br>कमी तपशिल |

अ.क्र. १ च्या कलावंता कडुन रु. १,१७,०००/- ची खरेदी अ.क्र. २ च्या कलावंताकडुन रु. ९६,०००/- ची खरेदी अ.क्र. ३ च्या कलावंता कडुन रु. ९१,०००/- ची खरेदी करणे आहे श्री. लक्ष्मण पोतदार यांनी देखिल तैलचित्राचे दर सादर केले होते. परंतु त्यांनी वाटाघाटीत दर कमी केलेले नाहीत म्हणुन त्यांचे दरांचा विचार करण्यांत आला नाही. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी कॅन्हॉस वरील तैलचित्र खरेदी करण्याच्या कामा करिता प्रस्तावातील अ.क्र. १ ते ६ च्या कालावंताचे नावांसमोर दर्शविलेल्या दरास अ.क्र. १ चे कलावंत प्रा. दिलीप बडे यांचेकडुन रु. १,१७,०००/- व अ.क्र. २ चे कलावंत यांचे कडुन रु. ९६,०००/- व अ.क्र. ३ चे कलावंताकडुन रु. ९१,०००/- ची तैलचित्रे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. त्याप्रमाणे उपरोक्त कलावतांना ५०% आगाऊ रक्कम देण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४१/१० :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बसैय्येनगर, बायजीपुरा येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ८,५३,६००/- ला स्थायी समिती सभा दि. १७-१२-९७ ला विषय

क्र. १४ ने मंजुरी मिळालेली आहे. जा.क्र. मनपा/लेखा/नि/१८८/ दि. २४-१२-९७ अन्वये वर्तमानपत्रात बी-१ नमुन्यात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकुण चोविस (२४) निविदा विक्री झालया व त्यापैकी दहा (१०) निविदा प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.ए. नवाब | ३९.५३% | अं.प. दरापेक्षा कमी दराने |
| २. | श्री. एस.पी. सरवदे | ३७.०१% | --//-- |
| ३. | मेसर्स फाईव्ह स्टार क.क. | ३५.१०% | --//-- |
| ४. | मेसर्स महेंद्र क.क. | ३३.००% | --//-- |
| ५. | मसर्स बी.ए. क.क. | ३१.९६% | --//-- |
| ६. | मसर्स बसरा क.क. | ३१.००% | --//-- |
| ७. | मसर्स शिवा क.क. | २७.२७% | --//-- |
| ८. | श्री. शेख क.क. | २५.८७% | --//-- |
| ९. | श्री. राजासिंग | २५.००% | --//-- |
| १०. | मसर्स कम्फर्ट क.क. | | |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.५३% कमी दराने श्री. एस.ए. नवाब यांची निविदा आहे.

मा. आयुक्तांनी दि. १३-३-९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. वरील प्रस्ताव मंजुर करुन संबंधित उपअभियंता (ड्रेनेज-२) यांनी सदरील कामावर काटेकोरपणे देखरेख करुन कामाचा दर्जा चांगला राहील याची दक्षता घ्यावी असे सुचविण्यात आले आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. बसैय्येनगर, बायजीपुरा नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३९.५३% कमी दराची श्री. एस.ए. नवाब यांची निविदा स्विकारणेस स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४२/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,कल्पतरु गृहनिर्माण संस्था, गारखेडा येथे रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामाचे सन १९९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने रक्कम रु. ९६,१८६=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते (खडी) मधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तरखेपर्यंत एकुण (१६) सोळा निविदा पत्रके विक्री झाल्या असुन निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (९) नऊ निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.डी. पहुळ | ४०.२५% | कमी दराने |
| २. | श्री. एस.एम. मंडोरे | ३६.३०% | --//-- |
| ३. | श्री. बदरबिन सालम | ३४.९९% | --//-- |
| ४. | श्री. जहीर अहमदखॉन | २७.०५% | --//-- |
| ५. | श्री. सुखबिरसिंग | ३२.०५% | --//-- |
| ६. | श्री. आर. बी. चव्हाण | ३३.३०% | --//-- |
| ७. | श्री. राजसिंग | ३२.९९% | --//-- |
| ८. | श्री. संजय राठोड | ३०.३०% | --//-- |
| ९. | श्री. एस.ए. देशमुख | २३.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०.२५% दराने श्री. एच.डी. पहुळ यांची निविदा आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले रक्कम रु. ९६,१८६/- चे काम श्री. एच.डी.पहुळ यांच्या कडुन ४०.२५% कमी दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कल्पतरु गृहनिर्माण संस्था गारखेडा येथे रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ४०.२५% कमी दराची श्री. एच.डी. पहुळ यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४३/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला शहानुरवाडी सर्व्हे नं. १६ पैकीचे १५ मिटर रुंद विकास रस्त्याचे खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ८,११,१२०=०० चे तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती विषय क्र. ९ दि. २७-१२-९७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (३१) एकतीस निविदा विक्री झाल्या असुन त्यापैकी निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (१२) बारा निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुखबिरसिंग | ४३.०५% | कमी दराने |
| २. | श्री. एस.एच. असोशिएट्स | ४२.४३% | --//-- |
| ३. | श्री. बदरबिन सालम | ४०.९९% | --//-- |
| ४. | श्री. ए.एम. फारुकी | ४०.४१% | --//-- |
| ५. | श्री. आर.बी. चव्हाण | ३९.४०% | --//-- |
| ६. | श्री. शेख करिम | ३६.००% | --//-- |
| ७. | श्री. शिवा कन्स्ट्रक्शन | ३३.९९९% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | श्री. महेंद्र कंन्स्ट्रक्शन | ३३.००% | --//-- |
| ९. | श्री. रेणुका कंन्स्ट्रक्शन | ३८.०५% | --//-- |
| १०. | श्री. हायवे कंन्स्ट्रक्शन | २२.९९९% | --//-- |
| ११. | श्री. कुलवंतसिंग | ४०.३६% | --//-- |
| १२. | श्री. अब्दुल सलाम | ३३.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया जास्त व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४३.०५% कमी दराचे श्री. सुखबिरसिंग यांची निविदा आहे.

तरी सदरील काम ४३.०५% कमी दराने श्री. सुखबिरसिंग यांच्याकडुन करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी स.नं. १६ पैकीचे १५ मिटर रुंद विकास रस्त्याचे खडी रस्ता तयार करण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ४३.०५% कमी दराची श्री. सुखबिरसिंग यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४४/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरात विविध ठिकाणी ३ सेट सोडीयम व्हेपर दिवे लावणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४,९६,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविण्यात आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण बारा कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. सुरेश इलेक्ट्रीकल्स | ५.००% | जास्त दर |
| २. | मे. सुवर्णा इलेक्ट्रीकल्स | ५.००% | जास्त दर |
| ३. | मे. बिटा इलेक्ट्रीकल्स | ५.००% | कमी दर |
| ४. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | १.००% | कमी दर |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. बिटा इलेक्ट्रीकल्स यांचे निविदा पत्रकांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.०० टक्के कमी आहेत. परंतु त्यांना १% इसारा रक्कम न भरल्याने त्यांची निविदा रद्द करुन मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या १% कमी दराच्या निविदेस मान्यता मिळाली आहे.

तरी मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या कडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्के कमी दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**मा. सभापती :** स्विकृतीसह मंजुरी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध ठिकाणी थ्री सेट सोडियम व्हेपर दिवे लावणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. बिटा इलेक्ट्रीकल्स यांनी १% इसारा रक्कम न भरल्याने त्यांची निविदा रद्द करुन मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४५/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हायकोर्ट जंक्शन येथे स्वयंचलित वाहतुक संकेताक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३५९०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तिन कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखपर्यंत यापैकी तिनही निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. फर्रानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक लॅब | १६.००% | कमी दर |
| २. | मे. न्युक्लीऑनिक्स पुणे | १२.४०% | कमी दर |
| ३. | मे. मल्ट्रॉन | ००.००% | कमी दर |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. फर्रानी इले. ॲण्ड इलेक्ट्रॉनिक लॅब यांचे निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.००% कमी आहेत.

तरी मे. फर्रानी इले. ॲण्ड इले. लॅब यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.००% कमी दराने करुन घेण्या बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हायकोर्ट जंक्शन येथे स्वयंचलित वाहतुक संकेतांक बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १६% कमी दराची मे. फर्रानी इले. ॲण्ड इले. लॅब यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४६/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बजरंग चौक येथे स्वयंचलित वाहतुक संकेतांक बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. ४,४२,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी तिनही

निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मेल्ट्रॉन | ०% | कमी दर |
| २. | मे. न्युक्लीऑनिक्स | १२.४०% | कमी दर |
| ३. | मे. फर्रानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक लॅब | १६.१०% | कमी दर |

वरील प्राप्त निविदा पत्रका पैकी मे. फर्रानी इले.ॲण्ड इलेक्ट्रॉनिक लॅब यांचे निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.१०% कमी आहेत.

तरी मे. फर्रानी इले. ॲण्ड इले. लॅब यांच्या कडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.१०% कमी दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बजरंग चौक येथे स्वयंचलित वाहतुक संकेताक बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १६.१०% कमी दराची मे. फर्रानी इले. ॲण्ड इले. लॅब यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४७/१६ :**

औरंगाबाद रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे फाटकावर पैठण रस्त्यावर उड्डाणपुल बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. औरंगाबाद शहर मंजुर विकास योजने नुसार हा रस्ता ३० मिटर रुंद आहे. सध्या नगर भुमापन क्र. १९०५४,१९०५३ या दोन मिळकती उड्डाण पुलाच्या सेवा रस्त्या करिता (सर्व्हिस रोड) आवश्यक आहेत. रेल्वेस्टेशन कडील सेवा रस्त्याचे काम वरील भाग सोडुन पुर्ण झालेले आहे. संबंधित मिळकतीचे मालक जमिन देण्यांस तयार आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

१) न.भु.क्र. १९०५४ मिळकत धारकांचे नांव श्रीमती राबीयाबी भ्र. शेख चॉद बाधित क्षेत्र २३.३७ चौ.मी. असुन खाजगी वाटाघाटीने मोबदला रक्कम रु. ३०,२८७=०० निश्चित केलेली आहे यावर खरेदीखत खर्च रु. ३१००/- एवढा राहील आणि

२) न.भु.क्र. १९०५३ मिळकतधारकाचे नांव श्री. दगडु संतु पाटील तर्फे अर्जदार १) गंगाधर दगडु पाटील २) श्रीमती मंजुळाबाई दगडु पाटील बाधित क्षेत्र ५७.५० चौ.मी. असुन खाजगी वाटाघाटीने मोबदला रक्कम रु. ७४,५२०/- निश्चित केलेली आहे. यावर खरेदी खताचा खर्च रुपये ७५००/- राहील. खरेदीखताचा खर्च मनपाने निम्मा व मिळकत धारकांने निम्मा करावयाचा आहे. करिता सदर रक्कम वळती करुन या वजा पुढील प्रमाणे देय राहील.

१) न.भु.क्र. १९०५४ रुपये २८,७३७/- (अठ्ठाविस हजार सातशे सदोतीस रुपये)

२) न.भु.क्र. १९०५३ रुपये ७०,७७०/- (सत्तर हजार सातशे सत्तर रु.)

करिता वरील रक्कम जमिन मालकास जमिनीचा मोबदला म्हणुन द्यावयाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर

प्रस्ताव मान्यतेनंतर सदर जमिनीचे संबंधित मिळकत धारकाकडुन नोंदकृत खरेदीखत करुन घेण्यात येईल. त्यासाठी लागणारी रक्कम रु. ३१००+७५००= रु. १०,६००/- (दहा सहाशे) श्री. डी.डी. कालेले शा. अ. यांना अग्रिम म्हणुन देण्यात यावी.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन जवळील रेल्वे फाटकावर उड्डाणपुल बांधण्या करिता(सर्व्हीस रोड) सेवा रस्त्याकरिता बाधीत मिळकती न.भु.क्र. १९०५४ चे मिळकतधारक श्रीमती राबियाबी भ्र. शेख चॉद यांना निश्चित केलेला मोबदला रु. ३०,२८७/- व न.भु.क्र. १९०५३ चे मिळकतधारक श्री. दगडु संतु पाटील तर्फे १) गंगाधर दगडु पाटील व २) श्रीमती मंजुळाबाई दगडु पाटील यांना निश्चित केलेला मोबदला रु. ७४,५२०/- देण्यास तसेच सदरील खरेदी खताचा अर्धा खर्च रु. ७५००/- उरोक्त मोबदल्यातुन वजा जाता १९०५४ चे मिळकतधारकास रु. २८,७२७/- तसेच न.भु.क्र. १९०५३ चे मिळकतधारकास रु. ७०,७७०/- अदा करण्यास त्याचप्रमाणे खरेदी खता करिता रक्कम रुपये १०,६००/- (दहा सहाशे) अग्रिम रक्कम श्री. डी.डी. कालेले, शाखा अभियंता यांना देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४८/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्तावा दिला की, वेदान्त नगर येथील उद्यानाचे विद्युतीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३१८०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तेरा निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यौपकी प्राप्त निविदा फक्त सात निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. ओम शांती इलेक्ट्रीकल्स | २७.५% | कमी दर |
| २. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स | ७.११% | कमी दर |
| ३. | मे. गजानन इलेक्ट्रीकल्स | १८.९०% | कमी दर |
| ४. | मे. लाईटवेल इलेक्ट्रीकल्स | २५.२०% | कमी दर |
| ५. | मे. शाम इलेक्ट्रीकल्स | ७.२०% | कमी दर |
| ६. | मे. नितिन इलेक्ट्रीकल्स | २२.५०% | कमी दर |
| ७. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | १८.००% | कमी दर |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. ओम शांती इलेक्ट्रीकल्स यांचे निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.५०% कमी आहेत.

तरी मे. ओम शांती इलेक्ट्रीकल्स याच्या कडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.५०% कमी दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांन्त नगर येथील उद्यानाचे विद्युतीकरण करणेच्या कामा करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २७.५०% कमी दराची मते. ओम शांती इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. आयुक्त :** पं. गोविंदराव जळगांवकर यांचे नाथ शष्ठीच्या वेळेस निधन झाले त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. १=०० मिनिटे सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.
(१=०० मिनिटे स्तंब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**विषय क्र. ५४९/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्तावा सादर केला की, बायजीपुरा येथील मनपा प्रा. शाळेवर पाहिला मजला बांधणे या कामासाठी र.रु. ८,२४,९१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्या सर्वसाधारण सभा ठराव क्र. २२३/१६ दि. ३०-३-९८ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी आता पावेतो दोन वेळेस निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यापैकी प्रथम निविदेच्या वेळेस तिनल निविदा प्राप्त झाल्या होत्या. या तिनही निविदे सोबत आवश्यक असणारी ई.एम.डी. जोडण्यात आलेली नव्हती त्यामुळे फेरनिविदा काढणे बाबत मा. आयुक्तांनी दि. ३०-८-९७ रोजी आदेशित केले. त्यानुसार दुसऱ्यांदा निविदा मागविल्या असता एकही निविदा दर भरुन प्राप्त झाली आहे. सदर कामाचे मुळ अंदाजपत्रक हे सन १९९५-९६ च्या जिल्हा दरसुची नुसार करण्यात आलेले होते.

आता स.नगर सेविका यांच्या मागणी नुसार सन १९९६-९७ च्या जिल्हा दरसुची नुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ८,६२,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. २०-३-९८ रोजी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ८,६२,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखा शिर्ष मधुन प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बायजीपुरा येथील मनपा शाळेवर पाहिला मजला बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या सुधारीत अंदाजपत्रक र.रुपये ८,६२,०००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५०/१९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नारेगांव ते मिसारवाडी पर्यंत १५० व ३०० मी.मी. व्यासाची जलनि:सारण वाहिनी टाकावयाची आहे.

त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ३८,९२,७४०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवुन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १५२/१६ दिनांक १६-१२-९७ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवुन बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दहा (१०) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकृतीच्या नियोजित तारखेस एकुण आठ (८) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्याखालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल सलाम | १७.३% | कमी |
| २. | श्री. एम.एन. कन्स्ट्रक्शन | २७.९९% | कमी |
| ३. | श्री. एम.के. एस. गुरु ॲण्ड कंपनी | १०.१०% | कमी |
| ४. | श्री. उदय इंजिनिअरींग | १५.१०% | कमी |
| ५. | श्री. शिवा कंन्स्ट्रक्शन | २८% | कमी |
| ६. | श्री. एलोरा कंन्स्ट्रक्शन | २३.११% | कमी |
| ७. | श्री. राणा कंन्स्ट्रक्शन | २६.०९% | कमी |
| ८. | श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ३.९९% | कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे. शिवा कंन्स्ट्रक्शन यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी असा दर दिलेला आहे.

तरी मे. शिवा कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव ते मिसारवाडी पर्यंत १५० व ३०० मी.मी. व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २८% कमी दराची मे. शिवा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५१/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कैसरकॉलनी भागात ट्रेन्चेसचे व किरकोळ पॅचेसचे खडीकरण करणेच्या कामासाठी दि. १७-९-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २०६/५ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. २,०२,२१८=०० ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/६५/९७ दिनांक ८-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (९) नऊ निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस (०२) दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल कदिर शेख रहीम | १.२२% | जास्त दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. मोहंमद अहमद सिद्यीकी | ८% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.२२% जास्त दराने श्री. अब्दुल कदिर शेख रहीम यांची निविदा आहे.

तसेच सदरील कामाचे ठेकेदाराने निविदा भरते वेळी निविदेत १.२२% जास्त या दराने निविदा कार्यालयास सादर केलेली असुन दर जास्त असल्यामुळे त्यांना मा. आयुक्तांचे दालनात दराच्या वाटाघाटीसाठी प्रत्यक्ष बोलवून वाटाघाटीव्दारे त्यांनी सदरचे काम हे निविदेत दिलेल्या दरापेक्षा १.२२% जास्तच्या ऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिलेली आहे.

करिता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री. अब्दुल कदिर शेख रहीम यांची निविदा असुन मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैसर कॉलनी भागात ट्रेन्चेसचे व किरकोळ पॅचेसचे खडीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी नुसार सदरील काम श्री. अब्दुल कदिर शेख रहिम यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५२/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ७ मधील मेहेबुब नगर व वानखेडे नगर भागातील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी दिनांक ३-१०-९७ रोजीच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्रमांक २४७/२ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ३,००,४६०/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/७३/९७ दि. २३-१०-९७ अन्वये प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (१८) अठरा निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण आठ (०८) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मो. सलीम | ३७.१०% | कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ३५% | कमी दराने |
| ३. | श्री. बदरबिन सालम | २७.९९% | कमी दराने |
| ४. | श्री. एस.एम. मंडोरे | २६.१०% | कमी दराने |
| ५. | श्री. राजसिंग | २५.९९% | कमी दराने |
| ६. | श्री. नरेंद्र शेट्टी | २५.८५% | कमी दराने |
| ७. | श्री. सुधिर कुलकर्णी | २०% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.१०% कमी दराने श्री. मो. सलीम यांची निविदा असुन प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ७ मधील महेबुब नगर व वानखेडेनगर भागातील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३७.१०% कमी दराची श्री. मो. सलीम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५३/२२ :**

सेक्रेटरी दिलरस एज्युकेशन कलचरल ॲण्ड लिटररी सोसायटी, औरंगाबाद यांनी दिलरस कॉलनी आसिफबाग येथील मंजुर रेखांकनातील खुली जागा लेडिज क्युनिटी सेंटर हॉल करिता भाडेपट्टयावर विकसित करण्याकरिता देण्याबाबत मागणी केली आहे. सदरील खुली जागा महानगरपालिकेने मो. आसिफबाग स.नं. १ व २ करिता मंजुर केलेल्या मंजुर रेखांकनामधील असुन नोंदणीकृत दस्तऐवजाने महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली आहे. हया खुल्या जागेचे क्षेत्र १९७५ चौ.मी. एवढे आहे.

विकास नियंत्रण नियमामधील तरतुदीनुसार व महानगरपालिकेचे प्रचलित धोरणात्मक सदरील जागा संस्थेची मागणी विचारात घेता सदर संस्थेत ३० वर्षाचे कालावधी करिता नेहमीचे अटीस व शर्तीस पात्र राहुन भाडेपट्टयावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर अटी व शर्ती बाबत संबंधीतास कळवुन त्या अटी व शर्तीची पुर्तता करुन घेऊन करारनामा करुन खुली जागा विकसित करण्याकरिता संस्थेस हस्तांतरीत करण्याची कार्यवाही मालमत्ता अधिकारी कडुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेक्रेटरी, दिलरस, एज्युकेशन ॲण्ड लिटररी सोसायटी औरंगाबाद यांनी दिलरस कॉलनी आसिफबाग येथील स.नं. १ व २ करिता मंजुर केलेल्या मंजुर रेखांकना मधील खुली जागा जिचे क्षेत्रफळ १९७५ चौ.मी. एवढे आहे. तया जागेची मागणी केल्या नुसार सदरील जागा संस्थेस ३० वर्षाचे कालावधी करिता नेहमीचे अटी व शर्तीस पात्र राहुन भाडेपट्टयावर देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५४/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महाविर चौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्यावर लावण्याकरिता २५० वॅट सोडियम व्हेपर फिटींग खरेदी करण्यासाठी रक्कम रु. २४१२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील फिटींग खरेदी करण्याकरिता दरपत्रके मागविण्यात आली असता दरपत्रके विक्रीच्या स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच दरपत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | साहित्याचे नांव |
|---|---|---|
| | | २५० वॅट सोडियम फिटींग २५० वॅट |

| | | प्रत्येक नग साठी. | |
|---|---|---|---|
| १. | मे.मोनार्थ एंटरप्रायझेस | २६३०=०० | ६००=०० |
| २. | मे. शांतीदेव इंटरप्रायझेस | ३०००=०० | ७००=०० |
| ३. | मे. पगारिया इंटरप्रायझेस | २७२७=०० | ५७९=०० |
| ४. | मे. दानिश सेल्स कार्पोरेशन | २५७५=०० | ६९०=०० |
| ५. | मे. फिलिंप्स इंडिया लि. | ३१२०=०० | ५३०=०० |

वरील प्राप्त दरपत्रकापैकी २५० वॅट फिटींग करिता मे दानिश सेल्स कार्पोरेशन यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे र.रु. २५७५/- प्रत्येक फिटींग करिता व २५० वॅट बल्ब करिता मे. फिलिप्स इंडिया लि.यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे र.रु. ५३०/- प्रति करिता असे आहेत.

तरी वरील प्रमाणे प्राप्त कमी दर मंजुरी बाबतच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. तसेच अंदाजपत्रक र.रु. २४१२००/- चे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाविर चौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्यावर लावण्याकरिता २५० वॅट सोडियम व्हेपर फिटींग खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर २५० वॅट फिटींग प्रती फिटींग रु. २५७५/- मे. दानिश सेल्स कॉर्पोरेशन व २५० वॅट बल्ब करिता मे. फिलीप्स इं.लि. यांचे प्रति बल्ब रु. ५३०/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५५/२४ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरात विविध ठिकाणी लावण्याकरिता १५० वॅट सोडियम व्हेपर फिटींग खरेदी करण्याकरिता रक्कम रुपये ४,६८,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील फिटींग खरेदी करण्यकरिता दरपत्रके मागविण्यात आली असता दरपत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण पांच दरपत्रके प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | साहित्याचा तपशिल | |
|---|---|---|---|
| | | १५० सोडियम व्हेपर फिटींग | १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब |
| | | (दर प्रति नग) | |
| १. | मे. फिलिप्स इंडिया लि. | २९९०=०० | ४८५=०० |
| २. | मे. पगारिया इंटरप्रायझेस | २४२१=०० | ५४९=०० |
| ३. | मे. दानिश सेल्स कार्पोरेशन | २२००=०० | ५७५=०० |
| ४. | मे. मानार्च इंटरप्रायझेस | २३४२=०० | ५००=०० |
| ५. | मे. शांतीदेव इंटप्रायझेस | २७८०=०० | ५६०=०० |

वरील प्राप्त दरपत्रकापैकी १५० वॅट फिटींग करिता मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे र.रु. २२००/- प्रत्येक फिटींग करिता व १५० वॅट बल्ब करिता मे. फिलिप्स इंडिया लि. यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे र.रु. ४८५/- प्रति बल्ब असे आहेत.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक व वरील दर्शविल्याप्रमाणे सदरील साहित्यासाठी प्राप्त कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध ठिकाणी लावण्याकरिता १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग खरेदी फिटींग करिता मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांचे सर्वात कमी म्हणजे र.रु. २२००/- प्रति फिटींग व १५० वॅट बल्ब करिता मे. फिलिप्स इंडिया लि. यांचे प्रति बल्ब ४८५/- या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५६/२५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भावसिंगपुरा ते वळदगांवकडे जाणारी मुख्य जलनि:सारण वाहिनी मेन सिव्हर "अ" ७०० व ८०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक २०-१२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असुन सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभा दि. १०-१२-९७ रोजी ठराव क्रमांक १५१/१५ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली असुन रितसर निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/८८/९७ दि. २६-१२-९७ अन्वये निविदा मागविण्यात आली असता एकुण दोन (२) निविदा प्राप्त झाल्या असुन त्यांचे दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मेसर्स शिवा कंन्स्ट्रक्शन | ११% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीच्या दराने |
| २. | श्री. सलीम पटेल | १७% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% जास्त दराची निविदा मेसर्स शिवा कंन्स्ट्रक्शन दरापेक्षा ११% जास्त दराची निविदा मेसर्स शिवा कंन्स्ट्रक्शन यांची असुन मा. आयुक्तांनी गुत्तेदारासमक्ष २% जास्त दराने काम करण्यांस वाटाघाटी अंती ठरविलेले आहेत.

करिता मेसर्स शिवा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त मंजुरी व विचारार्थ सादर. सदरील काम शासकीय अनुदान (दोन कोटी) ९७-९८ च्या शिर्षकामधुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा ते वळद गांवाकडे जाणारी मुख्य जलनि:सारण वाहिनी मेन सिव्हर "अ" ७०० व ८०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम करिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी नुसार सदरील काम मे शिवा कंन्स्ट्रक्शन यांचे कडुन अं.प. दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.
या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र. ५५७/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथे संगित कारंज्या भोवती संरक्षक ग्रिल व फुटपाथ बनविण्याच्या कामासाठी सन १९९७-९८ खात्याचे डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १,४७,३००/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च संगित कारंज्यासाठी ठेवलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे संगित कारंज्या भोवती संरक्षक ग्रिल व फुटपाथ बनविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,४७,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५८/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी येथे सर्व्हे नं. ३३ मधील रेखांकनामध्ये खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ३,२६,१३३=०० चे तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती विषय क्र. ५/ दि. १७-१२-९७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२४) चोविस निविदा विक्री झाल्या असुन त्यापैकी निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (११) अकरा निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.एच. असोशिएटस | ४२.५५% | कमी दराने |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ४१.३६% | --//-- |
| ३. | श्री. बदरबिन सालम | ४०.९९% | --//-- |
| ४. | श्री. रेणुका कंन्स्ट्रक्शन | ३९.००% | --//-- |
| ५. | श्री. सुखबिरसिंग | ३८.०५% | --//-- |
| ६. | श्री. आकाश कंन्स्ट्रक्शन | ३६.८६% | --//-- |
| ७. | श्री. संतोष झाल्टे | २३.०५% | --//-- |
| ८. | श्री. हायवे कंन्स्ट्रक्शन | २३.९९९% | --//-- |
| ९. | श्री. पी.एम. कुलकर्णी | २९.०६% | --//-- |
| १०. | श्री. आर. बी. चव्हाण | ३९.१०% | --//-- |
| ११. | श्री. शिवा कंन्स्ट्रक्शन | ३३.५५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४२.५५% कमी दराने श्री. एस.एच. असोशिएटस् यांची निविदा आहे.

तरी सदरील काम ४२.५५% कमी दराने श्री. एस.एच. असोशिएटस यांच्या कडुन करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथे स.नं. ३३ मधील रेखांकना मध्ये रस्ते तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ४२.५५% कमी दराची श्री. एस.एच. असोशिएटस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५९/२८ :**

कामधेनु सहकारी गृहनिर्माण संस्था जाधवाडी येथे जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. १,९४,५९४/- चे तयार करण्यात आले होते सदर अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९५-९६ च्या दर सुचीनुसार तयार करण्यात आलेले असुन त्यावर होणार खर्च सन १९९७-९८ मधील भांडवली कामे जलनिःसारण या लेखा शिर्षकातुन करण्यात येत आहे. आतापर्यंत या कामावर रक्कम रुपये १,४९,५९४/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. सदर कामाला यापुर्वी स्थायी समिती ठराव क्र. ९८/२४ दि. १८-६-९७ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामामध्ये वाढ होत असुन या प्रस्तावित कामामध्ये २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. वाहिनी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. योग्य तो आणि नैसर्गिक उतार देण्यासाठी जलनिःसारण वाहिनी टाकतांना पाईप खोलावर टाकावे लागत आहे. या कामामध्ये २५७ लांबीचे काम करतांना खोली वाढत असुन चेंबरची संख्या, उंची व व्यास वाढत असल्यामुळे अंदाजपत्रकाच्या रक्कमेतसुध्दा वाढ होत आहे. त्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ३,४०,०९२/- एवढे तयार करण्यात आले असुन त्यापैकी या अगोदर मंजुरी मिळालेली रक्कम रु. १,९४,४९४/- असुन वाढीव अंदाजपत्रक रक्कम रुपये १,४५,४९४/- ला मंजुरी मिळणेस्तव प्रस्तावा स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कामधेनु सहकारी गृहनिर्माण संस्था, जाधवाडी येथे जलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामामुळे चेंबरची संख्या, उंची व व्यास तसेच खोली वाढल्यामुळे वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. १,४५,४९४/- व पुर्वीची रक्कम रुपये १,९४,५९४/- असे एकुण सुधारित अंदाजपत्रक र.रु. ३,४०,०९२/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६०/२९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, युनुस कॉलनी मोतीवाला फंक्शन हॉल समोरील ले आऊटच्या मोकळया जागेवर बहुउद्देशिय हॉल बांधणे या कामासाठी सन १९९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये ९,९९,६००/- चे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. २३-३-९८ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी रक्कम रुपये ९,९९,६००/- चे ढोबळ अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरील कामाचा खर्च नविन वाचनालय इमारती बांधणे यामधुन प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे युनुस कॉलनी, मोतीवाला फंक्शन हॉल समोरील ले आऊटच्या मोकळया जागेवर आलेल्या रक्कम रु. ९,९९,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६१/३० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १२ फुलेनगर (आंबेडकरनगर) येथे मंगल कार्यालय बांधणे या कामासाठी रक्कम रुपये १०,००,०००/- चे ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास मा. आयुक्तांनी दि. २०-३-९८ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी उपरोक्त कामास्तव रक्कम रुपये १०,००,०००/- ढोबळ अंदाज पत्रकाचा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर. उपरोक्त कामाचा खर्च हा व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षातुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १२ फुलेनगर (आंबेडकरनगर) येथे मंगल कार्यालय बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६२/३१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महानगरपालिका गरवारे स्टेडियम येथे पोल रोवुन त्यावर सोडियम व्हेपर दिवे लावुन विद्युत व्यवस्था करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) दरसुचीनुसार (१९९७-९८) रक्कम रुपये ४,८५,७७२=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९७-९८ च्या "क्रिडा संकुल बांधकाम" या लेखाशिर्ष खाली करण्यात येईल.

तरी र.रु. ४,८५,७७२/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका गरवारे स्टेडियम येथे पोल रोवुन त्यावर सोडियम व्हेपर दिवे लावुन विद्युत व्यवस्था करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,८५,७७२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६३/३२ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महानगरपालिका गरवारे स्टेडियम येथील वेस्ट पॅव्हेलियन बिल्डींगचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (विद्युत) दर सुचीनुसार (१९९७-९८) रक्कम रु. १,१८,३३६=०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९७-९८ च्या "क्रिडा संकुल बांधकाम" या सदरा खाली करण्यात येईल.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१८,३३६=०० चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका गरवारे स्टेडियम येथील वेस्ट पॅव्हेलियन बिल्डींगचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,१८,३३६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६४/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, नाथ सिड्स ते नक्षत्रवाडी या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. २१ लाखाच्या अंदाजपत्रकास मा. सर्वसाधारण सभेची पत्रके मिळालेली आहे. सदरील कामाकरिता निविदा पत्रके मागविण्यात आली असता एकुण तेरा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. बी.जे. इलेक्ट्रीकल्स | ५.००% | जास्त दर |
| २. | मे. गजानन इलेक्ट्रीकल्स | १.००% | कमी दर |
| ३. | मे. दानिश सेल्स कार्पोरेशन | १.००% | कमी दर |
| ४. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स | ०.१०% | कमी दर |

वरील प्राप्त निविदा पत्रकामध्ये मे. गजानन इलेक्ट्रीकल्स व मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असुन सारखेच म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी असे आहे.

वरील दोन्ही एजन्सीचे दर सारखेच प्राप्त झालेमुळे दोन्ही एजन्सी कडुन पुन्हा बंद पाकीटात दर मागविण्यात आले असता त्यांचे दर खालील प्रमाणे प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | मे. दानिश सेल्स कार्पोरेशन | २९.१७८% | कमी दर |
| ४. | मे. गजानन इलेक्ट्रीकल्स | २७.००% | कमी दर |

वरील दोन्ही एजन्सीपैकी मे. दानिश सर्वात कमी सेल्स कार्पोरेशन यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.१७८% कमी असे आहेत.

तरी मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांचे २९.१७८% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाथ सिड्स ते नक्षत्रवाडी या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. दानिश सेल्स कॉर्पोरेशन यांची अं.प. दरापेक्षा २९.१७८% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६५/३४ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, रोषनगेट येथे "हायमस्ट" बसविण्याच्या कामाकरिता रक्कम रुपये १०=०० लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९८-९९ च्या "सोडियम दिवे लावणे" या तरतुदी मधुन करण्यात येईल.

तरी रक्कम रुपये १०=०० लाखाचे अंदाजपत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोषनगेट येथे हायमास्ट लाईट बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १०.०० लाखाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६६/३५ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रगती कॉलनी घाटी येथे उद्यान विकसित करणेचे कामाबाबत अंदाजपत्रक रु. ४,२८,०००/- एवढयाचे तयार करुन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. २८६/८/ दि. १६-१०-९७ रोजी मंजुरी घेण्यात येऊन निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्री झाल्या व स्विकृतीची दि. २०-१२-९७ पर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि. २३-१२-९७ रोजी मु. लेखाधिकारी यांचे दालना ात उघडण्यात आल्या असता प्राप्त निविदांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १. | सफवान कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे दर. |
| २. | एस.ए. नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराचे दर. |

या अनुषंगाने प्राप्त निविदेत तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे श्री. सफवान कंन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे दर प्राप्त आहे.

सबब तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच श्री. सफवान कंन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराचे दर विचारार्थ व मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रगती कॉलनी घाटी येथे उद्यान विकसित करणेचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराची व अं.प. दरापेक्षा

२% कमी दराची श्री. सफवान कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६७/३६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १२ येथील गौतम बुध्दाच्या पुतळयाभोवती संरक्षित भिंत बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रु. १,१४,५००=०० एवढयाचे सा.बां. विभागाच्या सन ९७-९८ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

सबब रु. १,१४,५००/- चे अंदाजपत्रक सन ९८-९९ च्या तरतुदी मधुन सदर काम करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १२ येथील गौतम बुध्दाच्या पुतळयाभोवती संरक्षित भिंत बांधण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १,१४,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६८/३७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लक्ष्मीनगर, देशमुख नगर रेखांकन आणि फल्पगार आ.पी. नाथ रेखांकना मधील खुली जागा विकसित करणेसाठीचे अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या सां.बा. विभागाच्या दरसुची अन्वये रु. २,७०,०००/- एवढयाचे तयार करण्यात आले असुन तयास मा. आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदर कामावर होणारा खर्च न्यायालयीन वादामुळे बंद असलेल्या कामाच्या रक्कमेतुन करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लक्ष्मीनगर, देशमुख नगररेखांकन आणि फुल्पगार आर.पी. नाथ रेखांकनामधील खुली जागा विकसित करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६९/३८ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. सिध्दार्थनगर येथे १०० मी.मी. व्यासाची व १५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु.जी. ड्रेनेज लाईन काढुन नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,९९,०००/- ला दि. २४-११-९७ ला विषय क्र. ३२३/५ ने स्थायी समितीने ठराव संमत केलेले आहे. सदरील कामाची निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/८४/९७ दि. १२-१२-९७ अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देवुन मागविल्या असता एकुण २२ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी ७ निविदा प्राप्त झाल्या, त्यांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मेसर्स राणा कंन्स्ट्रक्शन | ३०.०९% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| २. | श्री. सुरेश सादवानी | २९.७०% | --//-- |
| ३. | मेसर्स शिवा कंन्स्ट्रक्शन | २८.८०% | --//-- |
| ४. | श्री. सय्यद अथर अली | २६.०१५ | --//-- |
| ५. | श्री. मन्नान खॉन | २४.८६% | --//-- |
| ६. | श्री. मो. सोहेल सिद्यीकी | २२.०८% | --//-- |
| ७. | मेसर्स खर्डीकर कंन्स्ट्रक्शन | २०.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणेज अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०९% कमी दराची निविदा मेसर्स राणा कंन्स्ट्रक्शन यांची आहे, सदरील निविदा दिनांक २६-३-९८ ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ नगर येथे १०० मी.मी. व्यासाची व १५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु. जी. ड्रेनेज लाईन काढुन नविन २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी सर्वात कमी दराची व अं.प. दरापेक्षा व अं.प. दरापेक्षा ३०.०९% कमी दराची मेसर्स राणा कंस्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७०/३९ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गिरजादेवी महिला प्राथमिक ग्र.स. संस्था नोंदणी क्र. अेजीडी/सी.ओएन/३६५/९८/ दि. २१ जाने. ९८ या नोंदणीकृत संस्थेने महिलांना रोजगार उपलब्ध करुन देणे व स्वावलंबी बनविणे या उपक्रमाकरिता सिध्दार्थ गार्डन जवळील सुलभ शौच्यालयाच्या दक्षिणेकडील नाल्याची जागा मागणी केली असुन त्यांनी तसेच झांबड इस्टेट जवळील नाल्याची जागेचीही मागणी केली आहे.

तथापि सदर प्रकरणात सहाय्यक संचालक, नगररचना व शहर अभियंता यांचा अभिप्राय घेण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित संस्थेस वरील दोन्ही नाल्याचे जागांपैकी एक नाल्याची जागा शासनाची मंजुरी घेऊन देता येईल.

प्रस्ताव मंजुरी नंतर नाल्याची जागा प्रदान करावयाची कार्यवाही ही शासनाने मंजुरी दिल्यानंतर प्रत्यक्ष जागा हस्तांतरापुर्वी जागेववर सिमांकन करुन उपलब्ध नुसार नाला जमिनीची क्षेत्र संबंधित संस्थेस हस्तांतरीत करण्यात येईल.

सदर जागेचे भाडे हे सहाय्यक संचालक नगररचना हे निश्चित करतील ते भाडे मानय करावे लागेल.

तरी सदर वरील दोन्ही नाल्याच्या जागेपैकी एक नाला जागा देण्यासाठी मा. स्थायी समितीसमोर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गिरजादेवी महिला प्राथमिक ग्रा.स.संस्था या नोंदणीकृत संस्थेस महिलांना रोजगार उपलब्ध करुन देणे व स्वावलंबी बनविणे या उपक्रमाकरिता सिध्दार्थ गार्डन जवळील सुलभ शौच्यालयाच्या दक्षिणेकडील नाल्याची जागा किंवा झांबड इस्टेट जवळील नाल्याची जागा या जागांपैकी एका सहाय्यक संचालक, नगर रचना हे निश्चित करतील त्या भाडयाने संस्थेस देण्यात सर्वानमुते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७१/४० :**

कार्यकारी अभियंता, (पा.पु.व.ज.नि) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जकात नाक्यावर बिनतारी संदेश व्यवस्था करावयाची आहे. त्यासाठी सर्वेक्षण अहवालानुसार रक्कम रु. १५,५०,७००/- एवढा खर्च येणार आहे. त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १४७/४/ दिनांक २०-११-९६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८६/९७ जी की, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यात येवुन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण पाच(५) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण चार (४) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.ऋषी डाटा नेट प्रा.लि. | ९,३९,७००/- |
| २. | मे. पंजाब वायलेस सिस्टीम लि. | १०,१५,२००/- |
| ३. | मे. महाराष्ट्रा इलेक्ट्रीक कार्पोरेशन | १०,१८,५५०/- |
| ४. | मे. टेलिमॅटीक इंजिनिअरिंग प्रा.लि. | १२,३७,०४५/- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे. ऋषी डाटा नेट प्रा.लि. यांचा आहे. म्हणजेच रक्कम रुपये ९,३९,७००/- एवढा आहे. त्यास मान्येस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जकात नाल्यावर बिनतारी संदेश यंत्रणा बसविण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच रु. ९,३९,७००/- या मे. ऋषी डाटा नेट प्रा.लि. यांच्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७२/४१ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गुलाबवाडी (घाटी) येथे म.रा.वि. मंडळ पोल टाकण्यासाठी म.रा.वि.मं. कोटेशन रु. २,०३,६६०/- आलेले आहे. त्यानुसार अंदाजपत्रक तयार केले आहे.

सदरील खर्च नविन पोल या सदरातुन करण्यांत येईल. तरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलाबवाडी (घाटी) येथे म.रा.वि.मं. चे पोल टकाण्यासाठी कोटेशन रक्कम रु. २,०३,६६०/- म.रा.वि.मं. कडे भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७२/अ/४२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शांतीपुरा ते भिमनगर भावसिंगपुरा रोडवर विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ९,८६,६७४/- चे अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाकरिता निविदा पत्रकमे मागविण्यात आली असता निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली, प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर आलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल्स | ०.१% | कमी दर |
| २. | मे. दानिश सेल्स कॉर्पोरेशन | १.१% | कमी दर |
| ३. | मे. गजानन इलेक्ट्रीकल्स | ६.००% | जास्त दर |
| ४. | मे. बी.जे. इलेक्ट्रीकल्स | ५.००% | जास्त दर |
| ५. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ०.१०% | कमी दर |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे. दानिश सेल्स कापौरेशन यांची निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१०% कमी असे आहेत.

तरी सदरील काम मे. दानिश सेल्स कॉर्पोरेशन यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१०% कमी दराने करुन घेणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शांतीपुरा ते भिमनगर भावसिंगपुरा रोडवर विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १.१०% कमी दराची मे. दानिश सेल्स कार्पोरेशन यांची निविदा स्विकरणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

**श्री. संजय जोशी :** महानगरपालिका क्षेत्रात विज फार मोठया प्रमाणात जळते. तेव्हा सालार पध्दत करता येईल. काय याची शहानिशा करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** एनर्जी सेव्हर बाबत मागे विचारणा केली होती काय झाले याची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** याबाबत ५ स. सदस्यांची एक समिती गठीत करण्यांत येईल. त्यात ३ स.सदस्य राहतील तर २ बाहेरील स.सदस्य राहतील आणि सदरील समिती योग्य तो निर्णय घेईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** जे महानगरपालिकेतील कर्मचारी १४ वर्षापासुन पंप चालक आय.टी.आय. कोर्स पास आहेत. त्यांना रु. ९५०-१२००/- या वेतनश्रेणी ऐवजी रु. १४००-२३०० अशी वेतनश्रेणी द्यावी.

**मा. सभापती :** प्रशासनाने तपासणी करुनच योग्य तो निर्णय घ्यावा.

**विषय क्र. ५७३/४३ :**

श्री. एन.ए.वाहुळ व टी.डी. राजपुत यांचे अपिलावर विचार विनिमय करणे.

**संवाद**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहानुरवाडी श्रीकृष्णनगर येथे अनाधिकृत वसाहती झालेल्या आहेत. याबाबत प्रशासनाने मालमत्ता अधिकारी, श्री. एन.ए. वाहुळ व नगर रचनाकार, श्री. टी.डी. राजपुत यांना निलंबित केले होते. याचे बाबतीत चौकशी केली असता समितीने श्री. एन.ए. वाहुळ यांना निर्दोष मुक्त केले आहे. तर श्री. टी.डी. राजपुत यांचे बाबतीत सक्त ताकीद देणेची चौकशीत म्हटले आणि त्या नुसार त्यांची एक वर्षिक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे तेव्हा त्यांचे अपिलावर आज निर्णय देण्यात यावा.

**मा. सभापती :** ठिक आहे. स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने मालमत्ता अधिकारी, श्री. एन.ए. वाहुळ यांना निर्दोष सोडल्याने व दोषमुक्त केल्याने त्याचप्रमाणे नगररचनाकार श्री. टी.डी. राजपुत यांना चौकशीत सक्त ताकीद देण्याचे सुचविले आहे. त्यास अनुसरुन या दोन्हीही अधिकाऱ्यांचे वार्षिक वेतनवाढ जी रोखलेली आहे. ती रद्द करुन पुर्ववत चालु करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. एन.ए. वाहुळ मालमत्ता अधिकारी व श्री. टी.डी. राजपुत, तत्कालीन नगररचनाकार यांना स.नं.७ शहानुरवाडी येथील विनापरवानगी बांधकाम प्रकरणी आयुक्तांनी दोषी ठरवुन जी एका वर्षासाठी वेतनवाढ रोखण्या बाबत निर्णय दिला तो उपरोक्त अधिकारी सदर कालावधीत कार्यालयीन व निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याने शिवाय विना परवानगी बांधकाम प्रकरणे विनाबिलंब व नियमाप्रमाणे हाताळल्याने चौकशी अधिकारी यांनी श्री. एन.ए.वाहुळ यांना निर्दोष मुक्त केलेले आहे. मात्र श्री. टी.डी. राजपुत याचे वरील अंशतः जबाबदारी लक्षात घेता त्यांना "कारणे दाखवा नोटीस" देवुन समज देऊन उपरोक्त दोघांचे निलंबन रद्द करुन त्यांना निलंबन कालावधीत त्याचे खाती देय असलेल्या रजेत रुपांतरीत करण्याची मंजुरीस स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सर्व ठरावांना सभेत स्विकृती देण्यांत येते.

या बरोबर "जन गण मन" राष्ट्रगिताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ३०-३-९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सभापती स्थायी समिती मा. प्रभाकर सिताराम विधाते यांचे अध्यक्षतेखाली दि. ३०-३-९८ रोजी दुपारी अंदाजे ४=३० वा. बैठक झाली. तिचे इतिवृत्त. बैठकीची सुरुवात वंदेमातरम् या गिताने झाली सभेस अधिकारी सह स. सभासद उपस्थित होते. (हाजरी रजिस्टर प्रमाणे.)**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | स.सदस्य |
| २) | स.स.श्री. त्रिंबक तुपे | --//- |
| ३) | स.स.श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ४) | स.स.श्री. विकास जैन | --//-- |
| ५) | स.स.श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ६) | स.स.श्री. अब्दुल रशिदखॉन (मामु) | --//-- |
| ७) | स.स.श्री. म.अ.रऊफ म.अ. माबुद | --//-- |
| ८) | स.स.श्री. स.अली मिरा सलामी | --//-- |
| ९) | स.स.श्री. संजय जोशी | --//-- |
| १०) | स.स.श्री. गौतम लांडगे | --//-- |
| ११) | स.स.सौ. यशोदा वाडेकर | --//-- |
| १२) | स.स.श्री. गांगवे बन्सी | --//-- |
| १३) | स.स.श्री. बंडु ओक | --//-- |

**संवाद**

**श्री. जयवंत ओक :** शहरात कुत्र्यांचा सुळसुळाट फारच मोठया प्रमाणात असुन या बाबत प्रशासनाने खबरदारी घ्यावी.

**पशुधन विकास अधिकारी :** एप्रिल ९७ ते एप्रिल ९८ पर्यंत एकुण ४१९७ कुत्रे पकडण्यात आलेले आहे. प्रत्येक महिन्याला पकडलेली आहे. त्याचप्रमाणे रात्रीच्या वेळेस सुध्दा कुत्रे पकडण्याचे कामे या विभागामार्फत करण्यात येणार आहे. यासाठी दै. वेतनावरील १० मंजुराची आवश्यकता आहे.

**मा. सभापती :** सकाळच्या सत्रात आणि सायंकाळी अशा दोन माळयात मोकाट कुत्र्यांना पकडण्याची कार्यवाही करावी.

**श्री. जयवंत ओक :** कुत्रे पकडण्याची मोहिम मोठया प्रमाणात राबवावी कारण चावा घेतल्यानंतर त्यासाठी चे बाजारात इंजेक्शन उपलब्ध नाही. व ते महागडे आहे. यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. रशिद मामु :** कुत्रे पक्रडल्यानंतर कुत्रे पकडुन सोडता किंवा त्यांना मारुन टाकता याची माहिती द्यावी.

**पशुधन विकास अधिकारी :** कुत्र्यांना पकडुन इंजेक्शन दिल्या जाते. तसे शासनाचे जी.आर. आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावे लागते.

**श्री. संजय जोशी :** मनपाच्या दवाखान्यात ॲन्टी बायोटिक हा प्रभाग सुरु करावा व जनतेला सुविधा द्याव्यात या बाबत प्रशासनाने काय मत आहे.

**सौ. वाडेकर :** गेल्या दोन वर्षापासुन मी सतत बोलत आहे की, माझ्या वार्डातील मकबुल मिस्त्रीचे अतिक्रमण का हटवित नाही.

**सहा. संचालक नगररचना :** दि. २-४-९८ रोजी या बाबत संबंधित व्यक्तींला चर्चा करणेसाठी बोलविले आहे. त्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** संबंधित व्यक्तींला बोलावुन वाटाघाटी करण्यापत येईल.

**सहा संचालक नगररचना :** संबंधित व्यक्तींनी जागेच्या मोबदल्याची मागणी केलेली आहे. त्यासाठी वाटाघाटी व्दारे निर्णय घ्यावा लागेल.

**सौ. वाडेकर :** गेल्या वर्षापासुन या बाबतची कार्यवाही होत नाही. याचे कारण काय? १५ फुटाचा रोड मध्ये त्यांनी अतिक्रमण केलेले आहे.

**मा. सभापती :** संबंधित व्यक्तींला बोलवुन प्रशासनाने चर्चा करावी व कागदपत्र तपासणी करुन जागेची मालकी कोणाची आहे. त्यानुसार मोबदला देण्याची कार्यवाही करावी.

**त्रिंबक तुपे :** जाफरगेट भागात त्या ठिकाणी अनाधिकृत टपऱ्या बसलेल्या आहेत. जवळपास ६३ लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. आणि त्यांचेकडुन मनपा भाडे वसुली सुध्दा करीत नाही याचे कारण काय?

**मालमत्ता अधिकारी :** त्या ठिकाणच्या टपऱ्या अनाधिकृत आहेत आणि त्या काढुन टाकणे बाबतचा कार्यक्रम ठरलेला आहे.

**श्री. मिरा सलामी :** या भागातील टपऱ्या सन ९५ च्या पुर्वीच्या आहेत तेव्हा सर्वसाधारण सभेच्या ठरावाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** पुढील बैठकीत या बाबत माहिती द्यावी.

**श्री. मिरा सलामी :** माझ्या वार्डात डुकरांचा फार मोठया प्रमाणात सुळसुळाट झालेला असुन त्यामुळे नागरिकांना त्रास होतो आहे. या बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. गेल्या दिड वर्षापासुन मी सतत बोलत आहे.

**मा. सभापती :** या बाबत पुढील बैठकीत माहिती द्यावी.

**श्री. भगवान घडामोडे :** मागील बैठकीत एन-७ सिडको भागात पाण्याच्या टाकीबाबत चर्चा झालेली होती. त्यानुसार काय कार्यवाही झाली.

**कार्यकारी अभियंता पा.पु. :** या संदर्भात निविदा काढल्या नंतर दिड पट निविदा आल्याने सेव्हरेज बोर्ड कडुन माहिती घेऊन स्थायी समितीमध्ये देण्यात येईल.

**श्री. भगवान घडामोडे :** या निविदामध्ये तफावत दरामध्ये का आले याची माहिती द्यावी.

**श्री. गौतम लांडगे :** या वर्षीच्या आणि मागिल वर्षीच्या दरात फारच मोठया प्रमाणात तफावत दिसते तेव्हा योग्य ती माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता पा.पु. :** सन ९६-९७ चे दराप्रमाणे ६९.०० टक्के कमिची निविदा प्राप्त झाली यासाठी मुख्य अभियंता प्राधिकरण यांचे कडुन डि.एस.आर.दर मागवुन पुढील बैठकीत माहिती देण्यांत येईल.

**श्री. गौतम लांडगे :** पिसाळलेल्या कुत्र्यांचे इंजेक्शन आपल्याकडे उपलब्ध आहेत काय?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** ४०० डोसेजचे इंजेक्शन उपलब्ध आहेत.

**विषय क्र. ५७४/१ :**

अति. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गुलशन महल मुख्य रस्त्यावर सोडियम व्हेपर पोल बसवुन लाईट व्यवस्था करणेकरिता र.रु. २,८३,४२०/- चे अंदाजपत्रक सा.बां. जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असुन सदरील काम "पोल शिफ्टींग" या लेखा शिर्षाखाली करण्यांत येईल. सदर खर्च ९७-९८ च्या तरतुदीतुन प्रस्तावित आहे. यासा मा. आयुक्तांची मंजुरी मिळाली आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुलशनमहल मुख्य रस्त्यावर सोडीयम पोल बसवुन लाईट व्यवस्था करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. २,८३,४२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७५/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. स्टॅंडर्ड कॉलनी, पैठण रोड लगत २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी रक्कम रु. २,७६,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील अं.प. परिसर अभियांत्रिकीय विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यांत आले असुन सदर खर्च जलनिःसारण भांडवली कामे या लेखा शिर्षकातुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. स्टॅंडर्ड कॉलनी पैठणरोड लगत २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,७६,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७६/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गोधडीपुरा संजयनगर स्लम येथे गादीया पार्क लगतच्या गल्लीत खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता सां.बा. खात्याच्या वर्ष ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,१७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन सदर काम "खडी रस्ते" शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक २५-१०-९७ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. गोधडीपुरा संजयनगर स्लम येथे गादीयापार्क लगतच्या गल्लीत खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,१७,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७७/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्वामी विवेकानंद उद्यान येथे लहान मुलांना खेळण्याकरिता विविध प्रकारची खेळणी बसविण्याचे कामाचे अंदाजपत्रक उपलब्ध असलेल्या युनीक अम्युमेंट पुना यांचे कॅटलॉग मधील दरानुसार तयार करण्यांत आलेले आहे. हया खेळणी बसविण्याचे अंदाजपत्रक रु. २,९८,०००/- चे तयार करण्यांत आलेले असुन मान्यतेनंतर प्रस्तावित खेळण्याचे करिता वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करुन दरपत्रक मागविण्यात येतील. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वामी विवेकानंद उद्यान येथे लहान मुलांना खेळण्याकरिता विविध प्रकारची खेळणी बसविण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. २,९८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७८/५ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, राणी लक्ष्मीबाई महिला कल्याण मंडळ, औ.बाद नो.क्र.एमडी/एमुजी/१०३ या संस्थेस निजामोद्दीन दर्गा रोड वरील महानगरपालिका शॉपिंग सेंटर या दुकान क्र. ७ व ८ च्या पहिल्या मजल्या वरील जागा दिर्घ मुदतीनंतर देणेचे बाबत ठरले आहे. त्यानुसार प्रकरणात मा. स.स.न.र. आणि मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय घेण्यात आला आहे. त्यानुसार प्रस्तावात दर्शविलेली जागा संबंधित संस्थेस सहाय्यक संचालक नगररचना हे जे भाडे निश्चित करतील ते भाडे मान्य करावे लागेल. आणि मनपा पनेल वरील उपलब्ध असलेले वास्तुशास्त्रज्ञ यांचे अभिप्रायानुसार संस्थेने नगर रचना विभागाकडुन रितसर बांधकाम परवानगी घ्यावी. लागेल.

सबब राणी लक्ष्मीबाई महिला कल्याण मंडळ, औरंगाबाद या संस्थेस निजामोद्दीन दर्गा रोड वरील म.न.पा. शॉपिंग सेंटर मधील दुकान क्र. ७ व ८ पाहिल्या मजल्या वरील जागा इतर अटीशर्ती नुसार ३० वर्षेच्या मुदतीवर देणे बाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**संवाद**

**मा. सभापती :** या ठिकाणी जागेची पाहणी करुन देता येत असेल तरच प्रशासनाने द्यावे त्यास मंजुरी देण्यांत येते.

**मा. सभापती :** मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राणी लक्ष्मीबाई महिला कल्याण मंडळ, औरंगाबाद जीचा पंजीकृत क्र. एमडी/एयुजी/१०३ असा आहे. या संस्थेस निजोमोद्दीन दर्गा रोड वरील महानगरपालिका शॉपिंग सेंटरच्या दुकान क्र. ७ व ८ च्या पहिल्या मजल्यावरील जागा दिर्घ मुदतीवर देणे बाबत ठरले आहे. त्यानुसार सहा संचालक नगररचना व शहर अभियंता यांचे अभिप्रायानुसार व नगररचना विभाग जे भाडे निश्चित करेल ते भाडे मान्य करुन मनपा पॅनेलवर उपलब्ध असलेले वास्तुशास्त्रज्ञ यांचे अभिप्राय नुसार नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगी घ्यावी. या व इतर अटी शर्तीनुसार ३० वर्षाच्या मुदतीवर सदरील संस्थेस जागा देण्यांस स्थायी समिती स्विकृतीसह मंजुरी देते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७९/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. म्हाडा कॉलनी (गृहनिर्माण भवनजवळ) येथे नवीन आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या ९५-९६ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३,१८,०००/- ला विषय क्र. ३१०/९ दिनांक २८-१०-९७ रोजी स्थायी समिती ने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार

वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी देवुन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण बत्तीस (३२) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण दहा (१०) निविदा सिलबंद प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. जी.के. पवार | ३१.९७% | कमी दराने |
| २. | श्री. नंदकुमार घोडेले | ३०.३०% | --//-- |
| ३. | श्री. मे. राणा कंन्स्ट्रक्शन | ३०.०५% | --//-- |
| ४. | मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन | २७.४०% | --//-- |
| ५. | श्री. राधेशाम शर्मा | २५.१०% | --//-- |
| ६. | श्री. रमेश सईसमुद्र | २५.००% | --//-- |
| ७. | श्री. मो. सोहेल सिद्यीकी | २४.३०% | --//-- |
| ८. | श्री. एस.एच. असोशिएट | २१.२१% | --//-- |
| ९. | श्री. एस.ए. देशमुख | १९.८६% | --//-- |
| १०. | मे. हायवे कंन्स्ट्रक्शन | १२.९९% | --//-- |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. जी.के. पवार यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.९७% कमी दराची श्री. जी.के. पवार यांची निविदा असुन दिनांक २१-३-९८ रोजी त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.९७% कमी दराची श्री. जी.के. पवार यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. म्हाडा कॉलनी (गृहनिर्माण भवनजवळ) येथे नविन आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता मागविण्यांत आलेल्या निविदापैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.९७% कमी दराची निविदा श्री. जी.के. पवार यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८०/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल टाकी ते हडको कॉर्नर या दरम्यान १५० मी.मी. ए.सी. जलवाहिनी टाकणे. ज्याचा अंदाजपत्रकीय खर्च रु. २,८४,५००/- एवढा आहे. कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता निविदा दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत खालील निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संदिप विखे | २३.२३% | कमी दराने |
| २. | श्री. एम.एस. काथार | २६.९०% | --//-- |
| ३. | श्री. सय्यद अथर अली | २७.५७% | --//-- |
| ४. | श्री. एजाज अहेमद | १५.१०% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री. मोहम्मद जावेद | २९.८०% | --//-- |
| ६. | श्री. सोहेल सिद्यीकी | २७.७७% | --//-- |
| ७. | श्री. सिद्यीकी सर्फराजोद्यीन | १५.००% | --//-- |
| ८. | श्री. विपुल कंन्स्ट्रक्शन | २७.५१% | --//-- |

वरील आठ प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. मोहम्मद जावेद यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा २९.८०% कमी दराची आहे.

तरी सर्वात कमी दराची निविदा श्री. मोहम्मद जावेद यांची २९.८०% कमी दराने स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल टाकी ते हडको कॉर्नर या दरम्यान १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.८०% कमी दराची श्री. मोहम्मद जावेद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८१/८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा गाव ते नाल्यापर्यंत १०० (फुट) विकास रस्त्याच्या बाजुने नाली बांधणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या ९६-९७ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,७७,९३७/- ला विषय क्र. दि.

रोजी स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देवुन निविदा मागविण्यांत आल्या असता एकुण (३३) तेहतीस कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत प्राप्त झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण सतरा (१७) निविदा सिलबंद प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. बदरबिन सालम | ३८.९९% | कमी दराने |
| २. | मे. रेणुका कंन्स्ट्रक्शन | ३८.००% | --//-- |
| ३. | श्री. विलास गो. जाधव | ३७.५०% | --//-- |
| ४. | मे. एस.एच. असोशिऐट | ३६.६३% | --//-- |
| ५. | मे. निलरंग कंन्स्ट्रक्शन | ३३.०३% | --//-- |
| ६. | मे. महेंद्र कंन्स्ट्रक्शन | ३३.००% | --//-- |
| ७. | मे. हायवे कंन्स्ट्रक्शन | ३२.९९% | --//-- |
| ८. | श्री. ए.एम. फारुकी | ३१.३२% | --//-- |
| ९. | श्री. अरंविद पवार | ३०.००% | --//-- |
| १०. | मे. संजीवनी कंन्स्ट्रक्शन | २९.६९% | --//-- |
| ११. | श्री. सुखबिरसिंग | २८.०५% | --//-- |
| १२. | मे. कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन | २५.७८% | --//-- |
| १३. | श्री. नंदकुमार घोडेले | २५.७८% | --//-- |
| १४. | श्री. एस.एच. देशमुख | २४.१७% | --//-- |
| १५. | श्री. मो. सोहेल सिद्यीकी | २२.००% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | श्री. एम.जी. डिडोरे | २१.८०% | --//-- |
| १७. | श्री. सिद्यीकी सरफराजउद्यीन | १५.०५% | --//-- |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया कमी दर हा श्री. बदरबिन सालम यांची निविदा असुन सदरील निविदेला दिनांक २६-३-९८ रोजी मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.९९% कमी दराची श्री. बदरबिन सालम यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा गांव ते नाल्यापर्यंत १०० (फुट) विकास रस्त्याच्या बाजुने नाली बांधणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.९९% कमी दराची श्री. बदरबिन सालम यांनी निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८२/९ :**

दि. २१-१-९७ च्या श्री. सुभाष तायडे, नाका जवान मनपा औरंगाबाद यांचे निलंबन आदेशाविरुध्दचे अधिनियमाचे कलम ५६(४) अन्वये अपिलावर निर्णय घेणे.

**संवाद**

**मा. सभापती :** १) श्री. सुभाष तायडे नाका जवान मनपा औरंगाबाद यांना सन १९९७ मध्ये लाचलुचपत खात्याचे लाच घेतांना रंगेहात पकडले होते. व त्यानुसार सिडको पोलिस स्टेशन औरंगाबाद यांनी कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल केल्याने प्रशासनाने त्यांना निलंबित केले. त्यांनी मुंबई प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) नुसार स्थायी समितीकडे अपील केले. सदरील अपिलावर खालील प्रमाणे निर्णय देण्यांत येतो.

**ठराव :**

१) महानागरी सेवा शिस्त व अपील नियम नुसार ४८ तासपेक्षा जास्त कालावधीत पोलीस कस्टडीत होते. संबंधितावर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यालयामधुन अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.

२) महानगरपालिका ही स्वायत्ता संस्था असुन कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांच्या जमा झालेल्या करातुनच देण्यांत येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यास निलंबित ठेवुन ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.

३) उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या आधिन राहुन रद्द करण्यांची शिफारस सर्वसाधारण सभेकडे करण्यांत येते.

४) संबंधिताचा निलंबन काळ हा न्यालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहीत धरण्यात यावा. संबंधितांना कामावर रुजु करण्याचे आदेश द्यावेत. प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यास मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८३/१० :**

दि. २६ फेब्रुवारी १९९८ च्या श्री. शेख मुनीर शेख चॉद दु. आवेक्षक श्री. अ. नसीर अब्दुल अजीज, मजुर मनपा यांचे निलंबन आदेशाविरुध्दचे अधिनियमाचे कलम ५६(४) अन्वये अपीलावर निर्णय घेणे.

**संवाद**

**मा. सभापती :** श्री. शेख मुनीर शेख चॉद दुय्यम आवेक्षक, व श्री. अ. नसीर अब्दुल अजीज यांनी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) नुसार स्थायी समिती कडे अपील केलेले आहे. सदरील अपीलावर खालील प्रमाणे निर्णय देण्यांत येतो.

**ठराव :**

१) महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियम ४ नुसार ४८ तास पोलिस कस्टडीत नव्हते. संबंधितावर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयामधुन अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.

२) महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असुन कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांच्या जमा झालेल्या करातुनच देण्यांत येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यास निलंबित ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.

३) उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन रद्द करण्यात येते.

४) संबंधिताची निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहीत धरण्यात यावा संबंधिताना कामावर रुजु करण्याचे आदेश द्यावेत. प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८४/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, पन्नालालनगर ते मुथीयान कॉर्नर रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,९९,९९५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पांच कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी पांचही निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | ३१.३४% | कमी दर |
| २. | श्री. मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ३१.००% | --//-- |
| ३. | श्री. मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | २५.७१% | --//-- |
| ४. | श्री. चांदराम आशान्ना | १०.००% | --//-- |
| ५. | श्री. मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | ५.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.३४% कमी दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा आहे. तरी निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पन्नालालनगर ते मुथीयान कॉर्नर या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३१.३४% कमी दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र. ५८५/१२ :**

दि. १८-९-९३ च्या श्री. कांतीलाल मिस्त्रीलाल बोथरा क. लिपीक महानगरपालिका औरंगाबाद यांचे निलंबन आदेशाविरुध्दचे अधिनियमाचे कलम ५६(४) अन्वये अपीलावर निर्णय घेणे.

**संवाद**

**मा. सभापती :** श्री. कांतीलाल मिस्त्रीलाल बोथरा क. लि. मनपा औरंगाबाद यांना सन १९९३-१९९७ मध्ये लाचलुचपत खात्याने लाच घेतांना रंगेहात पकडले होते व त्यानुसार सिडको पोलिस स्टेशन औरंगाबाद यांनी कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल केल्याने प्रशासनाने त्यांना निलंबित केले. यांनी मुंबई प्रा. मनपा अधि १९४९ चे कलम ५६(४) नुसार स्थायी समितीकडे अपील केले. सदरील अपीलावर खालीलप्रमाणे निर्णय देण्यांत येतो.

**ठराव :**

१) महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियम ४ नुसार २४ तास पोलिस कस्टडीत नव्हते. संबंधितावर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयामधुन अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.

२) महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असुन कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांच्या जमा झालेल्या करातुनच देण्यांत येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यास निलंबित ठेवुन ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.

३) उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन रद्द करण्याची शिफारस सर्वसाधारण सभेकडे करण्यात येते.

४) संबंधिताची निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहीत धरण्यात यावा संबंधिताना कामावर रुजु करण्याचे आदेश द्यावेत. प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यास मंजुरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८६/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, रोकडिया हनुमान कॉलनी अंतर्गत व हॉटेल मिंगलिग समोरील मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करणे व वार्डातील पॅचेसेच काम करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९०,२०६४/- च्या अंदाजपत्रकीय स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार कोरी निविदापत्रके विकल्या गेल्या व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत या पैकी चारही निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाले प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | २३.९९% | कमी दर. |
| २. | श्री. डी. अजितसिंग | २३.८८% | --//-- |
| ३. | मे. व्यकटेश कंन्स्ट्रक्शन | २२.३१% | --//-- |
| ४. | मे. मास्कोट | १८.८६% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी मे आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. याचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.९९% कमी आहेत.

तरी मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.९९% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोकडिया हनुमान कॉलनी अंतर्गत व हॉटेल मिंगलिग समोरील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे व वार्डातील पॅचेसचे काम करणेसाठी मागविण्यांत आले निविदापैकी तुलनात्मकदृष्टया व अं.प. दरापेक्षा २३.९९% कमी दराची मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८७/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मराठवाडा विद्यापीठ ते बौध्दलेणी पर्यंतच्या रस्त्यावर डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. ३-१०-९७ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. २५१/६ अन्वये अंदाजपत्रक र.रु. १,६१,३००/- ला मंजुरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचन क्र. मनपा/लेखा/नि/७३/९७ दि. २३-१०-९७ व्दारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकुण (४) निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण (४) चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. चांदराम कंन्स्ट्रक्शन | २९% | कमी दराने |
| २. | श्री. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | २१.९७% | --//-- |
| ३. | श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | १७% | --//-- |
| ४. | श्री. मे. मास्कॉट | १०.८६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९% कमी दराने श्री. चांदराम एन आशन्ना यांची निविदा असुन मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मराठवाडा विद्यापीठ बौध्दलेणी पर्यंतच्या रस्त्यावर डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी

व अं.प. दरापेक्षा २९% कमी दराची श्री. चांदराम एन आशान्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८८/१५ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सचिव आयॉन नॅशनल स्पोर्टस क्लब औरंगाबाद जा.क्र. महा./९५/१९९६ या नोंदणीकृत संस्थेने अर्ज दिला आहे की, संस्था दोन वर्षापासुन शहरात कार्यरत आहे. ज्युदा तायकवाडी, पंज्यालढत, व व्यायाम व्दारे उत्कृष्ट खेळाडु निर्माण करण्याचे काम करित आहे. सदरील संस्थेचे डॉ. काळबाडे हॉस्पीटल शेजारील मंजीत नगर या रेखांकनातील खुली जागा दिर्घ मुदतीवर मिळण्याबाबत मागणी केली आहे. वरील संस्थेस मंजीत नगर या मंजुर रेखाकंनातील खुली जागा खालील अटीशर्तीनुसार देता येईल.

१) सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १६०/१ दि. ३०-११-९६ नुसार मान्य असलेले भाडे रु. २००/- प्रतिवर्ष राहील.
२) विकास नियंत्रण नियमावली नुसार अनुज्ञेय वापरासाठी व खुल्या जागेच्या क्षेत्राचे १०% अथवा २०० चौ.मी. दोन्ही पैकी जे कमी असेल त्यासाठी रितसर बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजुरी करुन घ्यावा लागेल.
३) भाडे पट्टयाची मुदत ३० वर्षे राहील. परंतु ५ वर्षेनंतर भाडेपट्टयाचे नुतनीकरण करावे लागेल.

इतर नेहमीच्या अटी शर्तीनुसार जागा भाडेपट्टयाने देण्याबाबत मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आयकॉन नॅशनल स्पोर्टस क्लब औरंगाबाद या संस्थेस डॉ. काळबाडे हॉस्पीटल शेजारी मंजीतनगर या रेखाकंनातील जागा प्रस्तावातील अ.क्र. १ ते ३ अटी तसेच इतर नेहमीच्या अटी शर्ती नुसार दीर्घमुदतीत भाडेपट्टयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८९/१६ :**

अध्यक्षा साई अंध संस्था, औरंगाबा यांनी मौजे मालजीपुरा येथील निराला बाजार समोरील रेखांकनातील नाल्यास लागुन असलेली खुली जागा भाडेपट्टयावर मिळावी म्हणुन मागणी केली आहे. सदरील संस्था नोंदणीकृत असुन त्याचा प्रमुख उद्देश अंधाना शालेय शिक्षण, प्रशिक्षण देणे, त्यांना स्वयंरोजगार, कर्ज उपलब्ध करुन देणे असा आहे. सदरील रेखांकनातील खुली जागा संस्थेस संस्थेच्या वापराकरिता विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदी अंतर्गत विकास करण्यासाठी देण्याचा प्रस्ताव संबंधित संस्थेने हया जमिनीलगतच्या सर्व भुंखडधारकाचे ना हरकत प्रमाणपत्र आणुन द्यावे . त्यानंतरच जागेचा ताबा संस्थेस देण्यांत येईल. या अटीवर मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर आवश्यक ती कार्यवाही करारनामा ना हरकत प्रमाणपत्राची पुर्तता इ. करुन नियमानुसार मंजुर ठरावा आधारे भाडे आकारुन नेहमीच्या अटी व शर्तीस पात्र राहुन जागा देण्यांची कार्यवाही करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अध्यक्षा, साई अंध संस्था, औरंगाबाद यांनी मागणी केल्यानुसार मौजे मालजीपुरा येथील निराला बाजार समोरील रेखाकंनातील नाल्यास लागुन असलेली खुली जागा संस्थेस संस्थेच्या वापराकरिता विकास नियंत्रण नियमावलीचे तरतुदी अंतर्गत विकसित करण्यासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

निमानुसार भाडे आकारुन नेहमीच्या अटी व शर्तीस पात्र राहुन जागा देण्यांची कार्यवाही करण्यांत यावी. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९०/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, भानुदासनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ९,८८,६८५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकुण पाच कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिमतारखे पर्यंत यापैकी फक्त चार निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ३१.००% | कमी दर |
| २. | श्री. डी. अजितसिंग | २९.००% | --//-- |
| ३. | मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | २५.७१% | --//-- |
| ४. | श्री. चांदराम आशान्ना | २५.००% | --//-- |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. आदिनाथ कंस्ट्रक्शन यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.००% कमी आहेत.

तरी मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.००% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भानुदासनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.००% कमी दराची मे. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९१/१८**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, फाजलपुरा लेबरकॉलनी गणेश कॉलनी रस्ता ते शहागंज भाजी मंडई या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ७,६१,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिमतारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | २५.७१% | कमी दराने |
| २. | श्री. आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | ११.००% | --//-- |
| ३. | श्री. चांदराम एन. आशन्ना | १४.९९% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन कं. यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.७१% कमी आहेत.

तरी मे. व्यकंटेशन कंन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.७१% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फाजलपुरा, लेबर कॉलनी, गणेश कॉलनी, रस्ता ते शहागंज मंडई या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.७१% कमी दराची मे. व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.